म. ग्रं. सं. ठाणें.
विषय निबंध
सं. क्र. ३५५१

# ... माझी जात

## पद्मजा फाटक



REFBK-0027034

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागले.


1 SEP 1993

22 SEP 1993

23 OCT 1993

31 NOV 1993

15 DEC 1993

12 JAN 1994

9 JAN 1994

EB 1994

9 MAR 1994

25 MAY 1994

25 JUN 1994

20 JUL 1994

27 JUL 1994

24 AUG 1994

SEP 1996


(क्र. मा. पहा)

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
ग्रं. क्र. 3559
26038
शाखा (स्थळ प्रत)
संदर्भ
निबंध
3559
26038
REFBK-0027034

# माणूस माझी जात

## पद्मजा फाटक यांची इतर पुस्तके

### कादंबरी

हरवलेली दुनिया (अनुवादित)

### कथासंग्रह

राही

दिवेलागणी

### ललित लेखसंग्रह

गर्भश्रीमंतीचं झाड

सोनेलुमियेर

### चरित्र

शिक्षणतज्ज्ञ ताराबाई मोडक

### प्रवासवर्णन

आवजो

### बालसाहित्य

चिमुकली चांदणी (बालकथा)

चमंगख चष्टीगो (कुमार कथा)

पैशाचं झाड (कुमार कथा)

हिंदविजय सोसायटीचे पगडी आजोबा (किशोर कादंबरिका)

# माणूस माझी जात

पद्मजा फाटक

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

माणूस माझी जात
(म - ७८१)
पॉप्युलर प्रकाशन
ISBN 81-7185-615-2

MANUS MAZI JAT
(Marathi Essays)
Padmaja Phatak

© सोनिया श्रीरंग अळतेकर

पहिली आवृत्ती : १९९२/१९९४

प्रकाशक :
रामदास भटकळ
पॉप्युलर प्रकाशन प्रा. लि.
३५ सी, पं. मालवीय मार्ग
ताडदेव, मुंबई ४०००३४

मुद्रण स्थळ :
स्मिता प्रिंटर्स
१०१९ सदाशिव पेठ
पुणे ४११०३०

अक्षरजुळणी :
आशय टाईपसेटर्स
२६६ शनिवार पेठ
पुणे ४११०३०

माझ्या लेखन-वाचन-अभ्यासात
सहभागी होणाऱ्या सगळ्या
आस्थेवाईक आणि निरपेक्ष
ग्रंथपालांना

# पाठवणी

इतकी वर्षं लिहून झाल्यावरही वाटतं की छे, लिहिणं सोपं नाही. आणि इतकी वर्षं जगून झाल्यावरही वाटतं की जगणंदेखील सोपं नाहीच. आणि जगण्याबद्दल लिहिणं तर तिप्पट कठीण!

अठ्ठेचाळीशी ही खरं तर जरा थोपून, थबकून आपण आयुष्यात काय केलं आणि आयुष्यानं आपल्याला किती पोचे आणले हे चाचपडून बघायची वेळ.

अर्थात, विचार करायची भीती वाटत नसेल त्यांच्यासाठी हे. तशी वेळ अजून गेलेली नसते, काळही सर्वसाधारणपणे आलेला नसतो. एखाद्या निवांत दुपारी समवयस्क दोस्त-दोस्तिर्णींना घेऊन असा रवंथ करत बसू म्हटलं होतं पण आयुष्य फारसं कुणाला इतकं, म्हणजे सलगपणे पन्नास वर्षं जीवाभावाचं राहू देत नाही. शिवाय एक दिशा मार्गानं भरधाव जात असताना तेवढी फुरसदही होत नाही. रेसच्या घोड्याला ठेच लागून तो जायबंदी झाला तरच; एरवी रस्त्याकडेची पळती झाडं थांबणं कठीण.

अपघात, आजार, निकटवर्तियांचे मृत्यू, बाहेरून न दिसणारं शारीरिक अपंगत्व अशा गोष्टींमुळे आयुष्यभर शिताफीने डावललेले काही मूलभूत, तात्त्विक प्रश्न सुतासारखे नाकासमोर धरले जातात; तेव्हा पंचाईत तर होतेच... पण मग लक्षात येतं की अरेच्या! अजूनही आपण आंघोळ करता करता मस्त गातोबितो की!

- एका वेगळ्याच मन:स्थितीत या संग्रहाची पाठवणी करत आहे...

पुस्तक छपाईसाठी पुढे पाठविण्यापूर्वी सर्व लेख ओळीने वाचून काढले. त्या वेळी माझे मलाच ते पन्नाशीच्या प्रौढावस्थेतून चाळिशीतल्या नवथरपणाने (!) लिहिल्यासारखे वाटले. मग लक्षात आलं; एखादा अपवाद वगळता ते आहेतच माझ्या चाळिशी ते पन्नाशी या दशकातले!

'माणूस माझी जात' हा सतरा वर्षांपूर्वी अनेक शिव्या आणि ओव्याही पदरात बांधून गेलेला लेख. अद्याप त्याची पोच वाचक देतात. त्यामुळे तो नियतकालिकी प्रवाहातून वाहून जाऊ देणं बरोबर वाटलं नाही.

बाकीच्या चौदा लेखांपैकी आठ 'महाराष्ट्र टाईम्स'मधून वेळोवेळी प्रसिद्ध झालेले आहेत हा एक चांगला योगायोग...

इतर लेख 'स्त्री', 'माणूस', 'पुस्तक पंढरी', 'माहेर', 'हेमगिरी' आणि 'ऐसी अक्षरे' या मासिकांतून प्रसिद्ध झालेले आहेत.

पुस्तकाच्या प्रस्तावनेत मला आजवर कधी प्रकाशकांचे औपचारिक आभार मानावेसे वाटले नाहीत. (उपजत शिष्टपणा हेच कारण असावं.) पण माझ्या संकटकाळात श्री. रामदास भटकळ माझे प्रकाशक नसूनही माझ्या पाठीशी उभे राहिले. या ठिकाणी त्याबद्दलची कृतज्ञता नोंदवायला मला फार आनंद होत आहे.

'हास्यनित्यत्व' हे श्री. भटकळांचं एक खास सुलक्षण. (शब्दाचा कॉपीराईट : प्रा. शंकर वैद्य.) तर या प्रकाशनाच्या निमित्ताने त्यांना वाढीव सुहास्य आणि वाचकांना सुवाचन चिंतून-

मुंबई
२४ जुलै ९२

पद्मजा फाटक

# ॲपेटायझर

'माणूस माझी जात' या पुस्तकाच्या निमित्तानं मी पद्मजाच्या लेखनाबद्दल लिहावं असा तिचा आग्रह. मला समीक्षा साधणार नाही हे ती पक्कं जाणते. तरीही... (यावर कदाचित पद्मजा डोळे मिचकावत - 'तरीही नव्हे; म्हणूनच!')

पद्मजाबरोबर माझा स्नेह उण्यापुऱ्या तेवीस वर्षांचा. तिला मी एक मैत्रीण म्हणून, लेखिका म्हणून, एक व्यक्ती म्हणून पाहत आले. तिचं दैनंदिन जगणं, संकटकाळातलं (क्रायसिस) वागणं आणि तिचं लिहिणं या सगळ्यांत मला एक समान सूत्र आढळलं. ते म्हणजे 'माणूस माझी जात.'

स्वत:चं माणूसपण नेहमी सहजी; तर प्रसंगी जाणीवपूर्वक पद्मजा जपत आली आहे. कसोटीच्या क्षणीही तिनं ते गमावलेलं नाही. तिच्याच भाषेत - 'कोवळे ज्ञानकण घेत - मिळवत नव्हे - समरसून जगावं. अनपेक्षित हताशी वाट्याला आली की मिस्कीलपणे हसावं; परिस्थितीला आणि आपल्यालाही.'

माणूस हा प्राणी बुद्धीचं 'टूल' घेऊन (शब्द तिचाच) जन्मलेला. हरएक सजीव प्राणी आपलं 'टूल' वापरून जगणं सुकर करतो. मग माणसानंही आपला मेंदू कधी गहाण टाकू नये. त्याला परजत, आसमंत पारखत-निरखत, चाखत-निवडत मस्त जगावं; अशी काहीशी तिची विचारधारणा आहे.

याचा अर्थ ती मेंदूप्रामाण्यवादी आहे असा खरखरीत निष्कर्ष काढता येणार नाही. कारण पद्मजाच्या तोंडची अत्यंत जहाल संभावना म्हणजे, 'काय इन्सेन्सिटिव्ह आहे!' बुद्धीइतकंच किंवा जरा अधिकच, संवेदनक्षमता हे मूलद्रव्य ती आवश्यक मानते.

आयुष्य चांगलं किंवा यशस्वी होण्याला पद्मजाच्या मते तीन घटक आधारभूत आहेत. पहिला म्हणजे, व्यक्ती स्वत: जी कवचकुंडलं घेऊन अवतरते ती शिदोरी. यामध्ये प्रामुख्यानं आहे तुमची सामाजिक, कौटुंबिक व इतर

पार्श्वभूमी, तुमचा स्वभाव, रूप आणि बुद्धिनिर्देशांक. दुसरा म्हणजे या कच्च्या मालाचा ती व्यक्ती आविष्कार, विकास, उपयोग कसकसा साधेल तो भाग. तिसरा भाग नशिबाचा. उपजत गुणांचा विकास माणसानं साधला तरी नशीब एकदम फटका मारून खाली बसवतं.

पद्मजा स्वत:ला नशीबवान समजते. सुशिक्षित आणि मुलांना वाढवण्याची चांगली दृष्टी असणारे आई-वडील लाभले. प्रार्थनासमाजाच्या पार्श्वभूमीमुळे जातीधर्मभाषा भेदांचं विष कधी पेरलं गेलं नाही. मुलगा-मुलगी असा भेदभाव आईवडिलांनी केला नाही. 'माणूस माझी जात' मध्ये नशिबाचा हा भाग पद्मजानं स्पष्ट केला आहे.

दैवामुळे मोडक कुटुंबात झालेला जन्म सामाजिक प्रश्नांचं भान देण्याला आपसूक मोलाचा झाला. स्वतंत्र प्रतिभा आणि बुद्धिमत्ता घेऊन जन्मलेल्या पद्मजानं सतत स्वत:चा विकास साधला. ('इतपत झालं नसतं तरच नवल. हे सगळं माझ्या सभोवारात उपलब्ध होतं, घडत होतं...' - पद्मजा.) "ही ब्राह्मणं वाटतात तेवढी 'ही' नसतात असा कोवळा ज्ञानकण घेऊन त्या उतरतील. सी.के.पी.-ब्राह्मण या जबड्यामधलं केसभर तरी अंतर क्षणभर तरी यामुळे कमी होईल." ('माणूस माझी जात') अशासारखं विदारक सत्याला सामोरं जाणारं विधान ती जन्मजात समजदारीमुळे करू शकते. या संदर्भात 'बायकांचा डबा' हा लेख मला महत्त्वाचा वाटतो. 'स्त्रीशक्ती'ची सौम्य, समंजस, प्रगल्भ जाण त्यात प्रकट होते.

मुंबईच्या लोकलमधल्या बायकांच्या डब्यात पद्मजाला आयुष्यातली रंगरंगोटी, हौस आणि गाणी टिकवून धरणारी स्त्री भेटते. तिचं बाईपण सर्व थरांत, स्तरांवर प्रकटताना दिसतं; जात, वय, आर्थिक वर्ग - सगळ्यांना मागे टाकून. एकदा मूल आणि चपला दोन्हीसकट चालत्या गाडीत एका लेकुरवाळीला वर ओढून घेण्याचं वत्सल-शौर्य दाखवून झाल्यावर एका बाईकडून त्या माऊलीला सणसणीत चपराक बसते. त्यावरील पद्मजाचं भाष्य लक्षात घेण्याजोगं आहे. "सतत जीवनसंग्रामाला तोंड देणाऱ्या चेपल्या-चेपटल्या जाणाऱ्या माणसांची मानसिकता बदलल्याशिवाय कशी राहील?"

इथं पद्मजानं वापरलेला शब्द आहे - 'माणसांची मानसिकता.' 'स्त्रीची मानसिकता' नव्हे. तिच्या स्त्रीमुक्तीविषयक भूमिकेबद्दल याहून बोलकं उदाहरण शोधून सापडणार नाही.

सामाजिक प्रश्नांबद्दलच्या उपजत आस्थेतूनच पद्मजा स्त्रीमुक्तीकडे पाहते. मानवमुक्तीचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे स्त्रीमुक्ती. (आजचं जग पुरुषांसाठी

पुरुषांकरता पुरुषांनी बांधलेलं आहे. तेव्हा स्त्रियांच्या प्रश्नांना, विकासाला अग्रक्रम असायला हवा. स्वाभाविकपणे त्याबद्दलची अभिव्यक्ती तीव्र. जिथं बदल हवा तिथं बंडखोरी, क्रियाशीलता नुसती समर्थनीयच नव्हे तर आवश्यक. स्त्रीमुक्तीच्या प्रश्नाची अशी जाण असते तेव्हा तो किंवा ती कमी अधिकपणानं स्त्रीमुक्तीचा पुरस्कर्ता असतेच.)

मात्र स्त्रीवरच नव्हे तर जिथं जिथं अन्याय होत असेल तिथं तिथं (उदा. दलित, यहुदी, कष्टकरी, बालकवर्ग) त्याचा प्रतिकार व्हायला हवा अशी तिची भूमिका दिसते. त्याला लेबल लावणं अशक्य आहे. एक विशिष्ट पंथ, त्याची संहिता, नियम, शिस्त हे सगळं बुद्धिप्रामाण्याआड येणारं. कारण तिच्याच भाषेत 'माणूस हा बुद्धीचं 'टूल' घेऊन जन्मलेला.'

पद्मजाच्या मनमोकळ्या, निकोप विचारसरणीचा उगम 'सुट्टीतलं घर' मध्ये असाच सहजपणे व्यक्त झालेला दिसतो. "... अलीकडे वाटतं, सुट्टीतलं घर ही वास्तू नव्हतीच. एका वृत्तीनं काही वर्षं ते दृश्य रूप धारण केलं होतं. बोहेमियन, कनायसर, एप्क्युरियन हे सगळे शब्द मी पुष्कळ पुढे शिकले..." एकूण वृत्ती हीच पद्मजाची निकोप प्रकृती. याचा सच्चा आविष्कार इथंही भेटतो. 'आपल्या देशावर प्रेम करण्यासाठी इतर देशांचा दुस्वास करावा लागत नाही.' अशा तात्पर्यात. (द अँग्लो सॅक्सन ट्रॅजेडी.)

'द अँग्लो सॅक्सन ट्रॅजेडी'चं बीज खरं म्हणजे जीवींची नक्की आवड कळणं. निवडीसाठी पुरेशा शक्यता पुढ्यात असणं आणि '.... सोसाट्यानं जगता जगता भूतकाळाचा भरजरी पदर ओढून स्वत:ला जाब विचारणं' यात आहे. त्याचं खुसखुशीत विवरण करावं पद्मजानंच. नाहक उमाळे, हुकमी गहिवर आणि कृतक् चुका टाळून आलेली बांधिलकी, ईमान तिला लख्ख उमगलंय.

माणूस म्हणून जगत असताना माणसामाणसांतील संबंधांचं मर्म जाणून घेण्याची एक प्रक्रिया अखंडपणे पद्मजाच्या मनात चालू असल्याचं तिच्या लेखनातून उमगतं. उदा. ग्रंथपालांशी संबंध म्हणजेही 'आयुष्यातलं एक सतत उलगडत जाणारं नातं'च असतं. 'वाचनालयं म्हणजे केवळ पुस्तकांच्या कोरड्या थप्प्या आणि स्नेहशून्य मांडणी नव्हे - वाचनालयं म्हणजे सुद्धा माणसामाणसांतले संबंध - तेच खरे.' ('वाचनालयं अशी वागतात') हा प्रत्यय घेतलेली लेखिका डोळसपणे अव्याहत वाचणारी, प्रगल्भ जाणिवांची, चिंतनशील, मिस्कील मूर्ती आहे.

'सुरगाठी' या महाराष्ट्र टाइम्समधून प्रसिद्ध झालेल्या सदरातले पाच निवडक लेख या संग्रहात आहेत. माणसाला अजून नव्या असलेल्या महाशहरी

संस्कृतीत जो एक 'थोडासाच वेगळा' महाशहरी माणूस मुंबईसारख्या शहरात आकार घेत आहे त्याची जीवनपद्धती आणि शहरी नातेसंबंधांचं जिवंत, खट्याळ आणि अरुक्ष झरोका दर्शन घडवणारी ही लेखमाला होती. पण त्यापेक्षाही खोल, दूरगामी, करुणही इथं खूपसं आहे. 'झाडांवर माणसांनी आणलीय तशी माणसांवर त्यांचं पुनर्वसन करण्याची वेळ येऊ देऊ नये.' हे शल्य पद्मजाच्याही मनात आहे. पण त्याबरोबरच तसं होणार नाही या दिलाशाचे साक्षीपुरावेही (किती जड!) तिच्याजवळ आहेत.

पद्मजाचं माणूस म्हणून असलेलं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिचं अथक आणि सर्वस्पर्शी कुतूहल. त्यातही 'माणसं आणि त्यांचे परस्परसंबंध' हा विषय मध्यवर्ती असतो. चालू विषयाचं भान जराही सुटू न देता चुकार नजरेनं माणसांच्या दुनियेतलं जे तिला दिसेल ते आपण पाहिलेलंच नसतं. आजूबाजूचं हालतं विश्व ती टिपकागदासारखं सहज टिपून घेत असते.

माणसामाणसांतील संबंधांकडे प्रौढ दृष्टीने पाहणाऱ्या पद्मजाला मैत्री मात्र बाळबोध आणि शाळकरी स्वरूपातच जपायला आवडते. "ट्रॅफलगार स्क्वेअर पाहणं तर महत्त्वाचं खरंच. पण आपण तर बाई त्या भाग्यवान ट्रिपमधला अर्धा मूल्यवान वेळ खर्चूनही - त्या आपल्याला विसरल्याही असतील हे रिस्क पत्करूनसुद्धा - मैत्रिणींकडेच तडफडलो असतो." 'गर्भश्रीमंतीचं झाड' मधला हा उतारा मैत्रीच्या संकल्पनेबद्दल खूप काही सांगतो. - मैत्रीचं नातं सर्वांत महत्त्वाचं; कारण तिथं सक्ती नसते, निवड आणि ऐच्छिकता यांवर त्याची उभारणी होत असते. (तिच्याच शब्दांत, 'Water is thicker than blood') मात्र मैत्री अविभक्त निष्ठेने जपायची असते.

सध्या पद्मजाला जीवघेण्या दुखण्यानं ग्रासलं आहे. बलाढ्य आजाराशी चाललेला तिचा मुकाबला पाहून बघणारा दमतो, तर पद्मजा?

अज्ञानातला आनंद जिला कधीच भावला नाही तिनं या आजाराचा सांगोपांग अभ्यास केला आहे. ( 'Catch the bull and fight with it with all the horns, claws and paws' हा सिद्धान्त.) तरीही हसतमुख राहण्याचा आपला वसा तिनं सोडलेला नाही. वास्तवाचं संपूर्ण भान राखून तिची दुर्दम्य विनोदबुद्धी सहज प्रकट होते.

एकदा टी.व्ही. वर एक रटाळ मुलाखत चालली होती. कार्यक्रमाच्या फालतूपणाचा अंदाज घेऊन पद्मजा म्हणाली, "वा! हे बरायं, किडनी धड आहे म्हणून काय वाट्टेल ते बडबडाल की काय?"

आमच्या घरी आम्ही दररोज अंड्याची पांढरी बलकं घरच्यांसाठी ठेवून

पिवळी नोकरांना देऊन टाकतो हे पाहून तिची उत्स्फूर्त कॉमेंट, ''वा! म्हणजे पुढच्या पिढीत आता मालक सगळे टुणटुणीत हृदयांचे आणि नोकरांना सगळ्या हार्टअॅटॅकस्!''

पद्मजाच्या विनोदबुद्धीइतकीच तिची जिद्दही अंगभूत आहे. ते आपण बोलून दाखवलं तर म्हणते, ''माझी आई अशीच होती. आई-वडील काय किंवा सासू-सासरे काय, कुणाकडूनच आम्हाला हातपाय गाळण्याचं प्रशिक्षण मिळालेलं नाही.''

'द अँग्लो सॅक्सन ट्रॅजेडी' मध्ये इंग्रजी भाषेचा पाठपुरावा करायला आई निमित्त झाली असं पद्मजानं म्हटलंच आहे. तितक्याच सहजपणे ती म्हणते, ''स्वयंपाकघरात नको बाई बसायला. मला ते माझं ऑफिस वाटतं. सगळा वेळ तिथं काढायचा म्हणजे मला गुदमरायला होतं. माझ्या आईलाही चुलीवर प्रयोग करत बसायची खास आवड नव्हती.''

Empathy या शब्दाचे अर्थसार जाणून घेण्याचा पद्मजाचा अट्टाहास वरचेवर दिसून येतो. शब्दकोशात या शब्दाचा अर्थ 'The power of projecting one's personality into (and so fully comprehending) the object of contemplation' असा दिलेला आहे. पद्मजाला विचारायला जाल तर ती उत्साहाने तुम्हाला Sensitivity, Sympathy आणि Empathy या तीन शब्दांबद्दल तौलनिक ज्ञान पुरवेल.

Sensitivity (संवेदनक्षमता) म्हणजे वनस्पती ज्याप्रमाणे प्रकाशाला देतात त्याप्रमाणे एखाद्या बाह्य गोष्टीला प्रतिसाद (Response) देणे. Sympathy (सहानुभूती) म्हणजे बाहेरून दुसऱ्याच्या परिस्थितीची, भावनांची कल्पना येऊन त्याच्यासाठी कळवळा वाटणे. Empathy (सहसंवेदना) म्हणजे दुसऱ्याचं मन, भावना जणू काही त्या आपलंच मन, भावना असल्याइतक्या आतून समजणे. 'टू किल ए मॉकिंग बर्ड' मधला अॅटिकस फिंच आपल्या मुलांना सांगतो, ''You never really understand a person till you climb into his skin and around it.''

असा परमनप्रवेश करता आला तर स्वतः सुखी होत असताना इतरांच्या सुखदुःखाचं भान सुटत नाही. पद्मजा बाळंत झाली तेव्हा तिचे वडील तिला मृदूपणाने म्हणाले होते, ''कुठल्याच बाईला - अगदी मादाम क्युरीलासुद्धा - हे एक दिव्य चुकलेलं नाही बरं!'' त्यांच्या सुरांतून, डोळ्यांतून, कळवळ्यातून पद्मजाला 'एम्पथी' पोचली असावी.

अशा प्रकारची 'एम्पथी' तिनं नुकतीच अनुभवली. सध्याच्या व्याधीमुळे

घ्याव्या लागणाऱ्या डायलेसिसच्या उपचाराच्या वेळी सोळाव्या वर्षापासून या खर्चिक दुखण्याला तोंड देत असलेली बावीस वर्षांची वंदना तिला भेटे. सदा आनंदी, बडबडी अशी ही मुलगी एक दिवस हुंदके देत पडलेली. पद्मजानं खोदून विचारल्यावर कळलं, इथून पुढे दर खेपेस लागणारे पाचशे रुपये आणणं तिला अशक्य होतं. डायलेसिस घेतलं नाही म्हणजे, 'पंधरा दिवसांत ये,' असं मृत्यूला आमंत्रणच. 'सहा महिन्यांसाठी तुम्ही तिची जबाबदारी घ्या. नंतर भावी किडनी फाऊंडेशनच्या मदतीनं मी तिला जगवतो.' डॉक्टरांनी पद्मजाला शब्द दिला आणि 'मी तुझी जबाबदारी घेतली.' असं वंदनाला सांगून पद्मजा घरी आली. तिनं एका पत्रकाद्वारे आपल्या जयविजय सहकारी वसाहतीतल्या सभासदांना आवाहन केलं, 'काहीही झालं तरी मी माझं एक डायलेसिस कमी करून या मुलीला जगवणार आहे.' पत्रकाचा उपयोग जादूच्या कांडीसारखा झाला. पैशांचं झाड हलवावं तशी दहा हजार रुपयांची रक्कम उभी राहिली - तीन दिवसांत!

ही पद्मजाची गुडविल् तर खरीच; पण ज्या एम्पथी या शब्दाच्या अर्थच्छटेवर ती लट्टू झाली आहे ती या घटनेतून साकार झाली असं मला वाटतं. माझ्या कल्पनेप्रमाणे माणूस म्हणून आपला प्रवास सिम्पथीतून एम्पथीकडे असा होत राहायला हवा. या दृष्टीने पद्मजाची अनुभव घेण्याची पद्धत विचारात घेण्यासारखी आहे.

पद्मजा आणि तिची लोकप्रियता याचा हृदयंगम प्रत्ययही या निमित्तानं आला. पद्मजाचं लेखन, तिचं दूरदर्शनवरील कार्यक्रमांचं संचालन यांतून तिला उदंड चाहतावर्ग मिळाला. स्त्री-पुरुषांचा संमिश्र असा तो परिवार आहे. सर्व थरांतील आबालवृद्धांचा त्यात समावेश आहे. विजय तेंडुलकरांसारख्या मर्मज्ञ कलावंताला तिचं दूरदर्शनवरचं संचालन आवडेल. बी.एड्. च्या परीक्षेला बसणाऱ्या तरुण शिक्षिका पद्मजाची प्रश्नमालिका तयार करण्याची पद्धत उचलतील. थकूनभागून दूरदर्शनसमोर बसणाऱ्या गृहिणीला पद्मजाचं मिस्कील निवेदन वाऱ्याची शीतल झुळूक अंगावरून गेल्यासारखं श्रमपरिहारक वाटेल.

तीच गोष्ट पद्मजाच्या लेखनाविषयी. मातब्बर प्रकाशनसंस्थांतून तिच्या लेखनाबद्दल आस्थापूर्वक बोललं जाईल. नव्यानं उभे झालेले प्रकाशक तिचं साहित्य अगत्यानं स्वीकारतील. मराठी साहित्याचे जाणकार तिच्या लेखनाचं उत्साहानं स्वागत करतील तर चोखंदळ वाचक तिनं आपल्याला स्वत:कडे व दुसऱ्याकडे एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून बघण्याची दृष्टी दिली, म्हणून तिचे आभार मानतील.

असं सगळं असूनही, कौतुकाचा; प्रशंसेचा वर्षाव अखंडपणे लाभूनही ते यश 'डोक्यात जाणं' म्हणतात तसा प्रकार पद्मजाच्या बाबत झालेला दिसत नाही. मानभावीपणानं, आडवळणानं किंवा प्रकट आत्मप्रौढीनं पद्मजा चुकूनही ही रसिकमान्यता मिरवताना दिसत नाही. त्याच्या दर्पानं आपल्या क्षेत्रातल्या किंवा परिवारातल्या माणसांना ती कणभरही लहान वाटू देत नाही.

न शेफारता हे यश तिला कसं पचवता येतं याचं आश्चर्य वाटतं. प्रसिद्धीबद्दलची ही तटस्थता, मानसिक स्थैर्य तिला कसं काय साधलं, असं विचारावं तर पद्मजाचं उत्तर न्यारं असतं. "मला कळायला लागल्यापासून आई-वडिलांसकट सगळ्यांचं प्रेम, कौतुक मला मिळत गेलं. आपले लाड काय ते होतच राहणार अशा सुरक्षिततेत मी वाढले. आत्मसन्मान जपला गेला. त्यामुळे कुणी वाहव्वा केली की वाहून जायला होत नाही." हे अजब उत्तर अर्थात खास पद्मजास्टाईलमध्ये पोचवून घ्यायला हवं. त्याला अहंमन्यतेचा वास नाही. पुढे तीच म्हणते, "आणखीही एक खरं. कोणी लेखनाबद्दल किंवा कार्यक्रमाबद्दल विशेषतः अन्याय्य टीका केली की - मीही माणूसच आहे, तेव्हा - मलाही ते लागतंच. पण मुख्य म्हणजे मी विचारात पडते. टीका डोळसपणे घेण्याचा फायदा निर्मितीला होत असतोच. मात्र त्यासाठी टीकाकार व्यक्तीची तेवढी कुवत, जाण आहे असं मला वाटलं पाहिजे. नाहीतर इथं कुणाला पडलीयू ?" इथं पद्मजा खळखळून हसणार. वरती म्हणणार, "पण असं सगळ्यांचंच असेल नं? ... आणि पाठीवर चार शाबासकीच्या थापा बसतात तशा चार-दोन थपडाही मिळणारच की."

इतक्या समतोलपणे निंदास्तुतीकडे पाहता येणं सोपं नाही. त्याच्यामागे मला वाटतं, जीवनविषयक समग्र दृष्टिकोनच (सॉरी, पद्मजा) असावा. याचं एक उत्तर असंही असेल की लेखिका पद्मजा व्यक्ती म्हणून जगणाऱ्या पद्मजाशी बरीचशी एकजिनसी आहे. त्या दोन व्यक्तित्वांत प्रचंड म्हणावी अशी दरी नाही; गरजेपुरती फट असली तर. नाहीतर बुद्धीला खुराक असल्याखेरीज चैन न पडणारी पद्मजा घरगुती कर्तव्ये सहजपणे पेलताना दिसली नसती.

नव्वद साली पद्मजाला नॉर्वेला जाण्यासाठी शिष्यवृत्ती मिळाली. त्या वेळी संसाराच्या आघाडीवर गृहिणी म्हणून तीन जबाबदाऱ्या तिच्या पुढ्यात होत्या. मोठ्या लेकीचं बाळंतपण, धाकट्या लेकीचं लग्न आणि आपल्या आईचं अखेरचं आजारपण. पैकी बाळंतपण आणि लग्न तिला 'एन्जॉयमेंट'च (शब्द पद्मजाचा) वाटत होती. परदेशगमन आणि त्यासाठी अभ्यास होताच. जाण्यापूर्वी सेन्सॉर बोर्ड, अण्वस्त्रांवरील लेखन आणि 'महाराष्ट्र टाइम्स'ची नोकरी ('महाराष्ट्र

टाइम्स'च्या रविवार पुरवणीचा एक विभाग त्यावेळी पद्मजा पाहत होती.) या तिन्ही अंगीकृत व्यापांतून मोकळं व्हायचं होतं.

या सगळ्या गोष्टी सांभाळताना धावाधाव नक्कीच होत होती. पण पद्मजा गांजलेली, विटलेली दिसली नाही. चिडचिड होत असेलही केव्हातरी; पण तेही फार काळ आवडायचं नाही. काहीतरी गमतीदार वाटायचं आणि फोन यायचा, "वेळ आहे का गं दीपा? जरा हसू या?"

तिच्या नजरेतल्या खोडकर छटेत बरंचसं रहस्य आहे. आव्हानं स्वीकारली तरी ती पेलण्याची दृष्टी कदाचित तिथंच दडलेली आहे. अंग (आणि मुख्य म्हणजे मेंदू) न चोरता कोणतंही काम हातावेगळं केलं की डोळ्यांत खेळणारा खट्याळ भाव ही पद्मजाची खरी श्रीमंती. आणि काम स्वीकारण्यापूर्वी काय तो विचार. मागून कुच्चरपणा नाही हे तर व्रत आहेच.

आजारपणामुळे अमेरिकेत मिळालेली शिक्षणाची संधी तिथल्या तिथं टाकून पद्मजा परत आली आहे. लेखनाचा तिचा धडधाकटपणा, झपाटा सध्या ओसरला आहे. तरीही ताज्या परदेशभेटीतल्या अनुभवांतून नवं स्फुरत असतं. त्याची टिपणं, टाचणं चालू असतात. बाजारात नव्यानं येणाऱ्या पुस्तकांची, बोलबाला झालेल्या वृत्तपत्रीय लेखनाची दखल ती सतत घेत असते. मध्यंतरी एन. सी. पी. ए. तल्या एका कथासत्राला तिनं उठत बसत हजेरी लावली. तेव्हाही सतत तीन दिवस टिपणं काढली.

तिचं मन भोवतालातून काय काय टिपत असतं. कला, चित्रपट, साहित्य, समाजकारण, सगळ्या विश्वाबद्दल कुतूहल असतं. (शास्त्रीय संगीताची क्रशी काय सुटका झाली असावी बरं!) या निरीक्षणातून खास पद्मजा फाटक कॉमेण्टस् जन्म घेतात.

पारदर्शी हिरव्या कपातला चहा 'स्पिनॅच सूप' असतो. बाळाला बांधलेली नॅपी 'काचा मारलेलं धोतर' ठरते. आकाशातला इटुकला पक्षी कसा 'पोह्यासारखा' दिसतो. कुणी फक्त 'श्वेतश्यामल' तर कुणी 'बहुरंगी' कळलेला असतो. सचिन तेंडुलकरमुळे वांद्र्याच्या साहित्य सहवासमध्ये राहणाऱ्या अतिरथी, महारथी साहित्यिकांची विकेट पडून त्यांचा पत्ता बदललेला असतो. ते सगळे आता ' C/o सचिन तेंडुलकर' असतात.

पद्मजाच्या स्वच्छ, स्वागतशील मनाचं दर्शन तिच्या या गंभीर दुखण्यातही झालं. दुखणं एवढं विकोपाला गेलेलं असूनही कोणताही उपचार पुरेसा काळपर्यंत करून पाहायला ती कंटाळली नाही. आयुर्वेद, होमिओपॅथी, योगशास्त्र, बायोकेमिस्ट्री, आहारशास्त्र ही झालीच. अनेक तज्ज्ञांचे सल्ले घेतले. या सगळ्या

‘ऑर्डियल’ मध्ये तिचे पती श्री. शशिकांत यांचा सहभाग आहेच. (ते स्वतःचं नाव ‘शशिकांत पद्मजा फाटक’ असं सांगतात.)

हे सगळे उपाय तिनं केल्याबद्दल नवल अशासाठी की आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानावर तिची भिस्त आहे. इतर उपायांची तुच्छता केली असती तर ते साजून गेलं असतं.

हीच खुली वृत्ती तिच्या साहित्यविषयक निकषांबाबत दिसते. ‘अमका काय मोठा लिहिणार!’, ‘तमकीला काय कळतंय!’ अशी शेरेबाजी करण्याऐवजी समकालिनांच्या साहित्याची पुरेशी दखल तिने घेतली आहे. त्यातून निवड झाली असेल. त्यामुळे पद्मजा अमुक साहित्यपठडीतली, तमुक गोटातली असा शिक्का तिच्यावर मारता येणार नाही.

माणसं बुद्धीवर भरवसा ठेवून जगतात.

ती प्रयत्नवादी असतात.

एकमेकांचा आब ठेवून समाजात, नात्यांत वागतात.

एकमेकांची प्रतिष्ठा सांभाळतात.

- असंच असतं.

नोकराचाकरांपासून सर्वांची पुरेपूर दखल घेत फिरल्यावर तिला जर म्हटलं, “तू घरी आल्यावर सगळ्यांची मनःपूर्वक विचारपूस करतेस.” तर “पण हे किती प्राथमिक आहे. माणसामाणसांनी असंच तर वागायचं असतं ना? त्यात ग्रेट काय?”

अखेर डायलेसिसच्या दिव्याला आठवड्यातून दोनदा तोंड देण्याचं कर्म उभं राहिलंच. आता मूत्रपिंडरोपणाच्या शस्त्रक्रियेखेरीज स्वाभाविक जगणं दुरापास्त अशी तिची अवस्था आहे. यथावकाश ती शस्त्रक्रिया होईल आणि पद्मजा रोगमुक्त होईल.

पद्मजाचं जगण्यावर नितान्त प्रेम आहे. मग जगण्याचं ‘पर्पझ’ काय असावं? या प्रश्नाचं तिचं उत्तर आहे,

“मस्त मजा करणं.”

‘माणूस माझी जात’ वाचणाऱ्यांना भेटणार आहे ‘मजा अशीही करता येते’ हे अनुभवलेली पद्मजा.

मुंबई
२४ जुलै ९२

दीपा गोवारीकर

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| माणूस माझी जात | ... १ |
| द अँग्लो सॅक्सन ट्रॅजेडी | ... १३ |
| वाचनालयं अशी वागतात | ... २३ |
| कॅशिया | ... ३६ |
| खेळणी | ... ४५ |
| सुट्टीतलं घर | ... ५५ |
| गच्ची आणि आपण | ... ६६ |
| महानगरातील माणसें | ... ७२ |
| अनुबंध | ... ७८ |
| बायकांचा डबा | ... ८२ |
| सर्किट | ... ९० |
| बिनचेहेऱ्याचं चिटपाखरू | ... ९६ |
| मिर्चमसाला | ...१०० |
| कहाणी साहित्तिकेची | ...१०८ |
| मालवते दिवे | ...११५ |

# माणूस माझी जात

नुकतीच मी - मलाही अचानक- प्रार्थनासमाजाच्या एका मेळाव्याला हजर राहिले होते. मेळावा इतक्या मोजक्या मंडळींचा आणि कौटुंबिक पातळीवरचा होता की स्वागतकारांनी, 'प्रार्थनासमाजाच्या संस्थापकांपैकी एक श्री. परलोकवासी वामन आबाजी मोडक यांची पणती आणि पणतजावई (कसं म्हणतात ?!!) आजच्या समारंभात उपस्थित आहेत!' असं आमचं जाहीर स्वागतही केलं.

या कार्यक्रमात अध्यक्षा सुलभाबाई पाणंदीकरांनी अध्यक्षपदावरून एक वेधक किस्सा सांगितला. समाजाच्या संस्थापकांपैकी एक, डॉ. भांडारकर म्हणजे सुलभाबाईंचे आजोबा. ही सारी मंडळी आपल्या कुटुंबियांसह मूर्तिपूजा, जातिभेद वगैरे सोडून वेगळ्या वाटेनं यशस्वी वाटचाल करत असलेली.

भांडारकरांच्या पुणे येथील संगमाश्रम या निवासस्थानात सुलभाबाईंच्या बालपणी बरंच गोकुळ नांदत असे. जेवणघर, पाकघर, प्रार्थनाघर हे सारं सामायिक आणि कुटुंबातल्या प्रत्येक शाखेला एकेक स्वतंत्र कक्ष अशी योजना असे. उपासनेसाठी असलेल्या स्वतंत्र हॉलमध्ये नेहेमीच भजनं, कीर्तनं असे कार्यक्रम होत. जातपात नडत नव्हतीच. उलट, हरिजन वारकरीही येऊन कीर्तनं, प्रवचनं करून जात व घरातली माणसं भक्तिभावानं त्यांच्या पायांवर डोकं ठेवीत.

आणि पुढे याच भांडारकरांच्या एका भाच्यानं एका परजातीतल्या मुलीशी प्रेमविवाह केला! खरी ती परजातीची नव्हतीच. भांडारकर मूळचे गौड सारस्वत तर ती वारदेस्कर या पोटजातीची. परंतु भांडारकरांना त्यावेळी मोठी हळहळ वाटली. म्हणाले, "मुलगी तशी वाईट नाही. सुशिक्षितही आहे, पण ---नं जातीबाहेरची मुलगी घरात आणली!"

घरातल्या एका लहान वयाच्या आप्त स्त्रीला ते खटकलं. त्या पटकन् म्हणाल्या, "तुम्हीच आम्हाला लहानपणापासून जातपात मोडा, उच्च-नीच भेद पाळू नका अशी शिकवण देत आलात आणि आता तुम्हीच हे असे उद्‌गार..."

"-काढू नयेत!" भांडारकरांनी कबूल केलं, "पण केव्हातरी आमच्या मनात असले विचार-हिशोब येतात. याला कारण लहानपणी आमच्यावर तसे संस्कार झाले आहेत ना! कुठंतरी ते अजून मूळ धरून आहेत. परंतु आता तुमचं तसं व्हायचं नाही. तुम्हाला आम्ही तसं खतपाणी घातलेलंच नाही! असाच जातिभेद हळूहळू पण समूळ नष्ट होईल."

भांडारकरांचे हे बोल पुढे इतके खरे ठरले की सुलभाबाईंच्या बहिणीनं जेव्हा खान यांच्याशी विवाह ठरवला तेव्हा तिनं ते सुलभाबाईंजवळ उघड केलं होतं. सुलभाबाई त्यावेळी चांगल्या बावीस वर्षांच्या होत्या. तरीही खान-पाणंदीकर विवाहातली क्रांती, बंडखोरी त्यांना फारशी उमगलीच नाही. पुढे हा विवाह झाल्यावर त्यानं जो कल्लोळ माजला तो त्यांना अनपेक्षित होता!

मला आठवतं, माझ्या लहानपणी मी चांगली मोठी होईपर्यंत- मला आपली जात काय हे ठाऊकच नव्हतं! तसा विचारही कधी डोक्यात येत नसे, कारण घरी असे विषयच कधी निघत नसत. ज्या शहरी वातावरणात अन् वर्तुळात आम्ही वावरत होतो तिथेही ह्या तपशिलांना फारसं महत्त्व नव्हतं.

परंतु एकदा आखाड्यात खेळताना तेंरदेसाई नावाच्या काळसेल्या, काजळ घालणाऱ्या मुलीशी माझी मैत्री झाली. आखाड्याला लागूनच तिच्या घराचं मागचं दार. एके दिवशी मी आणि नंदा विहिरीपाशी दगडावर विटकर घासून कुंकू काढण्याचं धर्मकृत्य उरकीत असताना ती कुंपणाची तार वाकवून आली न् म्हणाली, "अग, ही गुप्ते-म्हणजे सी.के.पी. आम्ही बाई ब्राह्मण! मोडक, तू कोणच्या जातीची?"

मी दोन मिनिटं या गुगलीवर विचार केला. 'माहीत नाही' हे उत्तर देणं कमीपणाचं वाटलं. माझी जात ठरवण्यासाठी मग मी झटपट एक निकष बनवला. खाण्याच्या फरकावरून हे लोक जाती आखताना दिसताहेत. आपण तर 'खातो!' (तोपर्यंत गुप्ते-तेंरदेसाई यांचं 'तुम्ही खाता?' इत्यादी उरकलं होतं!)

मी पटकन् उत्तर दिलं, "-आमचे बाबा सी.के.पी. आहेत नि आई मात्र ब्राह्मण आहे!" (का, तर बाबा पहिल्यापासनं 'खाणारे' मला माहीत होतं. आई काही लग्नापूर्वी खात नसे-तेव्हा ती नक्कीच ब्राह्मण असणार!)

ती तेंरदेसाई बिचारी एक मोठ्ठं नवल घेऊन घरी गेली. हे अक्करमासं

गणित तिला पेलवणारं नव्हतं, पण तिनं ते तसंच जड, जड खाकोटीत मारून घरी नेलं.

मधले दोन दिवस मी आखाड्यात गेलेच नाही. तिसऱ्या दिवशी मला पाह्यल्याबरोबर तिनं सोसासोसानं कान पकडला!

"अग, माझी आई म्हणाली ऽ की उलटं असेल! तिचं आडनाव मोडक ना? मग परभांच्यात 'मोडक' नसतात. तिची आईच सी.के.पी. असेल."

इथं मात्र आता हे वाङ्मय मला एकटीला रसग्रहण करण्याइतकं सोपं राह्यलं नाही. मनावेगळंही झालं नाही.

त्या संध्याकाळी मी तो वजनदार दगड घरी नेला नि आईच्या पुढ्यात ठेवला.

आईची, माझा तो गहनगोतावळा पाहून हसताहसता पुरेवाट झाली!

"अग, आपण सगळे ब्राह्मणच आहोत. समजलं का? हो, तरी आपण खातो सगळं- आपल्याला पटतं म्हणून! कळलं?"

"अग, हिनं असं सांगितलंन् त्या मैत्रिणीला! ती मुलगी तरी कसली? -घरी जाऊन... आईला विचारून!"

आईनं आपल्या मैत्रिणींना सांगून त्यांनाही हसवलं!

तेव्हा हे एक नक्की झालं. आपली जात काय? - तर ब्राह्मण! एवढी आयडेंटिटी मला पुढे बरेच दिवस पुरली.

कुणीतरी परस्पर दुसऱ्याला सकौतुक म्हणायचं, "विचारतेस कशालाऽ तिचा रंग आणि डोळेच सांगताहेत ती कोकणस्थय् ते!"

या खेपेला वडील रिकामे सापडले, म्हणून मी त्यांच्यापुढे सागरगोटे आपटले असावेत.

ते हसून म्हणाले,

"अग, तू अस्सल 'कोब्रा' दिसतेस ना? म्हणून म्हणतात लोक!"

एकूण ब्राह्मण असणं ही काही वाईट गोष्ट दिसत नाही. उलट, त्याची आपल्याला ऐट वाटणं अपेक्षित आहे. एवढं कुठंतरी नक्की झालं.

पण फारशी जाणीवपूर्वक ऐट करायला मानसिक सवडच झाली नाही. आधीच मैत्रिणी अर्ध्या गुजराती! शिवाय लहानपणच्या अज्ञानात ऐट करण्याजोग्या शंभर गोष्टी आपल्यापाशी असतात. (उदाहरणार्थ, बाहुली, आजोबा, आईनं घालून दिलेली वेणी, बंगलोरचा मामा, बाबांची फटफटी) तिथं ही माळ्यावरची, अडगळीतली कळशी काढून, मध्यभागी ठेवून कोण ऐट करायला बसणार?

आम्ही गुजरातेत, बडोद्यासारख्या शहरात राहत होतो. गुजराती स्वयंपाकी आमच्याकडे होता. नंतर मराठा, पुढे केवलराम नावाचा पुरभैय्या! हुसेन नावाचा म्हातारा मुसलमान बाबांचा डबा न्यायला येई. फार गरीब, प्रेमळ होता. आई बाबा क्लबमध्ये ब्रिज-टेनिस खेळायला जात. त्यामुळे बाळकाका गुप्ते, बाबूराव सबनीस, डॉ. षणाभाई, डॉ. कोठारी हे आमचे कुटुंबमित्र. शेजारी राहायचे ठक्कर. समोर कर्णिक. घर होतं कर्नल चव्हाणांचं. फान्सेका म्हणून आमचे एक जुने शेजारस्नेही होते; ते दर दिवाळीस फुलांच्या करंड्याच्या करंड्या घेऊन सहकुटुंब आम्हाला 'विश्' करायला यायचे. आम्हीही मग ख्रिसमसला आठवण ठेवून जायचो. रेचल, राल्फीशी खेळायचो. मोठेपणी माझ्या भावाच्या आजारात मिसेस् फान्सेका अश्रू ढाळत, अख्खं जनरल हॉस्पिटल धुंडाळत आली आणि उदयच्या उशाखाली मेरीचा ताईत ठेवून गेली. 'मिसेस् मोडक, प्लीज कीप इट!' म्हणून माझ्या आईला बजावलंन्.

शाळेत आमच्या वर्गात चारसहा कोकणस्थ ब्राह्मण मुली होत्या. पण त्यांच्यात त्यातल्यात्यात हुशार मीच! बाकीच्या गोऱ्या पण डफ्फोळ! त्यामुळे ब्राह्मण म्हणजे हुशार हे समीकरणही माझं विशेष लाडकं झालं नाही.

-पुन्हा मला जात भेटली ती मुख्यतः कॉलेजात. दरवर्षी नव्या वर्षात ॲडमिशन घेताना एक फॉर्म भरायचा असे. बरीच गिचमिड माहिती, आधी आडनाव लिहून ब्लॉक-लेटर्समध्ये पूर्ण नाव! इत्यादी भानगडीचा मामला होता. वडिलांना विचारून विचारून भरायचा. रिलिजन, कास्ट हे रकाने आले की बाबा म्हणायचे,

"ह्या! ब्राह्मण वगैरे काही लिहायचं नाही! इंडियन लिही- फार तर 'हिंदू' लिही, बस्स्!"

प्रत्यक्षात कदाचित आपला खण नक्की करण्यासाठी जात लिहिलीही असेन मी. पण अभिमान वगैरे भानगडीपेक्षाही स्पेलिंग बरोबर आहे ना, याची खात्री करून घेण्याकडे माझं लक्ष. कारण आमची जात भलती गाठीगाठींची लिहायला!

क्वचित कधी, 'सी.के.प्यांचे सगळे पैसे खाण्यातच जायचे!' किंवा 'शेवटी डोकं, मराठा!' किंवा 'सारस्वतमंडळी हुशार असतात हं.' अशा प्रकारचे उद्गार कानावर आले असतील. परंतु सर्वसाधारणपणे माणसाचं बरंवाईटपण त्याच्या गुणांवर ठरवलं जाई. सयुक्तिक असो- नसो, ज्यात त्यात जातीचा टेंभा मिरवणाऱ्यांची नावं तुच्छतेच्या यादीत समाविष्ट केली जात.

हे सगळं भलतंच मिळमिळीत आहे याची जाणीव कॉलेजातल्या

बरोबरीच्या मैत्रिणी नकळत करून देऊ लागल्या. कुणाच्या मैत्रीचं स्वाभाविकत्व सिद्ध करताना पटकन् खुलासा केला जाई,

'मग! तो त्यांचा जातवाला आहे!'

एन्.सी.सी. मध्ये विजयमाला शिंदे शूटिंगमध्ये पुढे. तिची गोळी नेमकी बुल्स आय् छेदून जायची. कौतुक केलं की लगेच फुशारून उठायची, 'मग! मराठा रक्त आहे, काही झालं तरी!'

'स्वयंपाक' आमच्या गप्पात क्वचितच येई. पण सारस्वत मुली 'आमचं वाटणेऽऽऽ'-ची रेकॉर्ड कॉलेजातही लावत. 'मिसेस वर्टी छान शिकवतात गं!' म्हणून गहिवरलं की लगेच ज्योत्स्ना क्रेडिट घ्यायची, 'सारस्वत आहेत त्या. फुकट नाही!'

मधल्या काळात मी कुणाकडून तरी आडनावाच्या शेवटी 'कर' असलं की ते पुष्कळदा सारस्वत निघतात किंवा देशस्थ हा ढोबळ नियम शिकून घेतला होता. नाडकर, नेरूरकर, पाटकर, शिरगावकर... कवड्यांनी 'एकी का बेकी' खेळावं तसा आडनावाच्या वर्गीकरणाचा नाद माझ्या मनाला लागला होता. हा लाल, हा केशरी, हा गुलाबी असे मी कप्पेच केले होते. पण अशा वास मारणाऱ्या अभिमानाचा मला राग यायचा.

"-लग्गेच कशी ग जात येते मनात तुमच्या? शी!" मी चिडून म्हणायची.

"आता इंग्लिशला आपल्याला कमलाबाई टिळक आहेत, त्या तर किती विद्वान आहेत! पण म्हणून काही लगेच आम्ही 'मग? आमच्या जातीच्या आहेऽऽत' म्हणून तोरा मिरवत नाही! हुशारी काय (फक्त) जातीवर असते?"

पण मैत्रिणींना तेच विचित्र वाटे. त्यांच्या मते आमच्या वर्गातली पेंडसे ढ असली तरी टिळकबाई ब्राह्मण म्हणून विद्वान; असा गर्व मी करणं हेच रास्त आणि उचित होतं.

अठराव्या वर्षी लग्न करून मी महाराष्ट्रात, पुण्यात आले, आणि इथं तर या जाती-पोटजाती पायात-पायातच वळवळायला लागल्या!

कऱ्हाडे, देशस्थ, कायस्थ, कुठपर्यंत? तर साधा साबण घ्यायचा तरी तो शक्यतो कोपऱ्यावरच्या मारवाड्याकडे न घेता, जवळच्या पातकरकडे न घेता जिमखान्यावरच्या दामल्यांकडे घ्यायचा!

हे तर काहीच नाही. माझी एक नवीन मैत्रीण होती. जरा ती गल्लीतल्या प्रधान मास्तरांच्या गॅलरीखाली थबकली की घरचे तिची खरडपट्टी काढायचे, "शी, सी.के.प्यांशी कसली बोलत उभी राहतेस!" (आणि मी तर लहानपणी

तासन् तास कदमांकडे असायची, किंवा समर्थांकडे! मी हुशार, चांगल्या वागणुकीच्या मुलींशी मैत्री करावी एवढीच आईची फारशी घट्ट नसलेली अट होती! तर तेवढ्यातही मी (वितंड) वाद घालायची, 'हुशारच का? स्वभाव चांगला असला की झालं! मैत्रीत कसला फायदा, व्यवहार बघायचा?')

मी मैत्रिणींना म्हटलं, "नाही ग, त्या मानानं इतर प्रांतात आम्ही किती मोकळे, खेळीमेळीनं राहतो! पंजाबी शेजाऱ्यांशीसुद्धा सहज जमवून घेतो. कप्पे, गट असतात-पण मधल्या भिंती पुठ्ठ्याच्या!"

या सगळ्यानं माझं डोकंच दुखायला लागलं. म्हटलं, हें कसले निकष माणूस ठरवायचे?

एकदम एक लहानपणची जरा वेगळी आठवण झाली. सुट्टीत आम्ही लोणावळ्याला बिऱ्हाड करायचो. एकदा सकाळीच एक सुस्वरूप बाई आमच्या दाराशी ओंजळ भरून चाफ्याची फुलं विकायला आली.

आमच्याकडे फारशी कुणाला फुलांची आवड नव्हती, तरी चार आणे देऊन ती आईनं विकत घेतली आणि खुजावर बशीत घालून ठेवली. अन् तिला हळहळ कसली तर, - 'बिच्चारी ब्राह्मणाची बाई नि अशी दारोदार फिरतेय्!'

आईच्या मनातलं हे बिच्चारेपण मला समजेना. बिचारी ती असेल तर ती गरीब म्हणून, गरजू म्हणून, उपाशी म्हणून!

ब्राह्मण असणं-नसणं हा मुद्दा इथं येतोच कुठं! म्हणजे मग ही मराठा किंवा सोनार असती तर फुलं घ्यायची नाहीत? दया दाखवायची नाही?

आणि पुढे लग्न झाल्यावरही असाच प्रसंग घडला. एका दुपारी अशीच एक बाई आली. नवरा आजारी, मुलांची फी इत्यादी रेकॉर्ड लावून मदत मागितली. मी सभ्य, निर्णायक सुरात 'नाही' म्हणून दार लावू लागले.

"-अहो, मग काही काम सांगा, निवडणं वगैरे, फुकट नका देऊ!"

त्यालाही मी नको म्हटलं. दोघांच्याच घरात काम तरी काय असणार नि हल्लीच्या दिवसांत कोण कोणाला असं एकदम आत घेणार?

बघताबघता बाईचे डोळेच डबडबले. चेहेरा लाल झाला.

"काय दिवस आलेत! जात जातीला ओळखत नाही; ब्राह्मण ब्राह्मणाला विचारत नाही!"

दातओठ खात तरातरा ती ब्राह्मणी पुढच्या दारी गेली.

तिचे अश्रू पाहून मला जरा चुटपूट लागलीच; पण तरी तिच्या अपेक्षेची मात्र कमाल वाटली! ब्राह्मणानं ब्राह्मणाला भीक घातलीच पाहिजे? ती मी

सौजन्यपूर्वक नाकारली म्हणून मी अब्राह्मण?

तिथनं पुढे मुंबईला आलो. उमेदवारी संपली. संसार, मुलं, लेखन सुरू झालं.

शेजारी ब्राह्मण आहेत की नाहीत हे लक्षात न घेता चांगले आहेत हे नमूद केलं. ते 'लक्' मानून समाधानानं त्यांच्यात मिसळू लागलो.

माझा चेहेरा नेहमीच कारणाशिवाय आत्मविश्वासी, कलोपासकी इत्यादी दिसत असतो. त्याचा कु किंवा सु परिणाम म्हणून एक स्थानिक कलामंडळ मला आमच्या नाटकात काम करा म्हणून आमंत्रायला आलं. गुजरातेत राहून मला 'नाट्य हे आपलं क्षेत्र नव्हे!' हे ठरवायची संधीच मिळाली नव्हती. म्हटलं, करून बघू! म्हणून गेले.

"हे काय तुम्ही 'त्यांच्यात' गेलात?' कुणीतरी उघडउघड आरोप केला.

त्यांच्यात म्हणजे? ही मंडळी तिसऱ्या डोळ्यांची की अनैतिक... असं मला झालं. त्यांच्यात म्हणजे- ते कितीका विधायक काही करायला पाहिनात- ते ब्राह्मण नव्हते! आणि मी त्यांच्यात गेलेच कशी?

नाटकं काही वेळा लग्नासारखीच क्षुल्लक कारणासाठी मोडतात- तसं ते नाटक नंतर झालंच नाही! पण त्या निमित्तानं त्यांच्यात-तुमच्यात-आमच्यात-पर्भांच्यात-भटांच्यात हे विशेष ठसक्यानं उच्चारायचे शब्द माझ्या कोषात दाखल झाले. साधे रव्याचे लाडू करायचे ते 'तुमच्यात कसे न् आमच्यात कसे काऽऽय?' असं वाटायचं.

पण हेच सारं जगाला अधिक पटणारं दिसत होतं. ऋग्वेदी ब्राह्मण मंडळ, ब्राह्मणसभा, गिरगाव, चांद्रसेनीय कायस्थ प्रभू समिती अशा संस्थांची मनाला हळूहळू सवय व्हायला लागली. गरीब मुलांच्या शिक्षणालाच मदत करतात ना? -म्हणून ब्राह्मणसभेची वर्गणी भरू लागलो.

आणि तिथून पुढेही मनाची बरीच वाटचाल झाली. कोसबाडला जाऊन ताराबाई मोडकांना आदिवासींसाठी झटताना पाहिलं, बाबा आमट्यांविषयी ऐकलं, 'चित्पावन' म्हणून एक स्वतंत्र मासिक निघतं हेही ऐकलं आणि...

-परवा ब्राह्मणसभेचे एक वृद्ध कार्यकर्ते वर्गणी मागायला आले. मी 'या बसा' म्हटलं. मुलांचं कौतुक करत तेही बसले. अशा हिंगणेकंपनीला आम्ही सहसा विन्मुख पाठवत नाही. सौजन्यपूर्वक, चोख, नम्र, सभ्य वागून समाजकार्यासाठी उन्हात वर्गणी जमा करत हिंडणारी ही उतारवयाची सुजनं. असे म्हातारे मला भावतातच. चेहेरेही 'प्रेमळ मामंजी' या व्याख्येत बसणारे असतात!

मी ह्यांना बाहेर पाठवून दिलं. हे आदरपूर्वकच त्यांना म्हणाले,

"रागावू नका. पण जातीयतेवर आधारलेल्या संस्थेला मदत करावी असं मला वाटत नाही-"

आजोबांना 'अशा' माणसांची सवय असावी. ते पुढे सरकून आत्मविश्वासानं म्हणाले,

"हे पाहा! तुम्ही म्हणताय ते खरंय. परंतु अहो, जाती नाहीत कुठं? अहो, माणूस आहेत तेथे तेथे जाती आहेतच. मग सगळे आपापल्या जातीसाठी करणार नि आपण मात्र..."

"ते कबूल आहे, या जाती नष्ट करणं माझ्या हातात नाहीय. पण आपणहून निदान मी त्यांना खतपाणी घालणार नाही. जिथे या जाणीवांना प्रोत्साहन मिळतं त्या कार्याला माझी मदत नाही... माफ करा!"

मी ऐकत होते. म्हातारबुवा विन्मुख चाललेत हे सवयीचं नव्हतं.

शेवटी ते उठले. जाता जाता मी सहानुभूतीपूर्वक हसले. तशी म्हणाले,

"बघा! तुम्ही जरा सांगा त्यांना"

मी म्हटलं, "नाही हो! आम्ही सामाजिक संस्थांना काही देत नाही नेहेमी, असं नाही. एकाहून अधिक संस्थांना अन् दरवर्षी देतो! पण हा त्यांच्या तत्त्वाचा प्रश्न आहे. पैशाचा नाही!"

ब्राह्मणसभा पुढे सरकली.

"बरं, वर कुणी आहे का 'आपलं'?"

शांतपणे म्हटलं, "आहे. गोखले आहेत, जा तुम्ही."

पण त्यांचं एक वाक्य मनात खाजत राहिलं. जाती मोडणं कधीच शक्य नाही. माणूस आहे तेथे जाती आहेतच. खरं तर होतं. अमेरिकेतही निग्रोंना, काळ्या लोकांना कसं वागवतात, प्रॉटेस्टंट-कॅथॉलिक, शिया-सुन्नी, वर्णभेद, धर्मभेद, मतभेद, प्रांतभेद, काही असो, कमीजास्त लेखणं हे आहेच.

मग हे स्वाभाविक, नैसर्गिक, अटळ, अपरिहार्य आहे, म्हणून स्वीकारायचं? की असेल ढीग स्वाभाविक पण 'माझ्या जातीचं' नाही म्हणून स्वतःच्या प्रवृत्तीला परवडेल तेवढ्या सौम्यतेनं किंवा तीव्रतेनं या सगळ्यापासून अलिप्त राहायचं?

एका वेळी असं बरंच, वेगवेगळ्या दिशेचंही मनात आटत, साकळत, विरजत असतंच. तसाच अंधार, गुंते, अडगळ बरोबर घेऊन आपण 'अवघडलेले' पुढे जात असतो. मनाला सवय असते, तशी.

शेवटचा प्रसंग गाडीतला.

बायकांच्या सेकंडात, तुफान गर्दीत मी उभी होते. एक वृद्धा आणि तिची मुलगीही होत्या. म्हातारी फार म्हातारी नव्हती. पण थकलेपण, वाकलेपण जाणवत होतं. लोकलचा तीनचतुर्थांश प्रवास आम्ही उभ्यानंच केला. मनात आलं, तिशीत आपण एवढ्या दमलो तर या बिचाऱ्या... ही मुंबईच वाईट! जागा झाल्याबरोबर मी आधी त्यांना 'बसा' म्हटलं. मग दोन स्टेशनानंतर मी बसले. त्याबद्दल त्या मधून-मधून इमानानं हसत होत्या.

गर्दी ओसरल्यावर मला ममतेनं म्हणाल्या, "कुठं उतरणार? आडनाव काय तुमचं?"

म्हटलं "फाटक."

"म्हणजे ब्राह्मण?"

त्यांच्या स्मिताला जरा नापसंतीची कडा आलेली दिसली.

मला हसू आलं. म्हटलं, "हो!"

आणखी थोड्या वेळानं माझं राहाण्याचं ठिकाण नक्की करून झालं. मग म्हणाल्या,

"तिथे येतो आम्ही केव्हाकेव्हा. सोमण म्हणून आहेत- ब्राह्मणच आहेत ते पण!"

हिंदी सिनेमातला किशोरकुमार चुकून बायकांच्या 'औरत' मध्ये शिरल्यावर पळत पळत बाहेर येताना म्हणायचा त्या सुरात मी मनाशी म्हटलं, 'बाऽऽप रेऽऽ!' थोडं गमतीनं, थोडं करमणूक म्हणून अन् जरा खवचटपणानंही म्हटलं,

"तुम्ही कोण तर मग?"

माझ्या अपेक्षेप्रमाणंच त्या 'सी.के.पी.' निघाल्या, तशी पुन्हा मला खुदकन् हसू आलं. त्या मात्र मला त्यांचं सी.के.पी.पण आवडणार नाही हे माहिती असल्यासारख्या हळुवार स्वरात म्हणाल्या, "आम्ही सी.के.पी.!"

एकीकडे त्यांच्या चौकशांना उत्तरं देतादेताच माझं हसणं पुरं झालं आणि माझ्या मनाला खिन्न वाटायला लागलं. त्यांच्याबरोबरच्या त्या तरुण मुलीकडे मी कुतूहलानं आणि कीव करतही पाहिलं आणि म्हटलं, या बाईचं तर निम्मं आयुष्य गेलंच- पण ज्यांच्या मनात माणूस पाहिलं की त्याची जात चाचपडली जाते, जात ऐकली की त्याची प्रतिक्रिया चर्येवर उमटते त्या माणसांनी वाढवलेली ही पिढी, तिची मूल्यं निराळी कशी असतील? तीही माझ्याकडे मी 'ब्राह्मण' म्हणून टवकारून, चिकित्सेनं पाहात असणार, मनातून मला 'भट' म्हणत असणार आणि मी तिला 'पाठारे प्रभू' अशी शिवी-बोल लावत असणार अशी

तिची, खात्री असणार. अर्थातच ती आपल्या मुलांना हेच निकष, नियम, कप्पे, खण शिकवणार! आणि ती तेरेदेसाईसुद्धा सौ. विद्वांस किंवा सौ. पुराणिक बनून आपल्या मुलांवर आज हेच 'संस्कार' करत असेल.

आणि इकडे आपलं फळ्यावर लिहिलेलं ध्येय आहे, राष्ट्रीय एकात्मता.

आता इथं 'पाईक' म्हणून मी नक्की काय करू शकत होते? 'कसली ही माणसं?' म्हणून शिसारीनं दूर होऊ? की तेवढ्या त्या गर्दीत, 'अहो, कसल्या अजून जाती घेऊन बसताहात!' म्हणून त्या भाबड्या पाककुशलेचा मेंदू धुवायला घेऊ? विले-पार्ले ते अंधेरी या अंतरात यापैकी कशानंच काही साधणार नव्हतं.

मी मनाशी निर्णय घेतला. अंधेरीला उतरल्यावर मी टॅक्सी करणार होते. वाटेत या जोडीला सोडायचं हे मी मनात त्यांची जात कळायच्या आधीच नक्की केलं होतं! एवीतेवी टॅक्सी मोकळी जाणार होती अन् यांची कॉलनी माझ्या वाटेत होती.

मी त्यांना स्नेहपूर्ण आवाजात म्हटलं, "चला, बरोबर जाऊ आपण. मी सोडते तुम्हाला!"

"....!"

"चला हो, एवीतेवी मला..."

मनात म्हटलं, यानं मी नक्की काय साधते आहे! त्यांचे शारीरिक कष्ट वाचवते आहेच. पण टॅक्सीतून या दोघी उतरतील तेव्हा

'ही ब्राह्मणं वाटतात तेवढी 'ही' नसतात!' असा एक कोवळा ज्ञानकण घेऊन उतरतील. सी.के.पी., ब्राह्मण या दोन जबड्यांमधलं केसभर तरी अंतर क्षणभर तरी यामुळं कमी होईल.

-आजमितीस माझ्या हातात तेवढंच करण्यासारखं नव्हतं का?

त्या मायलेकी दिसेनाशा झाल्या. टॅक्सी सुरू झाली तशी मी आयुष्यात कितव्यांदा तरी स्वत:लाच प्रश्न केला, 'आपल्याच मनात मग हे विचार कसे येत नाहीत?'

-आणि माझ्या डोळ्यांसमोर माझे प्रार्थनासमाजिस्ट पणजोबा स्वच्छ उभे राहिले. महार घरगडी ठेवणारे माझे आजोबा आठवले. 'हिंदू' जात लिही, म्हणणारे बाबा आठवले.

(आणि मनात म्हटलं, अरे आपल्या अंगणात कधीच तुळशीवृंदावन नव्हतं म्हणून आपण उगाचच खंत केली!)

ब्राह्मणसभेच्या त्या म्हातारबुवांना मी तिथूनच टेलीपथीनं म्हटलं, 'चुकीचं

बोललात तुम्ही आजोबा! जातपात नष्ट होऊ शकते, तीन पिढ्यांत होऊ शकते-सात पिढ्यांत तर ती कायमचीच गाडली जाईल. पण त्याकरता प्रत्येकानं आपल्या मागच्या पिढीच्या पुढे जायला हवं.'

'माणसं म्हणजे काही कारखान्यात निर्माण केल्या गेलेल्या साबणवड्या नव्हेत! त्यांच्यात भेद, विविधता, श्रेष्ठ-कनिष्ठपण राहणारच. बुद्धी, रंग, रूप, मतं, कर्तृत्व, याबाबतीत तफावत असणार. उदाहरणार्थ, जर्मन लोकांची बुद्धिमत्ता आणि निग्रो लोकांचा काळेपणा हे कुणालाच नाकबूल करता येण्यासारखं नाही. परंतु गट पडणारच असले तर ते इतपत तरी नैसर्गिक असावेत. जन्मासारख्या हाती नसलेल्या अपघाती योगायोगानं कुणी उच्च-नीच ठरू नये. गुणांपेक्षा कुळाला किंमत दिली जाऊ नये. नोकरीत, लग्नात, सामाजिक संबंधांत अन्यायी ठरतील इतके हे कप्पे जीवघेणे असू नयेत, व्यक्तीच्या विकासाच्या आड ते येऊ नयेत.'

परदेशात निग्रोंच्या, स्त्रियांच्या बढत्या वर्णभेदामुळे, लिंगभेदामुळे रोखल्या जातात हे गैरच! काळ्या लोकांना समाजात समानतेनं वागवलं जात नसेल तर ती चूकच. परंतु तिकडे निदान गोऱ्यांमध्ये पुन्हा हा लाल, हा पांढरा, हा ब्लॉन्ड असे उपकप्पे नाहीत. स्कॅन्डिनेव्हियन माणूस ऑस्ट्रेलियन सुंदरीशी लग्न करतो आणि त्याचा मुलगा वेस्ट इंडिज बायकोसह फ्रान्समध्ये स्थाईक होतो.

कप्प्यांचे कंगोरे इतपत तरी गुळगुळीत झाले पाहिजेत म्हणजे त्यांनी मनं रक्तबंबाळ होणार नाहीत.

या संदर्भात 'दैवायत्तं कुले जन्म मदायत्तं तु पौरुषम्!' हे मनानं रक्तबंबाळ झालेल्या कर्णाचे आतून आलेले बोल आजही प्रत्येकानं भिंतीवर फ्रेम करून लावण्यासारखे आहेत.

आणि आपल्या हातात काय आहे हे मला माझ्यापुरतं स्वच्छ उमगलं.

माझ्या वडिलांनी मला हिंदू ही आणि एवढीच आपली जात असं लिहायला शिकवलं होतं आणि वागताना तर तेवढीही जात त्यांनी मानली नव्हती.

आता यापुढे माझं कर्तव्य म्हणजे माझ्या मुलांना मी 'माणूस' आपली जात आहे असं मानायला शिकवणं.

कठीण आहे! सातशे वर्षांपूर्वी ज्ञानेश्वरांनी तरी काय, हेच सांगितलं. माणसानं माणसाचं माणूसपण ओळखून माणसाशी वागणं. आज तरी माणसांना हे पूर्णार्थानं जमलंय का???

'माणूस माझी जात' हे लिहिणं, मानणं, म्हणणं जितकं सोपं आहे तितकं तसं वागणं सहज शक्य नाहीच.

तरीपण एक आधुनिक व्रत म्हणून ते मी अंगिकारायला हवं. शिवाय या अवघड व्रताचे दोन चांगले विशेष आहेत! हे व्रत आपल्या असमर्थतेमुळे अर्धवटच साधलं तरी लगेच 'गेलं पुण्य वाया' असं होत नाही! काहीतरी साधतंच, चार तरी पावलं पुढे टाकली जातातच. दुसरं म्हणजे या व्रताच्या मागे 'जरा काही चुकलं की झाला कोप' अशी कुणी शीघ्रकोपी देवताही नाही!

■ ■ ■

# द अँग्लो सॅक्सन ट्रॅजेडी

आपण आपला अभ्यासविषय कसा निवडतो? आपला रसविषय कसा ठरतो?

विशेषत: इंग्रजी साहित्यासारख्या विषयाला आपण वरतो तेव्हा तरी, 'मला आवडतो म्हणून मी तो घेतला' असं म्हणता यावं ना?

बरीच वर्षं मी तसं म्हणत होतेही.

एका(च) तऱ्हेनं त्यावेळी विषयाच्या निवडीचं स्वातंत्र्य सुखवस्तू मुलांपेक्षा सुखवस्तू मुलींना जास्त असायचं. तेव्हाच काय, आतासुद्धा मुली आरामात संस्कृतसारख्या बाजारभाव घटलेल्या किंवा मराठीसारख्या बाजारभाव नसलेल्या विषयात एम्.ए. वगैरे करत जातात. त्यांच्या गृहविज्ञानाला तर किफायतशीरही समजतात.

पण 'आवडीचा विषय' म्हणजे तरी नक्की काय? तुमचं कॉलेज विशिष्ट वर्षी जे काही चारसहा विषय पिसून 'यातला एक पत्ता धर' म्हणून तुमच्यापुढे धरतं त्यातलं एक पान तुम्ही ओढायचं. प्रवेशपत्रिकेतल्या विषयांपैकी 'हा नको', 'हा तर अजिबातच नको', करत उरलेल्या विषयांसमोर टिक-मार्क करून टाकली, की मग ते जन्माचं मंगळसूत्र!

आणि हे आपलं आहेच की भाजीवाल्याकडचं प्रत्येक वांगं आपण खाली वाकून, निवडून घ्यायचं, वाण्यापुढे मात्र डोळे मिटून यादी सरकवायची, पुढे सोनाराकडे तो म्हणेल ते वजन किंवा घट अंधश्रद्धेनं लिहून घ्यायची आणि सर्वांत वरकडी म्हणजे आयुष्याचा जोडीदार तासभर एकत्र बसून चहा पिता पिता निवडून टाकायचा, की मग झाली एका शुभमुहूर्तावर, 'हात पाँव धो ले और खाना खा ले'च्या करियरला सुरवात!

व्यवसाय मार्गदर्शनाची सोय त्यावेळी नव्हती आणि आताही त्याची फारशी फॅशन नाही.

त्यात तुम्हाला गणित येत नसलं की इंजिनियरिंगचे रस्ते बंद, ड्रॉईंग आवडत नसलं की निवड आणखीच अरुंद, 'फाईन आर्टस'ला जायची कुवत नसते आणि मेडिकलला जायची तर आपल्याला आवडच नसते, कारण बेडूक कापणं आपल्याला 'कसंतरी' वाटत असतं.

एखादा विषय निवडण्याची वेळ येते तोपर्यंत विषय म्हणून त्याचा स्वाद आपल्याला खरोखर कळलेला असतो का? अगदी इंग्रजी, गणित असे शाळासोबतीसुद्धा पुढे इतके बदलतात की इंग्रजी घेतल्यामुळे आपल्याला लेग्विस ॲन्ड कझामियाची 'हिस्ट्री ऑफ इंग्लिश लिटरेचर' वाचून त्यातनं रेस्टोरेशन कॉमेडीची इंग्लंडमधल्या तत्कालीन समाजपरिस्थितीशी आणि युरोपातल्या राजकीय घडामोडींशी सांगड घालावी लागेल याची कल्पना येत नाही आणि बी. ए. च्या गणितापेक्षा एम्. ए. चं गणित इतकं वेगळं असू शकतं की, 'हाच का तो विषय आणि हाच का तो पहिला येणारा मुलगा?' असं वाटावं. विषय पुढे व्यापक तरी होत जातात किंवा अमूर्त तरी.

तात्पर्य, मला कळायच्या आतच मी आपला आवडता विषय इंग्रजी असं ठरवून टाकलं आणि मग पुन्हा इकडे पाहिलं नाही की तिकडे; आणि याला कारण म्हणजे माझी आई.

माझ्या कर्तृत्ववान आईची मी अनेक अर्थांनी चाहाती होते आणि तिने लग्नानंतर मुंबईच्या विल्सन कॉलेजातून हॉस्टेलमध्ये राहून 'बी.ए. विथ इंग्रजी' केलेलं होतं; जे ती मिश्र क्लबमध्ये जाऊन ब्रिज खेळताना, ''ॲम आय नॉट-वॉण्टेड ऑर अनवॉण्टेड ऑन धिस टेबल?'' असं चतुरपणे बोलून सिद्ध करत असे! अर्थातच, यातलं जमेल ते ते मलाही करायचं होतं.

या ठिकाणी रोल-मॉडेल म्हणून आई नसेल तर वडील, मोठी बहीण, शेजारचा व्हाया आय. आय. टी. अमेरिकेला गेलेला संदीप, असं कुणीही चालतं. + तुम्ही फारच हुशार असाल तर तुमचे सर तुम्हाला आपलाच विषय घेण्याची गळ घालतात किंवा वडील, काका यांच्यामार्फत 'घरची वकिली' किंवा 'फॅमिली बिझनेस' हा झक्कू तुमच्या विषयाच्या निवडीत लुडबूड करू शकतो.

तरीदेखील हे सगळं, 'माझ्या चार मुली चार वेगवेगळ्या शाखांमधल्या पाहिजेत, म्हणून मी धाकटीला म्हणते की तू आता 'लॉ' कर!' ह्या हास्यास्पद महत्त्वाकांक्षेपेक्षा बरंच! निदान आपण माहेरच्या शोकेसमधल्या जपानी बाहुलीच्या शेजारी ठेवलेली शिंपल्यांची बाहुली किंवा ताजमहाल तरी नसतो.

'गणित हा काय मुलींचा विषय आहे?' हा आक्षेप तर मी विद्यानगरी,

पुणे येथे आल्यावर प्रथम ऐकला! विषयाला लिंग नसतं अशी तोवर माझी समजूत होती.....

शाळेत आपला आवडता विषय म्हणजे बहुधा आपल्याला फारसा अभ्यास न करता भरपूर किंवा 'हायेस्ट' मार्क मिळवून देणारा विषय असतो. ('हायेस्ट' या शब्दाला शाळेत असेपर्यंत केवढा भाव असतो! नंतर तो कुठे गायब होतो?!) आणि इंग्रजीच्या प्रश्नपत्रिका बऱ्याचदा माझ्याशी तसं वागायच्या.

खरं म्हणजे त्यातले बरेचसे गुण भाषेचे नसून स्पेलिंगचे किंवा व्याकरणाचे असायचे हे आता कळतं आणि पुढे स्वयंपाक करता यायला लागल्यावर जे पटकन् कळतं तेही तेव्हा कळत नसतं की थिरडी करता येणं आणि ती खायला आवडणं या दोन किती स्वतंत्र गोष्टी आहेत!

शेवटचं म्हणजे इंग्रजी साहित्याबद्दल हवेत असणारा मान! इंग्रजीसारखं हिंदी आणि संस्कृतही येत असलं, मराठीत गती असली आणि विज्ञानातही अडचण नसली तरी सुपरभाषेसारखा त्यांचा दबदबा नव्हता. एकदा 'अरे वा, इंग्लिश लिटरेचर का?!' घेतल्यावर 'त्यापेक्षा सोशॉलॉजी का घेत नाहीस?' असं म्हणायची कुणाची प्राज्ञा नव्हती. आणि जाहिरातकला, ग्रंथालयशास्त्र हेच त्यावेळी नवोदितांपैकी तर मॅनेजमेंट आणि टॅक्सेशनचे पर्याय तुमची प्रज्ञा कशाला जोखतायत?

भाषेच्या भरीला मानसशास्त्रासारखा मनमिळाऊ+मार्कमिळाऊ विषय घेणं ओघानेच आलं, पण तिसरा जोडविषय मी कोणता निवडावा! तर अर्थाअर्थी संबंध नसलेलं अर्थशास्त्र! 'इकॉ+पॉली'ला गेलेल्या मैत्रिणींची साथ मला त्या एका विषयापुरती तरी धरून ठेवायची होती!

त्यात आमच्या घरी इंग्रजीच्या तुलनेत मराठीच्या वाट्याला सापत्नभाव येई आणि याला त्या काळात तिथे तरी कुणी देशद्रोह समजत नसे. 'पमा, तू लौकर लौकर मोठी हो, म्हणजे मला मराठीतनं पत्रं लिहायला नकोत!' हाच आशीर्वाद आजोबांच्या पत्रात दर वेळी असे. आणि बाबा पांचगणीला शिकलेले. त्यांना आतापर्यंत मी मोठ्याने वाचून दाखवले तरच 'पु.ल.' आवडायचे. या सगळ्यात माझ्या अस्मितेचं कुलुंगी कुत्रं केवळ मराठी भाषेच्या खुंटाला बांधून ठेवायचं काम मोठ्या माणसांपैकी कुणाच्या हातून झालंच नाही!

इतर सर्व हाडामासाच्या पालकांप्रमाणे आमच्या आईवडिलांनीही आम्हाला वाढवताना काही लहानमोठ्या चुका केल्याच; त्यातली एक म्हणजे घरात इंग्रजीला कुलदैवत मानायचं आणि शाळा मात्र मराठीला सरस्वती मानणारी

निवडायची! पण इंग्रजी माध्यमाच्या शाळा गणित कच्चं ठेवतात, अशी त्यावेळी कल्पना होती. तरीही ते कच्चं राहिलंच म्हणा; पण मधल्या मधे मला मराठी मात्र येऊन बसलं. गुजरातेत राहून मी इतपत तरी मराठी राहिले याचं कारण, मराठी माध्यम!

मात्र शाळेतही आमच्या मातृभाषेच्या वाट्याला सापत्नभावच, कारण गुजरातेतल्या त्या शाळेत आठ तुकड्यांपैकी सात गुजराती असायच्या, एकच मराठी. प्रार्थना, पाट्या, नोटिशी, घोषणा, नाटकं सगळं गुजराती! उपमुख्याध्यापक पारशी, मुख्याध्यापक गुजराती! राग आला तरी करता काय, आमचे जगतापसर सुद्धा स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी गुजरातीत भाषण करून फितुरी सिद्ध करायचे.

हे धेडगुजरी वातावरण मराठीविषयी भलेबुरे गंड जडवून घ्यायला किती पोषक होतं! पण मी त्याऐवजी इंग्रजी पत्रलेखन, इंग्रजी वाचन याकडे वळले. लग्न झाल्यावर मुलुंडला येईपर्यंत त्याचं कुणाला फारसं आश्चर्य किंवा कौतुक वाटलेलंही दिसलं नाही. तिथे मात्र शेजारणी कुजबुजू लागल्या, "अहो, त्या वडिलांनासुद्धा इंग्लिशमधून पत्र लिहितात!"

कॉलेजच्या परिसरात गुजरातीत बोलावंसं वाटायचं नाही, इंग्रजी बोलण्यातलं आव्हान पेलायचं नाही, हिंदीतून बोलण्यात पुरेसं आव्हान वाटायचं नाही आणि मराठीत बोलून तिथे चालायचं नाही. मग समोरच्या व्यक्तीची मातृभाषा कोणती हे बघायचं आणि शक्य तेवढे इंग्लिश शब्द वापरून ती पुरेशी संवादशील बनवायची! कुणी आपल्याला 'घाटी' म्हटलं तर ती शिवी दुर्लक्षाने मारून पुढे बोलत राहायचं. मिळून सख्खी भाषा, मावसभाषा, देवभाषा, देशभाषा आणि परभाषा यातली एकही भाषा धड येत नसल्याचे तोटे कमी करत, पाचही भाषा थोड्याबहुत येत असणं ही सोय मानून एक पुरेसं लवचिक बोलणं चालू ठेवायचं. प्रत्येकाची भट्टी वेगळी. हळूहळू मग मनाची भाषाही तशीच झाली, तीच झाक लिखाणातही उतरायला लागली.

इंग्रजी लिहिता-वाचता येतं पण बोलता येत नाही ही मराठी माध्यमवाल्यांची गोची आमच्या आईवडिलांच्या पिढीला कधी कळलीच नाही.

त्यातून मग मराठी मुलींना लागणारी जथा करून वावरण्याची सवय, त्यातच वाटणारी सोय आणि सुरक्षितता! इंग्रजी घेतल्यावर माझ्यापुरतं डोक्यावरचं ते छप्पर उडालं. गुजराती माध्यमातून आलेली एक मराठी मुलगी वगळता, वर्गबंधू पारशी, सिंधी, युपियन, मुसलमान - आफ्रिकीसुद्धा!

या सगळ्याचा एक टिकाऊ फायदा झाला, आपल्या देशावर प्रेम

करण्यासाठी इतर देशांचा दुस्वास करावा लागत नाही त्याचप्रमाणे आपली मातृभाषा आवडायला इतर भाषांना नावं ठेवावी लागत नाहीत, हे कळलं.

चौदाव्या शतकापर्यंत इंग्रजी साहित्य नामक चीज अस्तित्वातच नव्हती! इसवी सनानंतरच्या पाचव्या शतकात ट्यूटॉनिक वंशाची एक जंगली जमात 'इंगल-लॅण्ड'मधून ब्रिटनवर चाल करून आली, तिथेच राहिली. सॅक्सन या नावाची आणखीही एक हल्लेखोरांची टोळी या बेटावर वास्तव्य करू लागली... ब्रिटनच्या मूळ रहिवाशांना रोमन आक्रमकांनी तत्पूर्वीच ख्रिश्चन धर्माची दीक्षा दिलेली होती. यथावकाश या जमातींवरही ते संस्कार झाले, एकीकडे त्या लिहित्याही झाल्या... हे अँग्लो-सॅक्सन वाङ्मय म्हणजे इंग्रजी साहित्याची गंगोत्री. फ्रान्सहून आलेल्या नॉर्मन लोकांच्या साहित्याचा ओहोळही त्यात मिसळला... यथावकाश त्यातून इंग्रजी साहित्याचा जन्म झाला. चॉसर हा पहिलावहिला ठोस असा, इंग्रजी लेखक.

त्या काळात वेगवेगळ्या धार्मिक यात्रांच्या निमित्ताने लोक मोठ्या संख्येने प्रवास करीत. चॉसरने कॅन्टरबरीच्या जत्रेला जाणाऱ्या यात्रेकरूंनी सांगितलेल्या कथा एकत्र केल्या. आणि आरंभीच्या 'प्रोलॉग'मध्ये या यात्रेकरूंची अतिशय सूक्ष्म, मार्मिक शब्दचित्रं उभी करून एक लेणंच कोरून ठेवलं. तत्कालीन राहाणी, सामाजिक परिस्थिती, धर्मपीठांतला मूल्यांचा ऱ्हास यांचं तो मोठ्या खेळकर 'ओल्ड इंग्लीश'मध्ये चित्रण करतो.

दोन वर्षं आम्ही एकीकडे हा अलबम पाहात होतो आणि त्याच वेळी बेकन, लँब, जॉर्ज इलियट, गोल्डस्मिथ, जेन ऑस्टिन, ड्रायडन, ऑस्कर वाइल्ड, 'फोरसेकन मर्मन' ही हळवी कविता लिहिणारा मॅथ्यू अॅर्नॉल्ड, 'वेस्ट मिनिस्टर अॅबे' रंगवणारा वर्डस्वर्थ आणि अर्थात-शेक्सपियर, अशी इंग्रजी साहित्याच्या चित्रसज्जातून 'कण्डक्टेड टूर' चालली होती.

इंग्रजी साहित्यातला कादंबरीचा उगम, शोकांतिकांमुळे होणारा मनाचा भावनिक निचरा-कॅथार्सिस, ग्रीक महाकाव्यातला टेनिसनच्या कृपेने ओळखीचा झालेला 'कमळांची फुलं खाणाऱ्यांचा' देश, शेलेची सॉनेटस् आणि कीट्सची ओडस्... एका संपन्न भाषेच्या संपन्न साहित्यातून भोवतालच्या भावबंधनांना, संबंधांना, अनुभवांना वैश्विकतेचं अस्तर पुरवलं जात होतं. आणि त्या वयात पोचायच्या तेवढ्या-प्रश्नपत्रिकेत उत्तरं लिहिण्याएवढ्या-या गोष्टी पोचत होत्या.

शेक्सपियरच्या प्रत्येक नाटकाचा प्लॉट चोरलेला होता, बेकन आणि शेक्सपियर एकच की काय असा एक गोंधळ तिकडे अजूनही चालूच होता. चार्लस् लॅम्ब आपल्या नियमितपणाने वेड्या होणाऱ्या बहिणीला वेड्याच्या

इस्पितळात पोचवण्यासाठी लग्नाविना राहिला होता. शेले आणि बायरनच्या भानगडी तरी किती-आणि कीट्स् बिचारा फोटोतल्यासारखा नाजुक दिसत, कोवळ्या वयातच मरून जाताना म्हणाला होता, "I feel flowers growing over my body..."

अजूनही "तुमचं पण इंग्लिश होतं?" म्हणणारे सहप्रवासी भेटतात तेव्हा त्यांच्या डोळ्यांत, हसण्यात ज्यांचं त्यांनाच कळणारं एक नातं, सलगी तरळून जाते.

"-तरीच!"

"त्यामुळे तुमचा बेस पक्का आहे!"

"मग बरोबर आहे, एवढं वाचता ते!"

न पटून मग मीही पहाणी सुरू केली,

"तुम्हाला खरोखरच वाटतं का गं की आपला बेसबिस पक्का आहे?"

"मग लिटरेचरनं तुला नक्की काय दिलं?"

"त्याने मला जगात वावरायचा आत्मविश्वास दिला. माणसं सगळी सारखीच, हे कळल्यामुळे आज देशापरदेशांत वावरताना माझ्या मनात कुठलेच गंड नसतात..."

"दर पाचदहा वर्षांनी त्या वह्यापुस्तकांतनं मी जाते आणि दरवेळी जास्त जास्त खोल जाऊ शकते..."

"-फारच गिल्टी वाटलं की ग्रंथालयात जाऊन मी एखादं क्लासिक आणते. ओव्हर ड्यू झालं की न वाचताच परत करते. आजमितीस माझा इंग्रजी साहित्याशी संबंध हा, इतका-दंड भरण्याइतका."

या देशात, वातावरणात आणि काळात ते संदर्भ हरवून बसणं किती सोपं होतं.

इंग्रजी साहित्याने मला संकुचिततेपासून, अरूंद निष्ठांपासून वाचवलं का?... कुणास ठाऊक.

"ओ इट वॉज अ वर्दी चॉईस!" म्हटलं तर आज भोवताली त्यातल्या छटा कळून हसणारं कुणी नसतं.

बाकी त्या अभ्यासामुळे आपण सांस्कृतिकदृष्ट्या 'आऊट ग्रुप' होतोय, प्रादेशिकता त्यामुळे पुसट होतेय, इथल्या मातीचा गंध हरवतोय, असं काही तेव्हा वाटलं नाही. बकुळीच्या फुलावरच डॅफोडिल्सचं कलम झालं. पुराणातल्या अहिरावण-महिरावणाची जागा ग्रीकांच्या मेड्युसानं घेतली, शार्दूलविक्रीडिताची हिरॉईक कप्लेटने. ओव्या, आर्या आणि केकावल्यांच्यावर, सुनीतं, ओडस् आणि

एलिजिसच्या थप्प्या लागल्या. जटायूच्याच फांदीवर फिनिक्स पक्षीही येऊन बसला. पण खरं म्हणजे दोन्ही पुराणपक्षी सारखेच अपरिचित राहिले...

पुण्याला गेलं की नजर फडक्यांच्या 'दौलत' बंगल्याचा शोध घेई. ते एकदा मराठी वाङ्मय परिषदेमुळे खरोखरच दिसले होते. पण 'काणेकर आम्हाला शिकवायला होते नि बापट आमच्याकडे चहाला आले होते' अशा आठवणी आम्ही टेनिसन किंवा मॅथ्यू ॲनॉल्डबद्दल कमवायच्या म्हटलं असतं तर इतिहास आणि भूगोल दोघांनी सहकार्य नाकारलं असतं.

ऑक्सफर्ड आणि केंब्रिज विद्यापीठांतल्या इमारती, मनोरे, नक्षीदार पूल आणि झाडं कल्पनेनं पाठ झाली; कधी काळी इंग्लंडला गेलोच तर शेक्सपियरचं 'स्ट्रॅटफोर्ड-अप-ऑन-एव्हॉन' हे जन्मगाव पाहायचं नक्की केलं.

तसा रमणलाल वसंतलाल देसाईंचा बंगला येताजाता लागे, पण "तो गुजरातीतला विख्यात कादंबरीकार... मोठासा काय असणार...??" ह्या फुकटच्या गुर्मीला कोण काय करणार?

बडोदं सोडताना एकेका राजवाड्याचा, घुमटा-मनोऱ्यांचा निरोप घेतला तो मॅथ्यू ॲरनॉल्डच्या शब्दांत 'माय स्वीट सिटी विथ ड्रीमिंग स्पायर्स...'

पुण्याला पोचल्यावर तिथल्या शंकराची भक्ती इथल्या देवळात रिन्यू करावी तसं ब्रिटिश कौन्सिल शोधून काढून धागेदोरे पुन्हा जोडून घेतले. तीच नावं, शीर्षकं इथे पाहून तेवढाच होमसिकपणाही कमी झाला. पण मुंबईला आलो तर उपनगरातल्या वाचनालयात क्लासिक्सना भाव नव्हता. मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाने तर इंग्रजीची ॲलर्जीच जाहीर केली होती आणि ब्रिटिश कौन्सिल थेट फोर्टात होती.

हळूहळू पदवी शोभेची झाली. लेखक कवींपैकी कोण कुठल्या काळातलं, यांची गल्लत होऊ लागली. चेंडू टाकला तर कोणी झेलेना. पाणी उतार शोधत मग मराठीकडे वळलं, वाचन प्रादेशिक बनलं. नाहीतरी माझं इरावती कर्वे वगैरे वाचणं राहूनच गेलं होतं... आरंभी इंग्लिश वाचायला मिळालं नाही की जीव कासावीस होई. हळूहळू मराठीसाठीही तसंच होऊ लागलं. विचाराची, वाचनाची, भोवतालाची भाषा एकच, लेखकही त्यातलेच, यात काही वेगळ्याच गरजा निभून मीही माझ्या भाषेनं लिहू लागले...

आरंभीचे इंग्रजी, मानसशास्त्र हे टप्पे मागे पडून मराठी साहित्य, समाजशास्त्र, विज्ञान, प्रसारमाध्यमांचेही थांबे लागले. ओढ आणि शोध बदलले. समाजशास्त्रासारख्या तथाकथित 'सोप्या, कंटाळवाण्या आणि निरुपयोगी' विषयाचा गंडा बांधून घेतला तेव्हा इंग्रजी साहित्य शिकतानाचा भाव घसरला...!

मग हळूहळू तो अनोळखी निसर्ग, धर्मगुरूंची ती उतरंड, त्यांचे ते पायघोळ झगे, ती विचित्र स्पेलिंगांची फुलं, कधी न चाखलेले ॲपल पाय आणि मफीनस्, मनाच्या म्युझियममध्ये गडप झाली. त्या तळघराची मग किल्लीही हरवली.

तोंडाशी खुणेचा दगड ठेवला नाही, झाडावर फुलीही मारली नाही तर अलिबाबाच्या गुहेचासुद्धा पुन्हा गुप्त खजिना होऊन जातो... सोसाट्यानं जगता जगता कदाचित् मी पुन्हा त्या भूतकाळाचा भरजरी पदर ओढून स्वत:ला जाब विचारलाही नसता.

मोठेपणी कोण अशी एकाच अभ्यासविषयाची कास धरून राहतं? माझ्या भोवतालची माणसंही या गुंतागुंतीच्या काळाशी सुसंगत अशी 'इंटरडिसिप्लिनरी' होत होती.

पण त्या दिवशी ब्रिटिश कौन्सिलमध्ये पोचायलाच उशीर झाला होता. 'जनरेशन गॅप' आणि 'विज्ञानेतिहास' या दोन चालू रसविषयांवरची काही टायटल्स मला शोधायची होती. इंडेक्सवरून नंबर काढून मी भराभर शेल्फं पार करत निघाले आणि ३०१ च्या ऐवजी चुकून अलीकडचंच, ८२० चं वळण घेतलं; तर पुढ्यात अर्जुनाला भारतीय युद्धात दिसले तसे एके काळचे, अठरा अक्षौहिणी भाईबंद रांगेने उभे : मॉम, लॅम्ब, मिल्टन, होमर, मार्क ट्वेन, हाल केन, आणि थॉमस हार्डी; ऑलिव्हर ट्विस्ट आणि आता न वाचवणारं वुदरिंग हाईटस्सुद्धा!

छे, छे, चुकीच्या गल्लीत शिरले. यांच्याशी आपला काय संबंध? सपाट्याने मी त्या सग्यासोयऱ्यांना पाठ दाखवली-नि थांबलेच! एके काळी माझ्या संवेदनांना झंकारून गेलेली, मला शहाणं व्हायला मदत करून गेलेली, माझ्याच करंटेपणामुळे कुठेतरी गळफटून गेलेली ही माझीच बिरादरी...'चुकीच्या', 'संबंध नसलेल्या' गल्लीतली! कमावलं किती, गमावलं काय? ... मधल्या काळात आयुष्यानं आपल्याला आणि आपण त्याला, असं काय केलं की....चरकणं जाईचना.

आपण आपला अभ्यासविषय कसा निवडतो? आपला आवडता विषय कसा ठरतो? 'आवडता विषय' म्हणजे तरी नक्की काय!

वर्षभरानंतर पुन्हा एकदा आद्यनगरीला जायचा योग आला. आमचं 'डिपार्टमेंट ऑफ इंग्लिश लिटरेचर' अद्याप तसंच, तिथेच होतं. तेव्हाचे ट्यूटर आता विभागीय प्रमुख झाले होते!

मी फारशी आशा ठेवली नव्हतीच, पण इंग्रजीच्या अगदी वीस-पंचवीस

बॅचेस धरूनही फार तर तीनशे विद्यार्थी झाले असणार. "सर, मला-"

"ओळखलं तर! मला आठवतंय, व्हर्नॅक्युलर मीडियममुळे न बिघडलेले जे काही थोडे स्टुडंटस् होते त्यांच्यापैकी एक होतीस तू-."

सरांच्या आवाजातल्या आत्मीयतेमुळे मला व्हायला पाहिजे होता तो आनंद झाला होता, तरीही पुन्हा एकदा मन चरकलंच. आपल्या मातृभाषेतनं शिकल्यामुळे, इथल्या मातीच्या बोलीमुळे माणूस बिघडतो? परभाषा मोलाची की ते एक मूल्यच?

तो उद्गार वाच्यार्थाने घ्यायचा नव्हता. तरीही मला वाटलं, कदाचित आपण इथून वेळेवरच पांगलो, इथे तथाकथित बेस पक्का होईपर्यंतच राहिलो. नाहीतर आपली मुळं कुठे असती? की कुठेच नसती? चॉसरचं इंग्लंड आता अस्तित्वात नाही आणि आता अस्तित्वात असलेल्या इंग्लंडशी, इंग्लिश मातीशी संबंध जोडणंही आपल्याला जमलं नसतं तर आपण आज अशा या ओस पडलेल्या डिपार्टमेंटमध्ये कुठे असतो-ईश्वराप्रमाणे सगळीकडे भरून असलेल्या आणि तरी कुठेच नसलेल्या भाषेत बोलत?

पण आणखी एक सर एन्शंट दिसायचं आपलं काम विसरून, तिथेच इंग्रजी साहित्याच्या संजीवनीत डुंबत बसले होते. निवृत्तीनंतरही त्यांचं संशोधन चालूच होतं. मी अमेरिकेला जायच्या खटपटीत होते. हक्काने त्यांची मदत घेतली, शिफारसपत्रं मिळवली. निरोप घेताना ते पुन्हा पुन्हा म्हणाले, "एवढी जाते आहेस तर लंडनला गेल्याशिवाय राहू नकोस. आणखी थोड्या पैशांचं जमव, जमेलच."

सर त्यांच्या इंग्लंडमधल्या वास्तव्यात एकदा लंडनच्या कुठल्यातरी रस्त्यावर पावसाची सर आली म्हणून वळचणीला उभे होते. सहज मागे पाहातात तर त्या जुन्या बांधणीच्या, नक्षीदार दरवाजांच्या सरदारवाड्यावर एका सुप्रसिद्ध इंग्लिश कवीच्या नावाची पाटी लावलेली. पाटीवर दिलेल्या माहितीनुसार तो साहित्यिक तिथे वीस वर्षे राहिला होता!

त्यावेळी अनुभवलेला नखशिखान्त थरार माहुलकर सर अजूनही अनुभवत होते. इंग्लंडमध्ये, लंडनमध्ये, केंब्रिजमध्ये त्यांच्या-आमच्यासाठी असे थरारच थरार होते. त्यांतला एक तरी थरार माझ्याही वाट्याला यावा यासाठी त्यांची तळमळ होती.

मला आर्थिकदृष्ट्या अजिबात आत्मविश्वास नव्हता की लंडनला मी उतरू शकेन. पण मी तसं म्हटलं नाही. त्यांची कळकळ मला कळत होती. एके काळी का, आजही त्यांची-माझी मक्का एकच होती.

त्यांच्या शुभेच्छा शिष्यवृत्तीसारख्या मानून मी अमेरिकेची वारी करून परतले, त्यालाही आता दोन वर्षं झाली. वाटेत उतरून मी व्हॅटिकन सिटीही पाहिली. पण लंडन विमानतळाला काही मी चरणधूळ झाडली नाही आणि आजपर्यंत सरांना मी तसं कळवलेलंही नाही.

मात्र कधी काळी त्यांना हे कळवावं, सांगावं लागलंच तर मग मी हेही त्यांना सांगेन किंवा कळवेन की केंब्रिजला जाणं, वेस्ट मिनिस्टर ॲबे पाहाणं माझ्या कुवतीत नव्हतं. पण मग मी पिकॅडली सर्कलला जाऊन खरेदीही केली नाही. ऑक्सफोर्ड स्ट्रीटला जाऊन नायलॉनच्या साड्यांची स्वस्त दुकानं धुंडाळत हिंडले नाही. आजच्या घटकेस माझ्या त्या आवडत्या विषयाशी मी पाळलेली बांधिलकी, इमान हे इतकंच, असंच.

■ ■ ■

# वाचनालयं अशी वागतात

ग्रंथालय चालवणं हे एक शास्त्र आहे आणि ते वाटतं तितकं सोपं आणि कंटाळवाणं नाही हे सुदैवाने मला फारच लौकर कळलं आणि त्यामुळे ग्रंथपालाला कारकून समजण्याची चूक मी कधी केली नाही.

उलट, ग्रंथपालांनीही वाचक म्हणून माझी नेहेमीच दखल घेतली. त्यामुळे आमचे संबंध कायम निरोगी राहिले. आता तर ते आयुष्यातले एक सतत उलगडत जाणारं नातंच होऊन बसलं आहे.

अर्थात, असं सगळं सलोख्याचं व्हायला तुम्ही वाचनाची सुरवात कोणत्या ग्रंथालयात करता, हे महत्त्वाचं असतं. मी भोगलेलं पहिलं ग्रंथालय इतकं सुंदर होतं की, सिंड्रेलानं लहानपणीच उंदराच्या पिंजऱ्याची ट्रिक करून राजपुत्राशी शादी उरकून टाकली नसती तर ती कॉलेजात गेल्यावर आपल्या कादंबऱ्या बदलायला त्याच ग्रंथालयात गेली असती. माझी गोष्टींची पुस्तकं वाचायची चटक या वाचनालयानं सहजतेनं पुढे नेली.

पण गाईडचं काम मी करणार असेन तर मी आधी तुम्हाला तिथलं बालवाचनालय दाखवीन.

विलिनीकरणापूर्वीच्या बडोद्यातल्या सरकारी सार्वजनिक ग्रंथालयाचा हा बालविभाग. वाचनालयं म्हणजे नुसती पुस्तकं नव्हेत, ही अमेरिकन कल्पना त्याही काळात सयाजीरावांनी तेथे राबवली होती. भिंतभर काढलेलं पतंग उडवणाऱ्या मुलांचं चित्र हे त्याचं प्रतीक, त्यातल्या मुलांचे चेहरे आणि पेहेराव अर्थात करीम, गोपाळ आणि सूरजीत अशी नावं सुचविणारे. या एकदालनी ग्रंथालयात पुस्तकांबरोबरच पत्ते, कॅरम, व्ह्यू मास्टर इत्यादी खेळही असायचे. आणि यातल्या सगळ्याला 'मुक्तद्वार' होतं. खेळाकडे मी ढुंकून पाहात नसे ते सोडा, पण त्या गुजराती-मराठी-हिंदी अशा संमिश्र कोलाहलात बसून पुस्तकं

वाचताना साबणाच्या फेसात बुडावं तशी मी हळूहळू ह्या पुस्तकांच्या पेटाऱ्यात बुडत जाई. शेजारच्या मुख्य वाचनालयात जाताना पालकांना मुलं तिथे सोडून जाता यावं, अशीही सोय अभिप्रेत असावी, कारण ग्रंथपालबाईंच्या मागच्या बाजूला असलेलं दार उघडून पालक गुप्त होत.

मुख्य ग्रंथालयाचा जिना खरं म्हणजे वेगळा होता. ज्या ग्रंथालयाबद्दल सांगताना मला ॲलिस-इन-वंडरलँड ऐवजी सिंड्रेलाची आठवण झाली ते या मुख्य ग्रंथालयाचं अंत:पूर किंवा बालेकिल्ला. अमुक इतकं मोठं झाल्याखेरीज तेथे प्रवेश नसे.

हा संपूर्ण अडिचाव्वा मजला म्हणजे एक काचमहाल होता. जमिनी, भिंती, खांब, खण, सगळं काचेचं! वास्तुसौंदर्याची व्हेनिशियन कल्पना होती म्हणे ती! दुधी रंगाच्या, निमपारदर्शक अशा त्या काचेवर बाहेरच्या सज्जातल्या रोपवाटिकेमुळे गालावरच्या लाजेइतकी किंचितशी हिरवी छटा येई आणि आत गुहेतल्यासारखा, गाभारातल्यासारखा गारवा असे. पारदर्शक कपातनं चहा आरपार सांडत नाही तशीच तिथली माणसं खालच्या मजल्यावर पडत नसत. त्या गारशीळ जमिनीवरून उगाचच जपून चालताना उरात जो सुखावा भरून येई तो पुढ्यातल्या ग्रंथसंभारामुळे की त्या शीशमहालाच्या काचेरी स्पर्शामुळे, कुणास ठाऊक. वाटे, चला, आपल्याला सिंड्रेलासारख्या काचेच्या चपला नाहीत, पण ती काचेची पादत्राणं घालून जमिनीवरून चालली तर आपण चामड्याच्या चपला घालून काचेच्या जमिनीवरून!

तिथल्या कित्येक पुस्तकांची वेष्टणं मखमली आणि कडा सोनेरी असायच्या. काही पुस्तकांना तर पितळी कड्या-कोयंडे होते!

अशा सुंदर वाचनालयात इंग्लिश लिटरेचर नाही तर काय सोशॉलॉजी वाचणार? थॉमस हार्डी, मेरी कोरेली, डिकन्स इत्यादींच्या त्या प्रथमभेटी होत्या. टेस, टोनो बंगे... कॉलेजात घ्यायला आपण योग्य विषय निवडलाय अशी माझी खात्री या गुप्तशा लायब्ररीनं करून दिली.

ग्रंथपाल खडूस नसतातच असा दावा मी कसा करेन? पण आयुष्यात आपल्याला जेवढे चांगले शिंपी, डॉक्टर्स आणि शिक्षक भेटतात त्यांच्यापेक्षा जास्त संख्येने जास्त चांगले ग्रंथपाल भेटतात. आणि याचं कारण ग्रंथपाल जेवढा पुस्तकांत गुंतलेला असतो तेवढा शिंप्याचा त्याच्या पुढ्यातल्या लेंग्यावर, डॉक्टरचा त्याच्या मिक्श्चरवर आणि शिक्षकाचा त्याच्या पुढ्यातल्या पृथ्वीच्या गोळ्यावर जीव नसतो. ग्रंथपाल बनवायच्या शाळा आहेत, पण चांगला ग्रंथपाल चांगल्या परिचारिकेसारखा जन्मावा लागतो.

'मुंबई मराठी'च्या इथल्या शाखेत एक हिरवं लुगडं नेसणाऱ्या, नाकेल्या, चष्मा लावणाऱ्या बाई होत्या. त्या अप्रशिक्षित होत्या, पण मी लिहिते म्हटल्यावर माझ्या वाचनाची दिशा समजावून घेऊन मला पुस्तकं सुचवणं, ती बाजूला काढून ठेवणं आणि बिनगर्दीच्या वेळी मला त्यांच्याविषयी बोलतं करणं, ही कामं या रानडे बाई आपण होऊन करत आणि असं त्या अनेक वाचकांसाठी करत. भिंती नेहमी ताज्या कात्रणांनी, वेष्टनांनी सजवत, वाचकस्पर्धा ठेवत. 'वासूनाका' त्या वेळी गाजत होतं. एके दिवशी मी न मागताच त्यांनी ते आपल्या पिशवीत घालून काउंटरखालून मला दिलं तेव्हा माझी खरी करमणूक झाली. म्हटलं, या आपल्याला इतक्या ओळखून कशा बुवा! (वासूनाक्यातल्या खऱ्या इरसाल शिव्या कुठल्या, हे आम्हाला दोघींनाही कळलं नाही...)

विलेपार्ल्याला राहायला आल्याच्या आनंदात मी एकदम तीन लायब्ऱ्या जॉईन करून ठेवल्या होत्या. इतकं वाचून होईना! शिवाय पुस्तकं 'लेट' देणं, एका वाचनालयाची मासिकं दुसऱ्या वाचनालयात परत करणं, इत्यादी प्रकार झाले. शेवटी वाचनालयांच्या संख्येत कपात केली नाही तर आपल्याला गरगरायला लागेल हे कबूल करावं लागलं. 'मुबंई मराठी'त त्या वेळी संग्रह कमी व इंग्रजी वाचनाचीही सोय नसल्याने नाईलाजाने तिचा नंबर आधी लागला. मी पुस्तकं-शेवटची-परत करायला गेले तेव्हा बाई हळहळल्या, "अहो, पण मी कधी तुम्हाला काही म्हटलंय का घोटाळे करण्याबद्दल..."

रानडे बाई 'बॉर्न लायब्ररीयन' होत्या! ग्रंथपालन ही नोकरी नसून वृत्ती आहे, हे त्यांनी मला शिकवलं. चांगला ग्रंथपाल वाचकाला ग्रंथप्रेमातून ग्रंथभक्तीकडे नेतो, त्याचं वाचन सकस, समृद्ध करत नेतो, हे तत्त्व मी पुष्कळ पुढे ऐकलं.

शाळेतल्या वर्गात जसं शिक्षकाचं अस्तित्व भरून असतं, तसं ग्रंथपालाचं नसावं. ग्रंथालयात गेल्यावर प्रथम जाणवायला हवीत ती पुस्तकं; ग्रंथपालाचा दबदबा नव्हे. तो निरुपद्रवी, कार्यमग्न पण गरजेला तत्पर असावा. पुस्तकं त्यानं लादू नयेत.

वाचक म्हणून माझेही काही हक्क आणि जबाबदाऱ्या असतात; या दोन्हीविषयी मला जागरूक करणारी निर्मला तर पुढे माझी मैत्रीणच झाली. निर्मला नजिकच्या महिला महाविद्यालयाची ग्रंथपाल आहे. अडीअडचणीला तिचं हे ग्रंथालय मनापासून माझ्या पाठीशी उभं असतं. मला हवा असलेला संदर्भ, पुस्तकं आठवणीनं आणून देणं, आठवणीनं परत नेणं, हे सारं निर्मला येता-जाता श्वासोच्छ्वासासारखं करते. येता-जाता, कारण ती आमच्या वरतीच राहते.

स्मरणशक्ती, व्यवस्था, वैचारिक शिस्त या गुणांमुळे ती ग्रंथपालनाकडे वळली असेल की त्या पेशामुळे हे गुण तिच्यात विकसित झाले? तिच्यामुळे मी "दंड भरतीय ना मी, मग काय झालं पुस्तक लेट दिलं तर?" या उद्धटपणातून बाहेर आले आणि "बिचाऱ्या लायब्ररीयनला किती पुस्तकं काढायला लावायची?" या ओशाळेपणातूनही. "-तुमचा तो हक्क असतो नि आमचं कर्तव्य. 'मुक्त प्रवेश' नसणं ही आमच्या वाचनालयाची कमतरता असते." निर्मलामुळे मी महाविद्यालयीन ग्रंथालयंही स्वभावाने सार्वजनिक असतात हा अनुभव घेतला आणि मग मी थेट परदेशातही धडामकन् कुठल्याही शैक्षणिक, सार्वजनिक संदर्भग्रंथालयात सुद्धा शिरू शकले. तिच्यामुळे मला आंतरग्रंथालयीन सेवा, आंतरग्रंथालयीन सूची (युनियन कॅटलॉग), इत्यादी खास सेवा ज्ञात झाल्या. निर्मलाने माझ्यासाठी जे केलं त्याला शास्त्रीय परिभाषेत 'ओरिएन्टेशन' असं नाव आहे.

वाचनालयाचे नियम किती लवचिक समजायचे नि किती काटेकोर पाळावेत याचं नेमकं प्रात्यक्षिक मला पार्ला कॉलेजच्या ग्रंथपालांनी दाखविलं. काही पुस्तकं मी हिंदीच्या, इतिहासाच्या प्राध्यापकांच्या ओळखी काढून त्यांच्या नावांवर आणली. त्यांना त्रास देणं जीवावर येऊ लागल्यावर थेट प्रमुख ग्रंथपालांपुढे जाऊन उभी राहिले. आणि बरेच दिवस त्याही ग्रंथालयाचं सौजन्य भोगलं. दरम्यान रीतसर मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयाचं सभासदत्वच घ्यावं हे मला सुचलं आणि तिथल्या श्री. टिकेकरांना माझं "नुकतंच तर मला काय वाचावं ते कळायला लागलंय" हे वाक्य पटलं! आता मला व्हाया पार्ला कॉलेज तिथली पुस्तकं मागावी लागणार नव्हती. पण प्रथमग्रासे मंक्षिकापात: झाला! मी पार्ला कॉलेजच्या मध्यस्थीनं मिळवलेलं विद्यापीठाच्या 'फोर्ट कॅम्पस'वरचं पुस्तक आता माझ्या नावावर मला 'रिन्यू' करून हवं होतं. दुय्यम ग्रंथपालांनी 'खो' घातला. "पुस्तक योग्य मार्गांनी आपल्या जागी परतल्याशिवाय ते 'कलिना कॅम्पस' माझ्या नावावर 'इश्यू' कसं करू शकेल?" मला पुस्तकाची घाई होती, कुणीतरी ते मधल्यामध्ये लंपास करेल ही भीतीही होती. पण पार्ला कॉलेजमध्ये परतले तर शिवदे म्हणतात, "आता तुम्ही तिथल्या मेंबर आहात. तुम्ही आमची सेवा वापरणं बरोबर नाही. पुस्तक तुम्ही कलिना कॅम्पसवरूनच घ्या." शेवटी व्हायचं तेच झालं; पुस्तक पुन्हा माझ्या हाती यायला दोन महिने लागले. पण मला ग्रंथपाल शिवदेंचा राग आला नाही. माझ्या गरजेच्या कालात त्यांनी माझ्यासारख्या आगंतुक अभ्यासकाला सढळपणे सेवा दिली होती. आता मला इतर मार्ग आहेत म्हटल्यावर ती नाकारून आपल्या स्टाफचं जादा काम

वाचवलं होतं आणि माझ्यामागून येणाऱ्या पांथस्थांसाठी सेवा खुली राखली होती.

शिवद्यांनीच माझं कुतूहल पाहून मला एक पुस्तक सुचवलं; त्याचं नाव होतं, ग्रंथालयशक्ती : 'लायब्ररी पॉवर'.

विद्यापीठ स्तरावरच्या ग्रंथालयांचे कायदेकानून बहुधा वाचकाला चोर समजूनच बांधलेले असतात. (विद्यार्थ्यांच्यामध्ये ग्रंथपाल खडूस म्हणूनच प्रसिद्ध असतात.) आणि मोठ्या वयात त्यांचा कधी कधी उपद्रवच नव्हे तर अपमानही वाटतो. "चालायचंच, या बसचा कंडक्टर तो-" असं म्हणून ग्रंथपालाला समजून घ्यायचं असतं. घेणं जड जातं. हळूहळू मग पुस्तकातली फाडलेली पानं पाहून दुसऱ्या बाजूचं म्हणणंही पटायला लागतं. मुंबई विद्यापीठाच्या ग्रंथालयातील एक ग्रंथपाल मला हसतमुखाने उत्तर देई, मार्गदर्शन करी. "घारी-गोरी आहे ना," मुलींचं म्हणणं असे, "जातीला विचारतेय!" आता त्यांना कसं पटवणार की...

अमेरिकेतल्या ग्रंथालयांत तुमची पिशव्या-पुस्तकं कुणी तपासत नाहीत, कुणी तुम्हाला हटकत नाहीत. गावातल्या सार्वजनिक ग्रंथालयातून तर गावातल्या कुणालाही आवडलेलं पुस्तक घरी न्यायला मेंबर असावं लागत नाही. एका वेळी बरीच पुस्तकं नेता येतात. ही सगळी चंगळच वाटते. एकदा मी गमतीनं म्हटलं, "आज मी सरळ गठ्ठाच घेऊन बाहेर पडणार होते." मग कळलं, ग्रंथालयाच्या दाराजवळचा तो काळसर चौकोनी खांब चोर पकडतो! पुस्तकाला आतून धातूचा तुकडा बसवलेला असतो. आपण 'एन्ट्री' करून न घेता बाहेर पडू लागलो की खांब धोक्याची शीळ वाजवतो. ज्यांच्या हृदयाची शस्त्रक्रिया होऊन धातूपट्टी बसवलेली असते त्यांच्यासाठी वेगळं दार असतं!

इतकी अनुभवी असूनही एकदा मी उगाचच घोळ घातला. अभ्यासविषय नवा होता. मुंबईतली मिळतील तेवढी पुस्तकं वाचायची (!) म्हणून थेट पार्ल्यातल्या टिळक मंदिरापासून आय.आय्.टी.; एस्.एन.डी.टी.; डेव्हिड ससून, पेटिट, युसिस, ब्रिटिश कौन्सिल करत करत मुंबईतली ७५ टक्के वाचनालयं पालथी घातली. सुदैवाने व्हाया टी.आय.एफ.आर. पुण्याकडे मोर्चा वळवण्यापूर्वी मला माझ्याच कॅम्पस लायब्ररीवर चक्कर टाकण्याची बुद्धी झाली, तर तिथे खजिनाच सापडला. मग लक्षात आलं, वाचनालयाचाही फोकस ठरलेला असतो. आय्.आय्.टी. चा भर अभियांत्रिकीवर, एस.एन.डी.टी. चा गृहविज्ञानावर, 'एशियाटिक'चा समाजशास्त्रीय, संशोधनपर विषयांवर. अवांतर वाचन, वाङ्मय विहार किंवा वृत्तपत्रीय कात्रणांसाठी प्रसिद्ध असलेल्या संग्रहालयात जर मी

विद्यापीठ पातळीवरचा अभ्यासविषय शोधायला गेले...

पुढे मी एक 'इंटर डिसिप्लिनरी' विषय निवडला. माझ्या विषयाची पुस्तकं फसवी शीर्षकं घेऊन नाना विभागांत दडलेली असणार होती. कुण्या जाणकाराकडून ग्रंथसूची करून मिळाल्यास माझी वणवण कमी होणार होती. नावलौकिक ऐकून मी कलकत्त्याच्या ग्रंथपाल श्री. बा. जोश्यांचा पत्ता मिळवून, त्यांना सिनॉप्सिस पाठवून दिलं. त्यांनीही "आम्ही नाही तर कुणी तुमच्यासारख्यांना मदत करायची?" म्हणून सूची करून द्यायचं मान्य केलं. वर्षभराने काम पुढच्या टप्प्यावर आल्यानंतर माझ्याकडून स्मरणपत्र गेलं. उलटटपालानं दिलगिरी आली आणि महिन्याभराने माझ्या विषयावरच्या शंभर पुस्तकांची यादी. पत्रातलं आणि सूचीतलं अक्षर एकच होतं. मला फार चोरट्यासारखं झालं. "हे काम खुद्द तुम्हाला करावं लागेल हे माहीत असतं तर..." माझ्या आभारपत्राला श्री. बां. चं उत्तर आलं, "माझ्या दिमतीला कर्मचाऱ्यांचा ताफा असतो, अशी कल्पना बऱ्याच लोकांची असते. अशी कामं मलाच कामाचे तास संपल्यावर बसून करावी लागतात. आताशी पूर्वीसारखी झेपत नाहीत..."

लेखकाला समाजातले विविध वर्ग मदत करतात, असा माझा अनुभव आहे. प्राध्यापकांचाही त्यात मोठा वाटा असतो. परंतु 'वाचकाला त्याचं पुस्तक आणि पुस्तकाला त्याचा वाचक' मिळवून द्यायच्या वृत्तीतून अनेक ग्रंथपाल तुमच्यासाठी कष्ट घेतात तेव्हा ते एका तऱ्हेने तुमची ग्रंथनिर्मितीच 'शेअर' करत असतात. आणि हे सारं ते तोंडी आभार, प्रस्तावनेत उल्लेख, इत्यादींची अपेक्षाही न ठेवता करतात. तुम्ही एखाद्या संदर्भासाठी चाचपडताय हे त्यांना गोड लागत नसतं; तुम्हाला एखादं दुर्मिळ पुस्तक अचानक मिळालं की होणारा आनंद तुमच्याखालोखाल त्यांना कळतो. आपलं एखादं पुस्तक आपण आपल्या लेखनवाटेवर अशी 'आनंदाची झाडं' लावत जाणाऱ्या ग्रंथपाल मित्रांना अर्पण करायचं, असं माझ्या आधीही अनेक लेखकांना वाटलंय...

मोठ्या वाचनालयातून तुमचा खरा संबंध येतो तो काउंटरवरून तुमच्याशी पुस्तकांची देवघेव करणाऱ्या कनिष्ठ कर्मचाऱ्यांशी. वाचकांना, विद्यार्थ्यांना लागणारं कोणतं पुस्तक कुठे आहे, हे त्यांना नेमकं माहीत असतं. दादरच्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या संदर्भ विभागात काम करणारे पारायणे यांची चौकशी काही अभ्यासक खालूनच करतात- "पारायणे आहेत का, तर आम्ही वर येतो!" ग्रंथसंग्रहालयात काम करायला योग्य अशी वृत्ती तर त्यांनी कमावली आहेच, पण आडनावही!!

'युसिस' या अमेरिकन ग्रंथालयात एकदा मला 'न्यू सोसायटी' या नियतकालिकात एक महत्त्वाचा समाजशास्त्रीय लेख वाचायला मिळाला. मला तो लेख संग्रहासाठी हवा होता. परंतु मी तेव्हा त्यांची सभासद नव्हते. ग्रंथपाल मला अंक बाहेर नेऊ देईनात आणि आत 'झेरॉक्स'ची सोय नव्हती! मी तर नाद सोडला नाही. 'एशियाटिक'च्या माझ्या पुढल्या फेरीत मी तो संदर्भ तिथल्या एका प्यूनला दिला-"न्यू सोसायटीचा हा अंक आपल्याकडे असेल का?" त्या वयस्क प्यूनने जंग जंग पछाडलं. कुठून तरी जवळपासचा अंक आणून दाखवी, "बाई, हा तर नाही?" शेवटी त्याने 'सोसायटी' या नव्या फॅशन्सना वाहिलेल्या मासिकाचा अंक माझ्यापुढे धरला. तशी मी एकदम मोठ्यानं म्हटलं, "छे; हे 'सोसायटी' नकोय मला!" माझ्यापेक्षाही त्या प्यूनची प्रतिक्रिया गमतीदार होती. दिलखुलास हसून तो म्हणाला, "तरी म्हटलं, आमच्या बाई हे असं मासिक कसं वाचतील!" त्याचा तो रिलीफ पाहून म्हटलं, "आता निदान याच्या मनातली इमेज टिकवण्यासाठी इथे(!) चटोर वाचन करता कामा नये!"

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाची नायगाव शाखा हा खरं तर संदर्भविभाग आहे. अभ्यासक, संशोधक, साहित्यिकारांनी तिथे बसून-वेळप्रसंगी तिथे मुक्काम ठोकूनही-तिथल्या ग्रंथांचा लाभ घ्यायचा असतो. पण पुष्कळदा प्रत्यक्षात मोठाली पुस्तकं तिथे बसून वाचणं सोयीचं नसतं. अशा वेळी ग्रंथपाल तारतम्य वापरून सवलत वाढवू शकतात. लतिका जोशी या तिथल्या ग्रंथपाल हे काम फार समजून करतात. फोनवरून सांगितलेल्या विषयाचे संदर्भ गोळा करून ठेवणे; गेल्याबरोबर पाणी, खुर्ची, पंखा असा सगळा निवांतपणा तुमच्या भोवती मांडून देणं; "बाई, घ्या ना थोडा चहा आमच्याबरोबर" एवढंच नव्हे तर, "तुम्ही उठू नका" करत कप तुमच्यासमोर आणून ठेवणं, एवढ्यावरच त्यांचं आदरातिथ्य थांबत नाही. मध्येच तुमच्या टेबलावर एखादी लिमलेटची गोळी येऊन पडते, वाचनाची चव वाढवायला!

आमची एकदा लोकलमध्ये गाठ पडली. उतरताना एका मोठ्या साहित्यिकेचं नाव घेऊन म्हणाल्या, "तुम्ही एवढ्या बोललात! आम्ही आमची पायरी ओळखूनच वागतो; पण xxx बाई खुशाल महिनेन् महिने पुस्तकं नेतात, आणि रस्त्यात भेटल्या की तोंड दुसरीकडे!"

जोशी पार्ल्यातच राहातात. मला हवे असलेले खंड पिशवीत मावत नसले तर स्वतः वाहून न्यायची त्यांची तयारी असते. एकदा तर माझ्या तुटक्या स्लीपर्सचं पुडकं सांभाळायला त्यांचा हात पुढे झाला, तेव्हा मीच त्यांची पायरी

सांभाळली! अनेक गाढ्या-मूढ्या साहित्यिकांपेक्षा ललिताबाईंची पायरी वरची आहे आणि याची त्यांना कल्पनाही नाही!

पार्ल्यातल्या एका प्रथितयश लेखक मित्रांना मी एकदा विचारलं, "तुम्ही कुठल्या लायब्ररीचे मेंबर आहात?"

"मी कुठल्याच लायब्ररीत जात नाही. लागतील ती पुस्तकं विकत घेतो."

"का?" मला ही आढ्यता कळेना, व्यवहार्यही वाटेना.

"इथल्या ग्रंथालयांना लेखकांशी कसं वागावं याची जाणीव नाही."

मीही लेखक होत होते, पण ही अपेक्षा मला कळेना. इतर सुवाचकांपेक्षा लेखक स्पेशल कसा? वाचनालयानं त्याची खातिरदारी केलीच पाहिजे हा आग्रह मला, पुढे दहा वर्षे मी आश्चर्य करीत राहिले, इतका और वाटला. अगदी अलीकडे मुंबई विद्यापीठाचे प्रमुख ग्रंथपाल श्री. टिकेकर यांनी गप्पांच्या ओघात शंकानिरसन केलं.

ग्रंथपालाच्या खुर्चीतून त्यांना या लेखकाची अपेक्षा गैरवाजवी वाटली नव्हती. विशेष वाचकांचा एक गट जोपासणं, त्यांना खास सवलती देणं, त्यांची काळजी वाहाणं हा त्यांच्या मते उपकार, पक्षपात ठरत नाही. ग्रंथपालाच्या कर्तव्यातलाच नव्हे तर आनंदाचा तो भाग असतो. टिकेकरांच्या ग्रंथालयाने तर "मुलाचं नाव काय ठेवू?", "लग्नपत्रिकेवर छापायला शाकुंतलमधला श्लोक सांगा" इथपासून "वाघ साबुदाण्याची खिचडी खात आहे का? ...सिंह असेल. नाहीतर सिंह बघा-" इथवर वाचकसेवा मुंबईबाहेरच्या रसिकांसाठीही केलेली आहे. टिकेकरांसारखे अनुभवी ग्रंथपाल आपल्या आठवणी ग्रथित केव्हा करतात, याची मी वाट पाहात आहे.

पार्ल्यातला माझा अनुभव वेगळा होता. टिळकमंदिराच्या वाचनालयाची मी सभासद होताच मला तोंड भरून सांगण्यात आलं, "तुमचा अभ्यासविषय सांगा, आम्ही संदर्भ काढून, सूची बनवून तुम्हाला गठ्ठ्यानं पुस्तकं देऊ." पुढे वाचनालय मुख्यतः गृहिणींकरता दुपारी अभ्यासिका खुली ठेवू लागलं. एक नवा उपक्रम वाचकांच्या औदासिन्यामुळे बंद पडू नये म्हणून मी मुद्दाम, अवेळी तिथे थडकत असे-शेवटी तो बंद पडलाच!

या वाचनालयामुळे मला ग्रंथालय-वाचक संबंधातली आणखी एक गोम कळली. आम्ही दोघांनी लौकरच त्या वाचनालयाची मक्का करून टाकली; पण माझी एक मैत्रीण म्हणे, "आहे काय तिथे? हवं ते पुस्तक मिळेल तर शप्पथ!" मला कळेना, हे वाचनालय माणसासारखं दोघांशी दोन तऱ्हांनी कसं वागतंय? मग लक्षात आलं, आम्ही बागेत विहार करायला गेल्यासारखं तिथे रमत होतो,

ती वाण्याकडे साबण आणायला गेल्यासारखी जात होती. प्रत्येक वाचनालय हा एक नवा संबंध, अनुभव असतो. आवडत्या माणसाशी परिचय, मैत्री वाढवत न्यावी तसा दोन्ही पक्षांनी तो जोपासायचा असतो. नेहमीच्याच मराठी कादंबऱ्यांच्या, चरित्रांच्या अथवा टीकावाङ्मयाच्या खणात मग एखाद्या दिवशी एकदम एक बहुमोल ग्रंथरत्न तुमच्यासाठी, राणीच्या मुकुटातला हिरा चमकावा तसं चमकतं. तो ब्रह्मानंद इतका वेगळा असतो की तुम्ही हरीणउडीच घेता. वेळप्रसंगी मग ग्रंथपालही आपला काउंटरपल्याडपणा सोडून तुमच्यासाठी 'दालमें खसखस' शोधायला पुढे होतात... एकदा गट्टी जुळली की ग्रंथालयांच्या मुठीतून तुमच्यासाठी काय काय जादू निघतात...

काही ग्रंथालयांत सरकारी कचेरीतल्यासारखं वरून खाली आलं की तुमचं काम झटकन होतं, तर इतर वाचनालयांत ही सापशिडी बरोबर उलटी असते. काही वाचनालयं प्रारंभी भांडतात; मग दोस्त बनतात.

'युसिस'मध्ये मी इतरांच्या प्रवेशिका वापरून नेहेमी जात असे. हवं ते पुस्तक बहुधा नसे, पण नियतकालिकं बरीच पाहायला मिळत. मात्र पिशवी, पर्स, वहीसुद्धा बाहेर ठेवायची. प्रसाधनगृहात जायचं तर ग्रंथपालाकडे किल्लीसाठी संपर्क साधावा लागे. 'नोटस्'साठी तिथलाच कागद वापरावा लागे. पंजाब अतिरेकी झाला तशी हे सगळे नियम आणखीच कडक झाले. बिगरसभासदांना प्रवेशच बंद झाला. सभासद होण्यासाठी कागदपत्रं व्यवस्थित लागतात असं कळलं, तेव्हा मी ओळखपत्र म्हणून आंतरराष्ट्रीय पासपोर्ट नेला, फोटो काढून नेला. कंपाऊंडप्रवेशाबरोबर एका खाकी गणवेशाचं वसकन् आडवं येणं, "थांबा, तुम्हाला आत जाता येणार नाही." "मला मेंबर व्हायचंय." तशी कामगारासारखी गेटवरच तपासणी. "फोटो आणलाय?...रेशनकार्ड? नाही? मग परत जा. रेशनकार्ड आणलंत तरच सभासदत्व मिळेल!"

तो इम्पोर्टेड द्वारपाल अमेरिकन काऊन्सिलेटच्या व्हिसा कचेरीतल्या सिक्युरिटी ऑफिसरचा सख्खा चुलतभाऊ वाटला! आंतरराष्ट्रीय प्रवासपरवान्यापेक्षा रेशनकार्डच हवं, हे आधी आडमुठं. त्यात ते सौजन्यपूर्वक नजरेस आणून देणं नाही. "आता मेंबर व्हा, मग आणून दाखवा रेशनकार्ड," हे तर नाहीच! मोफतची ग्रंथसेवा, म्हणून काय झालं?

"तुम्हाला असं केलं?" करत मग जयवंत दळवींनी शिफारस-चिठ्ठी दिली. माझा प्रश्न-"तुम्हाला-आम्हाला"तला नव्हता. तरीही, मला त्यांची खास वाचकश्रेणी नाकारण्यात आलीच, पण शीघ्रगती अमेरिकेतल्या ताज्या घटनांमध्ये मला गम्य असल्याचं मी त्यांना पटवू शकले नाही, ही त्यांची चूक नव्हे.

शिवाय, प्रत्यक्ष सभासद म्हणून गृहप्रवेश करताच ग्रंथपाल सावे मनापासून बोलले आणि मन त्या वातानुकूलित वातावरणात रमून गेलं. अर्थात अजूनही खिशात प्रवेशपरवाना नसल्यास आत जाण्याची प्राज्ञा नाहीच!

अमेरिकन द्वारपाल आणि ब्रिटिश कौन्सिलचा द्वारपाल परत आते मामेभाऊ निघाले! पुणं सोडताना ब्रिटिश कौन्सिलचं सभासदत्व सोडलं तरी मी इथेही कुणाकुणाच्या नावावर पुस्तकं आणायला जात होतेच. कुणी ओळखदेख विचारली नाही की हटकलं नाही. एकदा परत जाताना प्रसाधनघरात शिरू लागले तशी दारापाशीच अटक झाली. "थांबा, कुठे चाललात? पडा बाहेर! पाच वाजायला आले. निघा!" मुंबईत तर हा दुष्टपणा 'पाण्याला नाही' म्हणण्यापेक्षाही अमानुष! जिनाभर मी धुमसतच होते. मग कळलं, एकदा कुणीतरी टॉयलेटमध्ये राहून गेलं होतं, या शिपायाला त्याचा धसका होता! पण म्हणून...

मात्र पुढे याच वाचनालयानं एक सुखद अनुभव माझ्या खात्यावर नोंदवून आपलेपणा सिद्ध केला. महायुद्धकालीन अण्वस्त्रनिर्मितीबद्दल मला वाचायचं होतं. काहीच मिळेना तेव्हा विचारणा करत करत मी खांडेकर नावाच्या ग्रंथपालांपर्यंत पोचले. "दर चारपाच वर्षांनी जुनी पुस्तकं काढून टाकून आम्ही संग्रहातला ताजेपणा टिकवतो." त्यांनी खुलासा केला. थोडी माझ्याबरोबर धुंडाळणीही केली. मी ती मुलाखत विसरलेही. नंतर पाऊण वर्षानं पार्ल्यातल्या टिळकमंदिरातनं माझ्यासाठी फोन आला. "तुम्हाला 'ब्रिटिश कौन्सिल'मध्ये बोलावलंय." मी आश्चर्य करीत गेले. खांडेकरांच्या मेंदूत माझ्या विषयाची नोंद होती. त्या विषयावरच्या आंतरराष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या 'Reith Lectures' या व्याख्यानमालेची भाषणं त्यांच्या हाती लागली, तेव्हा त्यांना माझी अचूक आठवण झाली. ब्रिटिश कौन्सिलची मी सभासद नव्हते तरी त्यांनी 'इच्छा तेथे मार्ग' शोधून काढून मला गाठलं होतं. त्यांनी संपूर्ण विश्वासाने ती फाईल मला 'सवडीने वाचण्यासाठी' दिली. मी ती सवडीनेच परत करण्यासाठी गेले, तोवर खांडेकर ती नोकरी सोडून गेले होते!

मात्र मला खरं 'घरच्यासारखं' वाटतं ते 'एशियाटिक'मध्ये. प्रत्येक वाचनालयाचं एक व्यक्तिमत्त्व, स्वभाव असतो. एशियाटिकचा स्वभाव संस्थानी आहे. आलिशान इमारत, प्रशस्त दालनं, इंग्रजी पुतळे, नक्षीदार स्तंभ, बेताची वाचकसंख्या आणि आरामशीर गादीच्या खुर्च्या, पाय ठेवायला चौरंग, उजेड, वारा, गारवा, बैठक-सारं विद्यासारखं जमवून दिलेलं. मुख्य म्हणजे वाचक, संशोधक म्हणून तिथल्या हवेतच तुमच्यासाठी कदर, आदर, आपलेपणा

जाणवतो. एका वेळी पंधरावीस पुस्तकं न्यायची श्रीमंत सोय आहे. कमीत कमी दंड करण्याकडे कल आहे. चर्चा-गप्पा-मुलाखतींसाठी पुरेसे जुने सोफासेटस् आहेत, दुर्गाबाई, अशोक शहाणेंसारख्या साधकांचा अड्डा आहे; तुमचा क्लेम व्यवस्थित सांभाळणारे, डुगडुगत्या स्टुलावरून छतापर्यंत चढून तुमचं पुस्तक आळस न करता शोधणारे, मेंबर झालात की तुम्हाला कुटुंबीय समजणारे, ज्यांना दिवाळीचं पोस्त देताना आनंद होतो असे कर्मचारी आहेत. तुमच्या संशोधनालाच काय, पण 'शांएस्ताँ'लाही तेथे प्रतिष्ठा आहे! पोटपूजेची पुरेशी व्यवस्था उपलब्ध ठेवणारं वाचनालय अजून माझ्या कल्पनेतच आहे. एशियाटिकचं कॅन्टीन संस्थानी काळातल्यासारखं रयाहीन आहे. तिथे फक्त चहा मिळतो आणि तोही स्टोव्ह पेटवून करतात; आणि तिथल्या 'लेडीज' रूमच्या पाणवठ्यावर आपलं रंगरूप ठाकठीक करायला या भागातल्या किती कर्मचाऱ्या येऊन जातात, याची नोंद ठेवायची तिथे पद्धत नाही. वाचकांनी तहानभूक विसरून साधना करावी, वाटल्यास डुलकी काढावी, वाटल्यास गच्चीच्या कोपऱ्यात ठेवलेल्या माठातलं पाणी घेऊन घटाघटा प्यावं, उरलेलं तिथल्या झाडांना घालावं...

"काय आपल्या लायब्ऱ्या. साधा कूलर ठेवता येऊ नये!" अशी एका मोसमी वाचकाची तक्रार मला पाणी पिता पिता अंतर्मुख करून गेली. त्याचं पटलंही, पण मनात मात्र म्हटलं, इथे हा माठच बरा!!

एशियाटिक लांब पडते म्हणून कुरकुरायचं नसतं, तिथली पुस्तकं लोकलनं आणताना त्यांचं वजन मानायचं नसतं आणि तिथल्या पायऱ्या चढताना 'सारांश'मधला शॉट आठवून पायांना समजवायचं असतं. तेवढं केलं की घरच येतं, "बाई, आलात? तुमचं क्लेमचं पुस्तक काढून ठेवलंय बघा!"

फोर्टमधल्या एस्.एन्.डी.टी. च्या ग्रंथालयात घरच्यासारखी वागणूक मिळवायला तर तुम्हाला त्या विद्यापीठाची विद्यार्थिनी, मेंबर, काही असावं लागत नाही. तुम्ही किडूकमिडूक लेखिका असलात, मुंबईच्या नसलात, शिकायला मुंबई विद्यापीठ निवडून वाचनासाठी मात्र संदर्भ विचारत इथे आलात, तरी हे ग्रंथालय तुमचं स्वागत करील; तत्परतेनं, वैयक्तिक लक्ष पुरवील. एक स्वच्छ उपाहारगृह आणि त्याहून स्वच्छ प्रसाधनगृह तुमच्यासाठी उपलब्ध ठेवील. तिथल्या मीनल गांधी लगेच तुमचा विषय विचारून संदर्भसाहित्य गोळा करू लागतील. एवढंच नव्हे तर ठिकठिकाणची माहिती नोंदवून ठेवायला लागतील... पुढे तुमचं काम झाल्यावर आणि तुम्ही 'गरज सरो' केलंत तरी पुढच्या वर्षी तिथे जाल तर त्या हसतमुखाने म्हणतील, "तुमचा दिवाळी अंकातला तो

लेख मी वाचला हो आठवणीने.''

मध्यंतरी 'जनरेशन गॅप' या माझ्या चालू विषयावरची पुस्तकं ह्या वाचनालयात जास्त उपलब्ध आहेत असं पाहून मी मेंबरच झाले. कुणीतरी 'तुम्ही इथे?' म्हटलं तशी मी गांधीबाईंकडे पाहात म्हटलं ते फारसं अतिशयोक्त नव्हतं; ''मुंबईतल्या सगळ्या लायब्ऱ्यांपेक्षा इथली ट्रीटमेंट मला आवडते, म्हणून मी इथे येते. -उगाच नाही. बायकांनी चालवलेली लायब्ररी आहे!''

त्या हसल्या, पण माझ्या शेजारच्या एका आकर्षक पुरंध्रीला परस्पर ते लागलं- ''याचा अर्थ तुम्ही अजून मुंबईतल्या सगळ्या लायब्ऱ्या पाहिलेल्या दिसत नाहीत.'' मी ही शांतपणे टोला परतवला, ''मी लहानपणापासून बडोदा, पुणे ते मुंबई शहरांतल्या अशा अनेक लायब्ऱ्या पालथ्या घालून झाल्यावर हे विधान जबाबदारीपूर्वक केलंय, तेव्हा आय शुड नो!''

फटाकडी निवली! दुपारी कॅन्टिनमध्ये पुन्हा समोर आली, तेव्हा कळलं. त्या दिवशी तिथे ग्रंथपालांचा एक सेमिनार होता. नकळत प्रस्तुत ग्रंथपालांचं ग्रंथालय मी उणं ठरवलं होतं, त्यामुळे तो नाकावरचा राग होता. अशा वेळी कॅन्टिनमधल्या खिलाडू वातावरणाचा फायदा घ्यायचा नाही तर कधी? ''तू स्वत: ग्रंथपाल आहेस, तुला पटेलच. शेवटी वाचनालय म्हणजे सुद्धा अखेर माणसामाणसातले संबंध-तेच खरे. चार पुस्तकांची कमी चार आतिथ्यशील शब्दांनी भरून काढतं, ते खरं ग्रंथालय. एरवी नुसता ज्ञानाचा कडबा काय कामाचा?'' आमच्यातही खिलाडू मैत्री झाली...

इतकी वाचनालयं पुरेत ना म्हणून मध्यंतरी मी आणखी एक किताबखाना शोधला. शेवटचा किस्सा तिथला आहे. घरगुती वातावरण, पुस्तक-मासिकांची मुबलकता, काउंटरवरची ओसंडणारी विविधता बघून मी गेले होते. पुस्तकं मिळायला वेळ लागे, मुक्तद्वार नव्हतं आणि नेमकं हवं ते पुस्तक पेपर वाचणाऱ्या आजोबांच्या पाठीमागच्या कपाटात असे! तरीही मी मनापासून जात असे. पण एके दिवशी आजवर न आलेला अनुभव आला. मी लहान नसल्यामुळे (!) बालविभागाची मेंबर नव्हते. मुलांच्या विभागातलं एक पुस्तक मला संदर्भासाठी हवं होतं. वाचनालय बंद व्हायची वेळ होती. मी म्हटलं, ''नाहीतरी आता ते कपाटजमा होणार. रात्रीपुरतं मला द्या, सकाळी पहिला बालवाचक यायच्या आत मी ते पाठवून देते.''

''जमणार नाही! अशी पुस्तकं द्यायची आमची पद्धत नाही.'' मुख्य ग्रंथपालांचा करडा स्वर ऐकून काउंटरवरच्या कर्मचाऱ्याचा नाईलाज झाला, माझाही!

मी वाद घातला नव्हता; पण डोक्यातून विषय गेला नाही. एक जादा सवलत मी मागितली होती, ती लेखिका म्हणून हक्काने? तिथल्यातिथं 'बालसभासद' बनून मी ते पुस्तक आणायला हवं होतं? आजवर कुठेही मला अशी वागणूक मिळाली नव्हती म्हणून मी चिडले होते, की ग्रंथपालांचंच बरोबर होतं?

आजवरच्या समस्त ग्रंथपालांचे अनुभव स्मरून मी नतीजाला आले. असे नियम तारतम्याने वापरायचे असतात. 'वाचकाला त्याचं पुस्तक आणि पुस्तकाला त्याचा वाचक' हे ग्रंथालयशास्त्राचं बोधवाक्य न उमजलेला ग्रंथपाल अप्रशिक्षितच की!

अखेर, ग्रंथालय ही सेवा असते, दुकान नव्हे. वाचक हा वर्गणीदार असतो, ग्राहक नव्हे. अभ्यासक हा रसिक असतो, विद्यार्थी नव्हे! शिक्षणाप्रमाणेच वाचन हा माणसाचा अधिकार असायला हवा.

मध्यंतरी ही जाण वागणुकीत उतरवणाऱ्या तीन ग्रंथपालांना घेऊन 'नाते ग्रंथालयाशी' हा कळकळीचा विषय मी दूरदर्शनवरून मांडला आणि एका गमतीदार प्रक्रियेला मला तोंड द्यावं लागलं. एका वेळी अनेक ग्रंथालयांतून संचार करण्याची माझी वहिवाट. उरलेल्या ग्रंथपालांना वाटलं, फायदा आमच्या लायब्ररीचा घेतात आणि टीव्हीवर चान्स मात्र दुसऱ्याला? कोणी रुसलं, कुणी जाब विचारला. एका ग्रंथपालाने तर "आम्ही तुम्हाला सेवा का द्यावी?" असंही आव्हान दिलं. तेव्हा आजवर अनेक ग्रंथपालांनी पोटात घातलेले माझे अनंत अपराध आठवून मी त्याला माफ करून टाकलं. अशी मी अनेक ग्रंथालयांचा लाभ घेत असते, हे त्यांना कसं सांगणार?

अपवाद होता तो एशियाटिकचा. तिथे गेले तो, हवेत तो नेहमीचाच -"या बाई, बरेच दिवसांनी आलात?"-भाव होता. "बाई, तुमचा कार्यक्रम पाहिला!" काउंटरवरचा कर्मचारी प्रसन्नपणे हसला. त्या कॉमेन्टमध्ये केवळ पावती होती. नेहमीचीच निकोप कौटुंबिकता होती. मुख्य म्हणजे दूरदर्शनवरच्या माझ्या प्रतिमेमुळे माझा भाव उगाचच वधारलेलाही नव्हता!

मी हसले. नजरेनंच कोपऱ्यातल्या एका हवेशीर बैठकीची पसंती केली. पायाशी ऐसपैस चौरंग आहे का बघितलं. वाचायला बसण्यापूर्वी मग मी गच्चीत जाऊन माठातलं थंडगार पाणी घटाघटा पिऊन घेतलं. भांडं जवळच्या बोगनवेलीच्या कुंडीत विसळलं आणि त्या वेलाच्या रसरशीत फुललेल्या फुलांकडे बघून म्हटलं, तथास्तु.

■ ■ ■

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध
प्र. क्र. ३५५९....
२७०३४
घ८८३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

# कॅशिया

या उन्हाळ्यात मला काही कॅशियाची झाडं बक्षिस मिळाली.

निसर्गातल्या काही-खरं म्हणजे बऱ्याच-चमत्कारांना उत्तर नाही; तसं मनातल्याही. म्हणूनच कॅशिया मला इतक्या उशीरा का मिळाला आणि पुढच्या उन्हाळ्यात का मिळाला नाही या प्रश्नाचं निरुत्तर मला कदाचित कॅथरिन ग्लेनसारखं मृत्युशय्येवरही सोडवावं लागेल. कॅथरिन ग्लेनची शेवटचा श्वास घेण्यापूर्वीची वाक्यं होती...

"So then, what is the answer?"

".....Oh, but what was the question?"

एकाएकी यंदा मला आमच्या हायवेवर, शेजारच्या कॉलनीच्या आवारात, कुठल्याही निनावी रस्त्यानं जातानासुद्धा पिवळ्या फुलांची झाडंच दिसायला लागली.

पायी, वाहनातून वेगानं जाताना, रस्ता ओलांडताना, पलिकडच्या फूटपाथवर, कुठेही असलं तरी ती झाडं नजरेतून वगळणं अशक्य झालं.

घरातल्या माणसांना मी म्हटलंही; की इतके दिवस हे झाड मग होतं कुठे? आपल्याला दिसलं कसं नाही? शेवटी एके दिवशी मला स्वत:शी कबूल करावं लागलं की हे सगळे पूर्ण वाढलेले वृक्ष आहेत आणि वृक्षांना असं एकाच जागी स्थायिक होण्याची खोड असते. त्याअर्थी ते गतवर्षीही इथेच, असेच उभे असणार, अन् आपापल्या जागी आपापल्या मकदुरानुसार असेच आरोग्यसंपन्न फुलतही असणार.

वरच्या निर्मलाने मग माहिती पुरवली, 'अग हा कॅशिया!' मऽग मला आठवलं, वि. द. घाट्यांनी तर याच्यावर 'कॅशिया बहरलाऽऽ' म्हणून लेखच लिहिलाय त्यांच्या 'मनोगता'त. अहं, घाट्यांनी कॅशियाच्या बाबतीत इतकं सरळ

साधं क्रियापद वापरलेलं नाही- 'कॅशिया भरारला!'

शेवटची पाळी माझ्या मुलीची होती. एकदा चहा पिताना मी अगदी भरात येऊन वर्णन सुरू केलं तशी ती म्हणाली, "आई, अग तू म्हणतेस तसलं झाड आपल्या लक्ष्मणच्या झोपडीवर आहे, स्वयंपाकघराच्या खिडकीतनं बघ." आहे की नाही? इतक्या वर्षांत मी फक्त अंधुकपणाने नोंदलं होतं की, चौकीदाराची झोपडी एका झाडाखाली आहे. पण केव्हातरी त्याच्या अंगणभर पिवळी फुलं पडलेली असतात, त्या अर्थी ते चारचौघांसारखं दिसणारं झाड केव्हा तरी फुलतही असणार इतपत अनुमान बांधण्याइतकंसुद्धा मुंबईत - आपलंच - आवार वाचतंय कोण?

याच सुमारास मी रोज पहाटे फिरायला जाणं सुरू केलं. एक परीक्षाही यावर्षी मागे लावून घेतली होती. आणि पहाट हा माझा लेखन-वाचन काळ. तेव्हा पावणेसहा ते सात शेजारच्याच एअरपोर्ट-कॉलनीतून फेरी, मग भाजी घेऊन परत येण्यापूर्वी तिथल्याच एका झाडाखाली, बाकावर बसून एक टॉपिक संपवायचा - असा वसंतऋतु होता. वाचता वाचता एकदा वर पाहिलं, तर बाकावरच्या माझ्या शेजारच्या रिकाम्या जागेवर टपटप...अशी फुलं! चमकून वर बघितलं तर काय... कॅशिया...!!

आयुष्याच्या खिशात काय काय गमती असतात. मनात आलं, परीक्षेने सवड दिल्यास आधी किंवा नंतर तरी कॅशियाचं स्पेलिंग बघून टाकलं पाहिजे किंवा मराठी नाव....

झाडमाथा भरतकामातल्या बाहुल्यांना आपण आपल्या देशातही घालतो तसं पिवळं बॉनेट चढवून बसला होता. आणि फुलं आवाज न करता मंद पावसासारखी पडत होती. माझं लक्ष गेलं होतं ते हालचालीमुळे. मी मग ओचा नव्हता म्हणून ओंजळीतच फुलं भरून घेतली आणि बसल्या बसल्या बाकावर त्यांचा गालिचा थापला. जमिनीवर तर या गालिच्याचे बडेभैयाच पसरलेले होते. आणि तरी त्यात इथेतिथे भर पडतेच आहे. कवितेत पऱ्या अशाच आकाशातून खाली उतरतात. मग एक फूल हातात घेऊन निरखलं. (अभ्यास बाजूलाच राहिला.) पसरट, पिवळ्या पाकळ्या आणि मधोमध केशरी पराग. पण कॅशियाचं फूल एकेकटं पाहाण्यात मजा नसते. गरब्यातल्या बायकांसारखं त्यांचं समूहातच दर्शनसुख घ्यायचं असतं. या उलट गुलाब एकत्र आले की एकमेकांवर रंगांच्या आणि देखणेपणाच्या बाबतीत आरोप आणि अन्याय करायला लागतात.

कॅशियाची मी वेलबुट्टी जुळवली, सागरगोटे झेलले, 'एकी का बेकी'

केलं, राजकमलच्या सुंदरीप्रमाणे ओंजळ कलती करून ती पुढ्यात ओतून पाहिली आणि मग तो रोजचाच खेळ झाला. भाजीची गाडी दुरून येताना दिसली की अभ्यास मिटायचा आणि शेवटची पाच मिनिटं कॅशियाला द्यायची.

मुलांना सुट्ट्या लागल्यावर एक दिवस मग मी माझ्या धाकट्या मुलाला उठवून आपल्याबरोबर घेतलं. तोही नाचत सुटला! पिशवीभर फुलं त्यानं गोळा केली. शिवाय कॉलनीच्या टोकापर्यंत बागडत जाऊन मला माझ्या फेरीत न दिसलेलं आणखी एक कॅशियाचं झाड शोधून दिलं. दोन गद्य इमारतींच्या मधोमध ते पोंक काढून उभं होतं. पण डोक्यावर मुकुट तसाच-देदिप्यमान!

का कुणास ठाऊक, मी मात्र त्यानंतरही वाट वाकडी करून त्या कॅशियाकडे गेले नाही. त्याच्याखाली बाक नव्हता आणि मनुष्यवस्ती फारच जवळ घेऊन तो उभा होता या कारणांस्तव नव्हे. पहिला कॅशिया माझा मित्र झाला, हा दुसरा, केवळ ओळखीचा राहिला. त्याच्याबाबतीत मी भूमिकेनं फक्त लांबूनच 'बघी'.

त्या दिवशी आम्ही पिशवी घरी नेली आणि टेबलावर सगळ्यांचं चहा-कॉफी, पेपरवाचन सुरू झालं होतं त्यांच्या मधोमध ती काही कल्पना न देता एकदम ओतली. अपघातानं, त्यामुळे एक फूल चहाच्या कपात पडलं पण बाकीची टेबलभर विखुरली आणि आमचा सनमायकाही फिक्का पिवळा! पंख्याच्या वाऱ्यानं फुलपाखरांसारखे त्यांचे पंख हलत राहिले. पेपरातली एखादी मार्मिक कोटी मोठ्याने वाचून दाखवल्यावर सगळे हमखास अन् एकदम हसतात तशी सगळ्यांनी त्याला दाद दिली. मग मुलीने त्या फुलांच्या पुढच्या दारात, हॉलमध्ये रोज वेगळ्या सजावटी करून बघायचा सपाटा लावला. पारिजातकापेक्षा खूपच कमी गतीनं कोमेजायची. एकदा कुणाला तरी जेवायला बोलावलं तर टेबलाच्या दोन्ही बाजूंना दोन कॅशियाच्या फुलांचे ढीग आणि त्यात मोठ्या पांढऱ्या मेणबत्त्या उभ्या करून झालं, 'कॅण्डललाईट डिनर!'

लक्ष्मणच्या डोक्यावर फुलांची फॅक्टरी चालू होतीच.

नंतर एकदा वहीत मी फुलं ठेवली आणि घरी आल्यावर ती उघडायचीच विसरले. दुसऱ्या दिवशी बघते, तो पानभर पिवळ्या-केशरी रंगाचा शिडकावा! मी उद्योगपती (भावी) असते तर तेवढ्यावरून रंगाचा कारखाना नसता निघाला? मला मात्र या संदर्भात आदिवासी लोक पळसाच्या फुलांच्या रसात भेंडीच्या चकत्या बुडवून त्याचे छाप झोपडीच्या भिंतीवर उमटवतात ते आठवलं आणि मनातल्या मनात मी मुंबईच्या बालमंदिरांना ती कल्पना भेटही देऊन टाकली.

परीक्षा आटोपल्यावर निवांतपणे मग मी कॅशियाचं झाड विचार करायला

पुढे घेतलं.

गम्मत म्हणजे कॅशियाचं झाड किंवा फूल फार सुंदर किंवा वेगळं नसतं. पण गायक जसे आपापली घराणी सांभाळूनही आपापल्या ढंगानं गातात, लेखकाची जशी स्वत:ची शैली आपोआप त्याच्या व्यक्तिमत्त्वातून निर्माण होते, तसं कॅशियाचंही कुठेतरी अनपेक्षित ठिकाणी उभं राहून डोक्यावर शेकडो एकरंगी फुलपाखरं वागवणं नि:शब्दपणे चाललेलं असतं. कॅशिया आपला मूक नजराणा वरच्यावर सांभाळत असतो. एखाद्या माणसाचं साधंच बोलणं त्यानं केलेल्या नेमक्या शब्द-वापरामुळे आकर्षक ठरतं तसं कॅशियाचं निम्मं कर्तृत्व त्यानं निवडलेल्या कॅज्युअल जागेत आणि अचानक, एकदम फुललेलं दिसण्यात असतं. त्याचं एकदम, अनपेक्षित दिसणं आणि केवळ आत्मानंदासाठी निरपेक्ष फुलणं हे त्याचं वैशिष्ट्य. बघणाऱ्यानं मान वर करून मानला, तर तो असतो.

या उलट गुलमोहर, बोगनवेल अगदी घाटातला पळससुद्धा, ब्यूटी-सलूनमधून बाहेर पडून फॅशन-परेडमध्ये भाग घ्यायला चालल्यासारखे सदा जय्यत. साजशृंगार करून कुणाचं लक्ष वेधायला जाणं कॅशियाच्या रक्तातच नाही, त्यामुळेच जर्द उन्हासारखा सोनपिवळा असूनही तो सूर्यास्तासारखा भडक नाही.

लहानपणापासून ठिकठिकाणचे सूर्यास्त सहप्रवाशांबरोबर पाहूनही सूर्यास्ताच्या शोभेनं मला रोमांचित असं केलेलं नाही. भोवतालचे माणसांचे थवे उत्तेजित होत असतात आणि मी जादूच्या कांडीचा स्पर्शच न झाल्यासारखी, तो सिनेमा संपण्याची वाट पाहात, उभी. मान्य आहे दार्जिलिंगला मी अजून पोचलेली नाही, पण सूर्याचा तो एकूण 'थक्क करून टाकतो थांबा तुम्हाला!' वाला पराक्रम मला मासमिडियातल्या प्रयोगांसारखा 'जुळवलेला' वाटतो.

अर्थात भविष्यात, एखाद्या सूर्यास्ताच्या वेळी अचानक मला आजवर न दिसलेले कॅशियाचे घोसच्या घोस क्षितिजावर मांडलेले दिसले तर सांगता येत नाही. अखेर माणसाला काय काय होईल याची काही गॅरंटी असते का?

आणि माणसांमधले तसेच फुलांमधलेही परस्परविरोधी गुण-दोष, विसंगतीसुद्धा आपल्याला वेगवेगळ्या वेळी वेगवेगळ्या कारणांनी मोहित करीत असतात. एखादी युवती आपल्याला साधेपणामुळे आकर्षित करते तर दुसरी आकर्षक, अद्ययावत् राहणीमुळे.

कॅशिया मला ज्या कारणामुळे आवडतो; बरोबर त्याच्याविरुद्ध कारणामुळे सूर्यफूल मला आवडू शकतं! सूर्याबरोबर, माणसांवरही इम्प्रेशन मारण्यासाठी त्याची दिवसभर चाललेली धडपड!

तशी हिरवीपिवळी निसर्गातली रंगसंगती ठोकळेबाज आणि 'चालू' असते. नवचित्रकलेनं केव्हाच अडगळीच्या खोलीत जमा केलेली, बायकांच्या भरतकामातूनसुद्धा बाद ठरलेली, पण पहाटेच्या वेळी आपण बाकावर बसलेलो असताना असा पुष्पवर्षाव झाला की आपण मोगल बादशहाच आहोत असं वाटायला लागतं!

मोगल बादशहा मग आपलं वाचन, प्रौढपणा आणि मुंबईच्या सकाळचा मिनिट ते मिनिट बांधीलपणा मनावेगळा करून उठतात आणि साडी सावरीत इकडून तिकडे धावत, परकऱ्या पोरीसारखे पडणारी फुलं हवेतल्या हवेत झेलायचा प्रयत्न करू लागतात.

...अरे बाबा, मी कितीही वेठमारू गृहिणी असले तरी माझ्याही मध्यमवर्गीय घरातली कुकरची वेळ माझी वाट पाहात नाही का?

कॅशिया खरोखरच आत्मानंदात झुलतात की हा आपला एका हौशी माणसानं लावलेला सोयिस्कर अर्थ? कॅशिया नकळत किंवा नाईलाजानेही फुलत असतील. आणि मग अशा नाईलाजास्तव आपल्या डोक्यावर चवरी ढाळण्याबद्दल आपण त्या बिनडोक झाडाचे आभार का मानायचे? हे तू सूर्याला प्रकाश देण्याबद्दल किंवा गाईला दूध देण्याबद्दल देव मानण्यासारखं झालं!

खरा कॅशिया आपल्या मनातच असतो. मनातलाच कॅशिया आपल्याला फुलं पुरवीत असतो म्हणूनच काहींना तो लहानपणी दिसतो. काहींना उशीरा पावतो आणि काहीकाहींना कधीच मिळत नाही. युरोपातली मॅग्लोनियाची झाडं कशी वाचनातूनही मनात भरतात तसं कॅशियाचं घरासमोर असूनही होत नाही.

पण एकदा कॅशिया भेटायला लागले की ते रोजच्या माणसांतही भेटतात, वाचनात आणि अभ्यासातही भेटतात. एखाद्या विषयावर नवे नवे मुद्दे गोळा करताना, तपशील ग्रहण करताना, नोटस् बनवताना, अगदी शेवटच्या परीक्षेच्या झटापटीतही वेगवेगळ्या पातळ्यांवर कॅशिया भेटतात आणि वाटतं, या मुद्यातलं हे शुद्ध, तार्किक सौंदर्य आपल्या आस्वादक बुद्धीला मागच्याच वाचनात का नव्हतं भिडलं?

अशाच एका कितव्या तरी फेरीत लक्षात आलं, हा रस्ता आता आपल्यासाठी कॅशियाचा बनला आहे. इतके दिवस त्या रस्त्यावर आपल्या उफाड्याची लाज वाटणाऱ्या मध्यमवर्गीय मुलींसारखे काही गुपचूप फुलणारे वृक्ष तेवढे होते. पण या दोनच झाडांमुळे माझ्यापुरता आता तो कॅशिया-अॅव्हेन्यू!

इतकी वर्षे घराजवळच पडून असलेली एक डांबरी वाट. पण एखादे दिवशी ती वेगळी वाचता येते आणि मग तिचा पुन्हा कधी रस्ता होत नाही,

ती पाऊलवाटेसारखी खाजगी बनते. पूर्वीही मी फिरायला येत असे; पण या रस्त्यावर काही घरं, तशी झाडंही आहेत, या पलीकडे मी गेले नव्हते आणि त्याचं एक कारण मी व्यायाम नामक 'मेन्टेनन्स अॅण्ड रिपेअर सर्व्हिसेस'साठी या बाजूला येत होते किंवा मैत्रिणींबरोबर गप्पा मारण्यासाठी निवांत जागा शोधत. आपण बरोबरच्या माणसांना खूप अभिमुख असलो की झाडं फक्त रस्त्याकडेला सावल्या पाडत उभे असलेले निरुपद्रवी प्राणी ठरतात.

नेहेमीच्याच कॅशियानं असं एखाद्या वर्षापासून मानवी, 'पर्सोनिफाईड' बनण्यात आपल्या संवेदनांचं परिपक्वपण आहे.

झाडावरची फुलं कशी पडतात? ती नंबर कसे लावतात? पाण्यात सूर मारताना वाटतं तसं त्यांना वाटतं की आपली वयोमानानुसार किंवा 'गर्वाचं घर खाली' होऊन पडतात? की वरच्यावर फासा टाकून ठरवतात, आज आधी कुणाची गच्छन्ति? मग लक्षात आलं, पक्षी बसतात त्यांच्या भारानं पडायलाच आलेली फुलं सुटून खाली पडतात, कधी वारा पक्ष्यांचे श्रम वाचवतो.

पण मान दुखेपर्यंत वर बघून अंदाज घेतला तरी पुढल्या क्षणी हे फूल पडेल का नाहीतर मग दुसरं कुठलं पडेल काही अंदाज करता येत नाही. मग लक्षात येतं, आपण फुलांना आपल्या घातकी किंवा आशाळभूत नजरेनं पाडत नाही. पक्षीही तसे निमित्तमात्र असतात. अपरिग्रहाचं व्रत घेतलेले प्रवासी ते; कुठेतरी आपला मूठभर देहभार टेकण्यानं कुठलं तरी फूल आपल्या ध्रुवस्थानाला हुकतं याचं भान त्यांना असू शकत नाही आणि फुलांनाही पक्ष्यांनी दिलेल्या या 'फुल-स्टॉप'बद्दल' भान असत नाही.

फुलं आपली सुरेख फुलतात आणि सुरेखच पडतात. मग कोमेजून जाईपर्यंत आयुष्यातली शेवटची पळं सुरेख दिसतच पडून राहतात. मग नवी फुलं निखळून त्यांची शवं करुण दिसायला लागायच्या आत त्यांना झाकून टाकतात.

झाडाखालचा काश्मिरी गालिचा आपला सदा टवटवीत.

पुन्हा, हे सगळं अर्थ लावणं माझंच. त्याला शास्त्रीय पुरावा, प्रयोगाचं पाठबळ, दुजोरा काहीच नाही. यातलं काहीही खरं नसू शकेल. पण एक मात्र नक्की, कॅशियाचं फूल कधीच आत्महत्या करीत नाही. एरवी ते जमिनीवर पडल्यावरही हसरं कसं दिसेल?

पुढे एके दिवशी फांदीला किड्याचासुद्धा भार झालेला नसताना एक फूल सुटून पडत असलेलं मी या डोळ्यांनी पाहिलं! ब्रह्मानंदाचा तो एक छोटासा चषक होता. एक तरी इतकी १०० टक्के नैसर्गिक क्रिया आपण शहरात पाहतो

का?

मग लक्षात येतं, झाडांनाही माणसांसारखे वेगवेगळे आकार, चेहेरे असतात. एक झाड दुसऱ्यासारखं फुलत, दिसत, विस्तारत नाही. पण अतिपरिचयामुळे आपली रोजच्या पाहण्यातली झाडं आपल्या खिजगणतीत नसतात. एरवी झाडं आपल्याही सहकारी वसाहतीत, घराच्या रस्त्यावर, बसस्टॉपवर आणि ऑफीससमोर कोरस रचून असतात. सवड आपल्याला नसते.

हे शहरातलं. खेड्यातल्या माणसांना तर माणसं आपल्याला अटळ असतात तेवढीच झाडं अटळ असतात; गृहीत धरावी लागतात. मात्र, आपोआप उगवलेली, पायाशी (न) दिसणारी, म्युनिसिपालिटीने मुद्दाम निगा राखून टिकवलेली झाडं पुरत नाहीत म्हणून माणसं कठड्यावर कुंड्या ठेवून त्यांना जवळ बाळगतात.

दररोज थोडा वेळ, मुंबईतही झाडांसाठी काढणं हे कुणाला 'काम' वाटत नसेल हे झाडाला कधीच न कंटाळता पाणी न घालणाऱ्या मला काय कळणार?

'किक्' नसलेली अशी सुखं आम्हाला कळेनाशीच झाली आहेत का?

एके दिवशी परतताना मी आणि श्रेयस तोंडात एकेक फूल धरून चालत राहिलो. कुणी समोरून आलं तरी तसंच - या देशात तीच पद्धत असल्यासारखं चालत राहायचं; तर खरं. पण दरवेळी समोरून कुणी येताना दिसलं की खिदळायला होऊन फूल पडायचं!

मध्ये एकदा थांबून त्याने मला मेंदीच्या फुलाच्या देठातला मध-मी लहानपणी माझ्या आईला दाखवला असेल तसा-चाखवला. नंतर आपले, दगड मारून एका झाडाची कैरी पाडायच्या कमी व्रात्य, प्रयोगाकडे वळलो...

आणि एकदा तर रस्त्याकडेच्या सांडपाण्याच्या नाल्याकाठी घनदाटपणे माजलेलं मिनी 'अमेझॉनचं खोरं' निरखत जाताना कल्पनेने त्या वनस्पती 'एन्लार्ज' करत गेलो आणि शेवटी मग त्या पाण्यात पडून, बेडूक होऊन पोहलोही...

केवढं रोमहर्षक वाटलं! लक्षात आलं, आपल्याला अन् या प्राण्यांना जाणवणारे वास, दिसणारे देखावे, वाटणाऱ्या भित्या, चैतन्य देणाऱ्या चाहुली नि होणारे साक्षात्कार सगळेच किती वेगळे असतील. त्यांच्यात रंगांना नावं नसतील, पण किड्यांना चवी असतील, नाले मसालेदार असतील. प्रदूषणानं ते पटापट मरत असतील पण रुमाल जवळ बाळगायचा ताणही त्यांना नाही आणि तरी लाखो वर्षं त्यांचंही प्रजनन चालूच तर आहे.

आपण जिथले नेहमीचेच रहिवासी असतो तो परिसर आपल्याला वाचता

येतो का? हाच परिसर मी, माझा मुलगा, इथले रहिवासी, तो भाजीवाला आणि नाल्यातला बेडूक प्रत्येकजण वेगळे वाचत असतील.

तर मग इथल्या रहिवाशांना 'कॅशिया' सापडावा असं वाटत असल्यास त्यांना आमच्या सोसायटीत फिरायला यायचं आमंत्रण मला द्यावं लागेल नाही का?

पाहता पाहता उन्हाळा संपत आला आणि कॅशियाचं सौंदर्य नश्वर आणि मोसमी असतं हे मला पटवू लागला. कॅशियाचा बहर ओसरला. गालिचा विरत चालला. आता पावसाला सुरवात होईल की कॅशिया आपली फुलाफुलांची छत्री या वर्षापुरती मिटून टाकील.

कोणास ठाऊक, पुढच्या हंगामापर्यंत माझा हा प्रभातफेरीचा उत्साह टिकतो का? की मी योगासनाचे पहाटवर्ग 'जॉईन' करीन, त्या ऐवजी?

एका मोसमात कॅशिया मला देणार किती आणि काय काय आणि ते मी दोन्ही करांनी घेऊ तरी किती आणि कसं?

गम्मत म्हणजे ही वसाहत इतकी मोठी आणि इम्पर्सनल (व्यक्तिभावरहित) आहे की एक बाहेरची बाई रोज इथे येत होती, कॅशियाखाली विहार करीत होती आणि आता यायची बंद झाली हे कुणाच्या लक्षात आलेलं नाही.

या मोसमापुरतं काही दिवस शहरातल्या एका गद्य, साचेबंद वस्तीतल्या एका सार्वजनिक रस्त्यावरच्या कामाच्याच सकाळी, मी बसलेल्या साध्या दगडी बाकाचं त्या कॅशियानं 'तख्त' बनवलं आणि जिच्या मतदानालासुद्धा खरं म्हणजे कुणी विचारीत नाही अशा, कुठेही रांगेतच उभ्या राहणाऱ्या बाईला 'शहेनशहा' बनवलं हे पुरेसं नाही का?

रोजची, घराजवळचीच वाटही एखाद् दिवशी आपल्यासमोर नव्याने उलगडते, वेगळी वाचता येते हा एकही जोडाक्षर नसलेला संदेश माझ्याच वृत्तीतून काढून कॅशियानं माझ्या पाटीवर मला लिहून दिलेला नाही का?

कॅशियाच्या प्रकरणाला पूर्णविराम देण्यापूर्वी मी वाचनालयात जाऊन घाट्यांचा तो कॅशियावरचा लेख पुन्हा वाचून काढला आणि-

माणसाला काही कळत नाही, हेच खरं!

असं दिसलं की घाट्यांनी मुद्दाम आपल्या आवडीचं कॅशियाचं रोप आपल्या बागेत नवीन बंगला बांधल्याच्या उत्साहात लावलं आणि मग पुढे ते त्याला विसरूनही गेले. नंतर कित्येक वर्षांनी निवृत्तीनंतर त्यांना माझ्यासारखाच स्वतःच्याच अंगणातला तो 'भरारलेला' कॅशिया अनपेक्षितपणे सापडला!

घाटे लिहितात - "आणि आज चमत्कार घडला! आकाशाकडे दृष्टी

लावून शांतपणे अगदी मोकळ्या मनाने झोपाळ्यावर पडलो होतो. मन प्रसन्न होते. लहानसहान संवेदनांचेसुद्धा स्वागत करण्यास तयार होते. आणि एक गंमत झाली. वाऱ्याची एक छानदार झुळूक.... हळूच स्पर्शून गेली. दुसरी आली. तिसरी आली आणि माझ्या देहावर भराभर नाजुक फुलांचा, तुऱ्यांचा वर्षाव होऊ लागला. फुले इतकी नाजुक की स्पर्शसुद्धा जाणवत नव्हता. आकाशातून छोट्या छोट्या पऱ्यांनी अलगद उतरावे तशी फुलं माझ्या देहावर एकामागून एक उतरत होती. मी दचकलो, शरमलो. जीवनातली अनेक वळणे घेताना ज्या कॅशियाला मी मागे टाकले होते, साफ विसरलो होतो तोच माझा कॅशिया माझ्या देहावर फुलांची पखरण करत होता आणि सांगत होता, "तू मला विसरलास पण मी आहे."

■ ■ ■

# खेळणी

ठकीशी खेळायच्या पिढीतली असूनही ठकी ही काय चीज असते ती मी फार मोठेपणी पाहिली आणि काहीशा नावडीनंच 'बाहुली' म्हणून नोंदली. जात्याच्या त्या खुंट्याबद्दल माणसं इतकी रम्य हसून लडिवाळपणे बोलू शकतात कशी, हे मला कधीच कळू शकलं नाही. पिवळट रंग, विना हातापायांचं कंटाळवाणं धड, नकटेचपटेपणा, शिवाय कधीच फुटू न शकण्याचा एक प्रकारचा मद्दडपणा!

वेळेवारीच अक्कलहुशारी वापरून मी एका शहरी, सुखवस्तू आणि चांगल्या अर्थानं रसिक कुटुंबात जन्म घेतलेला असल्यामुळे मूल म्हणून मला, माझ्या बाल्याला तिथे स्वतंत्र मान होता. धाकट्या भावंडाला कडेवर घेऊन सांभाळत आईचं दळण आणून द्यायला गिरणीवर मला कधीच जावं लागलं नाही. (मारामारी करायला मोठा भाऊ तसा होता.) परिणामी, खेळणी मला पुष्कळ मिळाली.

प्लॅस्टिकच्या लालचुटूक कपबशा, मुद्दाम तुळशीबागेत जाऊन आणलेला पितळेचा टिफीन बॉक्स, लाकडाचा रंगीत स्टोव्ह, कढीचं पंचपात्र, खास पंगतप्रसिद्ध भातुकलीची भांडी, बोळकी आणि आवर्जून मुंबईच्या क्रॉफर्ड मार्केटमध्ये जाऊन आणलेली उघडझाप करणाऱ्या डोळ्यांची, रडणारी बाहुली!

आपल्याला न मिळालेल्या खेळण्यांची हौस मोठेपणी पालक ती आपल्या मुलांना घेऊन भागवीत असावेत. कारण माझ्या त्या बाहुलीवर माझ्या तरुण आईचंही प्रेम होतं.

कुणीही पाहुणे आले की माझी बाहुली दाखवायचा समारंभ होई.

'ओळीनं इतक्या सुंदर-सुंदर बाहुल्या ठेवल्या होत्या, पण चेहेरा हिचाच गोड होता! पंचेचाळीस रुपये पडले ऽऽ!'

या बाहुलीचे गाल, कोपरं-ढोपरं फुटेपर्यंत मी तिच्याशी खेळले. थंडीत तिलाही व्हॅसलिन लावलं.

बहुपतीत्वाची चाल पुन्हा प्रचलित होईल, इतकी तिची लग्नं लावली.

याखेरीज विजूकडे रंगीबेरंगी षट्कोनी मण्यांनी गच्च भरलेला डबा होता.

नीताच्या दिवाणखान्यात झुंबरंच झुंबरं, आणि खेळामध्ये लोलक सापडायचे. त्यातून बाहेर पडणारे रंगीत किरण पाहून हरखलं की, 'घे तुला!' म्हणून ती देऊन टाकायची.

आवाक्याबाहेरची खेळणी मी मागितली आणि मला ती मिळाली नाहीत असं कधी झालं नाही.

तशी प्रत्येकच कुटुंबाच्या आवाक्याबाहेर काही खेळणी राहणार.

तसं ते मुलांना प्रमाणाबाहेर वाटू न देणं हे पालकांच्या कौशल्यात मोडतं.

माझ्या अन् भावाच्या खेळण्यांत, खेळांत निश्चित भेद होता.

व्यापार डाव, मेकॅनो, आगगाडी, सागरगोटे, लगोरी, विटीदांडू इत्यादींना लिंगं नव्हती.

शिवाय मुंबईच्या दरवर्षी नवीन रूपं धारण करणाऱ्या खेळण्यांबद्दल मनात वेगळंच आकर्षण आणि लोभ असे.

अंडी घालणारी प्लॅस्टिकची पिवळी कोंबडी, चक्रव्यूह, योयो, हुलाहूप!

वयोमानानुसार गोष्टीतल्या आणि नाचातल्या पऱ्या पाठ न दाखवता मागे सराव्यात तशी खेळणी कमी झाली आणि गोष्टींची पुस्तकं वाढत गेली. चित्रं, रेकॉर्डस्, दुर्बीण, भिंग, होकायंत्र, शेवटी ज्ञानकोश... अशासारख्या चिजा मिळाल्या.

याशिवाय आजोबांनी बाबांसाठी घेतलेला एक जंगी मेकॅनो आमच्याकडे होता. दर सुट्टीत माझा भाऊ आणि त्याचे मित्र त्या सहा पेट्या भोवती मांडून दिवसच्या दिवस बसत. शेवटी त्याच्यातून खोलीभर वाटणारी क्रेन किंवा जायंट व्हील तयार होई.

शोभादर्शक आणि कोठीच्या खोलीत बॅटरी लावून दाखवायचा 'Sunday Comics' -चा सिनेमा आम्ही घरी तयार केला.

पुढे प्लॅस्टिकची आकर्षक कोडी बाजारात आली, रंगीत कॉमिक्स आली.

खेळण्यांच्या बाबतीत एक सुखद अशी तृप्ती आणि तितकीच सुखद अतृप्ती माझ्या मनात आहे-ज्याचं श्रेय 'हम दो हमारे दो'चं रहस्य पिढीभर आधीच ओळखलेल्या माझ्या जन्मदात्यांकडे जातं.

पण शेवटी-शेवटी हातगाडीवर विकायला यायचे ते आकर्षक जपानी( ?)

द्राक्षांचे घोस आईनं कधी आपल्याला घेतलेच नाहीत!

सगळी खेळणी घेऊन झाली, आता आपण मोठं होऊ या झालं, अशी निश्चित रेषा आखून नाहीतरी बालपण संपायचं नि मोठं व्हायचं नसतंच!

काही खेळणी घ्यायची राहूनही जावी लागतात.

माझ्या पिढीच्या कुठल्याही, सर्वसाधारणपणे सुखवस्तू घरातल्या मुलांचं क्रीडाविषयक आत्मचरित्र याहून फार वेगळं नसावं.

पुढे माझ्या वडिलांनी क्लबमध्ये वगैरे नेऊन माझ्यात प्रत्यक्ष खिलाडू वृत्ती बाणवण्याचा प्रयत्न केला, त्यामुळे ज्यात खेळ असतो पण खेळणी नसतात, खेळाची साधनं असतात अशा खेळांमध्ये इंटरकॉलेजिएट हरण्यापर्यंत माझी प्रगती झाली. दोन भाग हायड्रोजन आणि एक भाग ऑक्सिजन या मूलद्रव्यीय संयुगात डुंबण्याबद्दल कपही मिळवले आणि त्या मातबर खेळाडूला चीत करण्याचा क्रीडाप्रकार मला सर्वात जास्त आवडला.

मुख्य म्हणजे या सर्वमान्य अशा, उच्चभ्रू बागडण्यामुळे कोर्टाच्या काठावर बसून बॅडमिंटन वगैरेंच्या टूर्नामेंटस् पाहण्यातला निर्भेळ आनंद मला खातेजमा करता आला.

ओडीसी आणि मोहिनीअट्टमसारख्या नृत्यप्रकारांचा ॲस्थेटिक आस्वाद घ्यायला मला टी.व्ही. निघेपर्यंत थांबावं लागलं तसं या 'स्पोर्टस् राऊंडअप्'चं झालं नाही.

मधल्या काळात पाहिलं तर माझं वय पिढी पालटून मुलांना खेळणी घेऊ लागलेलं.

बाजारातील खेळणी बदलली होती-अजिबात कमी आकर्षक झाली नव्हती.

आम्हीही इतर मागचे-पुढचे पालक लावत असतील ते 'स्वस्त आणि टिकाऊ'चे निकष ती खरीदताना लावू लागलो आहोत असं (एक) मला दिसलं. हे टोचेलबिचेल का, खेळता-खेळता लागेल का, धुता येईल ना?

मुलांचे निकष किती वेगळे आणि खास, त्यांचे स्वतंत्र असतात ह्याचं प्रत्यंतर मला श्रवणच्या बाबतीत आलं. मी आणलेल्या चेंडूला दातांनी चाव-चावूनही काहीच झालं नाही. तेव्हा त्यानं निराश होऊन तो फेकून दिला. 'हे तुटततत (तुटतच) तर नाहीयेऽ' अशी त्याची तक्रार होती.

खेळणं सोलून आत काय आहे ते पाहाण्याच्या बालसुलभ जिज्ञासेलाही आपली विज्ञानयुगातलीही निम्म्याहून अधिक खेळणी दाद देत नसावीत.

खेळण्यांकडे आपलं आपोआप लक्ष जाईनासं होतं का?

की खेळणी आपल्या हातून काढून घेतली जातात?

'गुप्त खजिना' या चिरंजीव पुस्तकाच्या शोधात मी त्यातल्या 'जिम्'च्या वयाचीच असताना पुण्याच्या 'इंटरनॅशनल' पर्यंत पोचले, तेव्हा तेथल्या श्रीयुत दुकानदारांनी मला 'आता तू मोठी झालीस!' -वगैरे सुनावून माझा हिरमोड केलेला मला आठवतो. (आणि त्या बदलात अनंत काणेकरांचा एक लेखसंग्रह पुढे केलेला!) इतकी वर्षं हे माझ्या मनाला लागून राहिलेलं आहे.

'या झोपाळ्यावर बारा वर्षांवरील व्यक्तींनी बसू नये' इ. पाट्या वाचून-वाचूनच खरं म्हणजे आपण झोके घ्यायचे थांबतो. अशा करड्या पाट्यांच्या धाकानंच हळूहळू मूल असं व्यक्ती बनतं, शिस्तबद्ध आणि साचेबंद होतं. आणि आपल्यापेक्षा लहान मुलं भारतात नेहेमीच अधिक संख्येनं असतात. 'अरे त्याला बसू दे' वगैरे. नंबर लावायला कंटाळून अखेर मी तर झोपाळा सोडला.

कुठेतरी त्या अमेरिकेत तरी 'या झोपाळ्यावर बारा वर्षांखालील व्यक्तींनी बसू नये' असे झोपाळे असतील का?' -असा पोटच्या पोरांविरुद्धचा, जन्मसिद्ध हक्क कधी कधी माझ्या मनात बंड करून उठत असतो.

अर्थात झोपाळे आणि खुळखुळे एक नव्हेत.

'दारामागच्या कोपऱ्यात लपून 'भाँ' करणं थांबवा' अशी पाटी कुणी दारामागच्या कोपऱ्यावर लावलेली नसते. पण असे कोपरे फुकट आणि कोणत्याही खोलीत चार असे भरपूर उपलब्ध असूनही आपण ते सोडतो.

आठव्या वर्षी जे आवडतं तेच अठराव्या, अठ्ठेचाळीसाव्या आणि ऐंशीव्या वर्षीही आवडलंच आणि परंपरापालनासाठी केलंच पाहिजे ही सांस्कृतिक अपेक्षा मला समजू शकत नाही. माझा संदर्भ सणावारात जो भातुकलीचा भाग असतो, त्याच्याशी आहे. उदा.- सुंदर भिंगरीकडून अणीदार भोवऱ्याकडे, सुंदर-सुंदर चित्रांकडे, गाण्यांकडे, कल्पना-विचार आणि कृतींकडे असा; वृत्तीचा प्रवास नको का?

जरी लहानपणी ऐकलेल्या गोष्टीतलं खेळण्यांचं कपाट, ती रात्री जागी होणारी खेळणी, पत्र्याचा शिपाई अन् साखरेचा शिष्ट घोडा ही मंडळी स्वप्नांच्या काठावर असतातच.

प्रत्येक पिढीची खेळणी वेगळी, लहानपणची आणि मोठेपणची खेळणीही वेगळी, आईची आणि मुलीची खेळणीही वेगळी!

'बच्चाभी खेलेगा, बच्चेकी माँ भी खेलेगी' अशी काही निवडक खेळणी सोडल्यास 'कशा गं, तुम्ही याच्याशी खेळायच्यात आई?' -हा मुलांचा उद्गार

मला जास्त आवडतो, समजतो, पटतो.

त्यांच्या 'वॉकीटॉकी' पुढे माझी कालची डोळ्यांची उघडझाप करणारी बाहुली ठकी झाली आहे.

ठराविक 'लंडन-लंडन'च्या ऐवजी माझी मुलं सोसायटीच्या हॉलमध्ये खेळतात तो 'भुताची विहीर' हा खेळ समजून घेताना एकीकडे आमच्या गुजराती-मराठी शाळेतल्या 'मामानु घर केटलु?' -'दिवा बळे एटलु!' या सामूहिक खेळाची आठवण येऊन माझ्याभोवती खेळगडीच खेळगडी जमतात.

याची परिसीमा गाठणारी अमेरिकन मुलगी मला टॉफ्लरच्या 'फ्युचर शॉक'मध्ये भेटली. अमेरिकेतल्या टाका-फेका संस्कृतीचं (Throw away society) वर्णन करताना लेखक 'बार्बी' या अद्ययावत् बाहुलीचं उदाहरण देतो. अतिलोकप्रिय अशा या बाहुलीची सुधारित आवृत्ती काढून निर्मात्यांनी जेव्हा 'जुनी देउनि नवीन घ्या' अशी एक अल्लाउद्दिनी योजना जाहीर केली तेव्हा तिथल्या मुली भराभर जाऊन आपल्या बाहुल्या बदलून आल्या. आपल्या बाहुलीत जराही न गुंतणारी अमेरिकन मुलगी लेखकाला अस्वस्थ करते. आणि या बाहुल्यांचं दुकान सुपरमार्केटमध्ये सापडलं नाही तर त्याची कन्यका केरन घरी येऊन सहजपणे आईला सांगते, 'नव्हतंच तिथे! गेलं असेल बदलून!'

आपली खेळणी, खेळण्यांची दुकानं टिकावीत अशी अमेरिकन मुलांची अपेक्षाच नाही!

आणि चुकून एकदा विमानतळाजवळच्या 'सेन्टॉर हॉटेल' मध्ये शिरले असताना मला तिथे खेळण्यांचे आणि खेळगड्यांचे संबंध आणखीच बदललेले दिसले!

आतल्या वर्तुळाकृती मार्गानं ते अलिशान हॉटेल पाहात-पाहात आम्ही चित्रसज्जा, हेल्थ क्लब इ. ओलांडून पुढे आलो तो आम्हाला एका भिंतीपाशी फ्रीझच्या आकाराचे 'इलेक्ट्रॉनिक गेम्स' मांडलेले दिसले. त्यात एका वेळी एक रुपया टाकून एक मोटार रेस खेळायची होती. स्क्रीनवर शर्यत दिसत होती. बटणं दाबून, चाक फिरवून आपण आपली 'लव्ह बग' पुढे काढायचा प्रयत्न करायचा. अपघात झाला, टक्कर झाली की खटका वाजून यंत्र थांबे. मग पुन्हा दुसरा रुपया की दुसरा डाव! एकट्यानंच खेळायची ती शर्यत होती. बाकीच्या मोटारी आपोआप मध्येमध्ये कडमडत होत्या.

आम्ही पाहिलं तेव्हा एक गोरी पाहुणी-छोकरी तो खेळ खेळत होती. आम्ही फुकटात मागे उभं राहून खेळ पाहत राहिलो. ती खेळत होती ते यंत्र मधून-मधून बंद पडत होतं. अद्याप पैसे खायची सवय झालेली नसल्यागत

प्रत्येक नवा रुपया त्याच्या अमेरिकन घशात अडके. की ती मुलगी कोपऱ्यात बसलेल्या वेटरकडे वळून गंभीरपणे म्हणे, 'Its stuck!' तो उठून काहीतरी करी की यंत्र सुरू होई. अत्यंत मख्ख चेहेऱ्याने ती मुलगी, तो वेटर आणि ते यंत्र आपापली कामं करीत होते. त्या खेळात खूप रंग होता, गर्दी होती, आवाज होता आणि ती मुलगी खेळत होती त्याअर्थी आनंद, मजा हीही असावीत. पण आश्चर्य म्हणजे त्या खेळात हसू नव्हतं! खेळणारी मुलगी एकदाही हसली नाही, हरल्यामुळे तिचा चेहेरा कधी बदलला नाही. टाळ्या वाजवून ती कधी जिंकलीही नाही! एकाएकी मला त्या खेळण्यातली शक्ती लक्षात आली. ते यंत्र इतकं समर्थ होतं, प्रभावी होतं, की इथे तेच मुलाला खेळवत होतं. ती मुलगी त्याच्या हातचं खेळणं झाली होती. आपल्या हातात सापडलेलं लहान मूल ते यंत्र गच्च पकडून ठेवत होतं आणि त्याची यांत्रिक बाहुली करून टाकीत होतं.

-एक खरं की खेळणी प्रमाणाबाहेर मिळू नयेत.

(अर्थात् मध्यमवर्गाला जरुरीपेक्षा जास्त खेळणी मुलांना देऊ नयेत हे पथ्य निराळं पाळावंही लागत नाही.)

मला आठवतं, माझ्या कन्यका नं. एक कडे नऊ बाहुल्या होत्या. मजलाभर पडलेली ती छबकडी पाहून शेजारचे म्हणत, 'अहो आजी, तुमच्या नातवंडांची आबाळ होतेय हो, उचला!'

-पण खेळणी इकडे-तिकडे टाकायची असतात. इकडे तिकडेच टाकायची असतात. नाहीतर ती केवळ रंग दिलेली, आकार, आवाजवाली साधनं ठरतात.

एका घरातल्या गृहिणीनं आपल्या सुगृहिणीपणानं मला अगदी गार करून टाकायचा चंगच बांधलेला मला दिसला. हॉल, स्वयंपाकघर, न्हाणीघर सगळं कसं आरसपानासारखं. त्या स्वच्छतेचा धाक, दरारा वाटावा, आत शिरताक्षणी ती नजरेत अगदी खुपावी इतकी स्वच्छता! अर्थात् झुळझुळीत! स्वत: मालकीण आणि तिची कन्यासुद्धा सदासुस्नात असल्यासारख्या! त्या सुव्यवस्थितपणाला तोरा होता. पण मला खटकली ती एकच गोष्ट. बालमंदिर ग्रेडच्या त्या तिडपिड्या पोरीचे खेळसुद्धा एका कोपऱ्यात स्वयंपाकघरातले डबे लाजतील इतक्या काटेकोरपणे लावून ठेवलेले. उंचीसे एक कतार-एन्.सी.सी. तलं लाईन ड्रेसिंग आठवावं तसे! ती शिस्तबद्ध, रंगीबेरंगी ओळ ना दुकानातली खेळणी वाटत होती, ना घरातली!

खेळपण हरवलेल्या त्या मोहक वस्तूंकडे पाहता-पाहता मी चटकन् त्या दिवशीचा 'थॉट फॉर टुडे' बनवून टाकला. खेळणी ही अस्ताव्यस्त, इकडे-तिकडे

टाकण्यासाठीच असतात, फार तर पायाखाली येऊ नयेत यासाठी त्यांचा एखादा हारा असावा किंवा कपाट!

लहान मुलांप्रमाणेच त्यांची खेळणीही पुरेसा माणूसस्पर्श झाल्याखेरीज 'लाडकी' बनत नाहीत.

खेळण्यांशी खेळायचं थांबल्यावरसुद्धा मी पाहिलं की आपण खेळण्यांच्या कल्पनांशी खेळतच असतो.

उदाहरणार्थ पाहा, एखाद्या 'सोसायटी डे'ला मला कार्यक्रमामध्ये एक खेळण्यांचा 'तास' घालायचाय! घरोघरची मोडकी-तोडकीसुद्धा खेळणी जमा करायची आणि हॉलमध्ये त्यांचा एक ढीग करायचा. मग सगळ्या चिल्यापिल्यांना सोडून द्यायचं त्यांच्यावर! खेळण्यांचं दुकान बक्षिस मिळाल्यासारखंच होईल ना! आपली खेळून झालेली, कोपऱ्यात पडलेली भूभू-भावली मंडळी सगळी एकत्र उपलब्ध!

खरी तर नात्यात, मैत्रीत तरी टिकाऊ आणि मोडक्यासुद्धा खेळण्यांची अदलाबदल करत राहायला हवी. त्याच त्या खेळण्यांना मुलं कंटाळतात. पण महाग असतात म्हणून ती टाकायचीही नसतात.

बांद्र्याला अशी खेळण्यांची लायब्ररी आहे म्हणे! दर आठवड्याला-महिन्याला बालक सभासदांनी जाऊन आपलं खेळणं बदलून आणायचं. मोडलं तर नुकसानभरपाई खरीच, पण कंटाळा आला की दुसरं! न मोडता परत केलं की शाबासकीदाखल प्रगतीवहीत लावायला एक पिवळा गुलाब बक्षिस! असे अकरा गुलाब झाले की एक खेळणे बक्षिस! पाठोपाठ तीनदा खेळणी तुटली तर एक महिना खेळणं न्यायला बंदी!

अशा आकर्षक योजनांच्या सार्वत्रिक प्रसाराच्या आड त्यातली आर्थिक अव्यवहार्यता येत असेल?

एवढं खरं की अशी एक लायब्ररी मुंबईत आहे आणि ती चालतेही आहे.

मुलं लहान असताना माझ्याकडे एक वरकामाची मुलगी-सुमन होती. दुपारी बसल्या-बसल्या ती माझ्या शिवणाच्या चिंध्या गोळा करून वीत-वीत उंचीच्या छान बाहुल्या करायची. कापडाच्याच, पण कुणाचा (माझ्यासारखाच!) उंच अंबाडा, कुणी बैठं, कुणी ओढणीवालं, ओणवं आणि नाचरं! उपजत कला होती तिच्या बोटांत.

तिची ती कलाकुसर पाहताना माझ्या मनात यायचं, आपल्या मुलांना अशा बाहुल्या करता येणं किती असंभवातलं आहे. त्यांना आपण 'रेडिमेड'

खेळणी इतकी पुरवीत असतो की आपली आपण खेळणी करायची कला बहुतेक पांढरपेशा घरांतून मुळातच मारली जात असावी; कधी जागीच होत नसावी.

संशोधनाची आई गरज, हीच मुळी इथे मिसिंग!

माझी मुलगी शाळेत शिकवलेली साचेबंद चित्रं काढून शाबासक्या मिळवू लागली आणि इकडे सुमन चोरी करून आमच्या घरातनं सुटली!

शिवाय तिच्या एक-दोन काळ्या कापडाच्या बाहुल्या पाहून खाली राहणाऱ्या बाईंनी तिच्यावर 'चेटूकाचा' आरोप केल्यामुळे तिचा बाहुल्यांचा कारखाना त्याआधीच बंद पडला होता.

आता टी.व्ही. वर अशा बाहुल्या करणाऱ्या बायकांनी आंग्ल शब्द वापरीत दिलेल्या मुलाखती पाहताना मला कळवळून आठवतं.... आपण सुमनकडून अशा बाहुल्या करायला शिकणार होतो!

कुठल्या तरी नेव्हल ऑफिसरची पत्नी असती तर एव्हाना सुमन टी.व्ही. वर झळकली असती. आज कुठे भांडीधुणी करत असेल? -की आणखी सराईतपणे, लोकलमधून मंगळसूत्रांच्या चोऱ्या?

'सुंदर माझं घर' मधून सुमनचा परिचय करून देणं-घेणं जाऊ दे, मंगळागौरीचे खेळसुद्धा परंपरा आणि सर्वांगीण व्यायाम म्हणून गंभीरपणे 'टिकवणारी' माणसं आपण; टेलिव्हिजनवरची 'टेलिमॅच' पाहून खदखदा हसणं तरी शिकू का? पडद्यावरच्या हलक्याफुलक्या खेळांत, 'ते वयास शोभतात की नाही?' -हा एकच एक निकष लावून नाक मुरडत राहायचं सोडून सहजपणे सामील होऊ का? एरवी कुठल्याच पाट्या सहसा मनावर न घेणाऱ्या आपल्या प्रौढ आणि सज्ञान नागरिकांना बागेतल्या झुल्यावरची ती बारा वर्षांची अट एवढी आणि कायमची मनावर घ्यायची नसते, एवढं एक तरी शिक्षण दूरदर्शनचं हे माध्यम देऊ शकेल का? आपण ज्याला न चुकता 'जनतासंपर्काचं साधन' म्हणतो ती टेलिव्हिजनची पेटी हेही वस्तुतः एक अद्ययावत् खेळणंच आहे हे आपल्या सदाविकसनशील मनांना उमजेल आणि मग मोठी माणसंही कदाचित् पुन्हा गारा वेचायला लहान मुलांबरोबर खाली उतरतील; पाऊस बघायला खंडाळ्याला जातील. पुन्हा कधी मी काश्मीरला गेलेच तर तिथल्या खिलनमर्गला (खेळांचं गाव!) बर्फाच्या गोळ्यांनी 'धबाधबी' खेळायला मला माझ्या सहप्रवाशांना शिकवावं लागणार नाही आणि पन्नाशीचा तो अनोळखी मुलगा आपण बर्फ उगारताच कसा आंगठा दाखवून, बर्फातून पळत सुटला हे त्यांनाही पुढे पाच वर्षं आठवत राहील!

'महागडं खेळणं' म्हणून दूरदर्शनशी भांडता-भांडता निसर्गातली ही एकदम फुकटची खेळणीसुद्धा आपण हरवून कशी टाकतो?

गारा म्हणजे 'पुण्याचा वळीव', पाऊस म्हणजे 'छत्री नीट केली पाहिजे' आणि बर्फ म्हणजे 'शून्याच्या खाली तपमान' अशा गद्य व्याख्याच आपल्या फाटक्या खिशात शिल्लक का राहतात?

-माझ्या आठवणीतलं शेवटचं खेळणं मी नुसतंच लांबून पाहिलेलं आहे. पण म्हटल्यास, तेच सर्वात खोल माझ्या लक्षात राह्यलं आहे.

बांद्र्याच्या लिंकिंग रोडवरून आम्ही दोघं घाईघाईनं कुठेतरी चाललो होतो. छोटा बरोबर नव्हता. पण मोठ्या माणसांनाही 'हरवू नये' म्हणून हात धरून चालावंसं वाटावं अशी गर्दी फूटपाथवर उसळलेली. चोहोकडे आकर्षक चिजा, माल! डोळे बघताबघता रंगीत करतील अशा!

तशात एका 'झोपडपट्टी छाप' मुलानं आडवं येऊन एक लाकडी खेळणं पुढं केलं, 'मेमसाब लेंगे?'

माझी नजर त्याच्या चेहेऱ्याच्या आधी त्या खेळण्याकडे गेली. कल्पना बरी होती. चालता-चालता उगाचच विचारलं, 'कितनेका?'

घ्यायचं नव्हतंच, तरी त्यानं सांगितलेली किंमत न पटून मी म्हटलं, 'काय सांगतोस, आठ रुपये?'

त्याच्या चेहऱ्याकडे नजर गेली आणि मी चरकले. ज्या माझ्या घरी ठेवलेल्या छोकऱ्यासाठी तो ते खेळणं विकत होता त्याच्याहून तो लहान होता. पण त्याच्या डोळ्यांत मला जबाबदार, प्रौढ फेरीवाला तेवढा दिसला. गिऱ्हाईक हुज्जत घालणार मग त्याला पटवायचं, अशी तयारी ठेवून तो तयार नजरेनं मला जोखत होता. आर्त पण हिशोबीही!

-जोडप्यातली न हरवण्याची एकद्वितीयांश जबाबदारी माझ्यावर होती आणि मला खेळणं घ्यायचंही नव्हतं. मी हातानं नको-नको करत होते तरी तो 'भाव करत' थोडा वेळ मागे-मागे आला. मग माझा नाद सोडून परत फिरला. तो आणि त्याचं खेळणं!

मी मात्र माझा चरकलेपणा आणि चरा घेऊन चालत राहिले. कुणा त्याच्याएवढ्या मुलाचं खेळणं हे खेळणं असूच शकत नव्हतं. हातात खेळणं धरलेलं असूनही तो त्याच्याकडे कधी खेळणं म्हणून पाहूच शकत नव्हता. त्याच्या दृष्टीनं ते केवळ बापानं करायचं आणि त्यानं त्याच्यापेक्षा मोठ्या मुलासाठी विकायचं असं एक उपजीविकेचं साधन होतं. समोरच्याला जास्तीत जास्त गंडवायची एक हुशार सोय!

जगातल्या, भारतातल्या तरी, बहुसंख्य मुलांच्या वाट्याला बाल्य आणि खेळणी दोन्ही येतच नसतील हे इतक्या प्रकर्षानं मला जाणवण्याचा समाजवादी क्षण, तो आणि तेवढाच!

तो म्हणेल त्या किंमतीला ते खेळणं विकत घेण्याच्या 'इम्पल्सिव्ह' कृतीनं तो प्रश्न त्या एका मुलापुरताही सुटणार नव्हता. तो जगड्व्याळ प्रश्न आपल्याला सोडवता येईल असा भ्रमही माझ्या मनात नव्हता. मी हिशोबी गिऱ्हाईक राहूनच पुढे सरकले होते.

जो प्रश्न बुद्धापासून मार्क्सपर्यंत कुणालाच सुटलेला नाही, सानेगुरुजीही ज्याच्यापुढे दमछाक होऊन रडले असा प्रश्न मी पुस्तकं वाचून, लेख लिहून किंवा एखाद्या मर्यादित संस्थेतर्फे रात्रशाळा चालवायला जाऊन मला सोडवता येईल असं मला माझी सारी संवेदनक्षमता पणाला लावूनही खरोखरच वाटत नाही. आणि तोपर्यंत माझी ही व्याकुळता क्षणिक नसली तरी षंढ आहे, हे मलाही कबूल आहे.

फार तर याचा परिणाम माझ्या घरी कपबशा विसळायला मी ठेवलेल्या नव्या सुमनच्या हातून एखादा महागडा कप फुटला तर त्याबद्दल मी तिला रागावले, तरी तिचा पगार कापणार नाही आणि दिवाळीला माझ्या मुलीचा जुना इंपोर्टेड फ्रॉक तिला उदारपणे देऊन टाकीन.

-असे सारे प्रश्न सफाईनं डावलून आपलं मध्यमवर्गीय आयुष्य उच्चमध्यम करण्याचा प्रयत्न करीत, शिताफीनं जगण्याचं कसब एव्हाना माझ्या अंगवळणी पडून गेलेलं नाही का?

आणि वेळेवारीच, अक्कलहुशारी वापरून मी एका शहरी, सुखवस्तू आणि सुविद्य कुटुंबात जन्म घेतला याबद्दल एक बक्षिसासारखं आयुष्य किंवा आयुष्यभर लांबीचं बक्षिस मला मिळायला नको का?

एवढं मात्र खरं की, एक खेळणं त्या दिवशी माझ्या हातातनं पडून, फुटून गेलं आहे. त्यानं मला कुठेतरी अन् कणभर का होईना पण कायमचं मोठं केलं आहे आणि उपजीविका करत ठेवलं आहे.

■ ■ ■

# सुट्टीतलं घर

लोणावळ्याचं घर मला वाटतं, आमच्या आईबाबांनी सहज बांधायला काढलं आणि मग हिम्मतबाजपणानं बांधूनच टाकलं.

बाबांना पहिल्यापासून बडोद्याच्या उन्हाळ्याचा राग. आपली शिक्षणखात्यातली नोकरीही त्यांनी कंटाळत, कंटाळत केली. त्यामुळे दरवर्षी उन्हाळ्याच्या सुट्टीत आमचं पुण्याबिण्याकडे कूच!

बाबांच्या हेडमास्तरी आवकीत त्यासाठी बजेट कुठलं सुटतंय? दरवर्षी सुट्टी आली, की आई घरातली चांदीची भांडी कोपऱ्यावरच्या बँकेत गहाण टाकून येई. त्या पैशात आमची ट्रीप होई! तीही कशी, तर महाराष्ट्रात जाऊन हापूसोत्सव भोगायचा आणि जूनमध्ये परतून बलसाड हापूसला भिडायचं. त्यानंतरचे चार महिने आई काहीतरी रामबाण काटकसर करून पैसे बाजूला टाकी आणि चांदीच्या भांड्यांच्या अध्यक्षतेखालीच आमची दिवाळी साजरी होई, 'ऋण काढून सण' म्हणतात ना तसं अक्षरश:.

सुट्टीवर निघण्यापूर्वी आम्ही टायफॉईडची इंजेक्शनं घ्यायचो. तरीही एका वर्षी आईला पॅरा-टायफॉईड झालाच. (त्यानंतर अश्रद्ध होऊन आम्ही इंजेक्शनं घेणंच सोडलं!) त्या वर्षी दुखण्यातून उठल्यावर आईला हवापालट म्हणून बाबांनी केलं लोणावळ्याला बिऱ्हाड.

बॉम्बे-पूना रोडवरच्या बिवलकरांच्या चाळीतल्या दोन खोल्या त्यासाठी भाड्याने घेतल्या. चाळीच्या पाठीमागे असलेल्या अवाढव्य विहिरीला ओठंगून बिवलकरांचं एक छोटेखानी घर होतं. त्याची वरची खोली बाबांनी निजण्यासाठी मिळवली. आईबाबांनी आमच्यासारखे स्वत:च्या झोपेचे हाल कधीच केले नाहीत! रात्री समारंभाने झोपायला जाताना वाटेत बाबा त्यांच्या मलमलीच्या सदऱ्यात काजवे पकडून 'टॉर्च' करून दाखवत. दिवा मालवला की खोलीत

काजवेच काजवे!

...चाळीत इतरही मोसमी व संसारी भाडेकरू होते. मुलंमुलं रोज सकाळी थेट वळवण्ड डॅमवर फिरून येत. येताना उसाचा रस प्यायचा. बाबांनी गुऱ्हाळवाल्याला ताकीद देऊन ठेवली होती, ''आमच्या मुलांना हवा तितका रस पिऊ द्या. पण दरवेळी मशीन पाण्याने स्वच्छ धुतलंच पाहिजे!'' 'यंत्र धुतलं होतं का पण नीट?' अशी ते चौकशी करत. कधी तरी गुऱ्हाळवाला आणि आम्ही दोघंही आपापल्या टोकांकडून 'धुतलं होतं' सांगून टाकायचो!

आमचे आईबाबा आमच्यातला व इतर भाडेकरूंमधला वर्गभेद सहजपणे बाजूला ठेऊन तिथे खूप मिळूनमिसळून राहिले. एकदाच फक्त, घरात शिरणाऱ्या सरड्याला मारण्यावरून बाबांची शेजारच्या कुलकर्ण्यांशी( ?) बोलाचाली झालेली आठवते - त्यांच्या मते सरडा मारण्याने बाबांना 'पाप' लागणार होतं. बाबांनी आत आल्यावर कपाळाला हात लावून म्हटलं, 'खुदा मालिक है!' आवारातली ती भलीमोठी पडीक विहीर साफ करून पोहायला वापरायची टूम बाबांचीच. एका रात्री परसू साफ करून दिवेबिवे लावून लहानमोठे सारे हुतुतूही खेळले. त्यानंतर तिथला तो मुक्काम आवडून आईबाबांनी लोणावळ्याला घरच बांधायचं ठरवलं.

पुण्याचा एक तीन हजार रुपयांचा प्लॉट बाबांच्या नावावर होता. आजीची नि बाबांची भांडणं वाढली आणि वयोमानानुसार आजीआजोबांची घाबरगुंडी उडाली. तसतसे ते बाबांचं नाव शेअर्सादिकांमधून कमी करत गेले. पण तो लहानसा प्लॉट चुकून तसाच राहिला होता. पुण्यात घर बांधणं केव्हाच परवडण्यातलं नव्हतं. तेव्हा यांनी शक्कल लढवली की आज तो विकल्यास त्याचे दहा हजार येतील. इकडून तिकडून भर घालून लोणावळ्याला घर बांधून, सुट्टीत व म्हातारपणी त्यात राहू.

आईला वाटे, कर्मगाव सोडून थंड हवेच्या ठिकाणी उन्हाळीघर कुठे बांधायचं? ''आपण सयाजीराव महाराज लागून गेलो की काय?'' पण ती दिसायला आपलं ते चालवणारी आणि बाबा गरीब. तेव्हा अशा वेळी होतं तेच आमच्या घरीही झालं, बाबाच जिंकले.

घर बांधण्यासाठी गुजरातेतून पुन्हा येणं जमण्यातलं नव्हतं. बाबांनी त्या सुट्टीतच मुंबईला जाऊन बांधकामक्षेत्रातल्या देवधर बंधू या मित्र व्यावसायिकांना गाठलं. आणि एका लिंबूटिंबू घराचा आराखडा आखला.

विमा-पॉलीसीवर कर्जबिर्ज काढून ॲस्बेटॉसचं छप्पर असलेलं एक लांबुडकं घर बांधता येणार होतं. ते उभं विभागायचं, डावीकडच्या दोन खोल्या

+ व्हरांडा उन्हाळी मुक्कामासाठी ठेवायच्या. उरलेली तीन खोल्यांची आगगाडी भाड्याने द्यायची. ही तजवीज का, तर आम्ही परप्रांतात असताना भाडेकरू आपसूक घराची देखभाल करतील. बिनपगारी माळी ठेवावा, त्याने चार झाडं लावावी, मजुरी करून पोट भरावं. एकूण मियाँ मूठभर, तरी त्याला कंपाऊण्ड, माळी, भाडेकरू, व्हरांडा, शेड, मागचं दार, पुढचं दार इतक्या दाढीमिशा काढून झाल्या.

सिमेंटची टंचाई होतीच, पण देवधरांची इथेतिथे कामं चालू होती. त्यांनी एका सुट्टीत -मित्रदंपतीचं छोटेखानी घर बांधून काढायचा पत्कर घेतला. त्यांनी फक्त सप्ताहाअखेरीस यायचं, झालेलं काम पाहायचं, 'डिफिकल्टीज' सोडवायच्या. थोडेसे मजूर, मुकादम आणि माल मुंबईहून पाठवायचा, बाबांनी त्यांना दिग्दर्शन करून आपलं आपण घर बांधून घ्यायचं.

त्यानंतर बाबा कुठून कुठून मुरूम, रेती, दगड नि लाकडं बघून येत. कधी घासाघीस जमे, कधी फटकाही बसे! दुकानदारच बैलगाडी ठरवून द्यायचा. इकडे आपण माल उतरवून घ्यायचा. हळूहळू मग दोन बैलगाड्या ठरूनच गेल्या. पण त्यातला एक गाडीवान वाटेत थोडा माल विकून येई! तुकारामाची आणि आमची मात्र गट्टीच झाली.

आम्ही वाळूच्या ढिगांवर बसून खेळत असताना बाबा सदरा, पायजमा आणि डोक्याला रूमाल असे उन्हातान्हात घर बांधून घेताना दिसू लागले. जेवणापुरते पटकन घरी जाऊन यत. कधी दुपारची देखरेख आम्हा दोघांवर सोडून जात. मजूर बांधकामावर भरपूर पाणी घालतात की नाही, इकडे लक्ष ठेवायचं असे.

आईसुद्धा स्वयंपाक, जेवणीखाणी आटपून जमेल तेवढी बांधकामावरच असे. सिमेंटच्या बेसनामध्ये गवंडी पुरेसं पाणी घालतात की नाही, हे आईबाबा दोघंही लाडवाचा पाक बघितल्यासारखे जातीने पाहात. बाबा प्रत्येक तांत्रिक गोष्टीची आईशी चर्चा करत. मोठे निर्णय घ्यायच्या वेळी म्हणत, 'तू जरा येशील का तिकडे?'

भिंती उभ्या राहू लागल्या तशी सामानाची छपरी कमी पडू लागली. मग घराला लागून पत्र्याची शेड उभारली. अशा प्रत्येक अपूर्वनियोजित खर्चाच्या वेळी बाबांची फॅ फॅ होई. इकडून तिकडून नसलेला पैसा उभा करताना त्यांची उडणारी गाळण रोजच कानावरून जाई; कारण आमच्याकडे मुलांच्या आणि मोठ्यांच्या जगातली रेघ अगदीच पुसट होती. शिवाय आईबाबांचं मला वाटतं फारसं गुप्त असं काही नसेच! वीस हजार, म्हणजे आमच्या 'डोक्यावरून

पाणीच' होतं. मात्र पैसे पुरले नाहीत की आज आमची होते, तशी त्या दोघांची चिडचिड झालेली पाहिली नाही.

एखादं बाळंतपण जवळून पाहावं तसं आमचं घर आम्हाला टप्प्याटप्प्यानं उभं राहाताना दिसत होतं. त्याच्या रोजच्या प्रगतीची बाळाच्या प्रत्येक शा, शू, शीची होते तशी चर्चा व्हायची. दिखाऊपणाला या घराच्या बाबतीत सर्वस्वी चाट होती. हॉलमधली जमीन शहाबादी फरशीसारखी दिसण्यासाठी गवंड्यांनी सिमेंटच्या शिऱ्यात लाल रंग मिसळून ताटात वड्यांसाठी थापावा, तसा तो सपाट थापून घेतला आणि तो थुलथुलीत असतानाच एका दोरीने आई सुरीने शंकरपाळे कापी तशा रेघा आखून, चौकोनी फरशा पाडल्या. घराला पांढरा रंगच फक्त परवडण्यासारखा होता. खिडक्यांच्या गजांना लावायला त्यांनी शेंदुरासारखा भडक नारंगी रंग का निवडला कुणास ठाऊक, पण सर्व खिडक्यांचे गज आई आणि आम्ही दोघा भावंडांनी मिळून स्वत:चे स्वत: - खाली ठिपके सांडून डाग पडू न देता - रंगवले. या पिटकुल्याशा घराला नाव काय द्यायचं याची चर्चा हौसेनं बरेच दिवस चालू होती. शेवटी आमच्या एका प्राध्यापक स्नेह्यांनी सुचवलेला माझ्या आणि माझ्या भावाच्या नावाचा संधी सर्वानुमते निवडला गेला. पद्मजा आणि उदयचं मिळून - पद्मोदय. त्या साध्यासुध्या घराच्या दर्शनी खांबावर ते बोजड नाव नक्षीबिक्षी काढून - पुन्हा केशरीच रंगाने - कोरायचं ठरलं.

आईबाबांना घराशिवाय काही सुचतच नसे. संध्याकाळपर्यंत त्याचा वीट येऊ लागे. फिरायला जायचं म्हणून मारे टेकडीची दिशा धरायची आणि वाटेतल्या प्रत्येक बांधकामात शिरून 'यांनी कसं केलंय बघ?' म्हणून त्यांच्या युक्त्या टिपायच्या, वेड्यात काढायच्या किंवा 'पुढेमागे' साठी नोंदायच्या. खरं तशातल्या योजकतेला आमच्या अर्थशास्त्रात वावच नव्हता. तेवढ्यात कळायचं, जठार, साखळकर नि मोकाशी अशा तिघांनी मिळून एक 'तिळं' बांधलंय! की लगेच ओळख काढून त्यांचं घर पाहायला निघाले. अतीच करत.

एवढं करून पचका झालाच. मेच्या मध्यावर सिमेंट येईनासं झालं. मजुरांना हातावर हात ठेवून बसवून कसं ठेवणार? बाबांना वेळेवर बडोद्याच्या नोकरीवर हजर राहायचं होतं. पाऊस जवळ येत होता. त्यात हे मौल्यवान दिवस फुकट चाललेले.

बांधकामगारांनाही आमच्या छोट्याशा घराचा लळा लागल्यासारखं झालं होतं. पण त्यांचा तिथला 'शेर' संपला होता. मुकादमाने दोन दिवस खपून आम्हाला देण्यासाठी एक सिमेंटचा अर्धपुतळा केला. शेवटच्या रात्री बांधकामावर

त्यांनी शेकोटी पेटवून सामुदायिक जेवण केलं. आम्हीही उत्तररात्रीपर्यंत त्यांच्यातच होतो.

यथावकाश बाबांनी सिमेंट व रजा दोन्ही मिळवलं. बऱ्याच तडजोडी कराव्या लागल्या, पण घर बांधून झालं. मुंबईहून आलेल्या नव्या तुकडीतले लोक तेवढे दिलवाले नव्हते. त्यांना दिवसही कमी मिळाले म्हणा.

एके दिवशी आईबाबांनी कोपऱ्यात बसून ग्रहशांत टाईप काहीतरी केलं, आणि पाच प्रकारचे 'रत्नखडे' जमिनीत पुरले. मला ते अगदी गोष्टीतल्यासारखं वाटून मी म्हटलं, "आता उदयच्या या घरात कित्येक पिढ्या जातील. त्यातलं कुणी ही पंचरत्नं काढून वापरेलही."

तशी आईबाबांना तिसऱ्याच अर्थाने कळवळायला आलं. 'अग, त्याच्याच का? तुझ्याही जातील, अर्धा भाग तुझ्यासाठी ठेवू.'

आईने बराच समजूतदारपणा दाखवला होता. पुढच्या दोन सुट्ट्यांत मग तिच्याही काही वाजवी मुरादींना न्याय मिळाला. न्हाणीघर बांधायला पैसेच नव्हते म्हणून ते स्वयंपाकघरात आलं होतं. आता ते बाबांनी बाहेर घेतलं. आईने चैन म्हणून उभ्याचा ओटा करून घेतला. जमीन मुरुमाची असल्यामुळे पाणी लौकर लागलं नव्हतं. प्लॉटच्या टोकाला एका खड्ड्यात उतरून पाण्याच्या खेपा कराव्या लागत. आता घराला पाणसुखही लाभलं.

इतकी मेटाकुटी होऊनही आमच्या राजस पालकद्वयाला आपली रहाणी गरीबडी करायचं कारण दिसेना. घरापुढच्या मोकळ्या, चौकोनी व्हरांड्याला शेळ्यामेंढ्यांना अडवण्यापुरती दोन छोटी लाकडी फाटकं होती. वारा तिथे छान येई आणि ऊन कधीच येत नसे. तिथे बसून आरामात ब्रेकफास्ट करता यावा म्हणून दोन आरामशीर सेट्ट्या घडवण्यात आल्या. मुंबईच्या मामाकडे एका गोलाकार टेबलाच्या पोटातून निघणारी चार चतकोर टेबलं असं ऐटबाज टेबल होतं. तसलं बाबांनी करून घेतलं. मात्र आपल्याच डोक्याने ते चौकोनी आणि उंच बनवल्यामुळे झालं डुगडुगंच. खुर्च्या हव्यातच आणि त्याही आरामशीर, वेताच्या उशीविशीवाल्या! मग रोज रात्री त्या आत आणून आतल्या खोलीतल्या खुंट्यांना टांगायच्या! आम्ही त्यांची टर उडवून पाहिली; पण बाबांचा पत्र्याच्या खुर्च्यांना सक्त विरोध होता. आणि त्यांना मांडी घालून पाटावर बसताच येत नसे! घरबांधणीचे वेळी सामान भिजू नये म्हणून बांधलेली पत्र्याची शेड तशीच ठेवली होती. तिथे बसून जेवायला मग घडीचं डायनिंग टेबलही एका सुट्टीत आलं. संध्याकाळी बाहेर जायचं नसेल तेव्हा बाबा अंगणात आरामखुर्ची टाकून त्यावर वाचत बसू लागले.

रोज सकाळी व्हरांड्यात आमचा ब्रेड-ऑमलेटादी इंग्लीश ब्रेकफास्ट चाले. घाई कसलीच नसे. गार वाऱ्याबरोबर जांभळं, अंडी, आंबे, सोनचाफे टोपल्यांतून विकायला येत. खेकडे सुद्धा! बसल्या बसल्या खरेदी चाले, माझं भरतकाम, आईचं विणकाम, बाबांचं साग्रसंगीत पेपरवाचन, भावाच्या टिवल्याबावल्या किंवा भोवराबिवरा. सर्वांना एकमताने आवडणारा जेवणबेत म्हणजे मटण, आंबरस आणि पोळ्या! दुपारी खेळायला मला समोरच्या राममंदिरातल्या ढेरसाऱ्या मैत्रिणी होत्याच आणि वाजवी अंतरापर्यंत कुठेही हिंडलं तरी काळजी न करणारे आईवडील! उन्हं उतरली की चौघांनी मिळून कुठला तरी डोंगर, देऊळ किंवा रेल्वेलाईन धरून खंडाळ्याच्या नाहीतर मळवलीच्या दिशेने चालू लागायचं. एखाद् दिवशी आमच्या आईला आताच्या आयांसारखा संध्याकाळच्या स्वयंपाकाचा कंटाळा येई. अशा रात्री जेवून यायला बॉम्बे-पूना रोडवरचं एक 'जयहिंद' नावाचं हॉटेल ठरून गेलं होतं. वाजवी दर, इराणी पद्धतीचं जेवण आणि जेवल्यानंतर साखर घालून विरजलेल्या गोड दह्याच्या वाट्या. एखाद् दिवशी पहाटे जेवण बांधून बरोबर घेऊन किंवा जेवून लगेचच बाहेर पडायचं. अशा पद्धतीने आम्ही आसपासचे सगळे डोंगर, किल्ले, लेणी, धबधबे आणि दऱ्या पुन्हा पुन्हा सर केल्या. मात्र त्यातही बाबांचं डोकं तिरपं चाले. 'मी तुम्हाला बरोब्बर नेतो.' म्हणून पायवाट सोडून कुठला तरीच चढ चढायला घ्यायचा. तो नजरेला वाटे तेवढा सोपा निघत नसे! काट्याकुट्यांनी ओरबाडलं जात माथा गाठल्यावर तिथे लागे तारेचे कुंपण किंवा वसकन अंगावर येणारे कुत्रे! अशा वेळी मात्र आई वैतागे. गावातल्या एकमेव सिनेगृहात दर शुक्रवारी 'म्युटिनी ऑन द बाऊंटी' सारखा नवा इंग्रजी सिनेमा लागे. स्वयंपाक आटपून दहाचा शो गाठायचा आणि परत येऊन आंबरसपुरीवर ताव मारायचा. अशा एखाद्या वेळी बाबांच्या आग्रहाला न जुमानता आई राजीखुषीने पेपर वाचून मग पुऱ्या तळायला घरी राही.

बडोद्याला आमच्याकडे कुणी काळं कुत्रंही फिरकत नसे. त्यामुळे आमची पाहुण्यारावळ्यांची हौसही इथेच फेडून घ्यावी लागे. आईबाबा मुद्दाम मुंबईहून येताना, पुण्याला जाऊन मामामावश्या, आत्याआज्यांना तोंडभरून बोलावून येत. रेल्वेलाईनच्या कडेकडेनं जाऊन पाहुण्यांना स्टेशनवरून घरी घेऊन यायची कामगिरी आम्हा दोघां भावंडांची. पाहुणे एकदोन दिवस हौशीने राहात. त्यांच्या बायका व्हरांड्यात वाऱ्यावर बसून पातेलीभर आंब्यांचा रस काढत. त्यांना पोचवायला जाताना आईबाबा वाटेत एकमेकांशी सल्लामसलत करून 'मगनलाल चिक्की'च्या दुकानात शिरत आणि 'खाऊ' म्हणून चिक्कीची पाकीटं बरोबर देत.

एका वर्षी तर बडोद्याहून आजीआजोबांनाही बरोबर आणायचा घाट घातला. तुकारामाला हुडकून काढून बैलगाडीत गाद्यागिर्द्या घालून आजी-आजोबांना ठिकठिकाणी हिंडवून आणलं तरीही अंगं चांगलीच ठेचकाळून निघत, पण आजोबा काठी घेऊन मनापासून येत. आजी मात्र अपेक्षेप्रमाणेच नाकं मुरडत राहिली आणि 'कसलं भिकारडं झोपडं बांधून ठेवलंय!' म्हणून नातेवाईकांच्यात जाऊन बडबडली. आईबाबांना ते लागलं असणार. नुकसान तिचंच झालं. उन्हाळ्यांच्या सुट्टीपुरतं आजी-आजोबांना वाढीव नोकरवर्गावर सोपवून आम्ही लोणावळ्याला पसार होऊ लागलो. यात बिचाऱ्या आजोबांचं मात्र 'लोणावळा' बुडलं.

त्या मानाने भाऊ देवधरांचं वाक्य आईबाबांना जास्त चमकवून गेलं. भाऊंना एकदा मी एकद्वितीयांश घर माझं असून पंचरत्नवाली खोली मी स्वत:कडे ठेवणार असल्याचं सांगितलं. ते फट्‌दिशी म्हणाले, "तोपर्यंत ते घर टिकायला बसलंय!" तेव्हा मात्र आमचं पालकद्वय चपापलं... 'पण आम्हाला तर तेव्हा म्हणाले होते...!' अर्थात् अशा धक्क्यांनी हबकण्याऐवजी दुप्पट जोराने मजा करायला घेणं ही आमची कुटुंबप्रथा असावी.

एका सुट्टीत आम्ही मामाची गाडी उसनी घेतली. आणि सह्याद्रीच्या पोटातील लांबची ठिकाणंही करून घेतली. तोवर आम्हाला मुंबईचे तुंगारे भाडूत म्हणून पावले होते. त्यांची बेबी ऑस्टिन होती. मुलं आमच्या बरोबरीची. बऱ्याच सहली आम्ही बरोबर केल्या. तुंगारे आमच्यापेक्षाही अफलातून निघाले. घर बांधायचा त्रास दुसऱ्याने घ्यावा. आपण त्यात राहून मजा करावी, अशीच त्यांची कल्पना. तो परिसर पुरेसा पालथा घालून झाल्यावर त्यांनी आमचं घर सोडलं - पुढचं घर कुठे घेतलं, कुणास ठाऊक.

आमच्या आईच्या सुट्टीतल्या घराच्या आठवणी इतक्या रम्य नसणार हे आता लक्षात येतं. आपल्या आईला स्वयंपाक, घरकाम फारसं आवडत नाही याचा शोध मला लोणावळ्यालाच लागला. बडोद्याला नेहमीच नोकरचाकर असत. इकडे तिला उलट, गैरसोयीच्या स्वयंपाकघरात दुप्पट काम पडे. पाहुण्यांची सरबत्ती थांबवण्याचा पवित्रा तिनं कधी घेतला नाही. पण 'रीडर्स डायजेस्ट' मधला एक किस्सा मात्र ती हसून हसून सांगे. सुट्टीसाठी आम्ही सगळे समर हाऊसमध्ये गेलो. आईनं घर साफ केलं. स्वयंपाक केला, टेबल मांडलं, सर्वांनी बसून त्याच्यावर ताव मारला. आई मागचं आवरून बाहेर येईपर्यंत आम्ही हातात पुस्तकं घेऊन पेंगुळलो होतो. मग बाबा सुखाने आळसावलेल्या आवाजात आईला म्हणाले, "वा! सुट्टीची खरी मजा हीच

काही न करता बसून राहाता येतं. हो की नाही ग?''

आता वाटतं की, बाबांच्या अतिहौशी स्वभावामुळे मध्यमवयाच्या आईची थोडीफार फरपटच होत असावी.

आईबाबा बडोद्यासारखे तिथेही समरसून राहात. बिवलकरांच्या चाळीत चक्कर टाकणं असेच. नव्या भांगरवाडीतही पोंक्षे, बोडस, करंबेळकर, इ. कडे बसायला जाणं, पत्रमैत्र्या जोडणं, त्यातून रात्री ब्रिजची 'टेजलं' जमवणं. आमची नावं गेल्या-गेल्या सार्वजनिक वाचनालयात घातली जात, पोहायच्या तलावात, टेबलटेनिससाठी क्लबातही. भाड्याची सायकल आणून घरासमोरच्या मोकळ्या प्लॉटवर फिरवायची. मुंबई-पुण्याहून आतेमामेभावंडांना उचलून आणण्यात येई. त्यांनाही या धाक नसलेल्या घरात आमच्याबरोबर जांभळाकरवंदांच्या मागे हुंदडायला मिळे. 'जांभळाचं झाड कुजकं असतं हं चढायला' अशा एखाद्या इशाऱ्यावर आईबाबा काम भागवत.

हळूहळू गावातले आमचे भाजीवाले, मासेवाले आणि वार्षिक कापडवालेसुद्धा ठरून गेले.

राममंदिरात कथाकीर्तनं जोरात चालत. आईबाबांना केशरी कपड्यांबद्दल कमी-अधिक नफरतच; मलाच केव्हातरी मैत्रिणींबरोबर जाऊन दासगणू महाराजांना दंडवत केलेला आठवतो. अधिक महिन्यात रोज आठवले शास्त्रींचं कीर्तन व्हायचं. कीर्तनसंस्कृतीशी माझा तो पहिला व शेवटचा संबंध. एरवी मला वाङ्मयातले साधे साधे संदर्भही कळले नसते.

सुट्टीतल्या घरात आम्ही इतके मनसोक्त राहिलो की तिथेच लहानाच्या मोठ्या झाल्यासारख्या माझ्या तिथल्या आठवणी आहेत. परंतु खरा तो पाच सहा वर्षांचाच काळ असणार. त्यानंतर बाबांच्या गुजरातच्या अंतर्भागात बदल्या होऊ लागल्या. आमच्या शिक्षणासाठी आई बडोद्यात राहिली. तिनेही नोकरी धरली. तिच्या नोकरीत उन्हाळ्याच्या सुट्टीचा अंतर्भाव नव्हता. बाबाच सुट्टीत बडोद्याला येऊ लागले किंवा आम्ही त्यांच्या गावी. त्यामुळे माऊंट अबू पदरात पडलं, पण सुट्टीतलं घर लांब पडत गेलं.... कुणीतरी त्या घराचा लाभ घ्यावा म्हणून बाबांनी मुंबईच्या मामाकडेच किल्ल्या ठेवल्या. त्यानंतर आम्ही सोडून बाकीचेच तिथे जास्त वेळा गेले. भावेमंडळी तर इतक्यांदा गेली, की आम्ही गेलो की आमच्यापेक्षा त्यांचीच चौकशी तिथली ब्रिजप्रेमी मंडळी अधिक आस्थेनं करत.

दरम्यान, लोणावळ्याचा पाऊस घराला नेमाने झोडपून काढत होताच. बदलते माळी त्याची पावसाळ्यातली झाकणूक धड करत नसत. जवळच्या

म्युनिसिपालिटीच्या शाळेतली मुलं कुंपणावरून उड्या मारून येत आणि आमचा व्हरांडा माकडचेष्टांसाठी वापरत. कोणी शेळ्यामेंढ्याही कोंडून जाई. गेल्या गेल्या घरसफाईला लागूनही घराची रया सुधारत नसे. 'थेट छतापर्यंत उलटी चिखलाची पावलं कशी उमटवत असतील बुवा ही कारटी?' म्हणून आश्चर्य करता करता आईबाबा हसत सुटत. झाडांची फळं चोरापोरी जात. भाडेकरूही मामुलीच मिळत. मध्यस्थाला त्यात फारसा फायदा नसे.

त्यानंतरच्या काळात आम्ही आमच्या पदव्या, नोकऱ्या, लग्न, बदल्या, बाळंतपण यांतच इतके गुंतलो, की सुट्टीतलं घर विसरायलाच झालं. काही दिवस तर चौघं चार ठिकाणी होतो. एकेक गाव सोडताना तिथलं सामान भरून लोणावळ्याच्या घरात डांबलं जाई. काही वर्षं त्या घरानं नुसतं सामान सांभाळायचं काम केलं.

लोणावळ्याला कुणी एकत्र किंवा स्वतंत्रपणे फिरकेनासं झाल्यावर ते घर ठेवण्यातही अर्थ उरला नाही. आईबाबांच्या मते म्हातारपणी त्या दोघांनीच जाऊन राहाण्याच्या दृष्टीने तो परिसर, ते गाव हव्या त्या गतीने 'डेव्हलप' झालं नाही... शेर असेल तिथे मन:पूतपणे राहाणारे आईबाबा घरं, गावं, वाहनं आणि माणसं यातून तितक्याच सहजतेनं बाहेर कसे पडतात, याचं मला नेहमी आश्चर्य वाटे. त्यांच्यात जो बोहेमियन वृत्तीचा अंश होता, त्याचाच तो अपरिहार्य भाग असावा. एके दिवशी निरिच्छपणे त्यांनी ते घर विकूनच टाकलं. आमचं सुट्टीतलं घर पुसट होत अखेर भूतकाळात विरघळून गेलं. आठवणीत तो एक खडीसाखरेचा खडा उरला, बस्.

लहानपणी उन्हाळ्याची सुट्टी केवढी तरी वाटे. त्यात आम्ही दोघे इतके रंगून राहायचो, की शेवटी शेवटी तेच घर राहातं आणि बडोद्याचं घर काल्पनिक वाटू लागे. सुट्टीवरून परत आल्यावर वाटे, अरेच्चा हेही घर खरंच होतं, आहे! मला वाटतं, सुट्टीतल्या घराची सर्वात मोठी देणगी हीच! दुसरं घर हवं ते बारमासी घराचा पूर्णपणे विसर पडण्यासाठी. सुट्टीतल्या घराने ही कामगिरी चोख बजावली. आमच्या आईवडिलांनी लोणावळ्याला असताना कधी बडोद्याच्या घराची काळजी केली नाही. बडोद्याला असताना लोणावळ्याच्या घरी चोरी होईल याचा धाक मानला नाही.

पुढेही आईबाबांनी कधी त्यांच्या स्वभावानुसार लोणावळ्याच्या आठवणींचे कढ काढले नाहीत. त्यांच्या या वृत्तीमुळंच कुठल्याही नव्या गावात रुजणं त्यांना जड गेलं नसणार. बाकी घर विकतानाही त्यांना फायदा काढणं जमलं नाहीच! तसं आईचंच खरं ठरलं. तेवढ्याच पैशात बडोद्यातच आमची

‘स्थावरजंगम इस्टेट’ झाली असती. मग कदाचित बडोद्यातनं आम्ही इतके उखडलेही गेलो नसतो. तरीही लोणावळ्याचं घर आयुष्यात उगवलं नसतं तर काहीतरी कमी राहिली असती. अर्थशास्त्रीय दृष्ट्या सुट्टीतलं घर ही आईबाबांच्या आयुष्यातली घोडचूक की गोडचूक? त्या पर्यायी घरानं आमच्यासारख्या कट्टर शहरी, मूळ गाव, त्याचा मागही हरवून बसलेल्या कुटुंबाला जे दिलं ते कुणी देऊ शकलं असतं का?

अलीकडे वाटतं, सुट्टीतलं घर ही वास्तू नव्हतीच; एका वृत्तीनं काही वर्षं ते दृश्य स्वरूप धारण केलं होतं. बोहेमियन, कनायसर, एपिक्युरियन हे सगळे शब्द मी पुष्कळ पुढे शिकले. त्या अर्थानं मला वाटतं सुट्टीतलं घर म्हणून अस्तित्वात आहे. आईबाबांच्या एवढी आमची अर्थव्यवस्था नाजूक नसूनही आम्ही असा वेडा प्रयोग करायला धजत नाही. हिशोबाने वागतो. आंबे मोजून खातो. मुलांना रानात सोडून द्यायला घाबरतो. आपापल्या व्यवसायात तर इतके जखडून गेलोय, की कुणाच्याच सुट्टीतल्या घराकडे मान वर करून पाहायला फुरसत नसते. पण त्यातूनही प्रवासाला निघालोच तर मित्रमंडळी अचंब्याने म्हणतात, ‘अजून तुमची मुलं तुमच्याबरोबर यायला तयार असतात?’ मीही मग चमकते. खरंच की! कुठलाही प्रस्ताव मांडा, आपली मुलं आपली एका पायावर तयार!

काळाच्या पावलांबरोबर पुढच्या पिढीला येऊन चिकटलेला हा त्या बोहेमियन वृत्तीचा एकच, चुकार ठिपका.

मध्यंतरी असेच बॉम्बे-पूना रोडवरून येत असताना गाडी पेट्रोल पंपावर थबकली तशी पायी चालायची सुरसुरी येऊन मी एकटीच झपाझप पुढे निघाले. अचानक बिवलकरांची चाळ, ती विहीर, ते दुमजली घर लागलं. आत शिरले. बिवलकरांच्या वेळचं शेवटचं बिऱ्हाड हलूनही चारपाच वर्षं उलटली होती. पण तिथल्या बिऱ्हाडकरूंना ‘मी इथे राहून गेलेय’ हा माझा दावा पटला. ‘अर्धा कप तरी’ चहा घेतल्याशिवाय सोडेचनात.

तसेच मग गावात शिरलो. राममंदिरासमोरचं नंतरच्या मालकाने वाटेल तसं वाढवून बेढब केलेलं ‘सुट्टीतलं घर’ गाठलं. माझं मला म्हणूनच नव्या, सुपरइम्पोझ झालेल्या घराकारातून मूळ घर वेगळं काढणं जमलं. याच घरात राहात असताना माझा मॅट्रिकचा रिझल्ट लागला होता... इथे मी सायकल चालवण्यात तरबेज झाले, कणिक भिजवायला शिकले, इथल्या वाचनालयातूनच

पुस्तकं प्रथम माझ्या हातात पडली....

तेवढ्यात राममंदिराच्या विश्वनाथभाई पुजाऱ्यांच्या पत्नीनं मला ओळखलं! 'जेवूनच जा, निदान चहा घेऊन जा' आग्रह सोडेचनात. नाईलाजाने मी त्यांच्या गॅलरीतून ओणवून गाडीतल्या माणसांना म्हटलं, 'उतरा.' तशी प्रवासापुरता आमच्या गाडीत सामील झालेला एक गमतीदार पाहुणा म्हणाला, "यांचं आपलं बरंय! वाटेल त्या घरात घुसतात आणि 'मी इथे राहात होते' सांगून चहा उकळतात आपल्या!"

■ ■ ■

# गच्ची आणि आपण

काही वेळा मला खरंच भीती वाटते की गच्चीशी माणसाचं नातंच तुटतंय आणि हे वाढत गेलं तर घराचा एक प्रसन्न अवयव माणसाच्या स्थापत्यातून त्याच्या त्या निरुपयोगी शेपटीसारखा गळूनच पडायचा!

असं होणं घरं बांधून राहणाऱ्या माणसांच्या हिताचं नक्कीच नाही. पण भाषा वाचवा, निसर्ग वाचवा, वाघ वाचवा, पुस्तकं वाचवा या सगळ्या अधिक निकडीच्या वाचवावाचवीत घराच्या या अगदी मूक पण खूप बोलक्या भागाचा नंबर कधी लागायचा?

असंही वाटतं की माझ्या एकटीच्या आयुर्मर्यादेत जर मी माझ्या काळ आणि अवकाशातल्या माणसांना हे पटवू शकले नाही तर मग माणसाच्या गच्च्यांचं भवितव्य काय?

बावीस-तेविसाव्या शतकातले लोक आपलं उत्खनन करून मोहेंजोदडोसारखं मुलांच्या पाठ्य-पुस्तकात लिहायचे की "त्या काळातले कल्पक अभियंते अतिशहरीकरणावरचा एक तोडगा म्हणून घरांच्या डोक्यावर चौकोनी अंगणं ठोकून त्याला कठडे नामक बांध घालत. लोक तेथे हवा खात, झाडं लावत, वस्तू सुकवत. उन्हाळ्यात झोपत तर हिवाळ्यात दोऱ्यांना बांधलेले कागदांचे तुकडे उडवण्याचा खेळही खेळत; आणि त्यावरून लक्षात घ्यावे की त्या काळातले लोक संस्कृतीने किती पुढारलेले होते..."

बिनवापरामुळे घरांचे अवयव लोप पावतात हे पाश्चात्य देशांत मी डोळ्यांनी पाहिलंय. ठोकळेबाज घराघुरांचा गॅलेऱ्यांचा अभाव आणि खिडक्या पापण्यांशिवायच्या डोळ्यांसारख्या टक्क उघड्या - त्यांना फक्त पडद्यांचे कल्ले!

-पण गच्चीची गोष्ट अशी हसण्यावारी नेण्यासारखी नाही. माणसामाणसांतली नाती टिकवण्याचं हल्ली फारच चालतं. माणूस आणि त्याचं

काम यांच्यातलं नातं पण काही चोखंदळे तपासताना दिसतात आणि झाड आणि माणूस यांच्यातल्या संबंधांची तर काही घोरे चक्क काळजीच करतात. पण कित्येक नात्यांची खातीच न उघडता, त्यांच्या शक्यता नाकारत आपण जगतो. त्याचं काय?

उदाहरणार्थ, गृहिणींना आपल्या रोजच्या चहाच्या किंवा आमटीच्या पातेलीला मोडीत टाकताना कळवळून जाणवतं ते नातं? आजारपणामुळे अंगाची वळकटी करून एकाच भिंतीशी पडायची वेळ आली की आपल्याला जाणवतं, अरे, या भिंतीवर अशी एक आकृती आहे! इतके दिवस कशी दिसलीच नव्हती? व्यायाम करताना आपल्याच दोन पायांमधून दिसणारी आपली खोली आपल्याला चकित करते. 'अरेच्या, ड्रेसिंग टेबलाचं अलमारीशी असं पण संधान आहे?'

आपल्याच अवयवांना आपण किती विसरून वागवत असतो! रक्तदाबासारखे अंतर्व्यवहार सोडूनच द्या. आपल्या केसांना भरपूर तेल लावून, सुगंधी न्हाऊन ते खसखसा पुसलेत आणि विंचरून बाहेर पडलात की मुंबईतसुद्धा, वाऱ्याच्या झुळुका त्या वेळूच्या बनातल्या लकेरीसारख्या बटाबटांमधून घुमू लागतात आणि मग लक्षात येतं, लोकशाहीत प्रत्येकाला मत, माणसांच्यात प्रत्येकाला इगो तसं दरेक केसाचंही काही एक म्हणणं आहे. प्रत्येकाच्या मुळाशी एक बोलकं रंध्र आहे आणि बैलाला पुरणपोळी आवडते तशी त्याला तेलपोळी.

कधी तरी 'चपला हल्ली २-४ महिन्यांच्यावर टिकतच नाहीत.' यापेक्षा, त्यांची आतून 'वाट' लावणाऱ्या पायांचीही दखल घ्या. जगात इतर महत्त्वाचे व्याप आणि प्रश्न आहेतच. पण पायांचाही आपल्यावर काही हक्क आहे, त्यांचीही आपल्याला थोडी मदत आहे. पायांच्या अवस्थेनुसार कढत पाण्यात मीठ, तेल किंवा शॅम्पू टाकून पोटरीपर्यंत पाय बुडवून बसा. एकमेकांवर घासून त्यांना चक्क करा. हल्ली बाजारात मेलेली कातडी दूर करायला छोट्या रॅकेटसारखी पायकिसणी मिळते. फाजील लाड म्हणून तिला हसू नका. टॉवेलने नखाबिखांना खरारा करून शेवटी वरून क्रीमचा हात फिरवा आणि सपाता घालून फिरा बघू घरभर. लक्षात येईल की आपल्या पायांनाही सुखासमाधानाने गुणगुणायला होतं...

आत्मपरीक्षणाच्या त्याच झटक्यात मग असाही विचार करा - गच्ची आपण किती दिवसांत झाडली नाही? तिचे - आपले संबंध इतके व्हाया चिरगूट का? वीस वीस वर्षं बांधकामकाळातली खडी, मुरूम, चाळणी

कोपऱ्यात घेऊन बसलेल्या गच्च्या मी अनुभवल्या आहेत. खसाखस झाडझूड करून त्यांची रया सुधारली आहे. सतरंजी, चटई पसरून त्यांच्याशी नातं जोडून सुखी झाले आहे.

महाराष्ट्रियांनो, कधीतरी गुजरातेत नाहीतर पंजाबांत जाऊन गच्चीचा वापर शिकून या. तसेच तडक मग सोपान चढून सौंध गाठाल. एखाद्याचं नशीब उघडतं तसं तुमच्या डोळ्यांसमोर, भोवती आणि डोक्यावर आकाश उजाडेल. तेच अंगभर पांघरून गच्चीभर फिरा, चारी बाजूंनी नजर खाली ओता. कितीही वठल्या वयाचे असलात तरी गॅरंटीने, मनाला लहान मुलासारखी मजा वाटेल. दिवसभर घरकाम, लेखनकाम, रसोईकाम यात अडकून घराबाहेर पडायला झालं नसेल तर अर्धा तास स्वत:ला गच्ची भेट द्याच. आपलीच मन:स्थिती जपानी पंख्यासारखी उघडेल आणि सायंप्रकाशातली उदासी शोषून घेईल. खाली यायच्या आत दुनियेचा रंग बदलेल.

पुन्हा तुम्ही कोळशाचं पोतं, गंजलेली तिचाकी इ. गोष्टी वाटेत ठेवणारच नाही.

गच्चीत अभ्यासाला, केस वाळवायला, कविता रचायला, मैत्रिणीशी कुचुकुचू करायला जावं. गच्चीवर जाऊन कुणावर तरी हळूच, लांबून आणि एकतर्फी प्रेम करावं. प्रेमपत्र, तर गच्चीवरच लिहावं. टाकीवर चढून बसावं मग खाली उतरून फाटक्या सतरंजीवर बगदादच्या राजासारखं लेटावं, त्याच्या थाटात कलिंगड खावं. थालिपीठ, पोहे किंवा भेळही चालते.

हिवाळ्यातल्या मध्यरात्री मी 'थरथरती थंडी, गरमागरम उंध्यू आणि भुतांच्या गोष्टी' अशी शिफारस करीन. मात्र तत्पूर्वी पॉट आणून आईस्क्रीम करायच्या कल्पनेचं तातडीने पुनरुज्जीवन करणं आवश्यक आहे. नाहीतर गच्चीबरोबर तेही नामशेष होऊन जायचं!

मुलांशी गच्चीभर पकडापकडी खेळा, त्यांना उचलून खालची मजा दाखवा. रमी नको, रुमालडाव खेळा. घरी न जमणारे चार व्यायामाचे हात-पाय हलवून घ्या. पहिल्या पावसात गच्चीवर भिजायला जा. गच्च्या नेहेमी शरीरांना वेगळ्याच हालचालींची संधी देतात. पडल्या पडल्या मग नक्षत्रं ओळखा. ते खगोलशास्त्र असतं थोडंच? ताऱ्यांना सांगायचं, की आपण त्यांना विसरलेलो नाही.

गच्चीत माणसं किंचित वेडी बनतात आणि दुरुस्तीपुरतीच शहाणी बनतात. शेजारच्यांच्या सुपातलं चिंचेचं बुटुक पटकन तोंडात घालतात. शाळेतल्यासारखी मिटकी मारतात. गोल ताटं घेऊन जेवायला बसतात.

लहानपणी राहायला आम्हाला जे पहिलं गाव लाभलं; त्याचं नाव काय असावं? - पादरा!

पण या हेंद्रच्या गावातच आम्ही दोघं नाईटसूट घालून, छत्र्या घेऊन गच्चीच्या कठड्यावर आईबाबांना 'सर्कस' करून दाखवायचो नि हसवायचो. आमची गच्ची मोठी, म्हणून बहुधान्ये मास्तरांचं कुटुंब आमच्याकडे झोपायला यायचं. अंधारातही मास्तरांच्या पोटाचा ढिगारा बघून हसू आवरेनासं होई. पाऊस आला तरी रजई डोक्यावर घेऊन त्यांच्या अहिरावण-महिरावणाच्या गोष्टी ऐकायच्या. या युक्तीने कधी कधी पाऊस पळूनही जायचा.

पुढे शहरात आल्यावरही पहाटेच्या दवप्रयोगाला न भिता आमचं तिथल्या सामुदायिक गच्चीवर झोपायला जाणं चालूच. गाद्याबिद्या लॅन्डिगमधे असायच्या. पण बाकीचा दिवे, पेपर्स, तांब्ये, गजराचं घड्याळ इ. सरंजाम समारंभाने वर न्यायचा आणि अर्ध्या रात्री पाऊस पडला की गोळा करून खाली आणायचा. शेजारीपाजारी आम्ही निघालो की हसत सुटायचे, तरी उकडायला लागलं की घराला कुलुप लावून आमची उर्ध्वयात्रा सुरू!

आयुष्यात एकदा तर मला तीन गच्च्यांवालं घर राहायला मिळालं होतं! तरुणपणी त्यामुळे गच्चीवरचं एकटेपण वेळीअवेळी मनसोक्त भोगलं. माझी मोठी मुलगी कधीच फुरंगटत नाही, तेही त्यामुळेच असेल. पहिल्या चार वर्षांतली अर्धी उमर ती गच्चीतच वाढली आहे!

मुंबईत जागेची एवढी टंचाई असताना माणसं नाकाला नाक लावून खोलीबंद का बसतात? ही सर्वात मोठी, उदार आणि कमीतकमी अटी घालणारी खोली आपण करंटेपणानं 'अंडरयूज्ड' का सोडतो?

हुरहूर, अंतर्मुखता, मेडिटेशन हे तुमचे आवडीचे विषय नसतील तर गच्चीत वाढदिवस, केळवणं, डोहाळेजेवणं करा की... ब्रिज? भिशी? ग्रंथालीनं तर मुंबईकरांना गच्चीभर मीटिंगा रंगवायला शिकवलंय. कनात टाकून बेशक मुख्यमंत्र्यांना बोलवा ना...!

माहेरच्या माणसांसारखी गच्ची नेहेमीच हक्काची असते. शाळेतल्या काही मैत्र्या कशा, केव्हाही भेटलं तरी पुन्हा पुढे चालू होतात. खुशालीच्या पत्रांचे झाडू फिरवून त्यासाठी मनं साफ ठेवावी लागत नाहीत. गच्च्यांचंही तसंच असतं. तुमच्यावर पाल टाकायला किंवा जळमटांचं तोरण धरायला ती काय अडगळीची खोली आहे?

दूरगामी परिणामांचं मी काही सांगू शकत नाही, पण गच्च्या माणसांना खिलाडू, सहिष्णू आणि खुलं बनवतात. वयाबियांच्या अटी बुजवतात. गच्चीत

माणसं कमी घुसमटतात. बोलणी क्वचित् फिसकटतात. गुपितं मोठ्यानं सांगता येतात, चुका कबूल करताना योग्य शब्द सापडतात. शेजारी जवळ येतात, व्याही विसावतात, म्हातारी माणसंही निदान येऊन, जेवून जातात.

आपण गच्चीवर असताना खालून कुणीतरी जाताना दिसलं की खुशाल त्याला लहान मुलासारखी हाक मारावी आणि 'मी कुऽऽठे?'चा आनंद जाहीर करावा. चोवीस तास पिठामिठाची काळजी करत हिंडण्याचा त्याचा खटाटोप वरून इतका काही भाबडा, बाळबोध आणि गमतीशीर वाटेल की हा तसाच घामटपणे आता टीव्हीपुढे जाऊन बसणार आणि हवामानाचे अंदाज ऐकणार, म्हणून तुम्हाला त्याची कीवच यायला लागेल! जणू काही तुमची स्वतःची उत्पत्ती, स्थिती, लय गच्चीवरच साजरी होते आहे.

गच्चीवर गेल्याने नेमकं काय होतं? भोवताल, मन, आयुष्य 'इन्स्टंट' झुळझुळीत का होतं? तर नेहेमीचं वास्तव वीतभर उंचीवरून दिसतं, नेहेमीचंच आकाशही वीतभर जवळ येतं आणि आपलं परिमाण बदलतं.

खाली पाहावं तर रोजचाच राबता, नेहेमीचीच लगबग. पण माणसं चपटी होऊन इकडून तिकडे रांगोळी काढत हिंडत असतात. धावणाऱ्या, थबकलेल्या गाड्या खेळण्यांसारख्या वाटतात; वस्ती मेकॅनोसारखी. सबंध परिसरच एखादा कुंचला फिरवल्यासारखा, नेटका, टुमदार झालेला. संपादित केलेल्या मजकुरासारखं सगळं घाण, गलका, दुर्गंध-प्रदूषणरहित झालेलं. धुतल्यासारखं, किमया झालेलं. झोपडपट्टीतून गेलेल्या ज्या गलिच्छ पायवाटेवरून रोज चालणं मुश्किल झालेलं असतं, तीसुद्धा आपल्याला पावलट उमटवत कोल्ह्याच्या घराकडे घेऊन जाईलशी, गोष्टीतल्यासारखी वाटते.

नेहेमीच्या वृक्षांना वरून नजरेच्या टपल्या मारता येतात. चालताना भयप्रद वाटणाऱ्या सुळक्यांना, मनोऱ्यांना समान पातळीवरून आशीर्वाद देता येतात. दूर, क्षितिजापर्यंत घरादारांचा मैसूरपाक पसरलेला. अधून मधून त्यात पाण्याच्या टाक्या, एरियल्स, ॲन्टिना खोवलेल्या. निर्मनुष्य गच्च्यांच्या सन्नाटी समुद्रात मध्येच एखाद्या गच्चीवर माणसं राहात असल्याची खूण म्हणून रंगीबेरंगी कपडे वाळणारे, आणखी एकीला पतंग उडवणाऱ्या मुलांचा कुंकुमस्पर्श होऊन सौभाग्य प्राप्त झालेलं. बाकी, सबंध दृष्टीपथात बादशहा खानबहादूर काय ते आपणच.

रोजच्या सक्तीच्या जगण्यातून आपण तेवढे स्वतःला निखळून, उसवून घेतलेले; त्याच्याशी आपले केवळ सलगीचे संबंध उरलेले. त्याऐवजी विमानं, पक्षी, ढग आणि तारे आपल्या विश्वात दाखल झालेले.

या सगळ्याचा परिणाम भौगोलिक, शारीरिक, मनोवैश्विक आणि तात्त्विक

पातळीवरही होत असावा. भोवतालाशी असलेले तुमचे संबंध तात्पुरते बदलतात, सुधारतात, ढिलावतात, निवळतात.

एक प्रकारचं पुरेसं, इष्टसं, सचैल एकटेपण आणि वरनं आकाशाची सर्वसमावेशक पाखर. बाकी मग वारे, बटा, अनवाणी पाय आणि भरपूर शांतता.

अशात मग केव्हातरी कॅलेन्डरवरच्या सूर्यास्ताखालच्या, वाचून फार पटलेल्या टागोरांच्या ओळी टपोऱ्या बनून पृष्ठभागावर येतात.

'अंडर द ग्रेट स्काय,
आय स्टॅण्ड फॉर धी
.....फेस टू फेस.

आयुष्यात अर्थ वाटायला मग त्यातल्या 'धी' वर विश्वास असावा लागत नाही, तो उडावाही लागत नाही.

■ ■ ■

# महानगरातील माणसें

महानगरी माणसांकडून मला पहिला सांस्कृतिक धक्का बसला, आमच्या अलकाच्या लग्नात. पंगतीत वाढायचा फॅन्सी ड्रेस करून मी हॉलमध्ये परतले तर माणसं वरपक्षालाही न जुमानता, 'रुमाल' टाकून, पानांवर बसून गेलेली! मी स्थानिक असल्यामुळे नात्यातल्या दुष्ट बायका माझ्याच मागे लागल्या, 'तू त्यांना उठव.'

शेवटी मी कसंतरी पुढे होऊन चार घसघशीत बायकांना विनवलं, 'प्लीज, गैरसमज करून घेऊ नका, पण....' मला आश्चर्याचा दुसरा धक्का देत त्याही हसत हसत पानावरून उठल्या. - त्या लग्नात गैरसमज झाले ते बाहेरगावाहून आलेल्या आमच्या नातेवाईकांचे, आपापसातच.

महानगरातली माणसं हा म्हटल्यास एक वेगळाच मनुष्यप्रकार आहे. त्यांची वागणी बाहेरून मुंबईत आलेल्या माणसांना बरीच वर्षं जड जातात. मुंबईची गर्दी, उकाडा, प्रवास आणि घाण यांचा सराव त्या मानाने लवकर होतो. उद्योगप्रधान शहरातल्या बांधलेल्या जगण्यात माणसांनी माणसांशी माणसांसारखं, सतत एकमेकांची कदर करून वागणं गैरसोयीचं, बिनसवयीचं आणि अनावश्यक ठरतं. 'माणूस स्वार्थी बनतो' हे सोपं उत्तर झालं. माणसाच्या महानगरीकरणाची प्रक्रिया यापेक्षा गुंतागुंतीची आहे.

महानगर म्हणजे एक भला मोठा रेटा. त्यातली माणसं बसमधे वडिलधाऱ्यांना, लेकुरवाळ्यांना, अपंगांना जागा देतीलच असं नाही, लग्नाचं जेवून निरोपही न घेता लोकल पकडायला सटकतील. प्रसंगी ती गर्भारशीला लोकलमधून ढकलून देण्याइतकी अमानुष बनतात हे वाचलं की गावाकडली माणसं एकमेकांची घरं जाळतात आणि डोळे फोडतात याचं आश्चर्य वाटेनासं होतं.

एकदा मुंबईतल्या एक साहित्यिक मला म्हणाल्या, 'बाहेरगावी व्याख्यानाला गेलं की, लोक इतक्या अगत्यानं वागतात! त्यांना इथल्यासारखं सांस्कृतिक अजीर्ण झालेलं नसतं ना! आपण मात्र कल्पनेनंच संकोचायला लागतो की, उद्या आपल्या डबल-ड्यूटीत ही माणसं अगदी आपल्या अटींनुसार फोन करून यायचं म्हणाली आणि, 'आज-उद्या, रविवारीही मला वेळ नाही, खरं म्हणजे मला वेळच नाही' असं म्हणायची पाळी आपल्यावर आली तर? वाईट म्हणजे अशा बांधलेल्या आयुष्यात जरा सवड वाढली की आम्ही वाढवतो ती कामं, चार झुळझुळीत मैत्र्या नव्हेत!

इथे आपल्या आयुष्यातून खूप माणसं पसार होत असतात. फलाटांवरून, गाड्यांमधून, घरा-दुकानांतून. यातला प्रत्येक माणूस एकेक स्वतंत्र अनुभव असतो. आपल्या आयुष्यात येताना तो नवी आव्हानं, नव्या मागण्या घेऊन येतो आणि आपण मुळातच नवारीच्या पलंगासारखे, ताणतणावांनी कसलेले! भोवतालची गर्दी कमी करता येत नाही, तेव्हा माणूस भावनिक गर्दी कमी करून त्यावर उतारा शोधतो. शहरात तो बिनचेहऱ्याचा असतो, भोवतालची बरीचशी माणसंही तो पुसटच राहू देतो.

एवढंच नव्हे तर जवळचे संबंधही तो सौम्य, शीतल, सुमधुर करून घेतो. चहातली साखर, अत्तराचा घमघमाट आणि जेवणातला आग्रह या सगळ्यांबरोबरच मैत्रीतला भावनांचा गडदपणा कमी करणं त्याला सुखावह होतं कारण एक वेळ पैशाचं सोंग आणलं तरी वेळेचं सोंग त्याला आणता येणार नसतं.

मात्र त्यामुळे आपण बऱ्याच माणसांना माणूस म्हणून मुकतो; वेगवेगळ्या भूमिका तेवढ्या जगतो. व्यवहार त्यामुळे सोपेच होतात. इथे मैत्रिणी दिव्याच्या खांबापाशी रेंगाळताना दिसायच्या नाहीत. प्रेमिक एकमेकांसाठी गाड्या सोडत नाहीत; नवरा-बायको वेगवेगळ्या डब्यांत चढतात. मूल शाळेत जाताना आपल्याला कुणी गॅलरीत उभं राहून टा-टा करणार नाही हे समजून असतं. मित्रमंडळीसुद्धा मर्यादित वेळ तुम्हाला देतात आणि मग तुम्ही समंजसपणे कटता! सख्ख्या मैत्रिणीला फोन करतानादेखील तुम्ही विचारता, 'वेळ आहे की कामापुरतं बोलू?' थोडक्यात, अपुऱ्या वंगणावर न कुरकुरता चालणारी ही जीवनपद्धती आहे. यात माणसांची जागा वस्तू घेतात, गप्पांची जागा वरवरची वागणी. हसणी, हालचाली आणि शब्दरचना सगळं ठराविक. त्याच्या पुढच्या अमेरिकेत तर कचेरीतल्या मैत्र्याच पुरतात, पुरवल्या जातात, पुरू शकतात. मग आपणच तथाकथित जीवाभावाच्या संबंधांचं फार स्तोम माजवतो कां? बघता-बघता

माझ्या महानगरानं माझ्यातही यातले काही बदल करून घेतले. मीही कदाचित् पुरेशी निष्ठुर, मतलबी आणि यांत्रिक झाले.

आमची कामवाली मूळची बेळगावची. ती मुंबई सोडून निघाली तेव्हा आम्ही तिचे पैसे काढायला बँकेत गेलो. बाईचा गाववालेपणा उफाळून आला. प्रत्येक खिडकीशी जाऊन कॅशियरपासून ते प्यूनपर्यंत प्रत्येकाचा आपला निरोप घेतायत, 'दादा! रामराम, वळख ठेवा!' मला काही त्या काऊंटरमागच्या अर्धपुतळ्यांच्या तोंडावर परतफेड दिसेना. बाईच्या ते गावीही नव्हतं. मीच 'आटपा, आटपा' करत तो विनोदी प्रवेश संपवला. ती पुळ्क्याची माणसं अशी त्रिमित होत नाहीत हा अनुभव पुणं सोडून येताना तिथल्या महाराष्ट्र बँकेकडून घेऊन मी शहाणी झाले होते. त्या खेडवळ बाईला हा उमज कुठून असणार!

-पण वर्षानुवर्षं एकच रोल करणाऱ्या एखाद्या व्यक्तीतल्या 'माणसाचं' अचानक आपल्याला दर्शन होतं आणि ते मोठं रम्य असतं.

आमच्या सहकारी सोसायटीच्या मध्यभागी आमचा चौकीदार राहतो. पती-पत्नी प्रथमपासूनच धोरणीपणाने आपल्या शंभर मालकांशी जेवढ्यास तेवढं वागतात. रामसिंग इतक्या वर्षांत एकदाच काय तो मला मुलगा झाला तेव्हा माझ्याकडे पाहून एक उत्सवाचं हसू हसला. त्यानंतर मात्र 'टाकी वाहतेय, मोरी तुंबलीय आणि वायसर बदलायचाय' एवढाच आमच्या संबंधातला ओलावा!

त्याची बायको तर तिच्या जन्मगावातूनच महानगरी वृत्तीचं बी घेऊन आल्यासारखी. आमची तीन बाळंतपणं समोरासमोर झाली, पण तिनं कधी माझी वास्तपुस्त केली नाही की मला तिची दखल घेऊ दिली नाही. मात्र रोज पहाटे ती आमचं दूध आणते तेव्हा या मख्ख वागणुकीला छेद देणारी एक कोमल क्रिया तिच्या हातून घडते. माझं पहाटलेखन थांबवून मी तिला दार उघडते तेव्हा माझ्या डोळ्यांना चष्मा, हातात उघडं पेन आणि पॅड असतं. खाली वाकून मी क्रेट उचलते; त्यानंतर मला हातातली एखादी वस्तू कोचावर, टीव्हीवर ठेवल्याशिवाय दार लावून घेता येणार नसतं. चौकीदाराची बायको थांबून राहते. मी पुरेशी मागे झाले की ती पुढे वळून हलक्या हाताने माझं दार ओढून घेते. तिने दिवसाकाठी एकदाच दाखवलेली ती हळुवार समज मला दररोज एकच पारिजातकाचं फूल दारात पडलेलं असावं, तशी मृदू वाटते. बहुधा रोजच मी स्वत:शी एक छोटंसं हसू हसून त्या फुलाची नोंद घेते.

आपल्या उपनगरात इतरत्रही काही मंडळी आपल्यासाठी सुसंवादाची 'ओॲसीस' बनून असतात. तो ठराविक फुलवाला, कोळीण किंवा चिक्कूवाला!

वय, वर्ग, जात, शेजार, शिक्षण काहीही जुळत नसूनदेखील आपण त्याला आवडत असतो. आपण गेलो की तो खूष होतो. आपणही त्याने पुढे केलेला माल भाव न करता स्वीकारतो, आपण त्याला आवडतो हे आपल्याला माहीत आहे. हे त्याला कळलंय हे आपल्याला कळलंय अशा राजीखुषीत तो रोजचाच यांत्रिक व्यवहार केवढा लडिवाळ बनतो! बस् तेवढा तो खजूर खाऊन, शहाळ्याचं पाणी पिऊन आपण पुन्हा आपल्या रखरखीत वाटेला आणि तो त्याच्या लबाड धंद्याला!

असेच एकदा आमच्या भागातले दिवे गेले. एवढ्या काळोखात हायवे कसा ओलांडणार आणि दुकानात तरी किती वेळ थांबणार! शेवटी एका जोडप्याच्या मागे निघाले. तर ते वाटेतच मावळून गेलं! पुन्हा माझा हात मंगळसूत्राकडे गेला, पाय मंदावले... तेवढ्यात पाठीमागून आवाज आला, 'काय काकू, बाजारात का?' कोपऱ्यावरच्या बिल्डिंगमधला डोळ्यांसमोर मोठा होत गेलेला मुलगा होता तो. नावही पटकन आठवेना. पण त्याने माझ्याशी वेग जुळवून घेतला. मला संकोचायला होऊ नये म्हणून गप्पांचा ओघही चालू ठेवला. जणू काही आम्ही रोजच भाजीला बरोबर जाणारे...! मी माझ्या घरात शिरले; आभार मानणंही कृत्रिम ठरेल इतक्या सहजतेनं तोही मला उजेडाच्या काठावर आणून सोडून पुढे चालत राहिला.

एकदा एका अनोळखी भागात पावसानं मला गाठलं. समोरून येणारी प्रत्येक रिक्षा मी थांबवायला पाही. पण जवळ आली की ती भरलेली निघे! त्यातल्या एकाला माझ्या चेहऱ्यावरती रडकुंडी दिसली असणार. रिक्षा पुढे जाऊन थांबली. आतलं गिऱ्हाईक बाहेर ओणवून मला बोलावू लागलं. मी धावत सुटले; पण अशी कुणा अनोळखी बाप्याबरोबर मी रिक्षात चढणार होते थोडीच? त्यानेही ते हेरलं असावं.... '.... मी उतरतोय, तुम्ही बसा!' करत त्याने रिक्षा खाली केली, 'तुम्हाला वेळेवर रिक्षा मिळाली, यांनाही लगेच गिऱ्हाईक मिळालं; मला काय थोडंसंच चालायचंय!'

दादरच्या माझ्या एका मैत्रिणीचा अनुभव खरा विलक्षण आहे. तिथे रेल्वेलगतच्या वाढीव पुलावरून स्टेशनाजवळ गजबजलेला रस्ता ओलांडता येतो. नेहेमीची, ऑफिसं सुटण्याची वेळ. पण त्या दिवशी त्या पुलावर गर्दीचं असं काही रसायन तयार झालं होतं की धड पुढे जाता येईना की मागे. अशा अवस्थेत माणसं तिथल्या तिथे घोंगावत होती. त्यात एक विचित्र असुरक्षितता

अनुभवाला येत होती. कुठे मारामारी होत नसूनही माणसांच्या नजरा कावऱ्याबावऱ्या होत होत्या. तशात अचानक एका मराठमोळ्या, वयस्क बाईनं चटकन वर्गभेद मिटवून माझ्या पांढरपेशा मैत्रिणीचा हात धरला आणि आत्मविश्वासाने ती पुढे झाली. गर्दीनंही त्यांना वाट करून दिली. आणि दोघी तीराला लागल्या. '...अहो, या अशा वेळी दोगीदोगींनी बरं पडतं...' म्हणत ती बायजा हात सोडून दिसेनाशी झाली....! दुसऱ्या दिवशी पेपरात आलं, त्या ठिकाणी त्यानंतर पंधरावीस मिनिटांनी एक खून पडला होता!

शेवटचा प्रसंग लोकलमधला आहे. एकदा पहाटे साडेपाच वाजता मी अंधेरीला लोकलमध्ये चढले. विरारहून निघालेल्या कष्टकरी महिलांनी डबा भरला होता; पण बसायला जागा मिळाली. सगळ्या तेवढ्या पहाटे पोळ्यांची चवड रचून, वेणीफणी, अंगधुणी करून निघालेल्या, आता गाडीत त्यांची दुसरी झोप चालू होती. 'बॉम्बे हॉस्पिटलला जायला चर्नीरोडला उतरू की मरीन लाइन्सला?' मी शेजारणीला विचारलं. तिला ते माहिती नव्हतं. पण तिने बसल्या बसल्या कानगोष्टी सुरू केल्या. शेवटच्या बाईला उत्तर बरोबर माहीत होतं. त्याच खुष्कीच्या मार्गाने ते माझ्यापर्यंत आलं, 'मरीन लाइन्सला उतरा.' ...आणि परत सगळ्या झोपल्या!

मुंबईतल्या माणुसकीचा तो नमुना मी एका म्हातारबुवांना ऐकवला तेव्हा ते एकदम आवेगाने म्हणाले, 'अरे, मी तर म्हणतो, मुंबईतल्या माणसाला जेवढी माणुसकी असते तेवढी इतर कुठेच नसते.' मी उलटी दचकले. महानगरी माणसांची या टोकाची तरफदारी मी करीन का? कुणास ठाऊक.

'नको रे बुवा ती मुंबई; शेजारी शेजाऱ्याला ओळखत नाही!' हा बाहेरगावच्या माणसांचा फणकारा हे एक टोक नि हे दुसरं. खरी इथली माणसं या दोन्हीच्या मधे कुठेतरी आहेत.

सोयीनुसार त्यांनी आपले संबंध एकतारी करून घेतले आहेत. काही तुसड्या माणसांचं त्यात फावत असेलही, पण माणूस नावाचं मशीन त्यात व्यवस्थित तरंगतंय. मला त्यात झपाटेबंध, उद्योगप्रधान संस्कृतीचा समंजस स्वीकार जाणवतो. इथे घसट कमी आहे. झीजही कमी. येताजाता टोमणे, रोगट तुलना, मानपान, तर्ककुतर्क, स्पर्धा आणि लपवाछपवी यांची इथल्या लोकांना गोडी कमी; कारण त्यासाठी माणसांच्या या धारेला वेळच नाही! एक प्रकारच्या अटळ, रंगहीनपणाबरोबर त्यात सुजाणपणा आहे, मधुमालतीच्या

फुलांसारखा मंद गोडवाही आहे.

माणसाच्या या महानगरीकरणाला आपण इतकं बिचकतो ते अशा संबंधांची सवय नाही म्हणून की ती आपल्याला विनापरतीची वाट वाटते, म्हणून? मधुमालतीच्या फुलांना वासच नसतो म्हणणाऱ्या माणसांच्या घ्राणेंद्रियाबद्दल मला लहानपणापासून शंका आहे. वाटल्यास त्यांना केसात घालू नका, निशिगंधासारखे त्यांचे गुच्छ बनवून त्यांना फुलदाणीतही ठेवू नका, पण कुंपणाकडेचा त्यांचा मंद गोडवा कबूल करायला काय हरकत आहे? अधिक सुवासाचं नसण्यात त्यांचीही काही मजबुरी नसेल का!

■ ■ ■

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
निबंध

# अनुबंध

माणसाचा 'मी' म्हणजे एक स्वत:भोवतीच गाऱ्या गाऱ्या भिंगोऱ्या करत फिरणारं वर्तुळ. त्याच्याबाहेरचं वर्तुळ म्हणजे कुटुंब. त्या पलीकडे मग घराणं, जात, भाषा, शाळा, वाडा, गाव, व्यवसाय, देश धर्म अशी मोठी मोठी होत जाणारी वर्तुळं. ही सारी वर्तुळं मिळून असे अनेक 'मी' चे मणी ओवून धरतात. त्या सर्वांचं मिळून एक भोकाभोकांचं जाळं तयार होतं आणि त्याला आपण समाज असं नाव देऊन ठोस बनवतो. परदेशात या जाळ्याच्या साहाय्याने लागेबांधे जोडण्याच्या क्रियेला नावच आहे- नेटवर्किंग.

सामान्यत: या वर्तुळावर्तुळाच्या दुनियेतल्या आपल्या जागी आपण अंगठीतल्या खड्यासारखे जडले गेलेले असतो. पण या वर्तुळांपलीकडेही काही सतत उमटणारी, मावळणारी पुसटशी वर्तुळं असतात आणि सर्कसच्या तंबूचे दोर, खुंट्या जसे आतल्या झोपाळ्याच्या खेळाला आधार देतात, तशी ती तुमच्या जीवनव्यवहाराला तोलून धरत असतात.

असं एक वर्तुळ मला प्रथम जाणवलं तेव्हा मी बाबांच्या फटफटीच्या पिलियन सीटवर बसून समोरून येणाऱ्या वाहनांची गंमत बघत होते. प्रत्येक मोटार अंगावर धावून आल्यासारखी येई, पण ऐन वेळी आमच्यावर न आदळता शेजारून पसार होताना आमच्याकडे बघून डोळे मिचकावी! मला तो मोठाच चमत्कार वाटला आणि मग तो चमत्कार नसून नियमाचं पालन होतंय हे कळल्यावर तर मला मानवी सामंजस्याच्या जाणिवेनं भलतंच भरून आलं.

रहदारीचा तो गोड नियम असा होता: विरुद्ध दिशांनी येताना विशिष्ट टप्प्यावर प्रत्येकाने आपली नजर झुकवायची किंवा आपले डोळे क्षणभर असे मिचकवायचे की एकमेकांच्या प्रकाशाने डोळे दिपून अपघात होऊ नयेत! गाडीहाक्यांमधली ही गोडीगुलाबी मला भलतीच हृद्य वाटली आणि आम्ही

मग असे शेकडो अपघात टाळले. मोठेपणी स्वत: वाहनहाकी झाल्यावर तर चौरस्त्यावरच्या ट्रॅफिक लाइटजवळचा तो वाहनवृंद मला ऑर्केस्ट्रासारखाच वाटायला लागला!

आपण थांबलो की आपल्याभोवती सिग्नलपाळू माणसांचा पिसारा. समोरचे, उजवे, तिरपे सगळेच सिग्नल नाही म्हणून थोपलेले. फक्त डावीकडून उजवीकडचा वाहनस्रोत चालू. मग समोरच्या दोन धारा सुटणार, तरी उजवीकडचा थवा थांबलेलाच. आणि डावीकडचेही आता थबकलेले! त्यानंतर उजवीकडचा लोट सुरू आणि शेवटी आमची पाळी! अन् एकीकडे आपले डावीकडचे चुलतभाऊ काटकोनात वळून वाहतायतच. आमच्यात हे सर्व चाललेलं असताना पादचारी आपल्या हिरव्या गणितानं रस्ते ओलांडत राहणार. फार तर आपण गाडी स्टार्ट करायच्या आत आपल्यापुढून आडवे, जीव घेऊन पळणार!

ओळखदेख नसतानाही सायकल, रिक्षा, बस आणि ट्रकच नव्हेत, तर हत्ती आणि उंटसुद्धा निमूटपणे या रांगोळीत सामील होतात ते काय केवळ पोलीस पकडेल म्हणून? तसं असतं तर सिग्नल बंद पडल्याबरोबर वाहनांचा लगदा झाला असता. दांडगेपणानं कुणाचंच भलं व्हायचं नाही, आपण तर कलंडू नयेच, पण कुणाचीच कुणामुळे टक्कर अथवा खोळंबा होऊ नये, हा महानगरी संकेत आर.टी.ओ. ने ट्रिपल पोलिओसारखा आपल्या धमन्यांत भिनवलेला असतो ना! चौकातला हा वाहनांचा सुमेळ मला माणसामाणसांतल्या, सौहार्द्रांचं, परस्परसामंजस्याचं प्रतीक म्हणून आवडतो.

पुष्कळ पुढे मला मग माणसांचं आणखी एक गुपित कळलं. आमचा नंबर लागल्यावरही किती दिवस आम्हाला फोनच मिळत नव्हता. आमच्या वरच्या गोखल्यांचंही तेच होतं. त्यांना शनिवारी ऑफ, म्हणून मग आम्ही तोच 'मारूतीचा वार' ठरवला. दर शनिवारी टेलिफोन एक्स्चेंजमधल्या संबंधित टेबलापुढे जाऊन उभं राहायचं, "आमच्या फोनचं काय झालं?"

"बघतो, आठ दिवसांनी या." कोण दमतं तेच बघत होतो. अखेर आम्ही अर्धे जितलो. गोखल्यांचा फोन आला. माझी मात्र गोची झाली. एवढ्या लांब एकटी कशी जाणार? बिचाऱ्या गोखल्यांनी शेजारधर्माला जागून 'सोळा शनिवार' पूर्ण केले आणि शेवटी एकदाचा आमचाही फोन पावला!

दरम्यान मी कातावून सोसायटीतल्याच दुसऱ्या एक गोखल्यांना म्हटलं, "माझ्यामुळे आणखी त्यांना या फेऱ्या! मी कधी याची परतफेड करणार? मला नाही आवडत." तर हे गोखले सवाई निघाले, "अहो, हे तसं नसतं!

गोखल्यांनी तुमच्या फोनसाठी एवढं केलं ना, तुम्ही मराठ्यांच्या किल्ल्या सांभाळायच्या. मराठे मायदेवांच्या झाडांना पाणी घालतील, मायदेव लिमयांच्या मुलीसाठी स्थळं शोधतील, लिमये कोटणीसांच्या भाच्याला नोकरी लावून देतील आणि कोटणीस दाणीआजींचं विजेचं बिल... ज्याची त्यालाच परतफेड केली पाहिजे असं नाही काही!''

त्या दिवशी मी फोन न आल्याच्या फणकाऱ्यात होते, पण मग पाहिलं तर खरंच! ठाकूर आजोबा जिने धुवून घेतायत, मराठेआजी पहाटे दिवे मालवत दुधाला जातायत, टोळ बोपर्डीकरांचा गॅस घेऊन ठेवतात आणि नंदाच्या आईला नोकरीवर जाताना खात्री आहे की नंदाची स्कूलबस चुकली तर शेजारच्या दामलेकाकू बघतील! तळमजला सगळ्यांच्या किल्ल्या सांभाळतो, वरचा मजला गच्चीवरची वाळवणं! आणि हे सगळं आडनावं जिथे एवढी गोरीघारी नाहीत तिथेही गुण्यागोविंदानं चाललंय!

व्यवसायाव्यवसायातूनही अशी एक सोनसाखळी फिरते. एकाचा इलेक्ट्रिशियन मेहुणा दुसऱ्याचा रेडिओ दुरुस्त करून देतो, त्याची बँकेतली भाची कुणालातरी व्हाऊचर आणून देते, कुणी कुणासाठी बारावीचे पेपर्स मिळवून देते, कुणी बोर्डातून रिझल्ट काढून आणतं, ग्रंथपाल लेखकाला पुस्तकं पुरवतो आणि लेखकाला कुणीतरी आपलं तीनशे पानी (!) हस्तलिखित आणून दाखवतं, ''जरा माझी ही कादंबरी वाचून बघता का?''

लग्न जुळवतानाही हा अनुभव येतो. कुणाकडेतरी माहिती काढायला फोन केला की उत्तर मिळतं, ''मी त्यांना ओळखत नाही, पण माझे साडू त्याच गल्लीत राहतात. त्यांना विचारू? का रविवारी आपण जायचं? अशा बाबतीत समक्ष गेल्याने फरक पडतो.'' तो साडू बिचारा आंघोळही न करता सबंध सकाळ तुम्हाला देतो, तुमच्याबरोबर हिंडतो. मधलाच कोणीतरी तुम्हाला चहा पाजतो, बायकोची ओळख करून देतो. कुणाच्यातरी गच्चीवर जाऊन आपणही तिथून दिसणारा टी.व्ही. टॉवर पाहून, 'वा, वा! छान, छान!' करतो. परत येताना आपण आभाराचे शब्द जुळवायला लागतो, तसा शेवटचा भलेकरी म्हणतो, ''अहो, त्या निमित्ताने आपली ओळख झाली...''

प्रसारमाध्यमांवर तर हे परस्पर सहकार्याचं कडबोळं चांगलंच रंगतं. स्टुडिओत आट्यापिट्याने जुळवत नेलेलं 'सीताहरण' चित्रित होत असतं. निर्माते, संचालक, अभिनेते, छायाचित्रकार, ध्वनिमुद्रक.... रंगभूषाकारांपर्यंत सारे महत्त्वाचे सोमेगोमे एकाच ताणाखाली बांधलेले... इतके, की शेवटी राम बिचारा करंगळी वर करून विचारतो, ''जरा जाऊन येऊ?''

प्रत्यक्षात, सीता हातोहात पळवून झाल्यावर मायक्रोफोनची वायर मध्ये येईल, म्हणून काळजी करणारे रावण आणि कॅमेरामन एकमेकांकडे बघून असे हसतात की रावण वीस वर्षांत आपल्या मेहुण्याकडे पाहून असा हसला नसेल, नि कॅमेरामन आपल्या शेजाऱ्याकडे. 'शासनाच्या हातचे' धनादेश पावले की जो तो पांगला! ते मैत्र तिथेच संपतं, त्याचा जीवच तेवढा असतो. रस्त्यात केव्हातरी गाठभेट झालीच, तर चालता चालता हात उंचावून भेटीचा आनंद नोंदवायचा!

केव्हातरी मग चित्रकार, पत्रकार, गिर्यारोहक, विद्यार्थी नि रेल्वेसेवक मोहोळ बनवून ग्रंथप्रसारासाठी बाहेर पडतात. गावोगावच्या संस्थांतून मतभेदांच्या असहकाराच्या अनेक जातीय, प्रांतीय, तात्त्विक फटी. पण हे मात्र साहित्यसेवेच्या एका भल्या धाग्यानं तीन दिवस बांधलेले...परत येताच वीण उसवून प्रत्येकजण आपापल्या जागी, कामावर, पत्त्यावर, फोनवर फक्त उपलब्ध!

कधी काहीजणी 'मुलगा झाला नाही' म्हणून विसाव्या शतकात, विसाव्या मजल्यावरही पिडल्या जाणाऱ्या आपल्या एखाद्या सहसतीभोवती समदु:खानं थबकतात. तिच्या नवऱ्याला वेढतात, सासूला चापतात आणि थोड्या आणखी शहाण्या होऊन आपापल्या उद्योगात विरून जातात...

अगदी जागतिक पातळीवरही कुणीतरी, कुठेतरी, आपल्या भावी पिढ्यांसाठी, आपण मूर्खासारखी, जाळून टाकलेली झाडं पुन्हा लावत असतात, कुणीतरी आपल्या डोक्यावरचा अणुबॉम्ब वरच्यावर रोखून धरत असतात. आपल्या इंधनाला पर्याय शोधत असतात आणि इकडे आपण आपल्या फलाटावर उभं राहून तीनतीनशे गाड्यांचा रामरगाडा बिनबोभाटपणे धकवणाऱ्या रेलयंत्रणेकडे पाहून, गावागावातून खेळवलेल्या दूधगंगेकडे पाहून, घराघरात कांदेबटाटे पोचवणाऱ्या ग्राहक-पेठेकडे पाहून आळीपाळीने अचंबित, संभ्रमित आणि रोमांचित होत असतो.

माझ्यासारख्याच अनेक माणसांच्या जीवावर चालवलेले हे महानगरातले, महाजीवन पातळीवरचे महाव्यवहार माझ्या बिळातलं माझं लघुजीवन बऱ्याच प्रमाणात ठाकठीक ठेवत असतात आणि मी आणि समाज यांच्यातलं नातं नक्की करून देऊन, मला कृतज्ञ ठेवत असतात.

महाजीवनाचा हा 'खेळ मांडियेला' मला प्रथम जाणवला तेव्हा मला हे भान पुरवणाऱ्या माझ्या महानगराला मी एक लंबाचौडा कुर्निसात करून टाकला आणि त्यातली अंतरं, उकाडा आणि अडचणींबद्दल कुरकुरणं खरं म्हणजे कायमचं बंद करून टाकलं.

■ ■ ■

## बायकांचा डबा

लोकलच्या डब्यामधल्या बायका हा एक स्वतंत्र संदर्भगट असतो. ती एक वेगळीच अनुभवांची शाळा असते. मी लेडीज फर्स्टबद्दल बोलत नाही, तिथली गर्दीसुद्धा अधिक दर्जेदार, स्वच्छ आणि अंगचटीला न येणारी असते.

लोकलमध्ये चढायचं कसं, आपलं स्टेशन येईपर्यंत एकमेकींशी शरीरं ॲडजस्ट करत, तसू तसू सरकून दारापर्यंत पोचायचं कसं, पर्स, निऱ्या आणि मंगळसूत्र सांभाळत उतरायचं कसं इ. बाबतीत रोजच्या, पासधारक प्रवासिनींचे ठोकताळे आणि टप्पे ठरलेले असतात. तुम्हाला ते साहजिकच ठाऊक नसतात. अशावेळी गबाळ्यासारख्या त्यांच्या वाटेत उभ्या राहिलात तर सर्वांगाने ठेचकाळून निघत, आपण त्या भाषेचेच नाही असं दाखवत, भोवतालच्या बायकांची बोलणी खाण्यावाचून आपण काय करणार! आपण तर लहानपणीही कधी 'नळावरची भांडणं' नामक स्कूल फॉर स्काऊंड्रल्समध्ये प्रशिक्षण घेतलेलं नसतं. तेव्हा, दारावरच्या कोळणींपेक्षा ह्या बऱ्या!

"या नेहेमी न येणाऱ्या बायका म्हणजेऽऽ काही माहीत नसतं यांना! अहो, बांद्र्याला उतरायचंय तर आत व्हा की!" जसा काही आतल्या बाजूला आपल्यासाठी सोफासेटच मांडून ठेवला आहे!

आपण वरच्या कडीतला इतर दोघींच्या बोटांबरोबरचा आपला क्लेम जाम सोडायचा नाही; तोल तर सावरता येतोय! अशातच एकदा मला एक 'पोस्टातली मुलगी' भेटली. आमच्यात तात्पुरतं मैतर झालं. "बी. कॉम. का?" मी म्हटलं, "माझी मुलगी पण कॉमर्सलाच आहे."

तशी एकदम कळवळून सल्ला मिळाला, "तिला फार शिकवू नका हो, लग्न होत नाही मग, माझंच बघा नं. लग्न होत नाही म्हणून शिकले. आता टेंपररीसुद्धा नोकरी नाही. आणि नोकरी नाही म्हणून लग्न नाही! चार

महिने पोस्टात लीव्ह व्हेकन्सीवर होते, तेवढ्यात भावानं स्थळं बघितली पण तीही आता सुटली. अहो, प्रत्येकाला नोकरी करणारी बायको हवी. कुठून आणायची ही नोकरी?''

लाजण्याबिजण्याचं नाव नव्हतं!

एकदा हार्बर लाईनच्या गाडीत एका भंगिणीनं आपला शेठाणीसारखा देह अशा गोडीगुलाबीनं आमच्यात सरकवला की मी पुस्तक मिटून ठेवून तिच्याशी गप्पा करू लागले. रेल्वेचीच स्वीपर होती ती. ''उद्या एकादशी ना?'' म्हणाली. मी हसून म्हटलं, ''मी करत नाही. त्यामुळे -'' ''तशी मायेनं म्हणाली, ''तुम्ही कसलं काम करता?''

मी माझं त्या दिवशीचं काम सांगितलं. ''तुम्हाला या कामाचे किती पैसे मिळतात?'' आकडा ऐकून मग समजुतीनं घेत म्हणाली ''हां हां! म्हणजे सोशल वर्क करता!'' उतरल्यावर पुन्हा मला खिडकीतून 'टा-टा' करण्यात आला. प्रवासापुरता आमचा वर्ग एकच होता ना!

एकदा तर एका मुलाची मी माझ्या चेपल्या जागेवरून बालवयातून प्रौढ वयात बघता बघता बदली झालेली पाहिली! गर्दीत मायलेकांचे हात सुटले होते. आईचा नुसता आवाजच त्याला न घाबरता दाराकडे चलायचं दिग्दर्शन करत होता. त्याचं रडवेलं तोंड मला जवळून दिसत होतं. पण मीही अनारकली अवस्थेत! भोकाडच पसरलं तर तोंडी धीर द्यायचा असं ठरवलं. पण मग एका निकराच्या क्षणी 'अशा वेळी ज्याचा तो' हे तत्त्व त्यानं अंगी बाणून घेतलं आणि हातपाय मारत, धक्काबुक्की करत मावळा निघाला. गर्दी थोडी किलकिली झाली. आणि खंदा वेळेवर आईला जाऊन मिळाला. माझ्या डोळ्यादेखत त्याचं बाळूपण जाऊन तो जाणता झाला होता!

आणखी एका अशाच प्रसंगातून मीच आणखी जाणती झाले. कुमारवयाची गणवेषधारी मुलंही शाळेच्या वेळी बायकांच्या डब्यातूनच ये-जा करतात. असाच एक रोडका मुलगा त्या दिवशी खिडकीजवळच्या एका सीटवर बसलेला मला मधल्या गर्दीतून अर्धामुर्धा दिसत होता. मी दोन बाकांच्या मधल्या भागात उभी होते. थोड्या वेळाने एक मराठी बाई त्याच्याच वयाच्या एका लठ्ठ मुलाला घेऊन चढली आणि आमच्या मध्ये उभी राहिली. आणखी थोड्या वेळाने पाहते तो तिनं त्या आधीच्या गरीबड्या मुलाला कसा कुणास ठाऊक, उठवून लावून आपला लाडावलेला मुलगा त्याच्या जागी बसवून दिलेला! मला रागच आला. त्या बिचाऱ्याची आई बरोबर नव्हती, म्हणून ही अरेरावी. जवळ सरकून; सणसणीत काहीतरी बोलावं आणि हा अन्याय दूर करावा अशी जोरदार

सणक येऊन गेली, ती मी कशीबशी जिरवून टाकली. तरी त्या दिशेने पाहिलं की 'आपल्याला काय करायचंय' ची सोयिस्कर भूमिका घेता येईना. हळूहळू मधली गर्दी ओसरली. आणि मलाही त्याच बाकावर बसण्याइतकी जागा मिळाली. मी ती चपळाई करून पटकावली. आणि जवळून पाहिलं तेव्हा जे लक्षात आलं त्याने मी स्तंभितच झाले. त्या लठ्ठशा मुलाने हातात आपल्या कुबड्या धरलेल्या होत्या. तो पांगळा होता म्हणून त्याच्या आईने...!

आणखी एकदा अशाच गर्दीत एक पारशी मायलेकांची जोडी चर्चगेटलाच माझ्या डब्यात शिरली. मला बसायला जागा मिळाली होती. ती दोघं उभी होती. आईसारखी मुलाला दटावायची 'वर ठेवून देईन तुला!' वगैरे धमक्या देऊन वळण लावायचा प्रयत्न करत होती. म्हणून त्या चळवळ्या मुलाला मी आपल्याजवळ बोलावलं आणि त्यातल्या त्यात अंग चोरून त्याला बसण्यापुरती फट तयार केली. तोही पटकन आला. लाजराबिजरा नाही म्हटल्यावर मी त्याची देखभाल चालूच ठेवली. तेव्हा लक्षात आलं आठ वर्षांच्या या मुलाची मानसिक वाढ तीन वर्षांच्या मुलाइतकी होती! त्याचे चाळे अजून बालमंदिरातल्यासारखे वेडे चाळे होते- म्हणून आई त्याला सारखी दमात घेत होती तर. एव्हाना त्याचं नि माझं जमून त्याने मला भराभर दप्तरातला डबा, बाटली इ. सर्व काढून दाखवलं होतं. आणि आता तो वहीतले रंगीत, ढबोळे ए.बी.सी पानं उलटून दाखवत होता. मला मुलं आवडतात. आणि पटकन त्यांच्या वयाचंही होता येतं. मी त्याला खेळवणं, रमवणं चालूच ठेवलं (आता सुरक्षिततेसाठीही). तेव्हा तोही चळवळ सोडून रमला. आईने त्या दिवसाच्या प्रवासापुरता सुटकेचा नि:श्वास टाकला. भोवतालच्या सगळ्याच बायका लडिवाळपणे आमची दोघांची मैत्री पाहू लागल्या... तशातच त्याच्या आईने त्याची करुण कहाणी ऐकवली. तान्हेपणीच मेनिनजायटीस होऊन तो मतिमंद झाला होता. त्यानंतर भगीरथ प्रयत्न करून बुद्धीची इतपत वाढ झाली होती. उपनगरातल्या कुठल्यातरी गच्चीवाल्या घरात त्याला कोंडून ती बरेच दिवस नोकरीला जात असे. पण आता तिने त्याच्यासाठी नोकरी सोडली होती. रोज फोर्टमधे एका खास मतिमंद मुलांसाठी असलेल्या शाळेत ती स्वत: त्याला घेऊन जाई आणि व परत आणी. वाटेत हा दांडगा पोरगा कधी मारामारी करून तर कधी थुंकूनबिंकूनही सहप्रवाशांना वैताग देई आणि त्याला रमवणं मला जमलेलं होतं. म्हणून... माझी सहज चिकाटी पाहून तिने मधेच मला मायेनं विचारलं, 'तुमचं लग्न झालंय?'' मी म्हटलं, ''अर्थातच''!

तशी पुन्हा प्रश्न आला ''तुम्हाला मुलं आहेत?... किती?'' तिचा

रोख समजून मी हसले. "आहेत, चांगली तीन. तुला?"

तशी एकदम एक पोळलेला उद्‌गार आला, "हा एकटाच आणि तेवढाच पुरे. पुन्हा नाही ग बाई अपत्यजन्माच्या फंदात पडणार!!"

मी मनातच म्हटलं - खरंच ग बाई.

माझं स्टेशन आलं तशी मी उठले. आपली मैत्रिण कुठे चालली, म्हणून माझ्या त्या छोट्याशा मित्राचा चेहरा एकदम कावराबावरा झाला. क्षणभर डोळ्यात असुरक्षितता, व्याकुळताही उमटली. मलाही त्याला सोडून जाणं जीवावरच आलं होतं. त्याच्या आईने मग समंजसपणे त्याच्याकडून 'आन्टी'ला टाटा करून घेतलं. त्याचा हात आपल्या हातात धरून हलवताना माझ्याकडे पाहून तीही निरोपाचं गोड हसू हसली. माझ्यामुळे तिचा प्रवास आजच्या दिवसापुरता उभ्याउभ्याच का होईना, सुखाचा झाला होता ना! बिचारी! मी चाळीसाव्या वर्षी तीन मुलं वाढवून दमले नव्हते तेवढी पंचविशीलाच बालसंगोपनाचा धसका घेण्याइतकी त्या एका मुलामुळे दमली होती. डब्यातून खाली उतरल्यावर मी पुन्हा दुसरा टाटा करण्यासाठी मागे वळले. आता मधे कुणी नसल्यामुळे तो मला थेट दिसत होता. पण अर्ध्या मिनिटातच तो मला पूर्णपणे विसरला होता. आईने दुसऱ्या कशात तरी त्याला रमवून टाकलं होतं.

मी स्वत:शीच हसून चालू लागले. मनात म्हटलं, नक्की का मी शहाणी आणि हा वेडा? आज इतकी वर्षं झाली तरी त्या मनोरुग्ण मुलाच्या स्नेहाचा तो सुंदरशा रंगाच्या बेबीवूलच्या तुकड्यासारखा धागा माझ्या मनमायेच्या वळचणीला तसाच खोचलेला आहे.....

वरचेवर प्रवास करू लागलात की तुम्हाला चर्चगेटला इंडिकेटर्स पाहत तीन-तीन गाड्या आडव्या पार करून एकदम शेवटच्या फलाटावर उगवून चालायला कसं लागायचं, खांबांचे रंग पाहून फर्स्ट क्लास कसा ओळखायचा किंवा टाळायचा, गर्दीच्या वेळी उलट्या गाडीनं चर्चगेटला जाताना सिग्नल पाहून आधीच गाडी कुठल्या प्लॅटफॉर्मला लागेल, परतीच्या प्रवासासाठी फास्ट, सुपरफास्ट, सेमीफास्ट यापैकी काय बनेल हे कसं ओळखायचं इ. चपळाया साधू लागतात. घाईच्या वेळी 'बांद्रा' पकडून माहीमला उतरायचं. तीन मिनिटांत त्याच प्लॅटफॉर्मवर पुढची गाडी पकडता येते. आणि तिच्यात बसायला जागा मिळते. बांद्र्यापर्यंतची सगळी स्टेशनं डावीकडे येतात, नंतरची उजवीकडे, हे लक्षात घेऊन मधल्या पॅसेजमधले धक्के कसे चुकवायचे, हेही एका मैत्रिणीनं शिकवलं.

हळूहळू मग त्यातच मला रोजच्या ऑफिससख्यांमध्ये, लोकलसख्यांमध्ये

मैत्रीची फुलं फुललेली, गप्पांची कारंजी उसळलेली दिसू लागली. कधी कुणी आठवणीनं कशाचे तरी पेढे वाटत. त्यातच एखादा लग्नाच्या फोटोचा अल्बम फिरत असतो. ट्रीप घाटत असते. एकमेकींना मुलांच्या अभ्यासाची काळजी ऐकवत सकाळच्या घाईत चतुर्थीचे मोदक कसे केले, ते सांगत आळीपाळीनं एकमेकींना बसू देणं, एकमेकींच्या पर्सेस धरणं, "तुमची जुनी शेजारीण माझ्या मैत्रिणीच्या ऑफिसात असते हो. तिला नातू झाला नुकताच!" अशी 'व्हाया' मैत्रीही चालते. अगदी 'ताप आलाय' म्हणून रजा घेतलेल्या दिवशीही या मैत्रिणींच्या ओढीनं गाडी न चुकवणाऱ्या बायका मुंबईत भेटतात! रोजच्या सारखी ठाण्याला लोकल पकडायची आणि प्रवासभर गप्पा मारून व्ही.टी.हून उलट्या गाडीने आपल्या हिवतापलेल्या घराकडे परत! त्यातच मेंदीचे वर्ग रंगतात, विणकामासारखे लघुउद्योग चालतात, टिकल्या-पिनांची खरेदी आटपते. बायकांच्या डब्यात तुम्हाला कधी पत्त्यांच्या चौकड्या दिसायच्या नाहीत आणि पुरुषांच्या डब्यात गाण्यांच्या भेंड्या ऐकू यायच्या नाहीत. खरं म्हणजे आमच्या भिशीतल्या सुखवस्तू शेजारणींपेक्षा या आयुष्यभर डबलड्यूटी करणाऱ्या कर्मचारिणींमध्ये कॉलेजकन्यांसारखा चिवचिवाट, उत्साह, हौशीपणा टिकलेला पाहिला तेव्हा मी अंतर्मुखच झाले.

कुणाला सांगू नका; पण इतकी वर्षं लोकलमधून प्रवास करण्याचा अनुभव असूनही एका सकाळी गडबडीत मी चुकीच्या फलाटावरून उलटीच गाडी पकडली. मला पोचायचं होतं सुपरफास्ट गतीने ग्रॅन्टरोडला आणि ही गाडी निघाली होती मला पार्ल्याहून उचलून घेऊन थेट गोरेगावापर्यंत. मध्ये कुठे थांबणारच नव्हती! मी कल्पनेनेच नर्व्हस झाले. मला त्या दिवशी अमुक वेळेच्या आत ग्रॅन्टरोडला एका अंत्यदर्शनासाठी पोचणं अत्यावश्यक होतं आणि गाडी पळत होती उलट दिशेला. आजूबाजूच्या बायकांकडून सल्ला मिळाला; "गोरेगावला तिथे आहात अशाच बसून रहा. हीच गाडी उलटी जाते. आणि मध्ये कुठेही उतरलात तरी आता हिच्या आधी पोचणारी गाडी मिळणं शक्य नाही." गोरेगावला पूर्ण डबा मोकळा झाला. आणि दारातून धडाधड करत नव्या कर्मचारिणींचा जथा गाडीत घुसला. पुन्हा माझ्या भोवतीचे सगळे बाक भरून गेले. मुंबईतल्या पध्दतीने मी पुन्हा एकदा माझ्या याही सहप्रवासिनींकडून माझं शंकानिरसन करून घेतलं. मी बसून राहिले तेच बरोबर होतं. नव्याने चढलेल्या तरुण स्त्रिया जरा जास्त शिकलेल्या वर्गातल्या चाकरमान्या होत्या. गाडी सुरू होताच त्यांच्यातल्या एकीने आपल्या जवळची मोठी स्टेनलेसस्टीलची बरणी उघडली. आतले पेले काढले आणि आपल्या ग्रुपमधल्या प्रत्येकीला

ती त्यातला आंबरस पेल्यापेल्यांनी पाजू लागली. ‘घे ग! आणखी हवाय का? अग घे, बी व्हिटॅमिन भरपूर असतं त्यात!’’

मी न राहावून शेवटी चौकशी केली तेव्हा जवळचीने खुलासा केला. ‘‘आम्ही उन्हाळाभर रोज एकेक जण असा सगळ्यांसाठी आंबरस आणतो, गाडीतच संपवतो.’’ चर्चगेट येताच आपापल्या कचेऱ्यांच्या दिशेने पांगणाऱ्या या ऑफिससख्यांची ती आंबरसाची पंगत माझ्या कायमची लक्षात राहाणार आहे.

एखादा ग्रुप सकाळीच हिरीरीनं गाणी म्हणत चाललेला असतो! अशाच एका संगीत ॲकॅडमीत मी एका दाक्षिणात्य मुलीला चक्क ‘देहाची तिजोरी’ पासून ते ‘इंद्रायणी काठी’ पर्यंत मराठी भक्तिगीतांचा फडशा पाडताना ऐकलं! उच्चार चुकला की तिच्या मराठी मैत्रिणी तत्परतेनं सुधारत. थेट चर्चगेटपर्यंत तिची साधना एक्स्प्रेस चालूच होती. दोघी उतरून फ्लोरा फाऊंटनच्या दिशेनं चालू लागलो, हसलो. ‘‘तू तर छानच म्हणतेस की आमची गाणी!’’ मी म्हटलं, ‘‘पण एवढं करतीयस तर शब्दार्थ पण समजून घे. भक्तिगीतं नुसतीच ‘करेक्ट’ म्हणून काय उपयोग! त्यांच्यात ‘भक्ती’ नको?’’ तिनंही फार समजून माझे आभार मानले. आता पुन्हा कधी भेटली- आणि गात नसली - तर मी तिला ओळखणारही नाही!

एखाद्या कावल्या क्षणी गर्दीचा रेटा, उकाडा आणि धक्के असह्य झाले की मग डब्यात भांडणाचं गळू फुटतं. जमेल त्या भाषेत अद्वातद्वा होतं. डबा कलकलाटानं भरून जातो. बाकीच्या बायका थोडा वेळ समजंसपणे निचरा होऊ देतात. अतीच झालं की झुंज सोडवू पाहतात, पण दोन्हीपैकी एक पक्ष उतरून गेला तरी मधूनमधून कढ येतच राहतात...

चिरडीला आलेल्या माणसांच्या अशा चिवड्यातनं जीवानिशी सुटून आलेली एक मैत्रीण मला सांगत होती, ‘‘काल एका बाईनं माझ्या निऱ्या आपल्याच समजून खोचल्या हो! मी सांगायला गेले तर माझ्यावरच खेकसते, ‘वा गं! तुझ्या निऱ्या मी कशाला खोचीन? कॉटन आणि सिल्कमधला फरक नाही का कळत मला?’’ शेवटी मग म्हणाली, ‘बरं आता खाली उतरल्यावरच बघू काय झालंय ते!’’ एकमेकींच्या निऱ्या खोचलेली ही सयामी जोडी खाली कशी उतरली असेल, कल्पना करता येते?

पण तशातच कुणाला चक्कर आली की तिचं वारा, पाणी होतं. दोघीतिघी तिला घेऊन स्टेशनवर उतरतात. बाकीच्या तिचं मासिक चालत्या लोकलमधून खाली टाकून ओरडून सांगतात, ‘‘नीट घरापर्यंत पोचवा ग, नाव

पत्ता विचारून!''

काही वेळा बोडणात कालवल्या जाणाऱ्या या बायका ख्रिश्चनांच्या त्या कन्फेशन बॉक्समधल्यासारखं खूप खरं, खासगी आणि प्रामाणिकही बोलून जातात. एकदा माझ्या एका चाहतीनं मला ओळखलं! ''बरं झालं, आज तुम्ही तरी भेटलात! नाही तर आज अशी वैतागून घरी चालले होते मी.. अहो, आज दिवसभर हिंडूनही एकसुद्धा काम झालं नाही. ऑफिसचंच हो, पण जिथं जिथं वसुलीसाठी गेले तिथं नाटच लागला! टेबलावरचं काम तसंच राहिलंय, उद्या तो ढीग दुप्पट होणार. वर बॉस अशा नजरेनं पाहणार की काय खरंच गेला होतात की घरी पळ काढलात. फोन करून 'चेक' पण करणार नाही मी खरंच गेले होते की नाही ते. तिकडे सासूबाईंना वाटत असतं की घरकाम चुकवायला मुद्दाम उशीर करते. आता तुम्हीच सांगा, कोणती बाई लवकर येणं हातात असताना असा बाहेर वेळ काढील... ?''

'स्त्रीशक्ती' चा प्रत्यय मला आला तो अशा चौफेर भावनिक लढाया देऊनही आयुष्यातली रंगरंगोटी, हौस आणि गाणी टिकवून धरणाऱ्या या बायकांमध्ये.

उतरताना पुन्हा मनात आपोआप दैववाद आणि प्रयत्नवादाची सांगड घातली जाते. 'उतरायचंय?' करत मधल्या 'अनाडी' बायकांना मागं सारून शक्य तेवढं दारापर्यंत पोचायचं, पर्स, साडी, श्वास, पोटही आवळून धरायचं. धक्का आपण मारत नाही आहोत हे स्पर्शातूनच पुढच्या बायकांना पटवायचं. शक्य तेवढ्या पुढच्या कडीत बोटं ओवून शरीरं दाराच्या दिशेनं झेपावून धरायची. हळूहळू वय, वर्ग, जात, भाषा यांच्याबरोबरच संकोच, उकाडा, चोरीची भीती - सगळ्याच भेगा लोपून खाली उतरण्याच्या एकाच महत्त्वाकांक्षेनं भारलेला, मुसंडी मारायच्या पावित्र्यातला, विशिष्ट कोनात वाकलेल्या आकृत्यांचा एक मोठा थोरला 'आम्ही' चा गोळाच तयार होतो. फलाट आला की समोरच्या अरुंद दारातनं ही ढेप भसाभस कोसळते आणि उलटीकडून चढायला बघणाऱ्या तुल्यबळ शिक्रणीत मिसळून जाते...

एकदा त्या निर्णायक क्षणी एका बाईचा मूल वाचवायचं की चप्पल वाचवायची असा अग्रक्रमांचा गोंधळ उडाला आणि गाडी सुटली तशी एका बाईनं तिला दोन्हीसकट वर खेचून एक सणसणीत थप्पड ठेवून दिली! तेव्हा कुठं डब्यातल्या बायकांच्या मनावर आलेला ताण कमी झाला! मनात आलं, रोजच्या रोज अशा जीवनसंग्रामाला तोंड देणाऱ्या चेंपल्याचेमटल्या माणसांची मानसिकता बदलल्याशिवाय कशी राहील!

भारतीय बायकांना कुणीतरी झुरळाच्या खालोखालची चिवट जात ठरवलं आहे! पोरं पाठीशी बांधून, परिस्थितीवर स्वार होऊन, कधी घर-दार-संसार, तर कधी कचेरी-व्यवसाय आणि कधी दोन्ही सांभाळणाऱ्या, सकाळी पुष्पगुच्छ आणि संध्याकाळी पालेभाजीच्या जुड्या होऊन प्रवास करणाऱ्या बायकांचा हा स्त्रीशक्तीनं भरलेला डबा...प्रसंगी 'गर्दीच्या मानसशास्त्रा'ला बळी पडून पागलखाना कसा बनतो हेही एकदा पेपरात वाचलं.

गर्दीच्या वेळी बोरिवलीच्या गाडीत अंधेरीवाल्यांनी चढायचं नाही, हा परस्पर प्रवाशांनीच केलेला नियम एका गर्भवतीनं मोडला. अंधेरीला उतरण्याचा तिचा प्रयत्न पाहून बाचाबाची झाली असणार. तिची परिणती अमानुषपणात होऊन त्या दिवशी त्या स्त्रीशक्तीनं तिला अंधेरी स्टेशन येताच ढकलून दिलं नि पोटातल्या बाळासकट ती जीवाला मुकली! थेट पुण्यापर्यंत 'मुंबईतली माणसं माणुसकी विसरल्या'चा थरकाप उसळला.

कर्मधर्मसंयोगानं दुसऱ्या दिवशी गर्दीच्याच वेळी मी चर्चगेटला गाडी पकडण्याच्या प्रयत्नात होते. मुसंडी मारणार तेवढ्यात लक्षात आलं, गाडी बोरिवलीची होती. मला पार्ल्याला उतरायचं होतं आणि वेळही बरोबर तीच होती.

गाडी सोडावी का, म्हणून मी क्षणभरच घोटाळले. पाय मागं घेतला; मग मनातल्या 'नको रे बाबा' ला 'काही होत नाही' म्हणून गप्प केलं आणि पुन्हा पुढं झाले. अशा अपवादात्मक प्रसंगाचा धसका घ्यायला मी कच्च्या दिलाची थोडीच होते! मला वाटतं, कदाचित इतक्या वर्षांनी, त्याच क्षणी मी खऱ्या अर्थानं 'मुंबईकर' झाले!

■ ■ ■

# सर्किट

○

पावसाळ्यातल्या एका दुपारी एक जवारिया माझ्या मुलीच्या सतारीची जवारी काढायला आला. जवारी काढणं म्हणजे ट्यूनिंग करणं. वाद्याच्या सर्व भागांना सुसंवादी करून वाद्य पुन्हा एकदा कार्यक्षम बनवणं. तो येणार आहे हे मी विसरलेच होते. नाही तर मी हॉलमध्ये, जमिनीवर जलतरंगासारखी माझी कागदपत्र मांडून बसले नसते.

जवारियाचा आवाज ऐकून लेकही सतार सांभाळत बाहेर आली, आणि माझी धांदल वाढली. मी त्यातल्यात्यात क्रमश: कागद उचलण्याचा प्रयत्न करत असल्यामुळे आणखीच वेळ लागत होता! एव्हाना तो जवारिया आणि त्याच्याबरोबरचा मनुष्य कोचावर येऊन बसले होते. ''बाई, हे काय करता तुम्ही?'

''मी लिहिते!'' मी संकोचून म्हटले.

''मग हा काय रिसर्च चाललाय का? कुठल्या विषयावर लिहिताय?'' चुरगळलेल्या कागदासारख्या दिसणाऱ्या त्या माणसाला कोणत्या शब्दांत, काय सांगावं हे मला कळेना. मग धडाकून म्हटलं, ''हा शास्त्रज्ञ आणि शस्त्रास्त्रनिर्मितीचा इतिहास आहे. म्हणजे, त्यातली माणसांची गोष्ट. पुढे शास्त्रज्ञांच्या नैतिक जबाबदारी, सामाजिक बांधिलकीपर्यंत जाईल ती.''

जवारियाला तेवढ्याने त्या विषयाचा आवाका जाणवला! ''वा, मोठं काम आहे! तुम्ही प्राध्यापक आहात?''

मी हसून 'नाही' म्हटलं आणि आत गेले. दुपारभर मग त्याचं सतारीच्या तारा बदलणं, बदाम, पिस्ते तासणं चालू राहिलं. दरम्यान, दोनदा चहा झाला.

''बरंच वेळखाऊ काम दिसतंय?''

''पूर्वी मी दिवसाला तीन सतारी करायचो, बाई! आता वयामुळे वेळ

लागतो.''

त्याच्याबरोबरचा तो इसम आल्यापासून नुसता बसून होता. ''हे मदतनीस वाटतं तुमचे?'' म्हाताऱ्याने त्याला कपबशा ठेवायला आत धाडलं, ''नाही, मुलगा आहे माझा. डोक्यानं कमी आहे, म्हणून बरोबर घेऊन फिरतो.''

''बाई, मी पण आमच्या या लायनीतलं संशोधन करतो. म्हणून तुमचं काम मला कळालं.'' आता चाट पडायची पाळी माझी होती. ''शासनाकडून मला त्याबद्दल पुरस्कारही मिळालाय, दहा हजार रुपये.''

बुवांची हकीकत स्वतंत्रपणे ऐकण्यासारखी होती. त्यांची बायको नऊ वर्षं आजारी होती. बुवांनी दोन लहान मुलं सांभाळून तिच्यावर पाण्यासारखा पैसा खर्च केला. त्यासाठी दादरची जागा विकून कळव्याला खोली घेतली. शेवटी ती गेलीच आणि हा मुलगा असा. धाकटा मात्र बापाच्या कामात इतका तरबेज झाला होता की ट्यूनिंग करायला टॅक्सीने, विमानाने जात असे! पण दोन वर्षांपूर्वी 'षण्मुखानंद' च्या समोर टॅक्सीचा अपघात होऊन तो वारला. लग्नाचा होता, सगळ्या कागदपत्रांवर बायकोकरता 'नॉमिनी' ची जागा मोकळी ठेवलेली! पण बुवांच्या चहात्यांनी त्यांना सगळी नुकसानभरपाई मिळवून दिली.

''दोघांना काय लागतं? पैशाची मला कमतरता नाही. पण दुसरं काय करणार, म्हणून असा फिरत असतो.''

त्यांचं दु:ख मुरलेलं होतं. त्यामुळे आवाज सहज होता. पण त्यामुळेच मला त्यातलं कारुण्य गडद वाटत होतं.

निघताना तर म्हातारबुवांनी षट्कारच ठोकला, ''बाई, तुम्ही जे काम करताय ते चांगलं आहे. तुमच्या मनाच्या समाधानासाठी ते जरूर करा, पण त्यानं काही व्हायचं नाही! अहो, माणसांची दानतच फिरलीय. पुस्तकं वाचून माणसं सुधारत, बदलत असती....''

मी त्यांना पुरेसं चिवट आणि जिवट असं काहीतरी उत्तर दिलं. पण मी गंभीरही झाले. इतकं सोसून, जग आणि माणसं पाहून त्यांनी केलेलं ते ज्येष्ठ विधान होतं.

त्यानंतर पाठोपाठ अशाच व्यक्ती आणि विधानं भेटत गेली की त्या जवारियाचा मला विसर पडू नये.

शीख अतिरेकी खलिस्तानच्या प्रश्नाला पाहता पाहता धार चढवत नेत होते. पेपरात रोज सर्वांत जास्त अस्वस्थ करणाऱ्या बातम्या त्याच असायच्या. आमच्या घरी माझा नववीतला मुलगा, सगळ्यांत मन लावून पेपर वाचणारा. एके दिवशी पहाटे हा मितभाषी मुलगा पेपर वाचता वाचता एकदम म्हणाला,

"आई या देशाचं आता खरं नाही!" त्याच्या निकाली स्वराला आणि भेदक वाक्याला आम्ही हसलो. आणि तोही असलं भाकित करून खेळायला निघून जाण्याइतपतच मोठा होता. पण वाढता अलगतावाद देशाला पोखरून टाकतोय हे पोरांसोरांनाही जाणवू लागल्याचं लक्षण होतं.

दरम्यान, मला माझ्या एका वयस्क पत्रमित्रांचं उत्तर आलं. मी त्यांना काही संदर्भ विचारले होते. माझ्या पत्रात त्यांना चौफेर आशावाद जाणवला असावा. "तुमच्यासारखी माणसं पाहिली की मनाला उभारी येते." त्यांच्या पत्रात होतं, "एरव्ही शिक्षण क्षेत्रापासून राजकारणापर्यंत सगळीकडे इतका अनाचार, अनागोंदी बोकाळलीय की अलीकडे मन उद्विग्नच असतं."

मी त्यांना काय ते उत्तर दिलं आणि मग अर्धवट गमतीने लिहिलं. "-किंवा असं म्हणा, की मला माझे भ्रम टिकवायचेत. गमवायचे नाहीत!"

भ्रम-इल्युजन- हा शब्द मी अपघाताने वापरला नव्हता. नुकतीच एका विद्वानांच्या निष्क्रियतेबद्दल मी तणतणले होते. तेव्हा एका प्राध्यापकमित्रांनी मला समजावलं होतं, 'त्यांचं काय झालंय, त्यांचे सगळे भ्रम हरवलेत! माणसाला काम करत ठेवायला काहीतरी आभास लागतात!'

या टप्प्यावर, समाजवादी नेते श्री. नानासाहेब गोऱ्यांना भेटायचा योग आला. मी कोणतेही निश्चित प्रश्न घेऊन गेले नव्हते, पण भिंद्रनवाल्यांची समजूत काढायचा प्रयत्न नुकताच फसलेला असल्यामुळे, सगळीकडे अंधारून आल्यामुळे किंवा अंशतः वयामुळेही असेल; तेही अचूकपणे समेवर आले, "मला नाही वाटत, आपल्याला काही भवितव्य आहे..." मी हसले, "रस्त्यावरचा माणूस, शाळकरी मुलगाही हेच म्हणतो. आणि आता तुम्हीही-"

"याला कारण आहे! तरुणांना आम्ही परिवर्तनाचे अग्रदूत मानतो. तेच जिथे फक्त स्वतःपुरतं बघणारे झाले आहेत.... एक देश, ही जर कुठे भावनाच नाही..!"

"पण तुमच्या तरुणपणी तसं नव्हतं! ते केवळ स्वातंत्र्य भावनेने आलेलं तात्पुरतं उधाण होतं म्हणायचं की, त्यावेळचे पुढारी त्या उत्कट देशभावाचा पुरेसा फायदा उठवून, तो टिकवून धरू शकले नाहीत, म्हणायचं?"

"तसंच काहीतरी म्हणावं लागेल..."

माझ्याच्याने त्यांना आणखी छेडणं झालं नाही; पण जिना उतरल्यावरही मला त्या प्रश्नोत्तरांमधलं अपुरेपण जाणवत राहिलं... कुठलाही देश...किंवा माणूस...सतत उचंबळलेल्या अवस्थेत कसा राहील? आणि त्यावेळच्या पुढाऱ्यांना दोष का द्यावा? ओपनहायमर ह्या अणुबॉम्बच्या जनकाने

म्हटल्याप्रमाणे, 'अशा गोष्टींवर नंतर ताशेरे मारणं नेहमीच सोपं असतं-'

घरी आले तो निष्ठेने विज्ञानप्रसार करणाऱ्या एका कार्यकर्त्याचा प्रदर्शनाचं आमंत्रण देणारा फोन. बोलण्याच्या ओघात त्यांना म्हणाले, "अहो, मी समाजकार्याच्या काठावर उभी असते तरी 'खुळ्यात जमा' ठरते. तुम्हाला नाही लोक सिनिक् बनवायला, वेड्यात काढायला बघत?" "अहो, अशा लोकांना स्वतः काही न करता नुसती मुक्ताफळं उधळायची असतात." मी उदाहरणं दिल्यावर त्यांचा ॲप्रोच बदलला आणि आवाजही. "आपल्याला इथे बसून वाटतं त्यापेक्षा खूप काही घडतंय. अंतर्भागात गेलात तर कित्येक तरुण प्रयत्नांची पराकाष्ठा करताना दिसतील आणि जाणवेल की परिस्थिती वाटते तितकी वाईट नाही!"

"...मी उत्क्रांती मानणारा माणूस आहे. असे शेकडो मोड, धुमारे, ठिणग्या फुटतील तेव्हा त्यातलाच एखादा स्फुल्लिंग तेजाळून टाकणारा ठरेल. मी तो स्फुल्लिंग नाही, हे मी जाणून आहे. पण तोवर परिस्थिती सुपीक बनवणं, वातावरण उत्तेजित राखणं, कस वाढवणं, हे तर करता येतं!"

आणि त्यानंतर आला पीटर. मी प्रथमच परदेशी निघाले म्हणून एक स्नेही ह्या शांततावादी, अमेरिकन कार्यकर्त्याला घेऊन आले. "आमची तयारी मजबूत आहे, तिकडे" पीटर म्हणाला, 'यंदा रीगन पडणारच. (पुढे तो प्रचंड बहुमताने निवडून आला!) आमच्यापुढचा खरा प्रश्न आहे; 'मसीहा' चा. आम्ही घरोघर प्रचार करतो तेव्हा लोक आम्हाला खिंडीत पकडतात. तुमचं म्हणणं पटलं, पण तुमच्याकडे काही निश्चित प्रोग्राम आहे का? तिथं आमचं घोडं पेंड खातं. सगळ्यांची मोट बांधणाऱ्या एखाद्या अवताराची जणू आम्ही वाट बघतोय!"

"कदाचित् आपण सारेच!" मी म्हटलं

"अमेरिकेत या. गुन्हेगारी म्हटलं तर अम्मळ वाढलीच आहे."

असा दिलासा देऊन पीटर गेला!

शेवटची समिधा एका लेखकमित्राने टाकली. विद्यापीठातला, शिवसेनेच्या उदयासंबंधीचा प्रबंध त्याला माझ्याकडून मिळवून हवा होता. त्यांच्या पक्ष कचेरीतर्फे वाढत्या जमातवादाच्या निमित्ताने तो काही टाचणं, लेखन करत होता. केवळ कुणाच्या तळमळीने, संघटितपणाने किंवा गणवेषाने मला हुरळायला होत नाही. मी म्हटलं. "अशी कामं तुम्ही नक्की कशाकरिता करता?"

त्यांच्या ग्रुपने अर्थातच या मुद्यावर विचार केलेला होता. "असं पहा, असंच सगळीकडून कापड कोसत गेलं तर हा तंबू केव्हातरी कोलमडून पडणं

अटळ आहे. आज धुगधुगी आहे ती फक्त स्त्री-मुक्तीच्या चळवळीत. एरवी, एकही चळवळ दमदारपणे उभी नाही. कुठे तरी चळवळीने मूळ धरावं आणि तिचा पहारीसारखा उपयोग होऊन हा देश जागा व्हावा, समाजात एक अभिसरण सुरू व्हावं, ही कल्पना, त्यामुळे अधांतरीच आहे.... पण सगळं कोसळल्यावरही राखेतून पुन्हा नवे धुमारे फुटतीलच. तशा शक्यता आपल्यात आजही सिद्ध होताहेत - त्या आमच्या भावी कार्यकर्त्यांसाठी योजना काय? त्यांच्यासाठी आम्ही ही शिदोरी तयार करून ठेवतोय असं समजा!''

इतक्यांचं इतकं ऐकल्यावरही परदेशी जायचं असल्यास मी वेळ चांगली निवडली होती! देश पंतप्रधानांच्या हत्येमुळे दचकलेल्या, वाली हरवलेल्या अवस्थेत होता. पुढे मी तिकडेच असताना इकडे नटनट्यांसमवेत राजीव निवडून आला, ठरला, टिकला... मी परतेपर्यंत हे द्वीपकल्प आणि त्याचं सेमी-तरुण नेतृत्व एकमेकांना रुळली होती. तिकडच्या लोकांनीही ''डू यू थिंक इंडिया वुईल सर्व्हाइव्ह?'' असे बूड उचकटून टाकणारे प्रश्न विचारून मला जागं ठेवलं होतंच.

परत येईस्तो इकडे बरंच घडलं होतं. ते समजून घेण्यात मी असताना पुन्हा लोंगोवालांपासून ते जनरल वैद्यांपर्यंत मध्ये शोभराज चार्लस, शरीयत इ. टप्पे घेत विसंवाद उफाळला. आणि एकीकडे, माहूत मारला गेला तरी आमचा धिमा देश गजगतीने चालतच राहातो हे सिद्ध होतच राहिलं. शीख उसळले तसे मुस्लिम चिडीचूप झाले. देशाचा पायलट पाहता पाहता दमलेला दिसू लागला.

मध्यंतरी आई माझ्याकडे राहायला आली होती. परदेशवारीनंतर दृष्टीचे आणि मेंदूचे काही भ्रम बदलले होते. तरीही, ती तिच्या पिढीतून काय म्हणते ते समजून घ्यावंसं वाटलंच, 'आम्हाला जी आपण टिकू की नाही, ही भीती वाटते ती तुम्हाला कधी, केव्हा वाटली होती का ग?

आईच्या 'यावच्चंद्रदिवाकरौ', वृत्तीतला मासूमपणाही माझ्याकडे नव्हता आणि शहाणपणाही. ''आम्हाला असं तेव्हाही वाटलं नव्हतं आणि आताही वाटत नाही! आपण टिकतोच, टिकू...''

या गोष्टीला फार दिवस झाले नाहीत. पुन्हा पावसाळा आला. इतके दिवस इतर अवधानांमुळे डाव्या हाताने चालवलेलं ग्रंथनिर्मितीचं काम मी पुन्हा नेटाने मध्यभागी ओढलं. एके दिवशी कशानं तरी हे सगळे अनुभव आतल्या आत एकत्र होत आले आणि ठरवलं, 'एशियाटिक' मध्ये जाऊन बसावं आणि हे सगळं लिहून काढून बघावं, आपण कुठवर पोचतोय ते. आशीर्वादाला,

तिथे वर्षानुवर्षं जातक कथांवर संशोधन करणाऱ्या दुर्गाबाई आहेतच.... निघाले नि कळलं मध्यंतरी तो जवारिया येऊन गेला, आज तिसऱ्यांदा यायचाय.

तो चुरगळलेल्या कागदासारखा इसम दाराशी हजर झाला तशी मी त्यांना 'या बसा' केलं. मग हळुवारपणे म्हटलं, 'आज तुम्ही येणार, मला कल्पना नव्हती. मला बाहेर जायचंय!' त्यांनाही मी हा खुलासा का करतेय, असं वाटलं नाही. "जरूर जा..." त्यांनी मान हलवली. मग विचारलं, "ते मागचं तुमचं काम... चालू आहे का अजून ते?"

मी म्हटलं, "हो!" (गिल्टी)

तशी तो जवारिया खूप पसंतीने हसला आणि म्हणाला, "छान, छान! असंच चालू ठेवा!"

बुवांनी हाही उपदेश समजून केला होता, यात मला शंका नव्हती.

ट्यूनिंग करायला झालेल्या, येता-जाता नैराश्याच्या चुळा टाकणाऱ्या सिनिक् बनलेल्या आमच्या देशातल्या, रस्त्यावरच्या माणसालाही माहीत होतं की पडून पुन:पुन्हा उठणाऱ्या, डोलत्या बाहुल्या वाढल्या तरच देशाचा जपान होतो, नाहीतर भ्रम हरवून बसलेला, सांस्कृतिकदृष्ट्या भुगा, भुगा झालेला ब्रह्मदेश.

माझ्याशी प्रश्नोत्तरं करणाऱ्या सगळ्यांना हे इंगित आतून कुठेतरी माहीत होतं, पटलेलंही होतं. ज्या वृत्तीच्या ते विरोधात वाटत होते तिच्याच ते शोधातही होते, शिवाय त्यांचा प्रश्न वरकरणी वाटला तसा तात्कालिक आणि या देशापुरता नव्हता, तो तेवढ्यापुरता सीमित नाही हेही त्यांना ठाऊक होतं. जवारियाच्या त्या तृप्तोद्‌गाराने, 'तथास्तु'ने माझं मला ते पुन्हा एकदा पटवून दिलं होतं.

■ ■ ■

# बिनचेहेऱ्याचं चिटपाखरू

माझ्या मुलाने पहिल्यांदा म्हणजे वयाच्या सहाव्या वर्षी 'टेन्शन' हा शब्द वापरला तेव्हा मी खूप हसले होते. आमच्या लहानपणी आम्हाला हा शब्द लागत नव्हता आणि त्याला पर्यायी शब्दही उपलब्ध नव्हता. आता शेजारचा तुषारसुद्धा म्हणतो, "ए, हळू टाक ना बॉल, मला सॉलिड टेन्शन येतं." माझ्या लहानपणी मोठी माणसं फेसलेस, रूटलेस, आयडेंटिटी हरवणं इ. शब्दही वापरत नसत आणि त्यांना प्रतिशब्द आजही निघालेले नाहीत. त्यावेळी कुणाला हे शब्द लागत नव्हते कारण तसे अनुभवही कुणाला येत नव्हते. बघता बघता कोणत्या अनामिक प्रक्रियेनं या शब्दांचा वापर रूढ झाला?

'रूट्स'चा अर्थ आपल्याला कळायला लागला तो केवळ त्या नावाचा तो अमेरिकन कादंबरेश्वर वाचल्यामुळे नव्हे. मात्र त्या 'रूट्स' मधल्या त्या कृष्णवर्णीय नायकाची थेट आफ्रिकेपर्यंत आपली मुळं शोधत जायची धडपड मला समजली तरी त्या पाचशे पानी प्रपंचाकडे माझ्यातला वाचक आकृष्ट झाला नाही. आपल्या सांस्कृतिक टप्प्यावर आपल्याला तो अनुभव आपला वाटत नाही. आपल्यापैकी बहुतेकांची मुळं आपल्याला हलू न देण्याइतकी परंपरेच्या चिखलात रुतून आहेत. नोमॅडिक अमेरिकनांच्या मुळांसारख्या त्या मिश्रमुळ्या नाहीत. कुणाला 'आमची दोन्हीकडची मूळ गावं पुसून गेली आहेत' हे सांगताना मी जरा खोडकरपणे बोलून जाते, 'आमची मुळं आपली पोर्टेबल आहेत!'

खोडसाळपणा चालू ठेवल्यास असंही म्हणता येईल की आम्हाला थोडी आमची पाळंमुळं हरवूनच बघू द्या की. त्याशिवाय ती एवढी मोलाची असल्यास पुन्हा सापडायची कशी? लमाणांसारखं अगदीच किन्यातून तुटून नव्हे, पण मुळांसकटच थोडं तर उडू द्या... ?

'फेसलेसपणा'चं थोडं वेगळं आहे.

महानगरी संस्कृतीत दाखल झालं की कुणी आपली दखल घेईनासं होतं.

आपला तोंडावळा धुवट, फिक्का होऊन जातो. इथला माणूस स्पष्ट नसतो. मुंबईत आपण म्हणजे क:पदार्थ! लाख्खो बिळांतून बुजबुजलेल्या करोडो माणसांपैकी एक बनायचं आणि हजारोंच्या लोंढ्याने, शेकड्यांच्या भावाने लोकल किंवा बसमध्ये घुसायचं. चर्चगेट किंवा व्ही.टी. पाशी दर पाच मिनिटांनी ढासळणाऱ्या चुरमुऱ्यांच्या पोत्यातला एक चुरमुरा नाहीतर पोहा बनून फेकलं जायचं. आपलं नाव, आडनाव, स्वभाव, वय, जात, वर्ग, धर्म, व्यवसाय सगळंच या प्रक्रियेत सपाट होऊन जातं.

दोन दिवसांच्या पाहुण्यालाही मुंबई होत्याचा नव्हता करून टाकते. पुण्याचा माणूस फोर्टमधे फिरून संध्याकाळी पुन्हा परतीची डेक्कन पकडतो त्याला हेही कारण असावं. मुंबईचं माणसांना निनावी करून टाकणं त्याला पळवून लावत असावं. एकानं म्हटलंही, "अहो, इथे आम्हाला कोण विचारतंय?" तरीही माणसाने कधी ना कधी तरी अफाट नगरीतल्या सपाट माणसांमधे मोडायचा अनुभव घ्यावा. जीवन त्याने चांगलं पचतं.

लहानपणी, आम्ही महाराष्ट्राबाहेर, भाड्याच्या घरात राहणारे 'घाटी' असूनही मला आठवतंय की मला चेहेरा होता. अमक्यांची मुलगी, तमक्या गल्लीतली, अमुक शाळेतली, घाऱ्या डोळ्यांची, केसांना चाप लावून सायकलवरून फिरणारी इ. बायोडेटाही होता. यथावकाश मग 'तसं हिच्यात काहीच नाही, खरं तर' असं लोक मागे वळून पाहून बोलू लागले तेव्हा मी ठरवलं, इतपत शिदोरी आपल्याला पुरे! मग पुणं गाठलं. आडनाव-पत्ता बदलून घेतलं आणि शेवटी मुंबईच्या विराट समुद्रात बिंदू बनून मिसळून गेले. मुंबईनेही इमाने इतबारे आमच्या चेहेऱ्यांवरून बोळा फिरवून आम्हाला 'सारखं' करून घेतलं आणि आम्ही मुंबईकर झालो.

'रावबहादूर खऱ्यांची नात' किंवा 'सड्यावरच्या गणपुल्यांपैकी' वगैरे कधी मी नव्हतेच. पण असते तरी या लाखांच्या पोशिंद्या नगरीनं माझी ती मिजास उतरवून टाकली असती. बाहेरून मुंबईत आलेल्या माणसांचा अनुभव कमी-अधिकपणे असाच असावा.

लहानपणापासून शहरात राहिल्यामुळेही असेल; मला हा अनुभव फारसा कष्टदायक वाटला नाही आणि सतत कुणाची तरी कुणीतरी असण्यापेक्षा तर ते निरोगीही वाटलं. खरं म्हणजे आपल्या गावंढ्या गावीसुद्धा आपण फारसे कुणी नसतोच! लहान वयात मुंबईत आल्याने आपलं हे कुणीच नसणं किंवा फुसकं कुणीतरी असणं आपल्याला वेळेवर कळतं आणि अगदी वैश्विक नाही तरी सामुदायिक पातळीवरचं सततचं घडणं मग सुरू होतं. किंवा कदाचित आपलं कुणीतरी असणं आपल्याबरोबर येतंच असतं. आपण कुठे राहातो हा तपशील ते आपल्यापासून छिनावून घेऊ शकत नाहीत, हेही कळत असेल...!

तसं पुण्याला असतानाही कुणाचं तोंड चुकवण्यासारखं काही हातून घडलेलं नव्हतं. तरी दर पाच मिनिटांनी कुणीतरी भेटणं, हे तरी काय? सतत तोंडापुढे आरसा धरला जाई. त्यात सक्तीने आपलं प्रतिबिंब पाहावं लागे. हा 'अंडर ऑब्झर्व्हेशन'पणा टाळायचा तर जंगलासारखा घनदाट अनोळखीपणा शोधत कॅम्पपर्यंत जावं लागे. तिथे तुम्ही दिसता कसे, घालता काय, कुणाच्या कोण, कुणात मिसळता सारेच जाब गळून पडत. त्या मानाने मुंबईतल्या चेहेऱ्यांच्या अनोळखी गर्दीत पाऱ्यात पारा बनून मिसळून जावं. घटकाभर बेवारशी, बिनचेहेऱ्याचं चिटपाखरू बनून बेगुमान भटकत राहावं... मग माणसांमधे झाडं लावलेली असली काय नि झाडांमधे माणसं उभी असली काय! गंमत म्हणजे सर्वाधिक अंतर्मुखता, एकेरी मला भेटली ती या महाशहराच्या मध्यावरच.

एकदा ही तथाकथित 'कुणी'पणाची कवचकुंडलं गळून पडून तुम्ही रस्त्यावर आलात, उघडे पडलात की आत्मपरीक्षणाचा मार्ग खुला होतो. स्वत:चं जिणं तळहातावर घेऊन निरखता येतं आणि मग वाटतं, एकासारखा दुसरा माणूस नसतो तेव्हा प्रत्येक माणूस तसा कुणी ना कुणी असतोच की! मग चेहेरा हरवणं म्हणजे काय? सुंदर न दिसणं? तर आपण कुणीतरी आहोत असं वाटण्यासाठी आपल्या भोवतालानं आपल्याला कुणीतरी खास समजावं लागतं. समाजाने आपला वेगळेपणा 'अंडरलाईन' करावा लागतो. गावाकडे आपापल्या परीनं प्रत्येकाला भोगता येणारी ही मान्यता मुंबई आपल्यापासून हिरावून घेते.

तुम्हाला सारखी हिडिसफिडीस करणारी, सतत तुमच्या वेळापत्रकाची खांडोळी करत जाणारी, स्त्रीपुरुष, रावरंक, येंडूगंडू, घारेगोरे सगळ्याच सुरकुत्या काढून टाकणारी 'बॉम्बे द लेव्हलर' तुमचा नक्षा उतरवते आणि स्वत:ला जोखण्यासाठी लागणारा 'फिलॉसॉफिकल' अंतरायही तुम्हाला पुरवते. गर्दीचा मग कोरस बनतो, मनाला हे अवघड जात असलं तरी अंती आत्म्याला बरंच पडतं!

शिवाय तुम्ही कितीही यत्किंचित असलात तरी तुमच्या 'नुक्कड'मधे तुमची जागा असते - जी दुसरं कुणी घेऊ शकत नाही. आणि तिथे तुमचा 'इंतजार' ही होत असतो! मग बाहेरच्यांनी तुमचा चेहरा मानला काय, न मानला काय! थोडक्यात, मुंबई तुम्हाला तुमची कॉलर पकडून 'कोऽहं?' हा प्रश्न विचारायला लावणारं गाव आहे.

पुढे मला माझ्या समाजशास्त्रानं महानगरातला हा 'स्व'चा लोप विविध अंगांनी समजावून दिला; मग पाहिलं तर रोजचा पेपरही तेच करत होता! मग लक्षात आलं, चोराचिलटांनाही हा बिनचेहेरेपणा चांगलाच मानवतो. कसंही

वेडंवाकडं वागून पुन्हा महानगरी गोपाळकाल्यात लुप्त होण्याची सोय इथे असते. जगभर जिथे जिथे महानगरं तिथे तिथे ही प्रक्रिया झालेली आहे. महानगरांना तिनं बकाल, गुंड आणि लुटेरं करून टाकलं आहे. मग एकविसाव्या मजल्यावरच्या म्हातारीचा भरदिवसा खून होतो. एकेकट्या, प्रौढ कुमारिका गच्चीवरून जीव देतात आणि बोहारी भर दुपारी ब्लॉकमधल्या गृहिणीची गठडी वळून गेला तरी भोवतालची माणसं फंदात पडत नाहीत. मुंबईचं न्यूयॉर्क किंवा शिकागो होण्याची भीती यातून भेडसावू लागते...

या टप्प्यावर मला व्यक्तिगत पातळीवर एक वेगळा अनुभव यायचा होता. दूरदर्शनवर नेमानं दिसू लागल्यावर पुन्हा माझी 'फेस व्हॅल्यू' वधारली. चेहेरा पाहायला शाळेतली मुलं बस थांबवू लागली. पुन्हा एकदा लोक मागे वळून पाहून 'तसं हिच्यात काहीच नाही खरं तर' असं ठरवू लागले. आरंभी हे सर्व घेता येईना; मग मनात आलं, आजचा चमकता चेहेरा उद्या फटकन मालवला जात नाही. मग प्रसिद्ध माणसांना पावलापावलानं पुन्हा अप्रसिद्ध होणं इतकं जड का जावं?

शेवटचा प्रसंग या प्रसिद्धीप्रकाशात असतानाचा आहे. एकदा मी भर दुपारच्या सणकत्या उन्हात फोर्टमधला हॉर्निमन सर्कलचा बगीचा ओलांडून एशियाटिक लायब्ररीकडे चालले होते. बागेत नेहेमीप्रमाणे फाटकी, कळकट, बिनचेहेऱ्यांची माणसं विसावून होतीच! समोरून एक आंबरशी रंगाचं पातळ नेसलेल्या, लालसर गोऱ्या रंगाच्या बाई येताना दिसल्या. म्हटलं, किती या बाई दुर्गाबाईंसारख्या दिसतायत्! तर त्या दुर्गाबाईच निघाल्या. त्या रणरणत्या उन्हात तळपत, शोडषेच्या उरकानं 'पत्र टाकायला' चाललेल्या!

आम्ही दोन मिनिटं बोललो आणि पुन्हा आपापल्या दिशेनं चालत राहिलो. एक माणूस आमचं हे भेटणं जवळून पाहत होता. बाई चालू लागल्या तशी पुढे होऊन मला म्हणतो, "बाई, आता तुमच्याशी बोलल्या त्या बाई म्हणजे दुर्गाबाई भागवतच ना?" मी 'हो' म्हणून हसले आणि तेच डोक्यावरचं लख्ख ऊन गुलमोहरासारखं रसरशीतपणे फुलून आलं!

खुदकन वाटलं, ज्या महानगरातला, रस्त्यावरचा फाटका माणूस दूरदर्शनसारख्या नव्या, चकचकीत माध्यमावरच्या चेहेऱ्याला सोडून, आयुष्यभर एका जुनाट ग्रंथालयाच्या कोपऱ्यात बसून जैन आणि बौद्ध वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्या तेजस् म्हातारबाईंची वास्तपुस्त करतो त्या महानगराची अजून तरी फिकीर नको, इतक्यात तरी काळजी नको.

■ ■ ■

# मिर्चमसाला

चांगल्या जमलेल्या चित्रपटाची एक खूण म्हणजे आशय आणि अभिव्यक्ती यांचा सुमेळ. त्यात 'काय सांगितलंय' आणि 'कसं सांगितलंय' या दोन्हीपैकी कुणी कुणावर कुरघोडी केलेली असता कामा नये. खरा तर हा निकष साध्या खुशालीच्या कार्डालाही लागू पडतोच; पण चित्रपटासारख्या तंत्रप्रधान माध्यमाच्या बाबतीत तो मुद्दाम अधोरेखांकित करावा लागतो. कारण मी असं पाहिलंय की, चित्रपटनिर्मितीशी कमीअधिक संबंधित असणारी माणसं तंत्र, गिमिक्स् यांना अवास्तव महत्त्व देतात. चित्रपट अखेर प्रेक्षकांना घरी जाताना कोणता परिणाम बरोबर बांधून देतो यापेक्षा कॅमेरे कोणत्या दृश्याच्या चित्रिकरणासाठी किती वापरले आहेत, वगैरेचं त्यांना जास्त महत्त्व वाटतं. याउलट पुस्तकाकडून सिनेमाकडे वळलेल्या प्रेक्षकांना एखाद्या चित्रपटापासून एखाद्या कादंबरीपेक्षा फारशी वेगळी अपेक्षा नसते. त्यांना 'चित्राचा डोळा' फुटलेला नसतो. हा तोल चांगला सांभाळणारा एक लक्षणीय चित्रपट म्हणजे 'मिर्च-मसाला'. 'गर्म हवा' सारखं याही चित्रपटाचं नाव उलट्या अर्थानं फसवं आहे.

दिग्दर्शकाला या चित्तरकथेतून ठोस असं काही म्हणायचंय आणि ते त्याने सर्वसामान्य प्रेक्षकांनाही खिळवून ठेवेल अशा नजाकतीनं सांगितलंय.

स्त्री-मुक्तीचे वारे वैचारिक व ललित साहित्यातून इतर प्रसारमाध्यमांकडे पसरतायत, चित्रपट निर्माते बदलत्या काळाची चाहूल लागून 'केस हिस्टरी'साठी स्त्री संस्थांकडे खेटे घालतायत, अशा या काळात केतन मेहता मात्र स्वातंत्र्यपूर्व काळातल्या एका 'गामड्या'कडे वळतात आणि थेट चालू काळापर्यंत आशय आणून भिडवतात.

कच्छमधलं एक खेडं; त्यांच्या कॅमेऱ्याने तिथली धूळ, शेण, घाम,

दारिद्र्य इ. कठोर वास्तव वगळून तिथलं बुजगावणं, स्त्रियांचे रंगीबेरंगी काचकाम केलेले पोशाख, त्यांच्या उघड्या पाठी, तिथलं ओसाडपणामुळे वैशिष्ट्यपूर्ण ठरणारं निसर्गसौंदर्य आणि लालचुटुक मिर्च्यांचं तिथे घेतलं जाणारं नेत्रसुखद पीक, यातून टिपलंय. मातीने सारवलेल्या झोपड्यांची रचनाही सुगरणीच्या घरट्यासारखी, निरखावीशी वाटणारी....

'एकदा काय झालं', एक गोरा सुभेदार आपल्या शिपायांबरोबर घोडे उडवत, गावच्या पाणवठ्यावर पोचतो. पाणी भरायला आलेल्या ग्रामकन्या भिऊन पाखरांसारख्या उडून जातात. अपवाद फक्त सोनबाई या लवंगी मिर्चीचा.

सुभेदार (नासिरुद्दिन शहा) गावाबाहेर तंबू आणि तळ ठोकतो आणि वसुलीच्या नावाखाली गावकऱ्यांना भरडू, नाडू लागतो...

दिग्दर्शकानं 'टायटल्स' साठी पार्श्वभूमीला घेतलेलं मिरच्यांचं रोप, लाल मिरच्यांचे ढिगारे, गालिचे, टप्प्या टप्प्याने लाल तिखटापर्यंत मिरच्यांची बदलती रूपं, यातलं प्रतीक हळूहळू स्पष्ट होऊ लागतं. त्या दृष्टीने गावच्या बायकांची पहिल्याच दृश्यात करून दिलेली ओळख सूचक आहे.

पहिल्या मुलाखतीत सोनबाई त्या उद्दाम इंग्रज अधिकाऱ्याला बजावते, "नदीचा पलीकडचा काठ घोड्यांसाठी अन् हा अलीकडचा माणसांसाठी वापरायची या गावाची रीत आहे. माणसासारखं मागाल तर तुम्हालाही पाणी पाजू..."

सोनबाईचे (स्मिता पाटील) सुभेदाराच्या नजरेत भरणं, तिच्या नवऱ्यानं रेल्वेतल्या नोकरीसाठी गाव सोडून जाणं (राज बब्बर), मुखियाने आपल्या पुत्रहीन पण तेज गृहलक्ष्मीची चालवलेली पुरुषी दडपणूक, त्याच्या कोवळ्या भावाचं चोरटं प्रेमप्रकरण, साचेबंद, ध्येयवादी शाळामास्तर, डोळे बारीक करून मिशांना पीळ भरत छद्मी हसणारा क्रूरकर्मा खलपुरुष.... आणि या सगळ्यांची योग्य काळ उभा करून त्यात नेटकी लागवड.... चित्रपटाचा मध्य जाणवतो तरी अजून रांगोळीचे थेंब तेवढे काढून झालेले. आपण अद्याप नवीन काही, नवीन पद्धतीने सांगतोय असा दिग्दर्शकाचा आव नाही.

कथानक खरं सुरू होतं, सुभेदार त्याचा मुलाहिजा न ठेवणाऱ्या सोनबाईची शिकार करू पाहतो तेव्हा.... इथवर आल्यावर सोनबाईच्या व्यक्तिरेखेवर एखादा स्वतंत्र परिच्छेद गमावणं जरूर आहे....

सत्तेचं जातं फिरतंय. 'काही जात्यातले काही सुपातले' ही अवस्था पूर्णपणे स्वीकारलेल्या गावच्या पुरुषांनी जणू बांगड्या भरल्या आहेत. आणि तरी घरोघर लहानमोठ्या स्त्रियांची- लाल मिरच्यांची - भरडणूक चाललेली...

दडपशाहीची जणू पात्यांवर पाती रचत नेल्यासारखी...

मात्र संस्कृतीनं, बापानं, नवऱ्यानं कडीकुलपात ठेवलेल्या अवमानित, अपमानित, अवस्थेतही त्यांचा खकाणा बाहेर उधळतो आहेच. बाहेरख्यालीपणात पुरुषार्थ मानणाऱ्या मुखियाची, 'रात्री जिथे होता तिथे परत जा' म्हणून नवऱ्याच्या तोंडावर दार लावून घेणारी, त्याच्या नामर्दपणाचा गावभर डांगोरा पिटून त्याला शह द्यायला बघणारी, त्याच्या मर्जीविरुद्ध मुलीला शाळेत घालू पाहणारी व शेवटी पिंजऱ्यातल्या चवताळलेल्या वाघिणीचं रूप दाखवणारी बायको. (दीप्ती नवल) मार खात खात प्रेमप्रकरण निभावणारी ग्रामकन्या (सुप्रिया चौधरी), अगदी राजरोसपणे सुभेदाराच्या तंबूत रात्र घालवून 'कमाई' करणारी मिसेस् नासिरुद्दिन शहा (?) सुद्धा; साऱ्या तशा तिखट स्त्रियाच. पण या सर्वांपेक्षा फटाकडी असते, सोनबाई.

सोनबाई 'काळी' हे नाव पडण्याइतकी काळी आहे. गावात त्याची चर्चा व्हावी इतकी वर्षं नि:संतान आहे. एक म्हातारी तिला मूल होण्याचा उपाय सुचवते तेव्हा तिला उत्तर मिळतं, "पण मला खरंच नाही त्याची एवढी पडलेली!" नवऱ्याच्या मागेही ही विरहिनी 'कुणाची टाप आहे' करत उन्नतपणे एकटी वावरते आहे. (त्यामुळेच पुढे तिला अहेर मिळतो, 'हिचंच काहीतरी चुकलं असेल, आमच्या नाही ते कुणी मागे लागत?')

सुभेदाराने छेड काढताच सोनबाई त्याला एक थप्पड ठेवून देते आणि मिरच्यांच्या शेतांतून पळत पळत अखेर आसरा शोधते तो गावच्या स्त्री-कामगारांकडून मिरच्यांवर सोपस्कार करून घेऊन त्यांची मिरचीपूड जमवणाऱ्या 'फॅक्टरी'च्या आवारात. अबूमियाँ (ओम पुरी) हा तेथला म्हातारा रखवालदार तिला आधार देतो आणि ती तात्पुरती तरी वाचते.

मिरच्यांचं खुडलं जाणं, झोडपणी, भरडलं, दळलं, कुटलं जाणं हे सारं योग्य टप्प्यावर दाखवून केतन मेहता 'स्त्री जन्मा ही तुझी कहाणी'चं या रूपकाशी असलेलं मिरचीचं नातं नि:संदिग्ध करतो. मिरचीची पूड झाली तरी तिच्यात उधळायची शक्ती, खाट, धग आहेच...

वासनापूर्तीसाठी सोनबाई मिळवणं हा आता सत्तांध सुभेदाराने आपला 'इज्जत का सवाल' बनवलाय. 'हरामजादी को सबक सिखाना पड़ेगा' करत तो निर्लज्जपणे 'एक तरह की लगान' म्हणून गावकऱ्यांजवळ तिची मागणी करतो.

परिसरातल्या शक्ती आता तीनचार ठिकाणी केंद्रित होतात आणि त्यांच्यातल्या ताण-तणावात, रस्सीखेचीत पुढचं नाट्य रंगू लागतं, ते सुभेदार,

सोनबाई, मुखिया आणि अबूमियाँ या चार व्यक्तींभोवती.

'सत्तेपुढे शहाणपण नाही' हे नपुंसक तत्त्वज्ञान कधी आपला भ्याडपणा लपवण्यासाठी तर कधी धूर्तपणानेही राबवणारे गावातले पुरुष सोनबाईला सुभेदाराच्या हवाली करायचा षंढ निर्णय घेतात, तेव्हा शोषणकर्ता आणि शोषित यांच्यातलं बेमुर्वत खोटेपणा आणि लाचारपणाचं, भेकडपणाचं नातं पूर्णत्वाला पोचतं.

गावात मीठ विकायला येणाऱ्या फेरीवाल्याची गाव सोडून जातानाची कॉमेंट, 'इस गाँव का पानी खराब हो गया है.'

गावात मुखियापत्नीने थाळ्या-वाट्या आपटून घरच्या पुरुषासारख्या पुरुषाचा निषेध नोंदवण्यासाठी उभी केलेली गावातल्या 'मुक्त' स्त्रीवर्गाची फळी, फॅक्टरीत अबूमियाँच्या एकखांबी आधाराने प्रतिकाराला सिद्ध झालेली, कैदी स्त्रियांची आघाडी.

आणि सुभेदार व त्याचे शिपाई यांनी फॅक्टरीचा मारवाडी मालक, मुखिया व इतर गावकऱ्यांना फितवून उभारलेली आघाडी... सामना रंगत जातो.

दरम्यान हळूहळू ही व्यक्तींची गोष्ट वृत्तींची गोष्ट बनत गेली आहे. संघर्षाला ऐतिहासिकता आली आहे.

सोनबाईची स्वसन्मानाची कल्पना ही तिची सर्वात मोठी संरक्षण ढाल आहे. 'फॅक्टरीचा रखवालदार म्हणून इथल्या चीजवस्तूंबरोबरच इथल्या कामगारांचा जीव वाचवणं हे देखील माझं कर्तव्य आहे.' असं मानणाऱ्या अबूमियाँची नेक साथ तिला मिळते. दोघं फॅक्टरीच्या अंतर्भागातलं नीतीधैर्य टिकवून धरतात. प्रचंड ताणाखाली असलेल्या त्या बंदिस्त स्त्रियांमधल्या ताणतणावांचे तरंग लाजवाब विणले गेले आहेत. वृद्ध स्त्रियांच्या तोंडून स्त्री जातीची असीम वेदना, कमीअधिक मूकपणाने सोसलेल्या अन्यायांचे व्रण, नैराश्य, त्या ताणाखाली व्यक्त होतात. कधी आपल्यावरच्या त्या संकटाला कारणीभूत झालेल्या सोनबाईला टोचाटोमणे मारणं, हार मानण्याचा उपदेश करणं आणि सोनबाईचं खंबीर राहणं, क्वचित विकल होणं. एका पोटुशीची भीतीने दातखीळ बसणं, बाळंतपणसुद्धा.... हे सगळं जिवंत चित्रण कळस गाठतं ते प्रसूती झाल्यावर अबूमियाँला हर्षोद्‌गाराने बातमी सांगितली जाते तेव्हा - लडकी हुअी हैऽऽऽ!

या 'छोटीशी छोकरी लालबाई नाम है' मुळे दलितांच्या संख्येत आणखी एकीची भर पडली आहे म्हणून त्या आनंदोद्‌गाराला कारुण्याची झालर आहे की आणखी एका चिनगारीचं, भावी सोनबाईचं हे अर्धस्फुट स्वागत आहे?

चित्रपटाची अखेर अपेक्षित, तरीही अनपेक्षित पद्धतीने होते. शिपायांच्या हल्ल्यामुळे फॅक्टरीचा दरवाजा मोडून पडतो. शेवटपर्यंत शर्थीने किल्ला लढवणारा अबूमियाँही बंदुकीची शेवटची फैरी झाडून धुळीत पडतो आणि ही आत्मघातकी लढत संपते. विजयोन्मादाने पुढे झालेला सुभेदार आणि शेवटी निकराची झुंज देण्यासाठी उराशी कोयता आणि नजरेत धग घेऊन उभी असलेली असहाय्य, एकटी तरीही झुंजार सोनबाई यांच्यात आता फक्त काही फुटांचं अंतर आहे... मात्र दोन्ही पक्ष अजून लांडगा आणि कोकरू या प्रस्थापित भूमिका स्वीकारायला तयार नाहीत. तेवढ्यात, डोळ्याचं पातं लवतंय ना लवतंय तोच फॅक्टरीच्या अंतर्भागातून विस्मयकारक वेगाने सोनबाईच्या तरुण मैत्रिणींची कुमक येते. दोघी दोघींच्या जोडीने बायका विलक्षण झपाट्याने सुभेदारावर चाल करून येतात. लाल तिखटाची पोती आवेशाने त्याच्यावर रिकामी होत राहतात.

हा अपेक्षित उठाव बघ्यांना जागच्याजागी खिळवून ठेवतो आणि त्या अंजनाच्या वर्षावाने 'आगबबूला' होऊन सुभेदार रडतभेकत जमिनीवर लोळण घेतो. सुभेदारासाठी, खरं म्हणजे आपल्यासाठी, असलेल्या सोनबाईच्या नजरभेटीत बंडखोरीचं बी विलक्षण तेजानं चमकतं आहे....

सोनबाई आणि तिच्या साथीदारणी जिंकल्या का? वास्तवात, नसतीलही. पण लाक्षणिक अर्थाने इथे जेत्यांची हार झाली आहे. जीत हरूनही जितले आहेत.

चित्रपटाचा हा शेवट स्त्रीजात वस्तुतः पुरुषजातीपेक्षा शक्तिमान आहे, ती आपल्याला डोईजड होईल या भीतीने पुरुषांनी तिला धूर्तपणाने बंदिस्त करून ठेवलं आहे, या काही स्त्रीवाद्यांच्या टोकाच्या समजुतीची आठवण करून देतो.

काही कच्छी स्त्रियांनी गावातल्या पुरुषांचा सहकार लुळा पडलेला असताना जुलमी सत्तेविरुद्ध दिलेल्या या लढ्याची कहाणी, सोनबाईची ही जीत, कुठल्या कुठे नेऊन भिडवते. मूठभर खेडूत स्त्रियांची ही गोष्ट पिढ्यानूपिढ्या स्त्रियांनी पुरुषप्रधान व्यवस्थेविरुद्ध दिलेला आदिम लढा आणि त्यांचं उज्ज्वल भवितव्य यांचा कानोसा घेतेच; पण त्याहीपेक्षा व्यापक अशा मानवी समाजातल्या दलित विरुद्ध शोषक यांच्यातल्या, 'आहे रे' आणि 'नाही रे' मधल्या सनातन लढ्याला ती स्पर्श करते.

अगदी स्त्रीमुक्तीपुरतं बघायचं तरी स्त्री शक्तीचं स्वरूप दाखवताना 'प्रचार' आणि 'प्रचारकी' यांच्यातली रेघ सांभाळून संयत तरीही भेदक हाताळणी कशी करता येईल याचा हा चित्रपट वस्तुपाठ आहे.

विशेषत: समाजातल्या नाडलेल्या वर्गाच्या जिण्याचं कमीअधिक वास्तव चित्रण करून प्रेक्षकांच्या खिशात बरीचशी उदात्त काहीतरी पाहिल्याची आणि थोडीशी नपुंसकत्वाची जाणीव भरून त्यांना घरी पाठवणं ही एक नवी फॅशनेबल 'किक'च आहे की काय असं वाटायला लावणारे अनेक चित्रपट निघत असताना आशावादाचा अंकुर लावून जाणारा मिर्चमसाला वैशिष्ट्यपूर्ण ठरतो. आणि हा आशावाद बेनेगली चित्रपटांप्रमाणे शेवटी डकवलेला वाटत नाही. प्रायोगिक चित्रपट व गल्लाभरू चित्रपट यांच्यामधले दर्जेदार चित्रपट वाढतायत ही हिंदी चित्रपटसृष्टीच्या उत्क्रांतीची खूणही मानायला हवी.

पडद्यावर ही लोककथा रंगवताना केतन मेहताने तिची कादंबरी (उदा. सरस्वतीचंद्र), माहितीपट (सिंहासन), केस हिस्ट्री (उंबरठा) किंवा बोधकथा (अग्निदाह) होऊ दिलेली नाही.

तशी ही अपेक्षित टप्पे घेत विकसित होत गेलेली, सत् आणि असत् यांमधल्या नेहमीच्या झुंजीची कहाणी. पात्रंही नेहमीचीच, काळीपांढरी. खलपुरुष, शाळा मास्तर, होळीचा गरबा, गावचा पाणवठा, बलात्कार, बाळंतपण हे सगळं तसं फॉर्म्युला चित्रपटात बसणारं, गैरवापर केल्यास पटकन् थ्रीलरच्या, मेलोड्रामाच्याच अंगाने जाऊ शकणारं. पण दिग्दर्शक त्याला आपल्या आशयानं, कॅमेऱ्यानं वेगळं परिमाण देतो. अतिवास्तव चित्रणाच्या फंदात न पडता भोवताल तो ती गोष्ट तुमच्या अवतीभोवती घडत ठेवण्यापुरतं जिवंत करतो. माणसं त्याला जे काही सांगायचंय त्याला पूरक एवढीच हाडामांसाची बनवतो. प्रतिमा, श्लेषही ठळक आहेत. तरीही मनोविश्लेषणाच्या जागा तो पुरेशा वाचकांच्या सुबुद्धपणावर सोडतो. काय, कुठे, कसं आणि कितपत दाखवायचं, याबाबतीत कल्पना स्पष्ट आहेत. उदा. सिनेमाभर महत्त्व दिलं आहे फक्त प्रौढांच्या संबंधांना. मुलांना चेहेरे, स्थान, भूमिका नाहीत.

नासिरुद्दीन, ओम पुरी, स्मिता पाटील आणि पाहुणी दीप्ती नवल नेहमीच्या टीममधले हे कलाकार जणू दरवेळी चिठ्ठ्या उचलून किंवा फासे टाकून आळीपाळीच्या भूमिका निवडतात आणि नेहेमीच्या तयारीने रिंगणात उतरतात. इथे नासिरुद्दीनला खलपुरुषाची चिठ्ठी आलीय. व्यंगचित्राकडे जाणाऱ्या लकबींनी त्याने भूमिकेत स्वत:चा रंग भरलाय. आपण एक सुंदर चित्रकथा बघतोय आणि तो आपल्याला गोष्ट सांगतोय हे भान केतन मेहता आपल्याला विसरू देत नाही. त्यामुळे १९३० च्या आसपास सोनबाईसारख्या तडफदार देहाती स्त्रिया असतील का? असे प्रश्न फजूल ठरतात. तरीही व्यक्तिरेखा वास्तववादी बनते ती कामगिरी स्मिता पाटीलची. ओमपुरी, मोहन गोखले, सुरेश ओबेरॉय व

इतर दुय्यम भूमिकाही ठाकठीक. पण कठपुतळ्या कमीअधिक सजीव करून कथानकाचा सुंदर गोफ विणत नेलाय, बाजी मारलीय ती दिग्दर्शकाने.

चित्रपटाला दिग्दर्शकाचं माध्यम म्हणतात हे नवीन असल्यास किंवा पटत नसल्यास 'मिर्च मसाला' पहावा. हे माध्यम त्याच्या मर्यादा आणि ताकद दोन्ही समजून वापरलंय की नाही हा चांगल्या चित्रपटाचा आणखी एक निकष. चित्रपट म्हणजे कॅमेऱ्याच्या भाषेत, प्रतिमांच्या लिपीत सांगितलेली गोष्ट. वेरूळच्या लेण्यातलं कैलास शिल्प एकाच खडकात वरून खाली खोदत नेलंय या शिल्पकलेतल्या चमत्काराची कल्पना नसूनही त्याचं सौंदर्य रसिकमनांना भिडतं की नाही? तसे या चित्रपटात तंत्रकौशल्याचं भान नसलेल्या प्रेक्षकांनासुद्धा दिग्दर्शक, कॅमेरामन, एडिटरची माध्यमावरची पकड जाणवून देणारे अनेक टप्पे, जागा आहेत.

मिरच्यांच्या ढंगदार पिकाची वेळोवेळी घेतलेली दृश्यं तर नेत्रसुखोत्सव साजरा करतातच पण अनेक देखावे सुंदर, चौकट चढवलेली निसर्गदृश्यं पाहावीत तसे नजरेला स्वतंत्रपणे, रंगांची, प्रतिमांची मेजवानी देऊन जातात; जे खरं जपानी चित्रपटाचं वैशिष्ट्य समजलं जातं.

क्षितिजावर आकाशाला दंतुर करत गेलेली माळरानाची कडा, निळं आकाश आणि हिरवं रान आपापलं काम समझदारीने करत असलेले, आणि अशा या निसर्गदृश्यात दोन उमदे घोडे मानेवरची सोनसळी झुलपं चमकवत उजवीकडची चढण चढून दाखल होतात तेव्हा सूर्योदयासारखी त्या अश्वोदयाची स्वतंत्रपणे दखल घ्यावी लागते. गरब्याचा देखावा याच प्रकाराने एखाद्या सुंदरशा 'स्टायलाईझड्' शुभेच्छाकार्डाची आठवण करून देतो. ३०० शॉटसूची ही फैरी आहे. एका फ्रेममध्ये अशीच दीप्ती नवल भरतकाम केलेल्या रंगीबेरंगी पोशाखात कोन साधून शिवत बसलेली. साधी भाज्यांची रसद फॅक्टरीत पोचते तीही असाच दर्जेदार दृकश्राव्य अनुभव देऊन जाते.

लाल मिरच्यांचं सौंदर्य टिपताना लोकेशनच्या सर्व शक्यता मन:पूत वापरलेल्या. अशी अनेक रांगोळीसारखी जमलेली चित्रं एखाद्या शोभादर्शकातल्या बदलत्या रंगरचना पाहण्याचा आनंद नजरेला देतात.... नजरेपुढे पुन्हा, पुन्हा काचमण्यांच्या ओंजळी रिकाम्या होत राहतात....

गतिमानता, टेकिंग, कलात्मकता आणि जरूर तेवढी घटनाप्रधानता या सगळ्यांमुळे मिर्च मसाला हा एक पडद्यावरचा अदाकारीचा उत्तम नमुना ठरतो.

राज बब्बरचं काम ती व्यक्तिरेखा कशी रंगवावी हे ठरलेलं नसल्यासारखी लाऊड झालीय. चित्रपटातली गाणी तेथल्या निसर्गजीवनात, लोकजीवनात

विरघळून जातात परंतु देहाती संगीत आपल्या चाली, गुणगुण मागे सोडून जातं, तसं इथे होत नाही, या काही उण्या बाजू, चित्रपटाला निर्दोषपणापासून दूर नेणाऱ्या म्हणून नोंदायच्या.

केतन मेहताला स्त्री जातीपुढच्या प्रश्नांची सर्वांगांनी जाण आहे, स्त्रीची विवशता, पिळवणूक, तिची स्थिती आणि परिस्थिती, कृती अन् विकृती या सर्वांमागच्या कार्यकारणभावाची उत्तम समज आहे. त्यामुळे सोनबाईच्या नजरेतला - उंबरठ्यातल्या स्मिता पाटीलच्या शेवटच्या नजरेची आठवण करून देणारा - आशावाद खोटा वाटत नाही. जिच्या बळावर स्त्री शतकानुशतकं एक दलित म्हणून लढा देत आली आहे ती चिवट आणि जिवट वृत्ती तो अधोरेखांकित करून जातो, जाता जाता संघटनेचं बळही नोंदवून जातो.

एक द्वितीयांश मनुष्यजातीच्या चालू संघर्षाचं हे चित्रण दिग्दर्शकाची सचोटी, बांधिलकी सिद्ध करून संपतं.

एखादा चित्रपट 'मैलाचा दगड' केव्हा ठरतो? एखाद्या गोष्टीचा नेमका शोध घेतो तेव्हा, डोक्यात एखादा 'किडा' सोडतो तेव्हा, सर्वंकष जीवनभाष्य करतो तेव्हा? काही मूलभूत समस्या, प्रश्न उपस्थित करतो तेव्हा, की आयती उत्तरं, उपाय पुरवतो तेव्हा?

विशुद्ध कलेकडूनही समाज परिवर्तनासाठी निश्चित योगदान मागणाऱ्या, कलेची उपयोगिता तिच्या समाजसुधारणेच्या क्षमतेवर मापणाऱ्या सध्याच्या काळात चित्रपट निर्मितीला आवश्यक असं कलात्मक भान न सोडता कालसुसंगत असं जीवनविषयक भान हा दिग्दर्शक पुरवतो, एवढं सध्या पुरेसं आहे.

बाकी केतन मेहताचा हा तिसराच तर चित्रपट.

■ ■ ■

## कहाणी साहित्तिकेची

आटपाट देश होता.
देशात एक प्रांत होता.
प्रांतात एक साहित्य होतं.
साहित्यात एक साहित्यिका होती.
खरं म्हणजे काय होतं,
तो एक स्त्री-साहित्यिक होता.
तर तो आपला लिहीत असायचा.
आणि लोकं आपली ठरवत असायची :
'पण म्हणजे हा एक स्त्री-लेखक की ही
लेखिका ?'
ही साहित्यातली स्त्री, ही लिहिते ते स्त्री-
साहित्य, की हे आपलं एक स्त्री-मासिकात
घुसलेलं बुरखाधारी मनुष्य ?
हिला शाईटीका म्हणायचं,
की हिच्या नवऱ्याच्या पायाला 'साहि-
त्तिका' झालाय म्हणून चिडवायचं ?
हॅं हॅं हॅं ? नाहीऽऽऽ म्हणजे,
ही विनोदी लेखिका की ही लिहिते हाच
मोठ्ठा विनोद ?
ही विनोद कळणारी लेखिका की विनोद
करणारी ?
तर अशी ही साहित्यिका आपली कधीमधी फोर्टात जायची आणि

दुसऱ्यांचीच पुस्तकं विकत घेत फिरायची. आपली पुस्तकं भेट देऊन खपवायला बघायची, नि वाचनालयं धुंडाळून किडुक मिडुक कनवटीला लावायची.

एकदा काय झालं, ती गेली फोर्टात हिंडायला. तर तिथे तिला भेटल्या देवकन्या-नागकन्या. त्या 'चिंता आणि चिंतनलायक' स्त्रियांची पहाणी करीत होत्या. हिच्या हातात पाहातात तो आपली 'मौजे'ची गंभीर पुस्तकं.

तशी तिच्याकडे निरखून पाहून त्या म्हणाल्या.

'मुली, मुली, तू का नाही लिहीत काही?

-तू नाही ना लिहीतबिहीत काही?'

हिला ते नवीन वाटलं. तिनं विचारलं,

'हा वसा कधी घ्यावा? कसा करावा?'

'तुला गे कशाला होवा? उतशील, मातशील, घेतला वसा टाकून देशील.

पुन्हा आपली स्ट्रँड बुक स्टॉलात जाशील.

घरी जाऊन टीव्ही-टीका करीत झोपी जाशील.

-नुसतीच आपली 'एशियाटिक'ची मेंबर राहाशील.'

साहित्यिका म्हणाली, 'नाही, नाही. उतणार नाही, मातणार नाही.

घेतला वसा टाकणार नाही.'

तर त्या म्हणाल्या, 'निर्मळ मळे, उदकाचे तळे, बेलाचा वृक्ष,

सुवर्णाची कमळे, विनायकाची देवळे-रावळे.

हा वसा जूनमासी घ्यावा. सप्टेंबरमासी पूर्ण करावा.

पशापायलीचं लेखन करावं. अठरा पाकिटं रजिस्टर करावी.

सहा स्त्री-मासिकांना धाडावी. सहांचं सदर बनवावं.

सहा दिवाळी अंकांसाठी ठेवावी. अल्पदान, महापुण्य.'

तशी ती आपली राजाची सून, ब्राह्मणाची लेक, तेल्याची तेलीण इत्यादी कोणी नसूनही तिने हा वसा घेतला. श्रावणमास लागला की काय करावं. दररोज आपलं रात्री जागावं न पहाटे उठावं. चहा प्यावा, लेखनसाहित्य जवळ घ्यावं. आणि दिसामाजी आपलं काहीतरी लिहावं. पसाभर कागद, खुलभर शाई, फुलस्केप पेपर्स नि जीफ्लो लेखणी. दिवाळी अंकांचं पोस्टमार्टम् ऐकावं. दोन पैसे दक्षिणा घ्यावी, आणि व्रताची समाप्ती करावी.

तर तिला जसे संपादक पावले, प्रकाशक गाठता आले, टीकाकार प्रसन्न झाले तसेच ते तुम्हाला-आम्हालाही होवोत. महादान, अल्पपुण्य.

एके दिवशी काय झालं, फिर्त्या वाचनालयवाल्यानं प्रदक्षिणा घातली. एक स्त्री-कथा-विशेषांक तिच्या दारात टाकला. दुसरा निघाला, तिसराही

मिळाला. हिला आपलं कुणीच त्यात धरलेलं नाही. हिचा त्यात साधा उल्लेखही नाही.

तरी हिनं आपलं आपल्याकडून काय करावं, पूजनसाहित्य घ्यावं, सरस्वतीच्या देवळात जावं नि गणेशोत्सवातले कार्यक्रम बुडवून सश्रम निर्मिती करीत बसावं. मुलाखती घ्याव्या, परिसंवादात लिहावं.

'फार लिहितेस' म्हटलं की 'कुठे काय' म्हणावं. 'कमी लिहितेस' म्हटलं की 'कसचं काय', करावं. एक घर चढावं नि दोन घरं उतरावं.

पुढे काय झालं की हिला एक संपादिका भेटली.

हिने विचारलं, 'कसं कसं करावं?'

तर ती म्हणाली, 'स्त्रियांनी आपलं स्त्रियांसारखं लिहावं.

स्लीव्हलेस घालावा, केसबिस कापावे,

पण बाईमाणसानं कसं-दोन्ही खांद्यावरनं पदर घेऊन लिहावं;

नि संस्कृतीचं रक्षण करावं.

पण तुम्हा पुर्षी बायकांना नाही हे कळायचं.'

बायकांनी कशाला बाई माणसांसारखं वागायचं?

हिनं आपलं चाचरत 'मी पण माणूसच आहे' वगैरे केलं. पण उपयोग झाला नाही. स्त्रियांमध्ये तिला घेतलं नाही. 'फक्त पुरुषांमध्ये' तिला करमलं नाही. कुणी आपलं तिला लंगडी गाय ठरवलं. कुणी तिला 'जंटलमन' म्हटलं, कुणी 'गेस्ट आर्टिस्ट' मानलं. तिला आपलं तेच परवडलं.

मग पुढे एकदा एक चर्चामंडळ आलं. तिच्याभोवती गर्बा धरून राहिलं. हिचं लिखाण त्यांनी उसकलं, पासकलं. डावं-उजवं ठरवलं, तुकडा मोडून बघितलं. मग एकदम सामुदायिक गिल्ला झाला,

'तुम्ही लेखक माणसं लबाड असता!'

'सत्यकथे'ला पाठवताना 'तसं' लिहिता,

बाहेर लिहिताना 'असं' लिहिता.'

हिनं विचार केला न् म्हटलं,

'छे छे!' तसं काही आमचं आतबाहेर नसतं.

विषयालाच त्याचं त्याचं रंगरूप असतं.

मग कधी होतो विठोबा, कधी बनतो मारुती.

लिहिल्यावर मात्र आम्ही पत्रिका बघतो,

उपवर मासिकांना सांगून जातो.'

'हां हां, तेच ते! म्हणजे तुम्ही लबाडीच तर करता!

वाचकवर्ग बघून ठरविता.'
'तसं नाही हो....'
'शिवाय तुमची नसते कथा, यमकापुरती देखील नसते तीत व्यथा!
तुम्हा बायकांचं अनुभवविश्व तोकडं, त्यात अस्सल लिहायचं वाकडं.
संस्कार, परंपरा आणि इथली भाषा सगळंच तुम्हाला आमच्या इथलं खटकतं.
शिवाय तुमचं मराठी मराठीच नाही. इंग्रजी तर ते त्याहून पण नाही!'
साहित्यिका बिचारी खट्टू झाली. मौन्यानंच लिहीत राहिली....
तेवढ्यात कुणाचं तरी खुषीपत्र आलं,
'अहो, तुम्ही आता 'सत्यकथे'साठीच लिहा.'
पानांचा विडा, फुलांचा झेला, फूल ना फुलाच्या पाकळीचा मेवा.
गुळखोबऱ्याचा नैवेद्य दावा, घेतल्या वशाचं उद्यापन करा.

म्हणजे कुणाचा तरी गंडा हवा! गंडा नाही, तरी झेंडा हवा. ताईत नाही तर पंथ हवा. कसला ना कसलासा छाप हवा!

साहित्यिका आपली लिहितच राहिली. अस्त्री लेखन, अहिंदु लेखन, अमराठी, अकथा लेखन. तेवढ्यात कुणीतरी कळवळून सुचवलं,

'अहो, तुम्ही तरी साहित्याला सावरा. पहिल्यासारखं, विनोदीच लिहा.
कुणाला ते फारसं जमतच नाही, आजकाल कुणी इतकं हसतच नाही.'
'नाही हो! त्यापरतं तुम्ही आपलं बालसाहित्य लिहा.
मुलांना तुमच्याशिवाय कोण करणार जाणतं?
-बक्षीस दिखील त्यात पटकन् मिळतं!'
'अहो, पण त्या लिहितात ते बालसाहित्यच वाटतं!'
'तुम्ही जरा लिहा वेगळं-सगळंच तुमचं बाई जगावेगळं!!'
'छ्या! तुम्ही तुमच्या बोरूनं समाजसुधारणा करा.
-आम्ही सत्येनारायण करूच हो, पण तुम्ही त्याच्याविरुद्ध लिहा.
स्वच्छ आणि सडेतोड हाणा.'
'अहं, उतू नका, मातू नका, मोबदला मात्र मागू नका.
-नि घेतला वसा टाकू नका.'
लेखिकाही खुलून म्हणाली,
'उतेन कशी, मातेन कशी? घेतला वसा मी टाकणार नाही.
घेतल्या पारितोषिका जागणार नाही. मिर्च्या-कोथिंब्रीसाठी अडणार नाही.
कथा-कादंबऱ्या पाडणार नाही -आणि

दिवाळी अंकातून झळकायला 'हातभट्टी' कधी मी लावणार नाही.'

आणि मग, 'ये जिंदगी उसी की है' गात ती शहीद होत असताना कुणीतरी आपलं टपकन् एक बोचकं तिच्या मांडीवर आणून टाकलं. आकारहीन, काटेरी, आतल्या गाठीचं नि खडबडीत.

'लेखिका' आहेस ना, मग हे सांभाळ. आणि लक्षात ठेव. त्या शिवलिंगासारखं हेही वाट्टेल तिथे ठेवायचं नसतं! इमर्जन्सीत कुठेतरी गळफटलं होतं, शोधून तुझं तुला आणून दिलं.'

'माझं? नाही हो माझं कुठे काय?'

'वा! कुठे काय कसं? तुझ्याच नावाची त्यावर चिठ्ठी आहे. तुझ्या साहित्याचं ह्याला वजन आहे. यालाच तुझी 'बांधिलकी' म्हणतात - विचारवंत मंगळसूत्राशिवाय भुंडे वाटतात! - काहीवेळा आवाळू वाटलं तरी त्याला बांडगूळ कधी समजायचं नसतं.

लेखिकेनं आपली दमलेली बोटं चुरगाळून मोकळी केली, अन् चालता चालताच पुरचुंडी चाचपली - तर चांगलीच जड वाटली! पण बांधिलकी म्हटलं की बांधकाम आलं!

'या, या! या, स्त्रीमुक्ती वाल्या आल्या!'

'छे हो, कुठे काय!'

'म्हणजे तुम्ही स्त्रीमुक्ती मानीत नाही?'

'नाही, तसं म्हणजे...

'I looked around & found I was a liber'-

पण का?' तेवढ्यात दोन-तीन मुक्त स्त्रिया आल्या.

'अरे, ही आपल्यातली एवढी ही नि हिच्या हातात झेंडा नाही?

ए! आता पुरुषांची बाजू घेऊन यापुढे लिहायचं नाही गं.'

'पण म्हणजे मी -नंबर नसला तरी- चष्मा घालू?

शी! आम्हाला तुमचा काही उपयोग नाही! तुमची ना कुठे निष्ठाच नाही.'

'भरल्या पोटीचे सवाल घेता नि ३॥ टक्क्यांना कुरवाळत बसता.'

'परवाचा तुमचा तो खेळण्यांवरचा ललितलेख छान होता बरं का.

पण शेवटी त्यात तुम्ही चमचाभर 'गरिबांचा कळवळा' घातलाच होता!'

'-हल्ली त्याला डिमांड असते ना?'

'लेखनातसुद्धा बी.सी. ना सांभाळावं लागतं ना!'

'नाही हो, मला खरंच कळवळायला झालं!

'इफेक्ट' साठी मी नाही काही लिहिलं!'

'छे हो! हल्ली ती फॅशन झाल्यै.'

'असं करा, मधून मधून तरी थोडं 'ग्रामीण' लिहा.'

'अहो, पण मी शहरात राहते नाऽऽ'

'चू! अशा कशा तुम्ही! ना घाट ना घर, ना आगा ना पिछा?'

'कायरस, कायऱ्या, काय म्हणतोस नायऱ्या?'

तुमचा बैल शेत खातो? आमचा बैल शेत खातो.

आजचा दिवस खाऊन द्या, उद्याचा दिवस खाऊन द्या.

परवाच्या दिवशी काळ्या खुंट्याला बांधून ठेवीन.'

काळा खुंटा मोडला. आंब्याची झाडी झडली. वाटाणा की घाटाणा....

ए, आता तरी सांग, तू कुठल्या पक्षाची? कशाची वादी? उजवी की डावी? नक्की काय साधतेस? कुणासाठी लिहितेस?

तुम्ही लिहिता ते साहित्यच नव्हे. समाजकारण तर त्याहूनही नव्हे!

लेखिका बापडी एव्हाना पिंडली होती. उतू का, मातू का, घेतला वसा टाकू का? लाल चष्मे, हिरवे चष्मे, ही दिंडी, ती दिंडी, डावी झापडं, उजवी झापडं, गणवेषाचं तर हिला वावडं! इथे ठेवू बांधिलकी की तिथे ठेवू! मुक्त मनाच्या अंगणात चालेल? खुल्या विचारांच्या आवारात जमेल? 'माणसानं माणूस म्हणून जगण्याशी' चालेल?

'छे! तुम्ही कीनई हल्ली पहिल्यासारखं लिहीत नाही!'

'शी बाई हल्ली तुम्ही प्रयोगच करीत नाही.'

'तुम्हीच फक्त खरेखुरे ललितलेख लिहिता.'

'(पण मग कथा मी खोटी लिहिते?)'

'अहो, तुम्ही रोज लिहा - तुम्ही अगदी थोडं लिहा.'

'तुम्ही फार खरं लिहिता, -छे, फार खोटं लिहिता.'

'अहो, तुम्ही खरं म्हणजे कंबर बांधा नी कामाला लागा.'

'कोपऱ्यात बसून काय नुसतं लिहिता?'

'पण.... विचारही कुणी तरी करायला नको का?'

'तोदेखील एक कृतीच नव्हे का?'

'अहो, तुम्ही जरा घराबाहेर पडा! घरचं सगळं सांभाळून (मगच) लिहा.'

साहित्यिका बिचारी आता विचार करून शिणली होती. सतत लादलेल्या बांधिलकीचं बोचकं धरून थकली होती. अखेर ती बोधिवृक्षाखाली विश्रांतीला टेकली आणि क्षणात तिला आपली - कामगारासारखी - झोपच लागली.

स्वप्नात तिच्या पुन्हा नागकन्या-देवकन्या आल्या.

'काय, केलीस निर्मिती? झाली फजिती?

ऐका लेखिकाबाई, तुमची कहाणी-

'ऐक, तू आदल्या जन्मी गाय होतीस. पण गरीबबिरीब नव्हतीस!

एका आदितवारी मग दावण तोडून गोठ्यातनं पळालीस.

नि तसं मोकळ्यानंच तुला मरण आलं.

या जन्मी म्हणून तुझं असं झालं. जित्याची खोड मेल्यावरही बाधली.'

नागकन्या हसल्या, देवकन्याही हसल्या. आणि स्वप्नातच साहित्यिकेला साक्षात्कार झाला. आपण कसला वसा घेतलाय हे तिला कळलं.

-कोण्या एके काळी एक तत्त्ववेत्ता होता. त्याचं नाव होतं इरॅस्मस्. तो म्हणत असे, मला कोणत्याही गोष्टीच्या सगळ्या बाजू दिसतात. कुठली तरी एक बाजू माणसं कशी निवडतात?

डोळे उघडले म्हणत डोळेझाक करतात?

लेखिका मग सकाळी उठली, उष्णोदकानं न्हायली, पंचामृतानं धायली आणि स्वच्छ स्वच्छ हसली. मग तिनं सहा रेखांचं कमळ काढलं, सहा तंतूचा तातू केला, त्याला सहा गाठी मारल्या. कागद घेतले, टेबल ओढले, रेघा काढल्या आणि मार्जिन सोडलं. पुन्हा लिहायला प्रारंभ केला.

''एक होता म्हातारा. एक होता मुलगा.

आणि एक होतं त्याचं गाढव.''

गम्मत म्हणजे ही तिची कथा अखेर 'पाळंमुळंवाली' ठरली.

लोकांना ती तिची स्वतंत्र निर्मितीच वाटली! नि एकदाची ती लेखिका नावारूपाला आली. पालखीत बसून साहित्य सम्मेलनाला गेली.

तिला जसा सुर्यनारायण पावला,
गणाधिराज प्रसन्न झाला,
सरस्वतीचा वरदहस्त लाभला,
तसाच तो तुम्हा-आम्हालाही लाभो.
ही एकोणीसाची कहाणी, त्र्याऐंशी उत्तरी,
देवा-ब्राह्मणाचे दारी, गायीचे गोठी,
पिंपळाचे पारी सुफळ संपूर्ण.
(का निष्फळ अपूर्ण?)

■ ■ ■

# मालवते दिवे

चार वर्षांपूर्वी बाबा गेले. त्यांचा मृत्यू मी डोळ्यांनी बघितला नाही म्हणूनही असेल, आता आतापर्यंत मला तो स्वीकारताच येत नव्हता. त्यांच्या नसण्याच्या अनुभवावर मी आपल्या आयुष्यातल्या धावपळीचं झाकण ठेवून दिलं होतं; पण ते काही खरं नव्हतं. पूर्वी मला कल्पनेनं वाटायचं की बाबा गेल्यावर आपण एकदासुद्धा हसू शकणार नाही. पण ते गेल्यावर पाहिलं तर आपण चांगल्या हसतो, खातो पितो.

" मी गेल्यावर तुम्ही चांगलं आईस्क्रीम आणून खा." बाबा माझ्याकडून कबूल करून घ्यायला बघत. मला वाटे, अरे, माझा दु:ख करण्याचा हक्क छिनून घेणारे तुम्ही कोण? मी खुनशीपणाने म्हणायची, "जरूर! पण मी आधी गेले तर तुम्ही आइस्क्रीम खायचं. कबूल?" पण बाबा म्हणायचे, "तू अकाली जाणार तेव्हा मला आईस्क्रीम खावांसं न वाटणंच बरोबर." आम्ही एकमेकांच्या अटी कधीच कबूल केल्या नाहीत.

बाबा माझे मित्र होते. जबाबदारीपूर्वक तरीही चाकोरीबाहेरचा विचार कसा करावा हे मला त्यांच्यामुळे कळलं- शिकता आलं तेवढं मी ते शिकले. त्यामुळे बाबांनी मरणोत्तर देहदान केलं तेव्हा ते आपल्या पुरोगामी विचारांना साजेसं वागले हे चांगलं झालं, एवढीच माझी प्रतिक्रिया झाली.

पण त्यांची ही सत्कृती १९८५ सालच्या पुण्यातही आगळी ठरली. ससूनच्या अधिकाऱ्यांना, पोलिसांना बॉडी कशी घ्यायची असते हेच माहीत नव्हतं. वृत्तपत्रात त्यावरून पत्रव्यवहार झाला आणि त्यातून पुढे देहदानाची चळवळ फोफावली. तेव्हा मला कळलं की ही कृती इतकी जगावेगळी आहे आणि ती आपल्या जन्मदात्याने केली.

आयुष्याला विटून किंवा भोवतालच्या माणसांवर चिडून नव्हे, तर माणूस

जातीच्या भल्यासाठी नियोजनपूर्वक, मरण्यापूर्वी दहा वर्षे कागदोपत्री देहदान करून ठेवणारे बाबा मग वेगळेच असणार. कसे होते बाबा? कुठे घ्यायचा त्यांच्या वेगळेपणाचा शोध?

बाबांच्या फोटोत, विशेषत: अलीकडच्या फोटोत त्यांचा रुबाब कधीच उतरला नाही. आत्मसन्मान हरवलेल्या माणसारखे ते कॅमेऱ्यापुढे मिटून बसत; चेहरा टाकत. आयुष्यावरचा या माणसाचा अभिप्राय काही चांगला नाही. आपणहून काही तो कुणाला ते जगायची शिफारस करणार नाही, असं तिऱ्हाईताला तो चेहरा पाहून वाटावं. मात्र नजर टिपत नाही असं काहीतरी कॅमेरा त्यांच्या बाबतीत टिपायला पाही.

त्यांचा शेवटच्या दिवसांतला एक फोटो मी टेबलावरच्या काचेखाली सरकवून ठेवला आहे. त्या फोटोतले डोळे मला येता जाता थांबवून धरतात. बाबांच्या डोळ्यांची म्हातारपणीही चर्चा होई, इतकी त्यांच्या डोळ्यांची हिरवाई अनोखी होती. फोटोतल्या डोळ्यांना रंग नाही, पण ते डोळे विशेष दु:खी आहेत. त्यांच्या जिवंतपणी कशी ही कारुण्याची छटा आपल्याला जाणवली नाही? का बरं दु:खी आहे हा फोटोतला माणूस? एवढं नक्की की तळ नसलेली ही व्यथा केवळ स्वत:पुरती, स्वत:बद्दल नाही. मग कुणाबद्दल आहे ही कणव? तर एकूणच माणसाबद्दल. 'मी, माझी मुलं, माझी माणसं यांच्या पलीकडचं काहीतरी त्या नजरेत आहे. त्यांच्या देहदानाच्या निश्चयाचं भिंग बनवून या डोळ्यांवाटे त्यांच्या अंतरंगाचा ठाव घेत गेलो, तर काही छडा लागतो का?

त्यांच्या स्वत:च्या लग्नात बाबांनी 'किती खपताहेत ही बिचारी माणसं आपल्या लग्नात' म्हणून एका मित्राच्या मदतीने माडीवर जाऊन भराभर पन्नास गाद्या त्या दमल्या-भागलेल्या वऱ्हाडी माणसांसाठी घालून ठेवल्या! स्वत:ची ठेवून न घेणारे हे नवरदेव पुढे कुटुंबवत्सलावस्थेतही जेवताना तूप किंवा मीठ घ्यायचं राहिलं तर उठून, आम्हाला वळसा घालून स्वत: ते घेऊन येत. आईने, 'मुलांना का सांगत नाही?' म्हटलं की कळवळ्याने म्हणत, 'जेवू देगं बिचाऱ्यांना!' कुणालाही झोपेतनं उठवणं जीवावर येणारे बाबा, पुढच्या माणसाला खाली वाकावं लागू नये म्हणून तांब्या भरून ठेवून मगच बाथरूममधून बाहेर पडणारे बाबा, आपल्या वाढदिवसाला 'मुलांना एक दिवस पोटभर जेवू घाला. वह्यापुस्तकं सगळं नंतर!' म्हणून पोटतिडकेनं आदिवासींच्या संस्थेला देणगी पाठवणारे बाबा, सकाळी उठून त्यांच्या कॉटवर बसून मला चहा पीत वाचताना पाहिलं की 'थांब, थांब तू उठू नकोस' म्हणून पायांवर पांघरूण आणून घालणारे

बाबा, म्हाताऱ्या नोकरांना काम सांगणं जीवावर येणारे बाबा. तरुणपणी प्रत्येक स्टेशनवर हमालाशी हुज्जत घालणारे बाबा पुढे पुढे ते मागतील ती हमाली देऊ लागले. 'अगं, इतकी गरिबी आहे आपल्या देशात!' रजपूत राजे चांदीच्या जात्यावर वेलदोड्यांचं पीठ करत या कल्पनेनं मी हरखले तेव्हा, 'किती गोरगरिबांना उपाशी ठेवून हा ऐष ते करत असतील, याचा विचार कर. विषमतेवर उभारलेल्या ऐश्वर्याचं कसलं कौतुक?' म्हणणारे बाबा. या त्यांच्या वृत्तीनेच व्यापक होत जाऊन त्यांना मरणोत्तर देहदानाच्या कळसापर्यंत नेऊन पोचवलं नव्हतं का? चारचौघांसारखा बाबांनाही कामाचा कंटाळा होता. त्यांनीही स्वार्थच केला. वाहून घेऊन समाजकार्य असं कधीच केलं नाही. उलट, आकंठ धूम्रपान केलं. तरी, परमनप्रवेश करून माणसाच्या गरजा, वेदना समजून घेणारे बाबा मला कृतीशून्य वाटत नाहीत. सिम्पथी आणि एम्पथी या शब्दांमधला फरक नक्की करायला मी शब्दकोशाकडे वळले ती केवळ आपलं इंग्रजी साफसूफ ठेवायला.

बुद्धाच्या, साने गुरुजींच्या, रसेलच्या संदर्भात मी 'अखिल मानवजातीबद्दलची अपार करुणा' नुसतीच वाचली होती. फोटोतल्या त्या डोळ्यात जी व्यथेची रेघ उमटली आहे तिच्यामुळे आता मला ती एक टक्का तरी कळू शकते. आणि मग वाटतं; बाबांपासून प्रेरणा घेऊन देहदानाच्या क्षेत्रात काम करणारे आजचे कार्यकर्ते बाबांचं नावही घेत नाहीत, म्हणून बाबांच्या वतीने त्यांच्यावर रुसण्याचा आपल्याला काय अधिकार? नावासाठी, श्रेयासाठी देहदान केलं, असे त्यांचे हे डोळे सांगताहेत का?

....गजानन जागिरदारांना जाऊन वर्ष झालं. एके काळी ते हनगलसारखे प्रत्येक सिनेमात असायचे. डोळ्यादेखत बापाचा रोल संपून बुढ्ढ्यात जमा झाले, तरी कामं करतच राहिले. एकीकडे पुण्याच्या फिल्म इन्स्टिट्यूटचं संस्थापनही केलं. मला वाटलंच नव्हतं की आमचा कधी संबंध येईल. उदार, अभ्यासू आणि उमदे जागिरदार मला फार आवडले. मी त्यांना विचारलं. 'तुम्हाला अती कीर्तीमान असल्याचा त्रास होतो का हो?'

'रस्त्यात लोक दाढीबिढी ओढून पाहतात तेव्हा होतो. पण एखाद्या दिवशी फिरून परत आल्यावर एकदम लक्षात येतं, अरे, आज आपल्याला कुणी ओळखलंच नाही? बरं नाही वाटत त्यानं.'

नट म्हणून त्यांना भाड्याने जागा द्यायला लोक कचरत त्याच काळात डॉ. ना.भा. खऱ्यांसारखी असामी टिळकांचं काम करणारा जागिरदार दारात उभा आहे म्हणताच प्रॅक्टीस सोडलेली असूनही जागिरदारांच्या अत्यवस्थ भावाला

तपासायला बाहेर पडली होती...

पहिल्या भेटीनंतर आम्ही एकाच टॅक्सीने परतलो. जागिरदारांचं घर आधी लागलं. ते उतरून गेल्यावर टॅक्सीवाला मला म्हणतो, 'बाई, साहेबांनी मला ओळखलं नाही!'

'तुम्ही त्यांना ओळखता?'

'हो. मी एकदा त्यांच्याकडे ड्रायव्हरची नोकरी मागायला गेलो होतो, पण तेवढ्यात त्यांचा जुना ड्रायव्हर परत आला!'

बस् तेवढीच ओळख!

'साहेबांनी सांगितलंय, बाईंना शेवटपर्यंत सोडा.'

पुढे मी जागिरदारांना हे सांगितलं तशी ते पटकन् म्हणाले 'वा! असं कसं सांगेन मी? मग त्याला मीच पैसे दिले नसते का, पुढपर्यंतचे?'

चित्रपटवाले 'काय सांगितलं' यापेक्षा 'कसं सांगितलं' याला महत्त्व देतात, हा माझा आरोप त्यांनी विचारपूर्वक ऐकून घेतला. त्यांची सूक्ष्मात जाऊन विचार करण्याची, ऐतिहासिक दृष्टिकोन ठेवण्याची, खात्री असेल तेवढीच विधानं ठामपणे करायची पद्धत मला आवडली. निघताना माझ्या बोलण्यात आलं, 'नव्या पिढीपासूनही मी खूप शिकते' डोळे मिचकावून म्हणाले, 'जसा मी तुमच्याकडून शिकलो!'

प्रत्यक्षात ज्या दूरदर्शनवरच्या कार्यक्रमाच्या निमित्ताने आम्ही भेटलो होतो त्यात जागिरदार चांगलं बोलेनात. तेव्हा संचालिका या नात्याने भास्कर चंदावरकरांना मी अधिक प्रश्न विचारले. (शिवाय जुन्या पद्धतीने बुजुर्गांना 'आपण' म्हटलं नाही!) जागिरदारांच्या चहात्यांना हे लागलं. तुम्ही चांगलं बोलला नाहीत हे तोंडावर कुणाला कसं म्हणणार? या ज्यानं त्यानं समजून घ्यायच्या गोष्टी असतात. जागिरदारांनी माझ्यावर अजिबात ठपका ठेवला नाही. कार्यक्रमाचं पोस्टमार्टेम करता करताच ते पुढच्या कार्यक्रमात काय काय सुधारणा करायच्या ते ठरवू लागले तेव्हा मी फोनवरूनच मान तिरपी करून विचारलं, 'म्हणजे, पुन्हा तुम्ही माझ्याबरोबर कार्यक्रम करणार?'

तशी जागिरदार मनापासून खूप हसले.

स्वत:चा मोठेपणा कसा घ्यावा हे जागिरदारांकडून शिकावं. जागिरदारांनी माझ्याकडून मुलांना घेऊन त्यांच्याकडे जायचं नक्की करून घेतलं. मीही ज्याला त्याला ते मला किती आवडले ते सांगत सुटले. प्रत्यक्षात त्यांच्याकडे जाणं मात्र झालं नाही. नवी विटी, नवा दांडू करत पुढची कामं होत राहिली, नवीन माणसं भेटत राहिली..

पण आपण होऊन फोन करण्याइतका मोठा माणूस त्यांच्यात होता. आपापली पुस्तकं आम्ही एकमेकांना भेट दिली. आपल्या आत्मचरित्रात त्यांनी बहुतेक स्त्रिया आपल्या गळयातच पडल्या; मग आपला नाईलाज झाला, अशी भूमिका घेतली. ती मला आवडली नाही. पण तेवढं मी त्यांना म्हटलं नाही. पुस्तकातला त्यांचा फोटो होता खराच पुन्हा पुन्हा बघण्याइतका रुबाबदार.

मुंबईच्या साहित्य संमेलनात मला भाषणाचं आमंत्रण डावलून टिवल्याबावल्या करताना पाहून ते सारखे कुरकुरत होते, 'हे बरोबर नाही.'

पुष्कळ दिवसांनी एकदा माझी 'एटी फोर' दादरच्या त्यांच्या धुरू बंगल्यावरून चालली होती. तर बंगल्याच्या आवारात, पांढरपेशा, पांढऱ्या कपड्यांतल्या, माणसांची कोंडाळी उभी. भर दुपारच्या उन्हात, मुक्याने गंभीरपणाने.

जागिरदार गेले की काय? चटका एकदम आतपर्यंत पोचला... इतके ते मनापासून बोलवायचे.... आपल्याला कामं महत्त्वाची ना, माणसं नाहीत! आता काय उपयोग?

कामाच्या जागी पोचले तरी मनातून ते जातच ना. तिथूनच 'दूरदर्शन'चा नंबर फिरवला, 'जागिरदार आहेत ना?'

तेवढ्यात फोन तुटला.

परत येताना ठरवलं, गर्दी दिसली तर पुढच्या स्टॉपवर उतरायचं. उद्या पेपरात वाचण्यापेक्षा-

-तर गर्दी वाढलेलीच आपली! आता उलट कंपाऊंडला लोंबकळून झोपडपट्टीतील पोरं आत डोकावताहेत.

मला काही एकदम आत शिरायचा धीर होईना. शेजारच्या बंगल्याच्या व्हारांड्यात एक धोबी इस्त्री करत होता.त्याला म्हटलं, 'शेजारी काय झालंय हो?'

'शूटिंग चालू आहे, बाई!'

मला हसावं की रडावं कळेना. गतीच्या नियमानुसार एकदम स्वतःचा धावता आवेग रोखताही येईना! तशीच आत शिरून माझ्या नावाची चिठ्ठी आत पाठवली. जागिरदार बाहेर आले. माझे दोन्ही हात धरून म्हणाले, 'वा, वा! आत्ताच मी दया डोंगरेंशी बोलताना तुझी आठवण काढली होती!'

मी खरी त्यांना 'शंभर वर्षं' आयुष्य चिंतणार होते; पण भोवती लोकांचा गराडा होता. 'तुम्ही गडबडीत दिसताय, पुन्हा येईन.'

पुढे जागिरदार एका प्रायोगिक सिनेमाच्या उद्घाटनाला भेटले तेव्हा त्यांना

मी तो विनोद सांगून टाकला. 'मला वाटलं तुम्ही-'

'गचकलात' हा शब्द न उच्चारता मी डोळे वर करून आकाशाकडे हात भिरकावला. त्यांनी पुन्हा एकदा हसून खिलाडूपणा सिद्ध केला.

मग मात्र एकदा मी मुद्दाम ठरवून लेकीसह त्यांच्याकडे गेले. या खेपेस मी चुकून एक स्टॉप पुढेच उतरले. त्यामुळे पोचायला उशीर झाला.- 'तुम्हाला बाहेर गर्दी असली म्हणजेच माझं घर सापडतं वाटतं?' जागिरदार विसरले नव्हते. त्या काळात 'स्वामी'चा आराखडा डोक्यात शिजत असल्यामुळे त्यांचे डोळे लुकलुकत होते. जागिरदार किती तपशिलात जाऊन, रंगून एखाद्या कार्यक्रमाची आखणी करतात, हे त्यांच्या तोंडून ऐकायला मिळालं. मोठ्या माणसांकडून अपेक्षित असलेलं, ऐतिहासिकतेचं भान सतत जाणवत होतं. किती काम करता, म्हटलं तर म्हणाले, 'दॅट कीपस् मी गोइंग!'

त्यांचा झपाटा पाहून मी विनम्र झाले. पुन्हा आम्ही आपापल्या आयुष्यात गडप झालो.'स्वामी' प्रक्षेपित झालं. अडकलं. पुन्हा सुरू होण्यापूर्वी त्यांचा फोन आला. खरी कामं करणारी माणसं दुसऱ्यालाही फोन नाही, पत्रं नाही, म्हणून छेडत नाहीत. ''मध्यंतरी अतिश्रमामुळे आणि 'स्वामी'च्या काळजीने मला हार्ट अटॅक आला होता.''

'अरेरे, कुणी बोललं कसं नाही?''

-तर मालिकेच्या लोकप्रियतेवर परिणाम होईल म्हणून बातमी फुटू दिली नव्हती. 'शुक्रवारपासून स्वामी नक्की पहा.'

शेवटचा फोन प्रतिक्रिया विचारणारा होता. स्वामीतले माधवराव सतत ड्रॉईंगरूम ते ड्रेसिंगरूम एवढाच प्रवास करतात, एवढा एकच आक्षेप मी नोंदवला.

'अहो, 'मराठी'ला घोडे, आऊटडोअर फिल्मिंग कुठलं परवडतंय? हौस म्हणून करतोय, तोटाच होतोय!'

-मला अपराधी वाटलं. मी परदेशी निघाले होते. '''स्वामी' अमेरिकेला नेत असलात तर संपर्क साधायचं काम मी करू शकेन.'' मी विचारलं.

'असं का?' जागिरदारांचा आवाज प्रथमच दुरून आल्यासारखा वाटला, 'पण मी आता थकलो. मालिका पुरी झाली, हेच पुष्कळ झालं.'

मला लाजच वाटली. मधला आजार, त्र्याऐंशीचं वय लक्षात न घेता, समान जीवनगती गृहीत धरून आपण बोललो!

'जाण्यापूर्वी येऊन जा!' मुलांची चौकशी करायला तर ते कधीच विसरले नाहीत.

मी खरंच जाणार होते. पण तेवढ्यात पेपरात बातमी आली. जागिरदार

वारले. घराभोवतीच्या कोंडाळ्यात सामील व्हायला मी गेले नाही. मी त्यांची अंतेवासी थोडीच होते? शंभर वर्षं आयुष्य असलेल्या जागिरदारांनी हातावर तुरी दिली होती.

पेपरात तरी पुनर्भेट होईल म्हणून सगळे मृत्युलेख मिळवून वाचले. पण समाधान होईना. बहुतेकांनी त्यांच्या कर्तृत्वाविषयी लिहिलं होतं; जे चित्रपटविषयक ज्ञानकोशात समाविष्ट होईल. माणूस म्हणून ते केवढे उमदे, साधे, आणि स्नेहशील होते हे कुणीच का लिहू नये?

फोनवरून आशाला, त्यांच्या पुतणसुनेला विचारलं, 'अग, ज्यांनी लिहिलं ते तसे निकटचे नसतील आणि निकटवर्तियांच्या हातून लिहिलं गेलं नाही.'

मी तर बाह्य वर्तुळात कुठेतरी होते. मनात येऊनही मृत्युलेख लिहिला नव्हता. मृत्युलेख लिहायला कुणाला आवडतो?

-१३ ऑगस्ट १९८९ ही जागिरदारांची पहिली पुण्यतिथी.

भावविश्वातली एकेक माणसं अशी दिव्यांसारखी मालवत असतानाच आपली पण विझायची तयारी होते का? आपली पण 'बारी' जवळ येते का?

सुहासिनी मुळगावकरांचं मरण फार जवळून पाहावं लागलं. डोळ्यातून पाणी काढत, जीवनापासून ओरबाडून नेल्यासारख्या, त्या गेल्या. शेवटच्या दिवसांत आमच्या खूप भेटी झाल्या. सूचक अर्थाने आम्ही एकमेकींचा निरोपही घेतला. 'मला वेळेवर हलवा. माझ्यासारखी उंचाडी बाई तुम्ही या चिंचोळ्या दारातनं बाहेर काढणार कशी?' इथपर्यंत त्यांनी आवरत नेलं होतं. तरीही बाई होत्याच्या नव्हत्या झाल्या आणि त्या दोन अवस्थांतला फरक कळला.

मृत्यूचा आघात जबरदस्त असतो. तो कळला की आईला आयुष्यभर पाण्यात पाहाणारा मुलगा आईसाठी धाय मोकलून रडतो, ते मानभावीपणाचं वाटत नाही. मरणाच्या आघातामुळे आत जी उलथापालथ होते, तिच्यामुळे संदर्भ बदलतात. ते जगणं सारांशरूपाने गोळा होऊन येतं. आयुष्यभर न दिसलेल्या छटा स्पष्ट होतात. माणूस दूर जातो आणि गहिरा बनतो. उद्गारांच्या, आठवणींच्या, प्रतिक्रियांच्या आरशाआरशातून दिसणाऱ्या प्रतिमा, एक वेगळंच एकसंध भान पुरवतात. कृतार्थतेच्या, टोचणीच्याही निराळ्याच छटा आपल्या हिरव्यानिळ्या पडलेल्या मनावर उमटतात.

सुहासिनीबाईंच्या बाबतीत नंतर वाटलं, की मृत्युलेख लिहायला हवा होता. निचरा तरी झाला असता.

सुहासिनीच्या रूपाने 'शो बिझनेस' मधल्या एका स्पष्ट व्यक्तिमत्त्वाने

माझ्या कृष्णधवल आयुष्याला तेरा वर्षं चमक पुरवली.

सुहासिनीने खूप लोकांना सुखावलं आणि दुखावलंही. तिच्याबरोबर राहाणं, मित्रत्व, नातं निभावणं, काम करणं काहीच सोपं नव्हतं, नसणार. आता मरणोत्तर, स्वकीयांच्या मनातूनही हा ताजवा जात नाही.

तिच्या दुखण्याची अस्ताई संपून अंतरा सुरू झाला तेव्हा मी रुग्णालयात गेले होते. त्यानंतर मुंबईत नव्हतेच. परत आल्यावर फोन करायचा धीर होईना.

पण तिने त्याही अवस्थेत मला 'प्रवासातले अनुभव' ऐकवायला बोलावलं. चार मंडळी इतरही बोलावली. नक्षीदार पाहुणचार, मूळ केसांबरहुकूम विग, सजावटीखाली झाकलेली थकावट. आजारपणात जडवून घेतलेला पेंटिंगचा नवा छंद पाहिला. "बाई, एवढी धमक, सळसळ तुमच्यात येते कुठून? मी लावलेला अर्थ बरोबर आहे का, सांगा?" असं म्हटलं.

"...तुमच्यात एक चैतन्यातून चैतन्याची भेंडोळी काढणारी साखळी प्रक्रिया घडत असावी!"

सुहासिनीने निराळाच अन्वयार्थ पुरवला. " 'I react to people and people react to me. Then I rereact to people.', अशी माझी प्रक्रिया आहे."

"-लोक कोण?" म्हणणाऱ्या मला या तिच्या उत्तराने एक झरोकाच पुरवला होता.

सुहासिनी अंतर्बाह्य परफॉर्मिस्ट होती. 'शी इज नॅचरली आर्टिफिशियल' हे मी दूरदर्शनवरच्या तिच्या कृत्रिम गुलाबावर चिडलेल्या रसिकांना सांगत असे त्याला विनोदाहून खोल अर्थ होता. माझा मलाच तो तिच्या शेवटच्या दिवसात आणखी कळला. सुहासिनीच्या वागणुकीतले बरेच कंगोरे, आत्मरतता आणि तिचा मोठेपणाही मला या सूत्रात ओवता आला. तिचं शक्तिस्थान कळलं.

पुढे केव्हातरी एकपात्री प्रयोगाची सुरुवातही ऐकायला मिळाली. आपल्या विजातीय सासू-सासऱ्यांना दिल्लीसारख्या अमराठी वातावरणात करमेना, तेव्हा नाट्यवाचन, नाट्यगायन करून त्यांना रिझवणाऱ्या तरुण, अल्लड, लुसलुशीत सुहासिनीची कमनीय छबी डोळ्यांसमोर उभी राहिली; बाहुलीसारखी.

घरी एक-दोन पदं म्हणताना दमणारी सुहासिनी रंगमंचावर टाळ्यांच्या कडकडाटात ४०/४० पदांचा सुरेल फडशा पाडू लागली. प्रसिद्धीच्या प्रकाशाने चिंब झालेली रोमांचिता-

मध्यरात्री अत्यावस्थावस्थेत रुग्णालयाकडे जातानाही गुलाबी रात्रझग्याबरोबर गुलाबीच पादत्राणं मागणारी-कामिनी.

लंच-अवरमध्ये आंबा खाताना सालीसुद्धा पेपर नॅपकीनवर कलात्मकतेनं ठेवणारी- रसिका.

'मौजेच्या छपाईशिवायचं पुस्तक मला हातात धरवत नाही' म्हणणारी चिकित्सिका.

स्वतःच्या प्रत्येक पुस्तकाची शाही पाठवणी करणारी -सदाफुली.

'मी बॅडमिंटन खेळते, पोहते, पळते तेव्हा मी आजी नाही आणि ग्रँडमाँ तर मी नाहीच,'' म्हणणारी आपल्या नातीची 'ग्रॅन्जी'-

तिच्या थाटामाटापुढे तिच्यातला शोधकतेचा धागा फिका पडे. पण कर्करोगाच्या शेवटच्या चढाईतही जपानने औद्योगिकीकरण आणि परंपरा यांचा मेळ कसा घातलाय हे समजून घेण्यासाठी धडपडणारी, एका बैठकीतले अनुत्तरित प्रश्न आठवणीने पुढच्या बैठकीतल्या अभ्यासकांपुढे सारणारी सुहासिनीही अस्सल होती. किती लोक मरणशय्येवरही जीवनेच्छा, ज्ञानेच्छेच्या स्वरूपात, अशी टिकवून धरत असतील?

केमोथेरपीच्या कष्टदायक उपचारांना प्रफुल्लितपणे सामोरी जाणारी सुहासिनी शेवटी टेकीला आली तेव्हा कुणीतरी ज्येष्ठ माणूस तिच्यातला हा 'परफॉर्मन्स' चा कलाबतू ओढूनच तिला शेवटच्या शोसाठी उभी करू शकेल, असं मला अनेकदा वाटलं. पण अशा रेडीमेड 'दुर्गाबाई' मिळवायचा माझा वेडा प्रयत्न कसा सफल होणार?

या आजारातच बाईंनी एकदा आम्हा काहीजणींना आपल्या सुंदर घरात बोलावून एकेक नाजूक फोटो-फ्रेम भेट दिली होती. रंग, डबी, नक्षी सगळंच नेहमीप्रमाणे नजाकतीचं होतं. फ्रेममधली रिकामी जागा जणू आम्हाला आत्मसन्मान शिकवत होती!

कुणाचा फोटो फ्रेममध्ये घालून ठेवण्याच्या पलिकडचं वय आज माझ्याकडे आहे. तिची एक आठवणच मी त्या फ्रेममधे घालून ठेवली आहे.

एकदा दूरदर्शन केन्द्रावरच्या तिच्या टेबलावर खप्पा सुहासिनी आणि एक खुशामतखोर गायक अशी मनोरंजक दुक्कल मी पाहिली. 'केवळ माझा नाही, या माध्यमाचा त्याने अपमान केलाय' म्हणून सुहासिनीने त्याला वाटेला लावलं. वर्षभराने तिथंच त्या दोघांना नव्या कार्यक्रमाची आखणी करताना पाहिलं, 'संपलं वाटतं भांडण?' 'मीच म्यान करून टाकला राग.' सुहासिनी म्हणाली, 'मी असा विचार केला की आयुष्यभर डूख धरण्याएवढे अपराध कितीसे असतात? झाली तेवढी 'ड्युरेशन' बस झाली. आता पुन्हा स्वच्छ संबंध सुरू!'.

'आत्मशिक्षणाचा भाग' बनलेली ही बाईंची आठवण मला लहानमोठे संबंध निभावताना आयुष्यभर उपयोगी पडावी.

शेवटची आठवण याहून खाजगी आहे. एकदाच, आमचं फोनवरून भयंकर वाजलं. व्यावसायिक जीवनात माझं कडाक्यानं झालेलं भांडण असं हे एकच. अशा भांडणांना बहुधा इतिहास असतो. शेवटची काडी म्हणून काहीतरी प्रसंग घडलेला असतो; एवढंच.

माझं म्हणणं होतं, 'टेबलाच्या विरुद्ध बाजूंवरून आपण कामं चांगल्या निभावून नेतोच. मैत्रीचा त्यात गोंधळ नको. मैत्री म्हणणार असाल तर आपण समान. मग त्यात मी वर, तू खाली, हे कसं?'

फोन खाली ठेवल्यावरही माझ्या पिंडाला स्वत:ची धग सहन होत नव्हती.

चार दिवसांनी सुहासिनीबाईंचाच फोन आला, 'तू लहान असून कशी सटकावत होतीस गं मला परवा!'

सुहासिनीचं मोठेपण हे की आपला आत्मसन्मान, अधिकार सगळं बाजूला सारून ते भांडण तिने नुसतं संपवलं नाही; ती ते खऱ्या अर्थाने विसरली. एवढंच नव्हे तर त्याचा उपयोग तिने आमच्या मैत्रीचा दर्जा उंचावायला करून घेतला!

लहरी, दिखाऊ, अहंमन्य नसलेल्या किती अधिकारी व्यक्तींना हे साधलं असतं?

सुहासिनीबाईंना जाऊनही आता काही महिने झाले.

-दिवे मालवण्यापूर्वी मोठे होतात असं म्हणतात. काही दिवे मालवल्यानंतरही मोठे होतात. माणसाला माणसाचं जगणं शिकवून जातं तसंच मरणही. मरणामुळे माणूस, त्याचा स्वभाव, त्याची हयात आपण वेगळ्याच रंगात पाहातो. यशापेक्षा अपयश, उजेडापेक्षा अंधार, जगण्यापेक्षा मरण सार्थ ठरतं, मिळून येतं.

■ ■ ■

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
आ. क्र. 3559
20038
ठाणे शाखा (स्थळ प्रत)

# माणूस माझी जात
## पद्मजा फाटक

स्वतःवर सहज प्रेम करण्याची क्षमता फारच थोड्याजणांकडे असते. अशी माणसं स्वतःवर प्रेम करतात ते स्वतःवर लट्टू होऊन नव्हे, तर इतरांविषयी वाटावी तशी आपल्याच जीवनाबद्दल, कामाबद्दल त्यांना आत्मीयता वाटत असते. स्वतःशी तंटा नसल्याने ती भोवतालच्या जगात सहज मिसळून जाऊ शकतात व इतरांची सुखदुःखं स्वतःची असावीत इतकी आतून आणि सहज प्रवृत्तीनं त्यांना जाणवतात. ही अवस्था म्हणजेच 'माणूस माझी जात.'
पद्मजा फाटकांनी ही अवस्था केवळ अनुभवली असे नव्हे तर ती त्यांच्या व्यक्तिमत्वाचा भागच बनून गेली आहे. व त्याचेच प्रतिबिंब त्यांच्या ललितलेखांमध्ये पडलेले आपल्याला जाणवते. त्यादृष्टीनं या संग्रहातील प्रत्येक लेख महत्त्वाचा ठरावा.

— **दीपा गोवारीकर**

**किंमत : रु. ६०.००**
(म - ७८१)
ISBN 81-7185-615-2

**पॉप्युलर प्रकाशन**

मुखपृष्ठ : पद्मा सहस्रबुद्धे